म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ३६५४
१९६५

# स्वप्न आणि सत्य

'रशिया आणि पूर्व युरोपच्या प्रवासात टिपलेले प्रसंग आणि त्या अनुषंगाने त्या देशातील विविध प्रश्नांचे विवेचन, विश्लेषण.'

लेखक

स. मा. गर्गे

REFBK-0015054
REFBK-0015054

. ग्रं. सं. ठाणें
भू-प्रवास
३६४

# स्वप्न आणि सत्य

स. मा. गर्गे



सन १९८६

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६९२ वि: भू-प्रवास
३६७ २४।४।८६

# स्वप्न आणि सत्य

'रशिया आणि पूर्व युरोपच्या प्रवासात टिपलेले प्रसंग आणि त्या अनुषंगाने त्या देशातील विविध प्रश्नांचे विवेचन, विश्लेषण.'

REFBK-0015054

REFBK-0015054

लेखक

स. मा. गर्गे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५०५४

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९, बुधवार, पुणें-२

प्रथमावृत्ति
फेब्रुवारी १९६५

चित्र
दीनानाथ दलाल

© स. मा. गर्गे

किंमत आठ रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, ‘ शिव-पार्वती ’
४६१।४, सदाशिव, पुणें-२

स्वातंत्र्यप्रिय व झुंजार पत्रकार

आनंद कृष्ण वाघमारे

यांस सादर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६८२ वि: ...
... ३६४ नों. दि. ...

# प्रास्ताविक

रशिया आणि पूर्व युरोपातील काही देशांचा प्रवास करताना जे प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले आणि जाणवले त्यांचें हे सटीप निवेदन आहे. रूढ अर्थाने हे प्रवासवर्णन असेल अथवा नसेल; पण त्यातील प्रसंग, चर्चा आणि मुलाखती मात्र यथातथ्य सादर करण्याचा मी प्रयत्न केला आहे. रशियातील केवळ नवी जुनी स्थळे पाहून प्रवाशाची जिज्ञासा पूर्ण होत नाही, निदान होऊ नये. तसेच, त्या देशाच्या प्रवास-वर्णनासंबंधी जिज्ञासू वाचकांच्या अपेक्षाही केवळ अशा स्थळांची माहिती मिळविण्या-पुरत्याच मर्यादित नसाव्यात असें मला वाटते. रशियातील महान् क्रांती, त्यानंतरचा मार्क्सवादाचा अभिनव प्रयोग, स्टालिनची प्रदीर्घ हुकुमशाही राजवट, आर्थिक नियोजन, त्यातून उद्‌भवलेले प्रश्न आणि प्रसंग, नव्या राजवटीचे बदलते स्वरूप या सर्वांच्या संदर्भात सोव्हिएट समाजजीवनाचा परामर्ष घेतल्याशिवाय त्या देशाच्या यात्रेची सांगता होऊ शकत नाही. अशा परामर्षांचे स्वरूप प्रवाशाच्या मनोभूमिकेवरही अनेकदा अवलंबून असते. माझी भूमिका भक्ताची नाही, तशीच भंजकाचीही नाही. याच भूमिकेवरून मी रशियातील परिस्थिति आणि प्रगती, सत्य आणि सत्ता, वास्तव जीवन आणि प्रचार यांच्या मूल्यमापनाचा प्रयत्न केला आहे.

या प्रवासाचा योग आला तो काहीसा अनपेक्षितपणे. व्हिएन्नाजवळ बादेन येथे १९६० च्या ऑक्टोबरमध्ये जागतिक पत्रकारांचा मेळावा भरला होता. त्या मेळाव्याला प्रतिनिधी पाठविण्यासंबंधी, इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नलिस्ट या भारतीय पत्रकारांच्या प्रातिनिधिक संस्थेला निमंत्रण मिळाले होते. फेडरेशनने निरनिराळ्या राज्यांतील बारा प्रतिनिधींची निवड केली. त्यांत माझा समावेश करण्यात आला होता. मी त्या वेळी, फेडरेशनच्या महाराष्ट्र शाखेचा ( महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ ) सरचिटणीस होतो. जागतिक पत्रकारांच्या मेळाव्याला जोडूनच रशिया, चेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया इत्यादि देशांच्या प्रवासाचा कार्यक्रम त्या त्या देशातील पत्रकार संघटनांनी आखला होता. त्यामुळेच मला या प्रवासाची अपूर्व संधी मिळाली. सुमारे पावणे दोन महिन्यांच्या अवधीत मी विमानाने दहा हजार मैलांचा प्रवास केला.

गेल्या चार वर्षांत मस्कवा नदीच्या पुलाखालून खूप पाणी वाहून गेले आहे. चीन आणि रशिया यांचे मतभेद अधिक तीव्र बनले आहेत. क्रुश्चेव्हच्या पदच्युतीने तर रशियातील राजकारणाचा एक अध्याय संपला. स्टालिनने निर्माण केलेली कोंडी फोडून क्रुश्चेव्हने रशियाच्या समाजजीवनात एक नवा प्रवाह सुरू केला. पण त्या प्रवाहाची दिशा निश्चित होण्यापूर्वीच त्याला सत्तापद सोडावे लागले. पश्चिमेकडे वळले तर पूर्वग्रह; पूर्वेकडे वळले तर चीनचा नवा ग्रह; मागे जावे तर स्टालिनचा काळ; आणि पुढें जावे तर पक्षाची पकड ढिली होण्याचा धोका. अशा अवस्थेत तो प्रवाह सापडला आहे. त्या देशाने शेकडो वर्षे झारची हुकूमशाही सोसली आणि नंतर स्टालिनच्या हुकूमशाहीचे प्रयोग सहन केले. त्याला लोकशाही, उदारमतवाद, सहिष्णुता, व्यक्तिस्वातंत्र्य इत्यादि मूल्यांची परंपराच कधी लाभू शकली नाही. त्यामुळे क्रुश्चेव्हने केलेल्या मर्यादित ' मुक्तते 'च्या मार्गावर आज तो देश अडखळला आहे. मार्क्सवादी प्रयोगातील दोषांची परिणती स्टालिनच्या क्रूर राजवटीत झाल्याचे त्या देशाच्या लक्षात आले आहे, पण त्या कर्मकांडाची इतिश्री करण्याचे धैर्य मात्र अद्याप होत नाही. अशा रुद्ध अवस्थेमुळेच क्रुश्चेव्हची पदच्युती झालेली आहे. पण त्याचा ठसा अद्याप कायम आहे,

रशियाबरोबर युगोस्लाव्हिया व चेकोस्लोव्हाकिया या दोन देशांतील घटनांचा या प्रवासवर्णनात समावेश केलेला आहे. स्टालिनच्या परराष्ट्र धोरणाला पूर्व युरोपातील छोटी राष्ट्रे कशी बळी पडली ( की मुक्त झाली ? ) याची त्यावरून कल्पना येऊ शकेल. मार्क्सवादाची दीक्षा देण्यासाठी स्टालिनने उपयोगात आणलेले ' क्रांति-तंत्र ' आणि आखलेली ' मुक्ति-मोहीम ' यांची पुनरावृत्ती आता पूर्व आशियातील छोट्या राष्ट्रांत घडत आहे. चीनचे तंत्र आणि मंत्र समजण्यासाठी, ' बेलग्रेड ' आणि ' प्राग ' या प्रकरणांतील माहिती, पूर्व आशियातील अलीकडच्या घटनांशी ताडून पाहण्यासारखी आहे.

रशियात प्रवास करताना एक गोष्ट मात्र तीव्रतेने जाणवते. तिचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. भारतात रशियन प्रचार-साहित्य, वृत्तपत्रे, नियतकालिके यांचा सतत महापूर येतो. ललित आणि वैचारिक अशा दोन्ही प्रकारांचे रशियन साहित्य येथे मुक्तपणे वाचावयास मिळते. पण रशियात मात्र भारतासंबंधी जे काही समजते ते फक्त सरकारी यंत्रणेच्या द्वारे आणि तेही सरकारची मर्जी असेल तेव्हा व त्याच पद्धतीने. रामायण-महाभारताचे अनुवाद किंवा काही कथा कादंबऱ्यांची भाषांतरे रशियन भाषेत उपलब्ध होत आहेत व त्यांचे खूप कौतुकही होते. पण भारतातील वृत्तपत्रे, नियतकालिके, भारतात प्रकाशित झालेली पुस्तके यांचा मात्र कोठे मागमूसही नसतो. त्यामुळे भारतातील सामान्य शिक्षिताला रशियासंबंधी जेवढे ज्ञान असते, त्यापेक्षा कितीतरी कमी ज्ञान रशियातील सामान्य शिक्षिताला भारतासंबंधी असलेले दिसून येते.

या प्रवासासाठी मला अनेकांचे सहाय्य आणि सहकार्य लाभले. इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नलिस्ट या संघटनेचे त्या वेळचे अध्यक्ष श्री. मा. वि. साने ( केसरी ), महाराष्ट्र श्र. पत्रकार संघातील माझे सहकारी श्री. ल. ना. गोखले ( किर्लोस्कर ) आणि ' विशाल सह्याद्री 'चे संपादक श्री. अ. वि. पाटील या पत्रकारबंधूंनी मला प्रोत्साहन दिले. तसेच, माझे मित्र जादूगार रघुवीर आणि श्री. जी. डी. शर्मा वकील यांचेही बहुमोल सहाय्य लाभले. सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

पत्रव्यवसायाशी संबंधित असल्यामुळेच मला प्रवासाची संधी मिळाली. या व्यवसायासंबंधी विद्यार्थीजीवनापासूनच माझ्या मनात आवड आणि आकर्षण उत्पन्न करण्याचे श्रेय मराठवाड्यातील ज्येष्ठ पत्रकार, राजकीय कार्यकर्ते आणि ' मराठवाडा ' साप्ताहिकाचे संस्थापक-संपादक श्री. आनंद कृष्ण वाघमारे यांनाच मी देतो. त्यांनी केलेल्या या संस्काराची अंशतः फेड करण्यासाठी मी हे पुस्तक त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमाशी आणि झुंजारवृत्तीशी कायमचे निगडीत करीत आहे.

पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी श्री. रा. ज. देशमुख यांनी स्वीकारली. पुस्तकाच्या लेखनासाठीही त्यांनी वरचेवर मला लकडा लावला, म्हणूनच ते पूर्ण होऊ शकले. त्यांचा मी अतिशय आभारी आहे.

पुस्तकाची सुबक आणि आकर्षक छपाई कल्पना मुद्रणालयाचे चालक श्री. लाटकर यांनी केली. त्यांचे आभार मानतो.

स. मा. गर्गे

२६ जानेवारी १९६५
१२०५/४ शिवाजीनगर
पुणे ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८६४२ वि: भ्र. प्रवास
क्रमांक ३६४ नों. दि. २५।६।६५

दिल्ली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
मुं. शाखा (स्थळ प्रत)

## क्रांतिभूमीचे आकर्षण

दोन तासांत दिल्लीच्या परिसरात प्रवेश आणि अवघ्या चोवीस तासांनी रशियाच्या दिशेने उड्डाण ! विमानतळ...हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे...पामीरचे पठार... चीनचा प्रदेश...अन् रशियाचे पूर्वेकडील महाद्वार–ताष्कंद...

पहाटे चारची वेळ असावी. गाडीत संपूर्ण शांतता होती. प्रवासी झोपले होते, काही पेंगत होते. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. झोंबरे वारे वाहत होते. प्रवासाच्या अनेक कल्पनांनी मनात गर्दी करून सोडली होती. रशियाचा प्रवास हीच मुळी एक अद्‌भुतरम्य कल्पना वाटत होती. काहीशा अनपेक्षितपणे साऱ्या घटना घडून आल्या आणि त्या क्रांतिभूमीचे प्रत्यक्ष दर्शन घडण्याची संधी मिळाली.

रशियासंबंधी खूप वाचले होते ऐकले होते, त्यातून अनेक बरेवाईट पूर्वग्रहही बनलेले होते. मार्क्सच्या विचारांनी आणि लेनिन–स्टालिनसारख्या लोकोत्तर व्यक्तींच्या कर्तृत्वाने भारलेला तो महान् देश. लेनिनची क्रांतिभूमी, स्टालीनची कर्मभूमी आणि आता क्रुश्चेव्हची नवप्रयोग-भूमी अनेक रहस्यमय वलयांनी अवगुंठित झालेली आहे. सतत चाळीस वर्षे तिच्याभोवती पोलादी पडदा पडलेला होता. त्या प्रचंड तटाचा भेद करून जे काही बाहेर येईल तेवढेच सत्य. त्यात अनेकांनी पुरोगामित्वाची अन् प्रगतीची स्वप्ने पाहिली; अनेकांनी हुकूमशाहीचे आणि यमयातनांचे सत्य दिसल्याचे सांगितले. ज्याला जेवढे दिसले तेवढ्याची अतिरंजित चित्रे रंगविली गेली. त्यांत शांतता आणि क्रूरता, दिव्यता आणि अमानुषता यांची परस्परविरोधी चित्रे, प्रचाराचे कार्य करीत होती. त्या प्रचाराच्या चकमकीत देशोदेशींच्या तरुणांची भावनाविवश मने उत्साहित होत होती आणि विदीर्णहि होत होती.

पण अलिकडे क्रुश्चेव्हच्या घनाघाताने त्या पोलादी पडद्याला अनेक फटी पडू लागल्या आहेत. त्यामुळे पडद्यामागील प्रयोग आणि प्रचार तपासण्याची शक्यता उत्पन्न झाली. साम्यवादी सत्य आणि सत्ता, यांचे वास्तव दर्शन घडू लागले आहे. भडक रंगांनी रंगविलेली रशियातील समाजाची चित्रे पारखण्याची सोय होऊ लागली. स्टालिनच्या काळातील कितीतरी रहस्यमय कथांचा विलय होऊ लागला. क्रुश्चेव्हने अनेक भयानक घटनांवर प्रकाश टाकला. त्यांतून नव्या कथा, नवी रहस्ये जन्मास येऊ लागली. या सर्व वादळी घटनांनी सत्याचे असत्य आणि असत्याचे सत्य असे अनेक

चमत्कार घडू लागले. त्या चमत्कारांनी अनेकांची स्वप्ने भंगली, काही जण भांबावून गेले, तर काही जणांना अखेर सत्याची प्रचीती आल्याचा आनंद वाटला.

## अवघ्या काही तासांत

रशियाच्या मनोभूमीत उठलेल्या अशा प्रचंड वादळात स्टालिनची भव्यता कोसळू लागली, दिव्यता उन्मळून पडली. गूढतेचे वस्त्र बाजूला सारून रशियाच्या समाजजीवनाचे निरीक्षण करू इच्छिणारांची गर्दी वाढली. बंदिस्त जीवन कसे होते, कोणत्या दिशेने प्रगती वा परागती करीत होते; यांची कल्पनाचित्रे रंगवीत बसण्याची गरज उरली नाही. अशा संक्रमणकाळात मला रशियाच्या प्रवासाची अपूर्व संधी लाभली होती.

काही तासांतच साम्यवाद्यांचा तो पितृदेश आणि क्रांतिवाद्यांची ती स्फूर्तिभूमी, तेथील समाजवादी मानव, सामुदायिक शेती, प्रचंड उद्योगधंदे, कला, साहित्य असे किती तरी विविध स्वरूपांचे नवे जग पाहता येईल...... अवघ्या काही तासांतच... कल्पनांची गती वाढली होती. भावनांचा आवेगही शिगेला पोहोचत होता. शरीर, मन, विचार सर्व काही रशियाच्या दिशेने उत्कटतेने, वेगाने चालले होते.

गाडीचा वेग मंदावल्याचे लक्षात आले. दिल्ली आली असे समजून खडबडून उठलो. सामानाची आवराआवर करू लागलो. खिडकीतून बाहेर डोकावले. कोणते तरी दुसरेच स्टेशन होते. घड्याळात पाहिले तो दिल्ली बहोत दूर नसली तरी, तब्बल पाऊण तास तेथे पोहोचण्यास लागणार होता. अधीरतेचे, उताविळपणाचे माझे मलाच हसू आले. पण असा उतावीळपणा गेले चार-पाच आठवडे चालू होता. गप्पांचा विषय कोणताही असो शेवटी गाडी मूळपदावर येऊन प्रवासाच्या पूर्वतयारीची चर्चा सुरू व्हावयाची. केवळ एक महिन्यात परदेशी प्रवासाची तयारी होणे शक्य नाही, असे कोणी म्हटले की आपला प्रवास रहित होणार, अशी शंका मनात चमकून जाई. मधून मधून चार-दोन मित्रांबरोबर प्रवासाच्या तयारीची गंभीरपणे चर्चा सुरू झाली की, ही शंका अधिकच तीव्रतेने जाणवायची.

'मी पैजेवर सांगतो, एक महिन्यात परदेशी प्रवासाची तयारी होणे शक्य नाही!' एका मित्राची भविष्यवाणी.

'अहो, कागदपत्रांची जमवाजमव करता करता नाकीनव आले नाही तर नाव बदलून देईन,' एका हितचिंतकाची प्रतिज्ञा.

'आपले ते पेंडसे परवाच अमेरिकेला जाणार होते, पण ऐन वेळेपर्यंत पासपोर्ट हाती पडला नाही. बिचाऱ्याला प्रवासाचा बेत रहित करावा लागला,' एका पोक्त शेजाऱ्यांचा अनुभव.

'तुम्ही स्वतः मुंबईला जाऊन चार दिवस मुक्काम ठोकला तरच वेळेवर सर्व काही जुळून येण्याची शक्यता आहे,' एका सल्लागाराची व्यावहारिक सूचना.

अशा अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. प्रत्येकजण आपले मत छातीठोक पणे सांगत होता.

त्यासाठी अनेक पुरावे सादर केले जात होते. त्यात स्वतःच्या अनुभवापेक्षा इतरांच्या अनुभवाचे प्रमाण अधिक असे. काही सांगीव, काही ऐकीव, काही विपर्यस्त असे किती तरी नमुने त्यात दिसत असत.

अडचणींचा पसारा वाढत होता. निराशेचे ढग जमत होते. प्रवासाला निघायचा मुहूर्त केवळ दहा–बारा दिवसांवर आला, तरी पासपोर्टचा पत्ता नव्हता. आरोग्याची सनद मिळाली नव्हती. शिंप्याचे वायदे संपले नव्हते. इन्कमटॅक्स कचेरीने हिरवे निशाण दाखविले नव्हते. या सर्व अडचणींवर मात करू शकेल असे एक अस्त्र मात्र अद्याप राखून ठेवले होते. पत्रकाराला अधिकाऱ्यांच्या दारांवर सहसा कोणी अडवीत नाही, असा या व्यवसायातील अनुभव होता. या राखीव अस्त्राचा उपयोग सुरू झाला. मात्रा बरोबर लागू पडली. कागदपत्रांना संबंधित कचेऱ्यांत गती मिळू लागली. सर्व कामे वेळेवर होणार याची खात्री वाटू लागली. मित्रांची भविष्यवाणी सुदैवाने खरी ठरली नाही. आणि मग चर्चेची दुसरी फेरी सुरू झाली. या दुसऱ्या फेरीतही तीच पात्रे बोलत होती. प्रवासाच्या तयारीसंबंधीच बोलत होती. पण त्यांचे वळण मात्र निराळे होते.

'शेवटी माझे म्हणणे खरे ठरले. मी अगदी आरंभापासून सांगत होतो की, तुम्ही एवढे उतावीळ होऊ नका. वेळेवर सर्व काही व्यवस्थित होईल.'

'माझा सल्ला चुकीचा नव्हता, हे तुमच्या आता लक्षात आले असेल. तुम्ही जेवढी घाई कराल तेवढे काम लवकर उरकेल असे माझे पहिल्यापासून मत होते.'

'अहो, तुम्हांला तरी एक महिन्याचा भरपूर अवधी होता. अवघ्या पंधरा दिवसांत सर्व तयारी पूर्ण करून ते काळे युरोपला गेले.'

त्या सर्व चर्चा आणि संवाद यांची उजळणी माझ्या मनात चालू होती. आपल्या विधानात काही विसंगती आहे याचीही आठवण नसल्यामुळे तेच मित्र बोलत होते, सल्ला देत होते. त्या वेळी त्यांचा आस्वाद घेण्याच्या मनस्थितीत मी नव्हतो. पण आता त्याच संवादानी माझी भरपूर करमणूक होत होती. पण तेवढ्यात व्हिसा मिळाला नव्हता याची आठवण झाली आणि मनाला कुशंकेने बारीकसा चिमटा घेतला. व्हिसा मिळवायला विलंब लागला तर—! अन् विमानाचे तिकीट! तेही अद्याप हातात पडले नव्हते. दिल्लीच्या कचेऱ्यांतून वावरणाऱ्या मुरब्बी लोकांचा देखील अनुभव चांगला नव्हता. लाल फितीत गुरफटलेले प्रकरण निकालात निघणे तसे सोपे नव्हते. पण या अस्सल भारतीय गुणाची झळ दिल्लीतील परदेशी वकिलातींना लागली नसेल असे गृहीत धरून समाधान मानण्याखेरीज दुसरा उपाय नव्हता. दिल्लीच्या स्टेशनवर पोहोचेपर्यंत व्हिसाच्या विचाराने सोडले नाही. स्टेशनवर उतरलो तेव्हा राजधानीला

मुसळधार पाऊस झोडपीत होता.

दिल्ली पत्रकारसंघाच्या कार्यालयात माझे काही भावी सहप्रवासी अगोदरच येऊन पोहोचले होते. रशियन वकिलातीत व्हिसा मिळविण्यासाठी सर्वांचा संयुक्त कार्यक्रम ठरला. चाणक्यपुरीच्या त्या सर्व भागांत इतर अनेक वकिलातींच्या लहान-मोठ्या कचेऱ्या दिल्लीकर पत्रकार दाखवीत होते. पण त्यांतील अमेरिकन वकिलातीची नावीन्यपूर्ण, आकर्षक इमारत वगळल्यास, रशियन वकिलातीच्या इमारतीची सर इतर कोणत्याही वकिलातीला येत नाही.

## रशियन वकिलातीचे वैभव

रशियन वकिलातीचा तो भव्य प्रासाद एखाद्या मोठ्या विलासी संस्थानिकाच्या महाप्रासादाला लाजवील असा आहे. आवारात सर्वत्र शुकशुकाट होता. भेटायला येणाऱ्या लोकांसाठी बाहेरच्या दालनात रशियन साहित्य ठेवलेले होते. त्या खोलीच्या शेजारच्या खिडकीतून एक मुलगी मध्येच डोकावून पुन्हा ताबडतोब खिडकी बंद करण्याची खबरदारी घेत होती. खिडकीची उघडझाक दर दोन-तीन मिनिटांनी चालू होती. पत्रकारांनी आपले पासपोर्ट आत पाठवून दिले आणि रशियन संपर्क अधिकाऱ्याशी पुढच्या प्रवासासंबंधी गप्पा सुरू केल्या. अर्ध्या तासात सर्व कागदपत्रांवर आवश्यक ती नोंद होऊन परत मिळाले आणि त्याबरोबरच रात्रीच्या अल्पोपाहाराचे निमंत्रणही पोहोचले.

चेकोस्लोव्हाकियाच्या वकिलातीच्या टुमदार इमारतीतही अशाच घटनांची पुनरावृत्ती झाली आणि व्हिसाचा सर्व विधी केवळ तास-दीड तासात संपला. प्रवासाच्या सर्व पायऱ्यांची चढण पूर्ण झाली आणि पत्रकार कॅनॉट सर्कसमध्ये निश्चिंतपणे भटकायला मोकळे झाले. सायंकाळी दिल्लीच्या पत्रकारांनी दिलेला निरोपसमारंभ संपवून रशियन वकिलातीच्या अल्पोपाहारासाठी सर्वजण तयार झाले.

रशियन वकिलातीच्या वास्तूचे अंतरंग विविध प्रकारांनी सुशोभित केलेले आहे. आकर्षक पद्धतीने सजविलेली आणि निरनिराळ्या प्रकाशयोजनांनी नटविलेली दालनामागून दालने ओलांडल्यावर आम्ही एका प्रशस्त हॉलमध्ये थांबलो. उंची फर्निचर, मौल्यवान गालीचे, मोहक रंगांचे पडदे, आणि सजावटीचे इतर निवडक साहित्य यांनी त्या हॉलला आगळीच शोभा आली होती. समोरच्या भिंतीवर रशियन क्रांतीच्या वेळचा लेनिनच्या जीवनातील एक आवेशपूर्ण प्रसंग रंगविलेले भव्य चित्र, आणि शेजारच्या खोलीतून येणारे पाश्चात्य संगीताचे संथ लयीचे सूर, यांमुळे वातावरण अधिकच गंभीर बनले होते. पाचच मिनिटांत रशियन वकील मि. वेनेडिक्टॉव्ह आणि त्यांच्या पत्नींनी दिवाणखान्यात प्रवेश केला. आमच्या दिमतीला असलेले रशियन पत्रकार व संपर्क अधिकारी काहीसे अंग चोरून नम्रतेने बाजूला उभे राहिले.

मि. बेनेडिक्टॉव्ह यांनी हास्यमुखाने सर्वांचे स्वागत केले. त्यानी दोन तीन खुमासदार कोट्या केल्याबरोबर वातावरण एकदम दिलखुलास बनले. खाद्यपेयांचे पदार्थ येऊ लागले आणि पाचसात मिनिटांतच अनौपचारिक गप्पांना रंग चढला.

मि. बेनेडिक्टॉव्ह जवळजवळ गेली दहा वर्षे भारतात रशियाचे वकील म्हणून काम करीत आहेत. मध्यंतरी १९५७ साली त्यांच्यावर काही राजकीय गंडांतर आले होते. त्यामुळे त्यांना रशियाला परत जावे लागले होते. पण पुन्हा त्यांनी नव्या परिस्थितीशी जुळवून घेतले व त्यांची फेरनेमणूक झाली. साठीच्या वयात असलेले हे रशियन मुत्सद्दी क्रांतीच्या वेळी शाळकरी वयात होते. १९३० मध्ये ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद बनले. काही वर्षे एका कापडगिरणीत काम केल्यावर मॉस्कोच्या शेतीसंस्थेत त्यांनी शिक्षण घेतले. त्यानंतर उझबेकिस्तानमध्ये एका शेतीकेंद्राचे प्रशासक म्हणून त्यांची नेमणूक झाली. स्टालिनने १९३६ मध्ये कम्युनिस्ट पक्षात घडवून आणलेल्या भयंकर शिरकाणाच्या काळात मि. बेनेडिक्टॉव्ह शेतकीमंत्री होते. स्टालिनच्या कृपेच्या आणि अवकृपेच्या आवर्तनातून बाहेर पडण्यासाठी त्यांना अनेकदा युक्त्याप्रयुक्त्या कराव्या लागल्या. एकदोनदा जिवावर बेतलेल्या प्रसंगांतून ते निभावले आणि नंतर त्यांची भारतात नेमणूक झाली. रशियाच्या शेतीविषयक प्रश्नांचे ते तज्ज्ञ मानले जातात. आणि आता अतिपूर्वेकडील राजकीय घटनांचे विशेष माहीतगार म्हणून रशियन राज्यकर्त्यांना त्यांचा सल्ला घ्यावा लागतो.

मि. बेनेडिक्टॉव्ह पत्रकारांना सूचना देत होते: ‘ मॉस्कोत शेती व उद्योगधंद्यांचे प्रदर्शन पाहावयास विसरू नका. लेनिनग्राडच्या हरमिटेजमध्ये जेवढा अधिक वेळ घालविता येईल तेवढा घालवा. बोलशॉय थिएटरचे एक तरी नाटक पाहिलेच पाहिजे. क्रेमलिन, भूमिगत रेल्वे, मॉस्को विद्यापीठ इत्यादि प्रसिद्ध ठिकाणे तर तुम्ही पाहालच; पण क्रांतिकाळातील घटनांचे प्रदर्शन, ग्रंथालय— ’

त्यांच्या सूचना चालू होत्या. मधूनमधून कोट्या–प्रतिकोट्यांमुळे हास्याचे फवारे उडत होते. पत्रकारांना खाद्यपेयांचा आग्रह करायलाही ते विसरत नव्हते. हातातील ग्लास काहीसा उंच धरून ते म्हणाले, “ हे आमचे सोव्हिएट पेय बरे का ! त्याची सवय एव्हापासूनच करून ठेवा. ” पुन्हा आग्रहाची नवी फैर झडून गप्पांचा ओघ प्रवासाच्या दिशेने वळला. मि. बेनेडिक्टॉव्ह व्होडकाचा आस्वाद घेत होते आणि पत्रकारांनाही घ्यायला लावीत होते. शेवटी आमचा प्रवास सुखाचा व्हावा, अशी त्यांनी शुभेच्छा व्यक्त केली आणि दोन तास रंगलेला कार्यक्रम संपला. सर्वजण दिल्ली पत्रकारसंघाच्या कार्यालयाकडे निघालो. सकाळी सहा वाजता आमचे विमान उड्डाण करणार होते.

सकाळी विमानतळावर पत्रकार जमले तेव्हा रशियन वकिलातीने रात्री दिलेल्या पाहुणचाराची धुंदी त्यांच्या नजरेत रेंगाळत होती. विमानतळावरील तपासणीचा विधी,

सांगितला जातो तेवढा त्रासदायक वाटला नाही. तपासणीसाठी सामान पुढे सरकत होते आणि त्याच्या पाठोपाठ दोन तीन दालनांतून निरनिराळ्या चिठ्या त्याला डकविल्या गेल्यावर अखेरीस ते विमानाच्या दिशेने रवाना झाले. तेवढ्यात, विमान दोन तास उशिरा उड्डाण करणार असल्याचे जाहीर झाले. हवा वाईट पडली होती. आकाश काळ्याकुट्ट ढगांनी झाकून गेले होते. जागरणामुळे शिणलेले पत्रकार कँटीनच्या बाहेरच्या व्हरांड्यात समोरच्या एरोफ्लोट विमानाकडे सुस्तावलेल्या नजरेने पाहात बसले

## पृथ्वीचा मानदंड

दोन तासांनंतर विमानाने ढगाळलेल्या धुंद आकाशात झेप घेतली तेव्हा एक अननुभूत वातावरणात प्रवेश करीत असल्याची जाणीव होत होती. बसल्या जागेवरूनच शेजारच्या जाड काचेतून एकदा बाहेर डोकावले. नंतर सभोवार पाहू लागलो. विमानातील कर्मचाऱ्यांच्या जलद हालचाली चालू होत्या. छोट्याशा थिएटरमध्ये बसून नाट्यप्रयोग पाहात बसलो आहोत असे वाटत होते. एक तास केव्हा निघून गेला ते समजले नाही. निसर्गाची विविध चित्रे आकाशातून पहाताना केव्हाच तंद्री लागली होती. त्या अपूर्व दृश्यांना डोळ्यात, मनात, साठविण्याचा अटोकाट प्रयत्न चालू होता. मन प्रसन्न होते आणि एका अत्यंत निराळ्या जगात निसर्गाचे सौंदर्यदर्शन मनाला सुखवीत, खुलवीत होते. तेवढ्यात विमानसुंदरीने निवेदन सुरू केले. प्रथम रशियन भाषेत आणि नंतर इंग्रजीत ती सांगत होती: " आपण ताशी पाचशे मैल वेगाने तीस हजार फूट उंचीवरून प्रवास करीत आहोत. जरा बाहेर डोकवा, हिमालयाची भव्य शिखरे तुम्हांला आकर्षित करतील आणि ती पाहात असताना न्याहरीचाही आस्वाद घेता येईल. आपण तीस हजार फूट उंचीवरून उड्डाण करीत आहोत आणि आपल्या विमानाचा वेग ताशी पाचशे मैल आहे. " निवेदन संपवून विमानसुंदरी अंतर्धान पावली आणि त्या वेगवान थिएटरमधील प्रेक्षक हिमालयाची भव्य आणि दिव्य सौंदर्यभूमी पाहाण्यासाठी शेजारच्या खिडक्यांतून खाली डोकावू लागले. प्रथम पाचदहा मिनिटे हिमालयाचे भव्यत्व मुळीच जाणवले नाही. इतर डोंगरांप्रमाणे अनेक उघड्याबोडक्या शिखरांच्या रांगांशिवाय पाहण्यासारखे काहीच नव्हते. नंतर पांढरी शुभ्र शिरोभूषणे चढविलेली शिखरे नजरेपुढे आली आणि मग मात्र हिमालयाच्या भव्यतेचा साक्षात्कार झाला. विस्तीर्ण व खोल दऱ्या, ढगांच्या छायेने झाकळू गेलेली छोटी शिखरे, पाण्याचे प्रवाह इत्यादि अनंत दृश्यांचा निसर्गपट उलगडला जाऊ लागला. पृथ्वीचा तो मानदंड, नगाधिराज हिमालय रौद्र स्वरूपात दिसल्यावर मात्र भयचकित वृत्तीने त्याचे दर्शन घेताना मनाची आंदोलने विमानगतीपेक्षा अधिक वेगाने होऊ लागली.

## हिमालयाच्या शिखरावर न्याहारी

समोरच्या बैठकीमागील पाकिटातून न्याहारीची डिश बाहेर काढली. त्यात गरम पदार्थ वाढले जाऊ लागले. हिमालयाच्या शिखरावर न्याहारी—विलक्षण बहारीची कल्पना होती. न्याहारीचा आस्वाद घेत होतो आणि त्याबरोबरच निसर्गचमत्काराच्या प्रचंड राशींचे रुद्रसौंदर्यही पाहात होतो. सुखद आनंद शिगेला पोचला होता. तो अनुपम अनुभव होता. स्वर्गीय आनंद आणखी काही निराळा असेल काय ? पण हिमशिखरांच्या शेजारची भीषण खोल दरी दिसली अन् आणि त्या दिशेनेही निराळ्या अर्थाने, स्वर्ग दूर नसल्याची भयाकुल जाणीवही मनाला स्पर्श करून गेली. विमानाला हेलकावा बसल्यासारखे उगाचच वाटले. पण भयकंपित करणारा तो विचार अंगावरून झुरळ झटकून टाकावे तसा, मनातून क्षणार्धात झटकून टाकला आणि पुन्हा तो वसुंधरेचा मानदंड, त्याचे भव्यत्व, दिव्यत्व डोळ्यांत सामावून घेऊ लागलो.

हिमालयाचा प्रदेश संपला आणि पामीरचे सपाट मैदान दिसू लागले. पृथ्वीचे ते ‘ छप्पर ’ उजाड, ओसाड, आणि कमालीचे रुक्ष. पण पृथ्वीचे ते कळाहीन रूप फार काळ पाहवे लागले नाही. मेघांच्या पांढऱ्या शुभ्र रुजाम्यावरून विमान अज्ञात पोकळीत वेगाने धावत होते. खाली पांढऱ्या पांढऱ्या कापसाची दुलई आणि वर निळे निळे आकाश

## दिवाळीतील किल्ले

हळूहळू मेघराशी विरळ होऊ लागल्या. विमान पूर्वीच्याच वेगाने अवकाशाच्या पोकळीत झेप घेत होते. ‘ आपले विमान रशियाच्या भूमीवरून प्रवास करीत आहे. पाऊण तासात आपण ताष्कंदला पोचू ! ’ विमानसुंदरीने माहिती पुरविली. अनेक प्रवाश्यांनी भूमीकडे पाहिले. कोणी भक्तिभावाने तर कोणी उत्सुकतेने, कुतूहलाने. भूमी सगळीकडे सारखीच, पण डोंगराळ प्रदेश ओलांडला आणि सुपीक प्रांतावरून विमान जाऊ लागले. दिल्ली सोडल्यापासून प्रथमच गावे दिसू लागली. सुमारे पाच मैल उंचीवरून दिसणारी ती गावे. दिवाळीच्या वेळी मुले किल्ले बनवितात, त्यांची आठवण झाली. घरे, रस्ते, कालवे, नद्या, शेतांचे हिरवेकाळे पट्टे सर्व काही स्पष्ट दिसत होते. पण जणू पुठ्ठयाची करून ठेवलेली घरे आणि रांगोळीच्या रेघा ओढून रेखाटलेले रस्ते.

वेळेचा पडदा बाजूला सरत होता आणि रशियाच्या रंगभूमीवरील पहिला प्रवेश लौकरच केव्हा सुरू होणार याविषयी उत्कंठा वाढत होती. एवढ्यात डोक्याच्या शिरांना ताण पडू लागला. थोडी अस्वस्थता वाटू लागली. परिचारिकेला बोलावून डोक्यात वेदना होत असल्याचे सांगितले. विमान खाली उतरत असताना असे होते, त्यात

घाबरण्यासारखे काही नाही; असे तिने सांगितले व हातावर दोन चॉकोलेट ठेवली. विमान उतरत असताना दाभाडे जोरजोराने हलविली म्हणजे त्रास होत नाही, असे सांगून ती निघून गेली.

ताष्कंदचा विमानतळ विस्तीर्ण आणि अद्ययावत समजला जातो. विमानतळावर कितीतरी विमाने विविध प्रकारांची होती. आमचे विमान भूमीला टेकताच ताष्कंदचे काही पत्रकार, भारत-रशिया मित्रसंघाचे कार्यकर्ते आणि आमच्या दिमतीला पाठविलेले दोन दुभाषे स्वागतासाठी सामोरे आले. त्या सर्व लवाजम्यासह विमानतळाच्या इमारतींत प्रवेश केल्यावर सर्वांची कागदपत्रे तपासण्यात आली, आरोग्याचीही तपासणी झाली आणि नंतर आम्ही ताष्कंद शहरात जाण्यासाठी निघालो.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९४२ वि: भू-प्रवास
क्रमांक ३५४ नों दि २५।६।७५

ताष्कंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ..................

## कोसळलेला पुतळा

तार्श्कंद शहराच्या दिशेने आमच्या मोटारी भरधाव निघाल्या होत्या. रस्त्यावरील दुतर्फा झाडांच्या रांगांमुळे वातावरण प्रसन्न वाटत होते. विमानतळावरून निघाल्यापासून दहा मिनिटांतच आम्ही शहराच्या परिसरात पोहोचलो. दूरवर मशिदीचे घुमट आणि उंच मिनार दिसत होते. इस्लामी राज्यात आल्याचा भास होत होता. छोटी–बसकी घरे मागे पडू लागली आणि आम्ही एका भव्य चौकासमोर आलो. मोटारींचा वेग बराच कमी झाला होता. चौकाच्या मध्यभागी एक प्रशस्त चौथरा दिसला. पण त्यावर पुतळा मात्र नव्हता. आकर्षक बांधणीच्या त्या चौथऱ्याची उभारणी दहा-वीस वर्षांपूर्वी तरी झालेली असावी. त्यावर पूर्वी केव्हातरी पुतळाही बसविलेला असावा. पण आता मात्र केवळ रिकामा चौथरा काहीसा उदासवाणे तेथे उभा होता. त्यावर एखाद्या उझबेकी राष्ट्रवीराचा पुतळा असेल; कदाचित रशियन क्रांतीत बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्ययोद्ध्याचा पुतळा तेथे उभारलेला असावा.

पण अशा कल्पना करीत बसण्याची फार वेळ गरज पडली नाही. चौकाच्या एका कोपऱ्यात मोठ्या झाडाला रेलून एक भव्य पुतळा कलत्या अवस्थेत कसाबसा उभा होता. थकला–भागलेला माणूस भिंतीचा आधार घेऊन उभा असावा तशी त्याची अवस्था होती. एखाद्या छोट्याशा धक्क्यानेदेखील तो सहज गडगडला असता इतके त्याचे स्थान डळमळीत झाले होते.

तो स्टालिनचा पुतळा होता.

अगदी अलीकडेच मूळ चौथऱ्यावरून त्याला अधःपतित केलेले होते. येवढ्याशा चिंचोळ्या जागेत रस्त्याच्या कडेला आणि झाडांच्या बुंध्याशी कसेबसे उभे राहिलेले ते प्रचंड धूड भोवतालच्या वातावरणाशी विसंगत दिसत होते. चौथऱ्यावरून उचलबांगडी झाल्यावर तो महात् पत्थर दूर कोठेतरी नेऊन का टाकला नाही हे मात्र समजले नाही. कदाचित त्या पुतळ्याची देखील अद्याप भीती वाटत असावी. मोटारीत माझ्या शेजारी दुभाषा आणि पलीकडे दोन तीन उझबेकी पत्रकार बसले होते. त्यांच्याकडे सहज नजर गेली. ते काही सांगण्याच्या मनस्थितीत नसावेत असे वाटले.

एव्हाना आम्ही एका आधुनिक बाजारपेठेत येऊन पोहोचलो होतो आणि

तेथून लगेच दोन मिनिटांनी आमच्या मोटारी एका भव्य हॉटेलशेजारी उभ्या राहिल्या.

ऐतिहासिक स्वरूपाचे बांधकाम आणि इराणीपद्धतीची कलाकुसर यांमुळे त्या हॉटेलची इमारत आकर्षक दिसत होती व तिची आशियाई बनावट चटकन नजरेत भरत होती. पांढऱ्या शुभ्र दगडाची ती चार मजली इमारत, तिच्यासमोर असलेले एक भव्य नाट्यगृह आणि त्याच्या समोरचे सुंदर उद्यान यांनी त्या सर्व विभागाला आधुनिक उझबेकी सांस्कृतिक केंद्राचे स्वरूप मिळाले आहे. शहरातील फॅशनेबल स्त्री–पुरुषांची गर्दी त्या नाट्यगृहाच्या उद्यानात दिसत होती.

## गोषातील स्त्रिया

दुपारी हॉटेलपुढच्या रस्त्यावरून काही वृद्ध तोंडाने हळूहळू पुटपुटत एका विशिष्ट दिशेने जात असलेले दिसले. ते मशिदीत जात होते असे समजले. त्या दिवशी शुक्रवार होता. मशिदीत सामुदायिक प्रार्थना असल्यामुळे साहजिकच त्या बाजूला उझबेकी म्हातारी मंडळी निघाली असावी. आम्ही मशिदीकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली. ताष्कंदमध्ये एकदोन नव्हे, चांगल्या बावीस मशिदी आहेत. पण त्या सर्व जुन्या शहरात. शहराचा तो सर्वच भाग अद्यापि मागासलेला आणि आडवळणाचा वाटावा, असा होता. अरुंद रस्ते, एक मजली जुन्या पद्धतीची बसकी घरे, रस्त्यावर खूप धूळ आणि लगतच्या ओट्यावर खेळत असलेली अगदी सामान्य कपडे घातलेली मुले. ताष्कंदमध्ये अद्याप गोषापद्धती चालू असावी यावर प्रथम विश्वास बसू शकत नाही. पण मशिदीपर्यंतच्या रस्त्यावर किमान तीस–चाळीस स्त्रिया तरी गोषा घेतलेल्या दिसल्या. काळ्या पडद्याने अवगुंठित झालेल्या त्या महिला वृद्ध असाव्यात.

मशिदीत पाचसहाशे मुसलमान प्रार्थनेसाठी जमले होते. एक मुर्शिद उंच ओट्यावर उभा राहून प्रवचन करीत होता. अनेकजणांनी आपापली कुराणे आणून त्यांचे पठन चालविले होते. त्या सर्व समुदायात तरुण क्वचितच दिसले. साठीच्या पुढे सरकलेले लोक त्या धार्मिक कार्यात गुंतलेले होते.

मशिदीच्या शेजारी एका जुन्या भव्य इमारतीत धार्मिक शिक्षणाची एक पाठशाळा चालू होती. तेथे तीस–पस्तीस विद्यार्थी शिकत असावेत. त्या सर्वांना शिकविण्यासाठी दोन–तीन मौलवी नेमलेले आहेत. त्यांची उपजीविका एका धार्मिक निधीतून होते, असे सांगण्यात आले. दरवर्षी पंधरा–वीस लोकांना हाजच्या यात्रेला जाण्याची परवानगी मिळते. मशिदीच्या महाद्वारावर आणि इतरत्रही काही ठिकाणी अरबी लिपीतील वचने उद्‌धृत केलेली आहेत. मुलांचे धार्मिक शिक्षणही अरबी लिपीतून चालते.

स्टालिनच्या काळात धार्मिक शिक्षणाला बंदी केलेली होती. पण युद्धकाळात ती बंधने काहीशी सैल झालेली होती. युद्ध संपताच पुन्हा अनेक निर्बंध लादण्यात आले.

क्रुश्चेव्हने ते निर्बंध काढून टाकले आहेत. त्यामुळे गेल्या चारपाच वर्षांत पुन्हा नमाज, धार्मिक शिक्षण, मशिदीची व्यवस्था इत्यादि सर्व चालू झाले आहे.

## पूर्वेकडील महाद्वार

ताष्कंद शहर उझबेकी लोकांच्या कर्तृत्वाचे व अभिमानाचे ठिकाण मानले जाते. शहराचे ऐतिहासिक वैशिष्ट्य आता मागे पडत चालले आहे आणि त्याला औद्योगिक केंद्राचे महत्त्व मिळाले आहे. ' पूर्वेकडील रशियाचे महाद्वार ' असा या शहराचा उल्लेख केला जातो. जुने शहर कायम ठेवून त्याच्या नजीकच्या परिसरात नव्या नगरीची उभारणी केली आहे. शहरात फेरफटका मारल्याबरोबर ही दोन वेगवेगळी शहरे दोन निरनिराळ्या कालखंडांची आणि निरनिराळ्या संस्कृतींची शहरे आहेत असे सहज लक्षात येते. जुन्या शहरातील अरुंद रस्ते, गल्ली, बोळ, छोटी घरे, जुनेपडके वाडे, मशिदी, गोषातून फिरणाऱ्या स्त्रिया आणि लांब दाढ्या व कफनीसारखे सैल कपडे पेहरलेले वृद्ध पुरुष, यांमुळे त्या भागात मोगलकालीन इतिहासाची स्मृती अद्याप जागृत आहे असे वाटते.

शहराची वस्ती सात आठ लाखाच्या आसपास, म्हणजे पुण्याच्या वस्तीइतकीच आहे. रशियातील सातव्या क्रमाचे हे शहर मानले जाते. जुन्या शहराच्या अगदी उलट दृश्ये नव्या भागात दिसून येतात. सुंदर हॉटेले, आधुनिक नाट्यगृह, वृत्तपत्रांच्या कचेऱ्या, ट्राम्सचा खडखडाट, रुंद आणि स्वच्छ रस्ते, उझबेकी लोकांइतकीच किंबहुना थोडी जास्त गोऱ्या रशियनांची गर्दी, आधुनिक स्वरूपाची उद्याने आणि क्रीडांगणे, याच भागाला जोडून असलेले मोठमोठे कारखाने आणि त्याला जोडून असलेली कामगारांची वस्ती.

उझबेकी माणूस मोकळ्या मनाचा आणि हसतमुख असतो. त्याचे सैल कपडे आणि तुळतुळीत डोक्यावरील नक्षीकाम केलेली छोटीशी टोपी, लांब मिशा वाढविण्याची पद्धत आणि अंगावर शालीसारखे कापड. मोगलांच्या वंशात उझबेकी लोकांचे स्थान उच्च समजले जाते. ताष्कंद, समरकंद, बुखारा ही सर्व इस्लामी संस्कृतीची केंद्रे याच प्रदेशात एके काळी अत्यंत वैभवशाली होती. ताष्कंदमध्ये इ. स. १८६५ पर्यंत मंगोलियन बादशहाची सत्ता चालत होती. त्यानंतर ते शहर झारने ताब्यात घेतले आणि क्रांतीनंतर त्या शहराचा कायापालट झाला. शहरात ६५ ते ७० टक्के उझबेकी लोक असून १५ टक्के रशियन आहेत. रशियनांची संख्या दरवर्षी वाढत चालली आहे. पुढच्या दहापाच वर्षांत ते ५० टक्क्यांच्या जवळपास येतील, असा अंदाज दुभाषाने सांगितला. शहरातील मोठे कारखाने, व्यापार, सांस्कृतिक केंद्रे, दळवळणाची साधने इत्यादि सर्व ठिकाणी प्रमुख जागेवर सामान्यतः गोरा रशियन दिसून येतो. त्यामुळे शहरातील राजकीय आणि आर्थिक हालचालींचे नियंत्रण मुख्यतः या लोकांच्या हातीच आहे.

उझबेकी माणूस काहीसा दबून वागताना दिसतो. गोऱ्या रशियनांच्या मानाने त्याला दुय्यम स्थान मिळत असावे असे सहज लक्षात येते.

क्रांतीनंतर उझबेकी प्रांतात कापूस, द्राक्षे आणि इतर फळफळावळ यांच्या पिकाकडे विशेष लक्ष दिले गेले आणि अलीकडे तर शेतीची अवजारे तयार करण्याचे प्रचंड कारखाने या शहरात सुरू झाले आहेत. कापसाच्या लागवडीपासून ते वेचण्यापर्यंत उपयोगात येणारी सर्व यंत्रे तयार करण्याचा सर्वात मोठा कारखानाही याच शहरात आहे.

## क्रांतीनंतर कायापालट

उझबेकी पत्रकार अमिनॉव्ह ( मूळ नाव अमीन ) आपल्या राज्याविषयी अतिशय अभिमानाने माहिती सांगत होता : दक्षिण रशियातील इतर राज्यांपेक्षा आमचे राज्य अधिक संपन्न आहे. रशियाशी संबंध आल्यामुळेच ही संपन्नता वाढली. क्रांतीपूर्वी ताष्कंद शहरात वीज नव्हती, नळ नव्हते आणि एकही चांगला रस्ता नव्हता. मग इतर गावांसंबंधी सांगावयाची गरजच नाही. कमालीची निरक्षरता आणि परिस्थितिसंबंधीचे अज्ञान यामुळे उझबेकी समाजाला जवळजवळ भटक्या जमातीचे स्वरूप आले होते. चाळीस वर्षांपूर्वी ताष्कंद शहरात फक्त एक पदवीधर होता आणि जुन्या पद्धतीच्या दहा-पाच शाळा कशाबशा रडतखडत चालू होत्या. पण आता सक्तीचे शिक्षण झाल्यामुळे निरक्षरता संपली, शिक्षणाचा प्रसार वाढला, शास्त्र आणि तंत्र समजू लागले. एक विद्यापीठ, सतरा कॉलेजे आणि दीडशे शाळा यात सव्वा लाख उझबेकी मुले-मुली शिक्षण घेत आहेत. उझबेकी भाषेला स्वतंत्र लिपी नव्हती. आता रशियन लिपीत ती भाषा लिहिली आणि वाचली जात आहे. जुन्या लोकांना धार्मिक शिक्षणामुळे अरबी लिपी येते. शाळा-कॉलेजात उझबेकी भाषेबरोबर रशियन भाषा सक्तीची असते. याशिवाय वरच्या वर्गात इंग्रजी, जर्मन किंवा हिंदी या तीन भाषांपैकी एक भाषा सक्तीची केलेली आहे. अलीकडे हिंदी भाषा शिकणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

## हिंदीची शाळा

त्या दिवशी एका दुय्यम शाळेत जाण्याचा कार्यक्रम ठरला होता. ती शाळा जुन्या ताष्कंदमध्ये असून ती गेली तीस-पस्तीस वर्षे चालू असल्याचे सांगितले. शाळेच्या महाद्वारापाशी खेळाडू मुलाचा एक पुतळा उभारलेला आहे. पायाखाली फुटबॉल आणि तोंडावर मुक्त हास्य,अशी त्याची ठेवण असल्यामुळे केवळ त्या पुतळ्यासंबंधीच नव्हे, तर त्यामागे असलेल्या शाळेसंबंधीहि अनुकूल मत बनल्याशिवाय राहत नाही. आम्ही

ज्या वर्गांत गेलो तेथे हिंदीचा तास चालू होता. पाठीवर लांब वेण्या सोडलेल्या आणि मोगलांच्या वंशातील तोंडवळ्याची आठवण करून देणाऱ्या मुली वर्गांत बहुसंख्येने होत्या. मुलांनी एकजात डोकी तुळतुळीत केलेली होती. त्या शाळेत हिंदी शिकणारे ६५० विद्यार्थी होते. सहा वर्षे त्यांना हिंदी शिकावे लागते. इंग्रजी ऐच्छिक घेणारांची संख्या फक्त २०० होती आणि जर्मन शिकणारे विद्यार्थी ५० च्या जवळपास होते. उझबेकीस्थानमध्ये गेल्या सात आठ वर्षांत युरोपीयन भाषा शिकणारांचे प्रमाण झपाट्याने कमी होत असून हिंदी आणि उर्दू भाषा शिकणारांचे प्रमाण वाढत आहे. हिंदी शिकविणाऱ्या शिक्षकांना, इतर विषय शिकविणाऱ्या शिक्षकांपेक्षा १५ टक्के पगार अधिक मिळतो. आम्ही पाहिलेल्या शाळेत हिंदीचे चार शिक्षक होते आणि त्यांपैकी तीन स्त्रिया होत्या. शाळेच्या कामाच्या पद्धतीत आपल्या इकडच्या शाळेपेक्षा विशेष फरक जाणवला नाही. शाळेची वेळ सकाळी साडेआठ ते साडेबारा अशी असल्यामुळे दुपारचा वेळ विद्यार्थी पायोनियर संघटनेचे कार्यक्रम, सहली आणि खेळ यांत घालवितात. विद्यार्थ्यांच्या मागे दर वर्षी परीक्षेचा काच नाही. फक्त शेवटच्या वर्गाची परीक्षा घेतली जाते. वर्षाच्या शेवटी बरा, चांगला, उत्तम असे शेरे मारले जातात आणि त्यांना अनुसरून त्या त्या गटाच्या विद्यार्थ्यांना एका वर्गात बसविले जाते. शाळेत शिकवली जाणारी हिंदी पुस्तके ताष्कंद किंवा मास्कोमध्ये छापलेली आहेत.

उझबेकी भाषेतील पुस्तकांचे प्रकाशन अलीकडे मोठ्या संख्येने चालू झाले आहे. त्यात मुख्यतः रशियन पुस्तकांची भाषांतरे अधिक असतात. हिंदी अथवा जर्मन पुस्तकांचे अनुवादही करण्यात येत आहेत. ही सर्व प्रकाशनांची कामे सरकारी प्रकाशन खात्यातर्फे केली जातात. खासगी प्रकाशन संस्था किंवा खाजगी छापखाने नसल्यामुळे जे काही मुद्रित किंवा प्रकाशित होते ते सर्व सरकारी यंत्रणेमार्फत. गेल्या पाच वर्षांपासून आधुनिक कथा-कादंबऱ्यांची—विशेषतः भारतीय साहित्यातील काही ललित वाङ्मयाची—भाषांतरे अधिक प्रमाणात केली जात आहेत. उझबेकी भाषेसाठी रशियन लिपी उपयोगात आणल्यामुळे शिक्षणप्रसारातील एक मोठी अडचण दूर झाली. रशियन भाषेतील शास्त्रीय ग्रंथ आणि ललित वाङ्मय या सर्वांचा प्रसारही त्यामुळे झपाट्याने होत आहे. उझबेकी लोकांचा धर्म आणि संस्कृतीशी अरबी लिपी संबंधित असल्यामुळे आरंभी रशियन लिपी स्वीकारताना काही ठिकाणी विरोध व्यक्त झाला. पण तो नाहीसा करणे कम्युनिस्ट राजवटीला विशेष अवघड नव्हते. नव्या पिढीला अरबी भाषा किंवा इस्लामी धर्म यांचे आकर्षण वाटत नाही. उद्योगधंद्यांची वाढ होण्याच्या कामीही रशियन लिपीमुळे सुलभता आली. या सर्वांपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या उझबेकी लोकांना स्वतःची लिपी नसल्यामुळे ज्ञानसंग्रह करून ठेवण्याची सोय नव्हती अशा ऐंशी लाख लोकांना एका नव्या लिपीचे साधन मिळाले.

## वेडा की भिकारी ?

सायंकाळीं आम्ही काहीजण नाट्यगृहापुढच्या उद्यानात बसलो होतो. नाट्यगृहाच्या मुख्य फाटकाशेजारी एक इसम मोठमोठ्याने बडबड करीत होता, आणि जाणारे येणारे त्याच्याकडे लक्ष न देता पुढे निघून जात होते. तो मनुष्य गुडघे टेकून उभा होता. मधूनच चिडून हातवारे करून तो मोठ्याने ओरडायचा तर लगेच गळा काढून रडू लागायचा. त्याच्या एका हातात काठी होती आणि दुसऱ्या हातात उझबेकी टोपी उलटी करून धरलेली होती. अंगातील कपडे आणि चेहेऱ्याची ठेवण चांगली असल्यामुळे प्रथम त्याच्यासंबंधी काहीच कल्पना करता येत नव्हती. जरा जवळ जाऊन पाहिल्यानंतर त्याच्या डोळ्यांत मधूनच वेडसरपणाची लहर आल्यासारखे दिसून येई. तो काय बडबडत होता हे समजावयास मार्ग नव्हता. पण त्याच्या चित्कारावरून तो अत्यंत चिडलेल्या मनःस्थितीत असावा व समोरच्या उघड्या टोपीकडे मधूनच पाहत असल्यामुळे त्याला पैशाची मदत हवी होती हे उघड दिसत होते. तो वेडसर भिकारी होता आणि त्याला अनेकदा त्या प्रमुख रस्त्यावरून दूर नेऊन सोडले, तरी तो परत तेथेच येऊन मोटमोठ्याने ओरडत असतो, असे नंतर समजले. युद्धाच्या वेळी त्याच्या मेंदूवर आघात झाला असावा. एक लष्करी अधिकारी त्याच्यासमोरून पुढे निघून गेला आणि त्याबरोबर त्या वेड्या इसमाचे माथे अधिकच भडकले. त्या पाठमोऱ्या लष्करी अधिकाऱ्याकडे पाहत मुठी वळून तो मोठमोठ्याने ओरडू लागला. पण येवढे सर्व चालू असताना त्याला तेथून कोणीही हलविले नाही किंवा भीकही घातली नाही.

त्याच दिवशी रात्री नाट्यगृहासमोरच्या उद्यानात आणखी एक चमत्कारिक दृश्य पाहावयास मिळाले. रात्री दहा–साडेदहा वाजण्याची वेळ असावी. उद्यानात विशेष गर्दी नव्हती. चार–दोन जोडपी बसलेली दिसत होती. लगतच्या रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रामचा खडखडाट वगळला तर वातावरण स्तब्ध आणि शांत होते. हवा प्रसन्न होती आणि चांदणे लख्ख पडले होते.

आम्ही कारंजानजीक एका बाकावर बसलो होतो. तेवढ्यात एक तरुणी अतिशय त्वेषाने ताडताड बूट वाजवीत आमच्या जवळून पुढे निघून गेली. तिच्या गतीत अनिवार संताप व्यक्त होत होता आणि काहीसे अडखळत चालण्यावरून ती बेभान झालेली दिसत होती. नाट्यगृहासमोरच्या सुंदर वातावरणाशी तो सर्व प्रकार विसंगत वाटला. आम्ही तिच्याकडे वळून पाहू लागलो, तेवढ्यात एक तरुण धावत आला आणि त्याने तिच्या दंडाला धरून समजूत घालण्याचा प्रयत्न चालविला. पण तिने एक हिसका दिला आणि जवळ जवळ धावतच ती रस्ता ओलांडू लागली. त्या तरुणाने तिचा पाठलाग केला. तो काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी आम्ही काहीजण आणि जवळच्याच झाडा-

खाली उभे असलेले उझबेकी तरुण पुढच्या रस्त्यापर्यंत चालत गेलो. ट्रामच्या नाक्यावर त्या दोघांची झटापट चालू होती. ट्रामसाठी उभे असलेले लोक त्यांच्या बाचाबाचीकडे शांतपणे पाहत होते. पण कोणीही काही बोलले नाही किंवा त्यांना सोडविण्याचाही प्रयत्न कोणी केला नाही.

उझबेकी तरुणांना ते दृश्य विशेष आवडले नसावे. ते आमच्या जवळ येऊन काहीतरी सांगू लागले. अर्थात ते आम्हांला समजू शकले नाही. पण त्या सर्वांचा निष्कर्ष एवढाच की त्या तरुणीने चिकार दारू झोकली होती आणि त्या झिंगलेल्या अवस्थेतच ती रस्त्याने धावत सुटली होती.

## सामुदायिक शेत

सामुदायिक शेतीचे केंद्र पाहण्यासाठी सर्वजण अतिशय उत्सुक होते. स्टालिनने तीस वर्षांपूर्वी शेतीच्या क्षेत्रात केलेला हा प्रयोग अनेक अर्थांनी शेतकऱ्यांच्या रक्ताने रंगलेला होता, तसाच उत्पादनाचे आकडे फुगवून सांगूनही रंगविण्यात आला होता. ताष्कंदपासून आठ–दहा मैलांवर असलेले ' कार्ल मार्क्स कलेक्टिव्ह फार्म ' पाहण्यासाठी आम्ही गेलो तेव्हा त्या शेताचे संचालक आणि त्यांचे सहकारी आमच्या स्वागतासाठी उभे होते. सामुदायिक शेतांना राष्ट्रपुरुषांची किंवा श्रेष्ठ नेत्यांची नावे देण्याची पद्धती अभिनव वाटली. कार्ल मार्क्स सामुदायिक शेताचा आरंभ १९३० साली झाला. त्या वेळी त्यात फक्त ५१ कुटुंबे सामील झाली होती. १०० ते १२५ एकर जमीन, चार–दोन झोपड्या आणि १५–२० जनावरे एवढेच आरंभीचे भांडवल होते. शेताचा संचालक अब्दुला गुलाम अहमद आपल्या कारकीर्दीचा इतिहास सांगत होता : तो गेली वीस वर्षे डायरेक्टर बोर्डाचा अध्यक्ष असून कम्युनिस्ट पक्षाचाही सभासद आहे. १९३० ते १९४० च्या दरम्यान रशियात शेतकऱ्यांचे जे भयंकर शिरकाण झाले त्या वेळी कार्ल मार्क्स शेताची काय अवस्था होती, हे सांगायचं टाळींत होता. त्या ' त्या वेळची परिस्थिती अडचणींची होती आणि आम्हांला त्या मोठ्या प्रयोगावस्थेतून शेतीचा विकास करावयाचा होता, ' येवढेच तो मोघम म्हणाला. या शेतावर आता एकूण ५६० कुटुंबे राहतात आणि शेताचे एकंदर क्षेत्रफळ ५००० एकर आहे. द्राक्षे, सफरचंद आणि भाजीपाला यांच्या पिकांवर अधिक भर दिला जातो.

' सामुदायिक शेत ' असा त्या शेताचा एकेरी उल्लेख करण्यात येत असला तरी त्यात हजारो शेतांचे छोटे तुकडे जोडलेले आहेत. कार्ल मार्क्स शेताचे केंद्र त्या भागात अतिशय नमुनेदार मानले जाते. मध्यभागी डायरेक्टर बोर्डाची कचेरी, त्याला लगत

सात–आठ मोठी घरे आणि पलीकडे शंभर–सव्वाशे लहान घरांचे खेडे. अशी चार पाच खेडी त्या शेताच्या निरनिराळ्या विभागांत वसलेली आहेत. मुख्य केंद्राजवळ शाळा, दवाखाना, समाजमंदिर, गुरांचे गोठे, धान्याची गोदामे आणि अवजारे ठेवण्याची जागा या सर्वांमुळे त्या केंद्राला आधुनिक सुखसोयींची जोड मिळालेली आहे. शेतावरील चारपाच खेड्यांचे शेतकरी तिथे येऊन दवाखाना किंवा समाज मंदिर यांचा उपयोग करतात. केंद्रात वीज आणि नळ यांची सोय आहे. रस्ते मात्र कच्चे, चिखलाने बरबटलेले आणि आपल्या खेड्याबाहेरच्या पांदणीसारखे आहेत.

डायरेक्टर बोर्डाचे नऊ सभासद आहेत. त्यांपैकी दोन–तीन सभासदांची घरे आम्हांला दाखविण्यात आली. आधुनिक सुखसोयींनी ती घरे सुसज्ज होती. पण इतर शेतकऱ्यांची घरे झोपडीवजा आणि बसकी होती.

‘ रशियाच्या समाजवादी अर्थपद्धतीचा कणा, ’ असे सामुदायिक शेतीचे वर्णन करण्यात येते. रशियातील साठ टक्के लोक शेतीच्या व्यवसायावर उपजीविका करतात. आणि रशियाच्या एकूण शेती–उत्पादनापैकी ८० टक्के माल सामुदायिक शेतात तयार होतो. सामुदायिक शेतीची जमीन सरकारच्या मालकीची असते. ती या शेतीला भाडेपट्ट्याने देण्यात येते. सामुदायिक शेती–पद्धतीचा आरंभ आणि त्यानंतर त्यात झालेले बदल लक्षात घेतले म्हणजे रशियाला शेतीचे उत्पादन वाढविण्यात किती प्रमाणात यश आले हे समजू शकेल.

रशियात क्रांती झाल्याबरोबर शेतकऱ्यांनी क्रांतीच्या नेत्यांकडे जमिनीची मागणी केली. तसेच शेतीच्या उत्पादनाचा मोठा वाटा शेतकऱ्यांकडेच राहावा आणि त्याची विक्री त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे करता यावी, असाही आग्रह धरला. ‘ कसेल त्याची जमीन ’, असे लेनिनने क्रांतीच्या वेळी घोषित केले होते. पण शेतकऱ्यांना जमीन देणे मार्क्सवादी तत्त्वांत बसत नव्हते. क्रांतीच्या वेळी शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांना जमीन देण्याचे आश्वासन दिलेले असले तरी ते प्रत्यक्ष व्यवहारात आणणे सोपे नव्हते. कारण एक तर त्यामुळे शेतीचे अगोदरच लहान असलेले तुकडे आणखी लहान करून शेतकऱ्यांना वाटून द्यावे लागले असते आणि दुसरे म्हणजे वैयक्तिक खाजगी मालकीची ही कल्पना मार्क्सवादाच्या साच्यात बसू शकत नव्हती. मार्क्सवादाला खाजगी मालकी मान्य नाही आणि शेतकऱ्यांना जमिनी मिळतील अशी घोषणा तर केलेली होती. लेनिन आणि त्याचे सहकारी पेचप्रसंगात सापडलेले होते. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक शेतमालकीच्या मागणीला नाकारणे शक्य नव्हते; पण देशातील सर्व उत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण तर करावयाचे होते. या पेचप्रसंगावर उपाय म्हणून लेनिनने प्रथम वीजउत्पादनावर भर देण्याची कल्पना जाहीर केली. त्यामुळे उद्योगधंद्यांना चालना मिळेल, शेतीवरील माणसांचे ओझे कमी होऊन कारखान्यांकडे त्यांची रीघ लागेल आणि शेतीसाठीही विजेचा उपयोग झाल्यास उत्पादन वाढविता येईल

अशी लेनिनची योजना होती. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा असंतोषही कमी होईल असे त्याला वाटत होते. पण विजेचे उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक लागणारा प्रचंड भांडवली खर्च आणि शेकडो तंत्रज्ञांची गरज या दोन्ही गोष्टींनी लेनिनच्या योजनेला मूर्त स्वरूप त्यावेळी तरी येऊ शकले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा असंतोष कायमच राहिला. त्याच सुमाराला यादवी युद्ध चालू झाले. बाहेरच्या आक्रमणाचाही धोका सीमेवर उभा होता. पहिल्या महायुद्धामुळे उत्पादनकार्याची विस्कटलेली घडी तशीच पडून होती. अशा स्थितीत शेतीचे उत्पादन खूपच घटले. शेवटी तडजोड म्हणून काही वर्षे शेतीची मालकी शेतकऱ्यांकडेच कायम ठेवण्यात आली. पण उत्पादनवाढी-साठी त्याचा उपयोग होऊ शकत नव्हता. शेतकऱ्यांना शेताचा तुकडा मिळाला पण इतर भांडवली खर्च करण्याची त्यांच्याजवळ ऐपत नव्हती. जमीनदारवर्ग निष्क्रिय बनला किंवा मारला गेला. त्यामुळे त्या वर्गाजवळ असलेली साधनेही विस्कळीत झाली किंवा नष्ट झाली.

## बिचारे शेतकरी !

पहिली पंचवार्षिक योजना रशियात सुरू झाली; आणि त्या योजनेत भारी उद्योगधंद्यांवर भर देण्यात आला. अशा वेळी शेतीचे उत्पादन आणि नियंत्रण आपल्या हाती ठेवणे सत्ताधारीवर्गाला आवश्यक वाटले. इ. स. १९२९ साली सामुदायिक शेतीची कल्पना मांडली तेव्हा शेतकरीवर्गात खूपच खळबळ उडाली. विशेषतः ज्या शेतकऱ्यांजवळ थोडीशी अवजारे आणि पशुधन होते त्यांना आपले सर्वस्व जाणार या भीतीने विलक्षण धास्ती उत्पन्न झाली. पण शेतीचे सामुदायिकीकरण करण्याचा प्रयोग मागे घेता येणे शक्य नव्हते. त्यामुळे उत्पादन वाढो किंवा न वाढो पण शेतीचे नियंत्रण शासनसत्तेच्या हाती आणण्याची गरज होती. स्टालिनने सामुदायिक शेतीचे प्रयोग त्याच्या राजवटीला शोभतील अशा मार्गानेच केले. सामुदायिक शेतीला विरोध कर-णाऱ्या शेतकऱ्यांची कत्तल तरी झाली किंवा त्यांना सायबेरियाच्या काळ्यापाण्यावर तरी पाठविण्यात आले. शेतीच्या प्रयोगाने ठार झालेल्या किंवा बेपत्ता झालेल्या शेत-कऱ्यांची संख्या पन्नास लाख असावी. काही जणांच्या मते हा आकडा एक कोटीपर्यंत वाढवावा लागेल. या आकड्यांची बेरीज वजाबाकी करून नक्की उत्तर हाती लागणे शक्य नाही. पण त्यावेळी लक्षावधी शेतकऱ्यांचे जीवन नष्ट झाले ही वस्तुस्थिती खुद्द क्रुश्चेव्ह यानेच अलिकडे जाहीर केली आहे.

## मालकीची इच्छा

अद्याप तरी शेतकऱ्यांच्या मनातून शेतीच्या मालकीची इच्छा नाहीशी झाली आहे

काय? सामुदायिकीकरणाच्या तीस वर्षांच्या प्रयोगानंतर मालकीची वैयक्तिक इच्छा नष्ट होऊन तिची जागा सामुदायिक मालकीच्या कल्पनेने घ्यायला हरकत नसावी. शेतीच्या सामुदायिकीकरणाबरोबर शेतकऱ्याच्या मालकी हक्काच्या इच्छेचे सामुदायिकीकरण खरोखरच झाले आहे की नाही हे समजावयाला निश्चित मार्ग नाही. सामुदायिक शेतीतून बाहेर पडण्याची कल्पना व्यक्त करणे भयंकर गुन्हा समजला जातो. पण अशा स्थितीतही शेतकऱ्याच्या मनाचा अंदाज कळायला काही मार्ग आहेत.

सामुदायिक शेतीवर प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या घराभोवती अर्धा ते दीड एकर जमीन मिळालेली असते. या जमिनीत पिकणारा भाजीपाला आणि फळे अलिकडे मोठ्या प्रमाणात पिकविली जातात. एवढेच नव्हे तर, शेतकरीवर्ग या खासगी शेतीची मशागत करण्यात अधिक गुंतलेला असतो. त्यामुळे सामुदायिक शेतीत तो पुरेसे लक्ष घालीत नाही, अशा तक्रारी अलिकडे वाढत चालल्या आहेत.

शेतकऱ्याच्या घराभोवती जो खाजगी प्लॉट त्याला दिलेला आहे तो स्टालिनच्या काळातच. पण या खाजगी तुकड्यावरील पीकही त्यावेळी सरकार ठरवील त्या किंमतीला द्यावे लागत असे. आता त्यात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. हे पीक शेतकरी आपल्या इच्छेप्रमाणे कोणत्याही भावाने विकू शकतो. ही सवलत मिळाल्याबरोबर शेतकऱ्यांच्या शक्तीचा आणि साधनांचा उपयोग स्वतःच्या शेतीच्या खाजगी तुकड्यावर अधिक प्रमाणात होऊ लागला, आणि या गोष्टीला जाहीर वाच्यता व्हावी एवढे मोठे प्रमाण प्राप्त झाले.

खाजगी शेतीबद्दल शेतकऱ्याच्या मनात सुप्तपणे किती जबरदस्त ओढ असते याचे एक प्रत्यक्ष उदाहरणच आम्हांला पहावयास मिळाले. कार्ल मार्क्स शेतावरील एक डायरेक्टर आपले घर आम्हांला दाखवीत होता. घरातील सामान सधन शेतकऱ्याला साजेसे होते आणि त्याची सजावटही चांगली केलेली होती. एका खोलीत भाजीपाल्याचा ढीग पडला होता. त्याची विक्री तो दुसरे दिवशी ताष्कंदच्या बाजारात करणार होता. आमच्यापैकी एकाने सहज म्हटले, 'एक एकर जमिनीत तुम्ही भरपूर भाजीपाला तयार केला आहे हं! शिवाय तुमच्या परड्यात द्राक्षांचे मांडवही बरेच दिसतात.'

तो म्हणाला, 'होय, पुढल्या वर्षी यापेक्षा अधिक भाजीपाला तयार होईल असा अंदाज आहे.'

'का?'

'कारण माझा मोठा मुलगा आणि पत्नी या छोट्या बागेकडे अधिक लक्ष देणार आहेत. एका एकरातही मला भरपूर पीक करता येईल.'

'तुम्हांला पाच एकर जमीन असती तर?'

'मग माझे सगळे घर भाजीपाल्याने भरले असते.'

'आणि दहा एकर असती तर ?'

तो मोठ्याने हसला. एक असंभाव्य घटना त्याच्या काल्पनिक जगात खळबळ माजवून गेली. त्याचा चेहरा फुलला, आनंदी झाला. मालकीच्या त्या कल्पनेनेही केवळ त्याचे मन सुखावले असावे. अगोदरच टपोरे असलेले त्याचे डोळे अधिकच विस्फारले. तो मोठ्याने म्हणाला, 'काय बहार झाली असती !'

'पण प्रत्येकाला असे दहा पाच एकरांचे शेत मिळाले तर सामुदायिक स्वरूप कसे टिकेल ?'

हा प्रश्न ऐकल्याबरोबर तो चमकला आणि सांगू लागला, 'छे छे ! मला तसे म्हणावयाचे नव्हते. सामुदायिक शेतीवर तर आम्ही काम करतोच, पण या खासगी शेतीच्या तुकड्यामुळे थोडे अधिक उत्पन्न मिळते, येवढेच मला म्हणावयाचे होते.'

शेतकऱ्याने व्यक्त केलेल्या सहजोद्गारांत त्याच्या भावना बोलक्या झालेल्या दिसल्या. पण ही गोष्ट आमच्या दुभाषाला तितकीशी बरी वाटली नसावी. तो केवळ दुभाषा म्हणजे भाषांतऱ्या नव्हता. परदेशी पाहुण्यांशी कसे वागावे, रशियासंबंधी त्यांच्या मनात अनुकूल भाव उत्पन्न व्हावा याची तंत्रे त्याला अवगत होती. शेतकऱ्याला सावरून घेण्यासाठी तो लगेच म्हणाला, 'घराभोवतीच्या बागेविषयी शेतकऱ्याला हे येवढे प्रेम का वाटते यासंबंधीचा एक जुना प्रसंग मी तुम्हांला सांगतो.'

## जमीनदाराचे भूत

काही वर्षांपूर्वी स्टालिन मास्कोनजीकच्या एका सामुदायिक शेतीला भेट देण्यासाठी गेला होता. त्याच्याबरोबर क्रुश्चेव्ह आणि इतर मंडळीही होती. ते सर्वजण एका सधन शेतकऱ्याच्या घरासमोर उभे होते. स्वतःच्या घराभोवती एकर दीड एकर जागेत त्या शेतकऱ्याने सुंदर बाग फुलविली होती. ती पाहून स्टालिन म्हणाला, 'हे शेत खूपच पिकले आहे नाही का ? येवढे भरघोस पीक आल्यावर रशियाला धान्याची तूट मुळीच पडणार नाही' क्रुश्चेव्हने प्रथम त्याच्या सुरात सूर मिळविला आणि नंतर त्याने हळूच म्हटले, 'पण हे सर्व शेत आपण कापून टाकणार आहोत, असे हा शेतकरी म्हणतो.' स्टालिन ओरडून म्हणाला, 'याचा अर्थ काय ?' क्रुश्चेव्हने उत्तर दिले, 'शेतकऱ्यांचे म्हणणे असे आहे की ही बाग फुलविण्यासाठी त्याने खूप कष्ट केले व आता ती फळाफुलाला आली आहे. पण सरकार ते सर्व पीक ओरबडून नेणार, सरकारच त्याची किंमत ठरविणार आणि त्यावरून जे दाम त्याच्या हाती पडतील ती त्याच्या श्रमांची किंमत ठरणार. अशा किंमतीत त्याचा खर्चही भागत नाही असे त्याचे म्हणणे आहे.'

स्टालिन संतापून म्हणाला, 'ते काहीही असो, ही त्याची खासगी बाग असली तरी तिचे पीक कापून टाकण्याचा त्याला अधिकार नाही.' क्रुश्चेव्हने सांगितले, 'मला

वाटते. यासंबंधी एक सुधारणा करावी म्हणजे शेतकऱ्याला कामासाठी उत्साह वाटेल आणि तो हिरीरीने अधिक पीक काढू लागेल. या बागेतील सर्व पीक त्याचे त्यालाच हवे तसे विकू द्यावे.'

स्टालिन लगेच संतापून म्हणाला, 'शेतकऱ्याच्या मनात जमीनदाराचे भूत शिरले आहे असे दिसते. आणि तू त्या भुताला अधिक चेतवितो आहेस. हे भूत मला गाडून टाकलेच पाहिजे.'

दुभाषाने सांगितलेला प्रसंग क्रुश्चेव्हचा मोठेपणा वाढविणारा होता. त्यामुळे अलिकडे रशियात स्टालिनची निंदा आणि क्रुश्चेव्हची प्रशंसा करण्याचे जे धोरण सर्वत्र दिसते त्यातलाच कदाचित प्रकार असावा. पण तो प्रसंग प्रत्यक्ष घडलेला असो अथवा नसो, क्रुश्चेव्हने शेतकऱ्यांच्या मनाला उल्हसित करणाऱ्या, त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या काही सुधारणा घडवून आणल्या आहेत हे मात्र खरे. शेतकऱ्याला स्वतःच्या एकर दीड एकर बागेतील पीक स्वतः हवे तेथे आणि परवडेल त्या भावात विकण्यास मोकळीक मिळाली आहे.

## खासगी बागेचे उत्पन्न

खासगी प्लॉटमधील उत्पादनामुळे रशियाच्या एकंदर शेतीविषयक उत्पन्नात १५ ते २० टक्के भर पडलेली आहे आणि हे उत्पादन एकंदर सामुदायिक शेतीच्या पिकाच्या जवळजवळ २५ टक्के येवढे झाले आहे. शेतकऱ्यांना मिळालेली ही सवलत त्यांचे पीक वाढविण्यास आणखी उपयोगी पडेल. अर्थात ही गोष्ट व्यक्तिशः शेतकऱ्याच्या दृष्टीने फायद्याची असली तरी सामुदायिक शेतीच्या दृष्टीने ती हानीकारक ठरेल की काय अशी शंका अलिकडे रशियन शेतकी खात्यात व्यक्त केली जात आहे.

रशियात अद्यापही अन्नधान्याचा तुटवडा भासतो. त्यामुळे शेतकऱ्याला आपल्या बागेतील पिकाचे भाव वाढवून ते विकले तरी त्यांना गिऱ्हाइकांना तोटा नसतो. शेतकऱ्याच्या पिकाला भरपूर मागणी आहे आणि ती सारखी वाढतच चालली आहे.

## सरकारी शेती

सामुदायिक शेतीशिवाय रशियात सरकारी मालकीचा आणि सरकारच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेला शेतीचा आणखी एक प्रकार आहे. सामुदायिक शेती म्हणजे नव्या धर्तीचे एक खेडे आहे असे म्हटले तर, सरकारी शेत हा एक कारखाना आहे असे त्याचे वर्णन करता येईल. सरकारी शेती संपूर्णपणे सरकारी मालकीचीच असते. त्यावर काम करणाऱ्या शेतकरी नोकरांना उत्पादनातील नफा किंवा प्रत्यक्ष पिकातील वाटा मिळत नाही. सरकारी खात्यांतील नोकरांप्रमाणे त्याना पगार मिळतो आणि

सरकारी नोकरांचेच नियमही त्यांना लागू असतात. गिरणीतील कामगारांप्रमाणे त्यांच्या नोकरीचे स्वरूप असते. शेती पिको अथवा न पिको सरकारी शेतावरील नोकराला त्याचा ठरलेला पगार मिळतो. पीक भरघोस आले तरी त्याच्या पगारात किंवा इतर सोयीसवलतीत भर पडत नाही. शेतावर त्याला राहावयास घर मिळते. जादा काम केले तर तेवढ्या जादा कामाचे वेतनही मिळते. सामुदायिक शेतापेक्षा सरकारी शेते क्षेत्रफळाने मोठी असतात. त्यांचे सरासरी क्षेत्रफळ ३५००० एकर आहे. त्यांतील एक तृतीयांश भागात शेती केली जाते. अशी एकंदर ५८०० सरकारी शेते आहेत. सामुदायिक शेतांची संख्या ८०००० आहे.

## शेतकऱ्यांचा मोबदला

सरकारी शेतीवरील शेतकऱ्याला धान्याच्या आणि रोख रकमेच्या स्वरूपात महिन्याकाठी ठराविक पगार मिळत असल्यामुळे त्याच्या मोबदल्याच्या बाबतीत विशेष गुंतागुंत नसते. पण सामुदायिक शेतीवरील शेतकऱ्याला त्याच्या कामाच्या गुणांवरून आणि कामाच्या दिवसांच्या संख्येवरून मोबदला मिळतो. आठ तासांचा दिवस सर्वांनाच लागू आहे, पण या आठ तासांच्या दिवसासाठी अकुशल शेतकऱ्याला जेवढा मोबदला मिळतो त्याच्या दुप्पट कुशल शेतकऱ्याला आणि सुमारे चौपट मोबदला तंत्रज्ञ शेतकरी किंवा विशेष जोखमीची कामे करणारा शेतकरी मिळवितो. वर्षाकाठी शेतातील उत्पादनापैकी ३५ ते ४० टक्के उत्पादन सरकारला दिले जाते. या मालाची किंमत सरकारनेच ठरविलेली असते. किंमतीच्या योग्यायोग्यपणाबद्दल शेतकऱ्यांना व्यक्तिशः किंवा सामुदायिकरीत्या काहीही आक्षेप घेता येत नाही. सरकारचा वाटा दिल्यानंतर १५ ते २० टक्के माल पुढील वर्षाच्या बीबियाणासाठी राखून ठेवला जातो. अशा प्रकारे ५० ते ६० टक्के पिकाची विल्हेवाट लागल्यानंतर राहिलेले ४० ते ५० टक्के पीक शेतकऱ्यांत त्यांच्या कामाच्या दिवसांनुसार विभागले जाते.

सामुदायिक शेतांकडून खरेदी केलेला माल सरकार कितीतरी अधिक किंमतीला नागरिकांना विकते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. अशा प्रकारे धान्याच्या खरेदी-विक्रीच्या व्यापारात सरकारला जो नफा मिळतो तो रशियाच्या अर्थव्यवस्थेचा फार मोठा आधार आहे.

'कार्ल मार्क्स' शेतावरील शेतकरी जादा काम करून वर्षाकाठी ३५० ते ४५० कामाचे दिवस जमा करू शकतो. आणि त्यासाठी त्याला वर्षाकाठी २००० ते २५०० रुबल्स (सुमारे सोळाशे ते दोन हजार रुपये) मिळतात. मोबदल्याचा काही भाग पिकाच्या स्वरूपात आणि काही भाग रोख रकमेच्या स्वरूपात दिला जातो. कुशल शेतकऱ्याच्या बाबतीत मोबदल्याचे प्रमाण यापेक्षा सुमारे दुप्पट असते. आणि तंत्रज्ञ शेतकऱ्याला सामान्यतः चौपट प्रमाण पडते.

## सधन शेतकरीवर्ग

डायरेक्टर बोर्ड आणि वर उल्लेखिलेला तंत्रज्ञ शेतकरी यांची सांपत्तिक स्थिती इतर शेतकऱ्यांच्या मानाने पुष्कळच चांगली असते. सधन शेतकरी, असा उल्लेख या गटाला उद्देशूनच केलेला आहे. सामुदायिक शेतावरील चारपाचशे कुटुंबांपैकी तीस चाळीस कुटुंबांची गणना अशा सधन शेतकऱ्यांत करावयास हरकत नाही. डायरेक्टर बोर्डाचा अध्यक्ष शेतीच्या सर्व व्यवहारावर देखरेख ठेवतो. पिकाच्या लागवडीपासून मालाच्या विक्रीपर्यंत सर्व प्रकारची कामे त्याच्या व्यवस्थेखाली पार पडत असतात. त्याला रोख पगार मिळतो. त्याशिवाय महिन्याकाठी काही कामाचे दिवसही त्याला दिलेले असतात. सरकारने ठरविलेले उत्पादनाचे लक्ष्य सामुदायिक शेताने पूर्ण केले म्हणजे अध्यक्षाला बोनसही मिळतो. पण त्याचबरोबर उत्पादनाचे लक्ष्य घटले तर मात्र त्याच्या वार्षिक उत्पादनाच्या २५ टक्क्यांइतका दंडही केला जातो. त्याची बढती किंवा बडतर्फी उत्पादनाचे लक्ष्य गाठण्यावर अवलंबून असल्यामुळे अनेकदा पिकाचे आकडे फुगवून सांगण्याची अनिष्ट प्रवृत्ती वाढते. विशेषतः डायरेक्टर बोर्ड व तंत्रज्ञ शेतकरी यांचे संगनमत झाल्यावर या अनिष्ट प्रवृत्तीला अधिक वाव मिळतो. सामुदायिक शेतीच्या कार्यालयात हिशेब तपासनीस आणि इतर नोकरवर्ग यांना ठराविक मासिक वेतन दिले जाते. डायरेक्टर बोर्डाचा अध्यक्ष एका बाजूला कार्यालयाचे नियंत्रण करीत असतो आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या कामाच्या प्रमाणात आणि प्रगतीत वेग कसा उत्पन्न होईल याकडे लक्ष देत असतो. सरकारी संबंधित खात्यांशी संबंधही त्याला ठेवावे लागतात. शेतावरील शाळा, छोटी दुकाने, दवाखाना, पाणी आणि वीजपुरवठा या सर्वांचा खर्च त्या शेताच्या उत्पन्नातूनच केला जातो.

## कम्युनिस्ट पक्षाचे नियंत्रण

डायरेक्टर आणि डायरेक्टर बोर्ड यांच्यावर कम्युनिस्ट पक्षाचे प्रत्यक्ष नियंत्रण असते. सामान्यतः डायरेक्टर बोर्डाचा अध्यक्ष आणि बोर्डातील एक तृतीयांश सभासद कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते असतात. आम्ही पाहिलेल्या ' कार्ल मार्क्स ' शेताचा मुख्य डायरेक्टर आणि बोर्डाच्या नऊ सभासदांपैकी तिघेजण कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. आणि मुख्य डायरेक्टर गेली वीस वर्षे त्याच अधिकारावर काम करीत होता.

सामुदायिक शेतांना यंत्रे आणि अवजारे पुरविण्यासाठी स्टालिनच्या काळात मशीन-ट्रॅक्टर-स्टेशन्स ( M. T. S. ) स्थापन केलेली होती. ही केंद्रे म्हणजे शेतीच्या अवजारांचे मोठमोठे कारखानेच होते. तेथील यंत्रे आणि अवजारे सामुदायिक शेतांना भाड्याने वापरण्यासाठी दिली जात. पण स्टालिनच्या इतर क्रूर पद्धतींप्रमाणे या

केंद्रांच्या बाबतीतही त्याने एक विशिष्ट धोरण स्वीकारले होते. या केंद्रांचे संचालक सामुदायिक शेतीच्या अंतर्गत कामांत ढवळाढवळ करीत आणि त्यामुळे सरकारला सामुदायिक शेतीच्या संचालकांमध्ये तेढ चालू ठेवण्यास एक साधन मिळत असे.

ठराविक मोबदला देऊन वरील केंद्रांकडून गरजेप्रमाणे अवजारे आणि यंत्रे मिळवावी आणि काम संपताच ती केंद्राला परत करावी अशी त्यांच्या व्यवहाराची पद्धत होती. या यंत्रसामुग्रीसाठी दरवर्षी सामुदायिक शेतीला बराच खर्च करावा लागत असे. रशियात अशी आठ हजार यंत्रकेंद्रे होती. सामुदायिक शेतांकडून मालाच्या स्वरूपात मोबदला दिला जात असे आणि सर्व केंद्रे सरकारच्याच मालकीची असल्यामुळे सरकार ठरवील त्या भावानेच केंद्रांना माल द्यावा लागत असे. पण अलिकडे क्रुश्चेव्हने यंत्रकेंद्रे बरखास्त करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे सामुदायिक शेतीला एक प्रकारे एका अडचणीतून मुक्त केले जात आहे. सध्या रशियात फार थोडी यंत्रकेंद्रे चालू आहेत. बरखास्त केलेल्या केंद्रांवरील यंत्रे आणि अवजारे जवळपासच्या सामुदायिक शेतांना विकून टाकण्यात आली.

सामुदायिक शेती आणि सरकारी शेती या दोन्हींवरही सरकारचे नियंत्रण असले तरी तुलनेने रशियन राज्यकर्त्यांना सामुदायिक शेतापेक्षा सरकारी शेती अधिक पसंत आहे. कारण सरकारच्या शेतीविषयक धोरणात सरकारी शेतीला अधिक उत्तेजन आणि प्राधान्य दिले जाते. सरकारी शेतांची व्यवस्था पाहणे अधिक सोपे असते आणि संपूर्ण पीक सरकारच्या पदरात पडत असल्यामुळे ते नफा मिळण्याच्या दृष्टीनेही अधिक उपयुक्त ठरते. तेथे काम करणारा सर्व नोकरवर्ग प्रत्यक्ष सरकारने नेमलेला असतो. पण सामुदायिक शेताच्या डायरेक्टरांची निवड त्या शेतीवरील शेतकऱ्यांकडून केली जाते. अर्थात रशियातील एकपक्षीय राजवट आणि शासनसंस्थेचे स्वरूप यांच्या संदर्भातच अशा निवडणुकीचा अर्थ लक्षात घ्यावयाचा असतो. पण तरीही प्रत्यक्ष सरकारने नेमलेला नोकर आणि डायरेक्टर बोर्डाचा सभासद यांच्यावरील सरकारच्या नियंत्रणाचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात असू शकतो.

## स्टालिनशी झटापट

शेतीच्या जुन्या पद्धतीपेक्षा सामुदायिक शेतीने रशियाच्या धान्याच्या उत्पादनात भर पडली आहे. पण हे विधान करताना सामुदायिक शेतीसाठी स्टालिनने केलेली सक्ती, त्यातून झालेला रक्तपात; शेतकऱ्यांनी, दाखविलेला विरोध त्यामुळे वरचेवर त्यांचा छळ या सर्वांचा इतिहास दृष्टीआड करता येणार नाही. इ. स. १९२९ साली सामुदायिक शेतीचा आरंभ झाला आणि इ. स. १९३५ साली रशियातील सर्व शेती सामुदायिक किंवा सरकारी नियंत्रणाखाली आली. सतत सहा वर्षे शेतकऱ्यांच्या मनातील असंतोष आणि स्टालिनचे सक्तीचे धोरण यांची झटापट चालू होती.

सामुदायिक शेतीमुळे व्यक्तिशः शेतकऱ्याला प्रत्यक्ष किती प्रमाणात फायदा होतो यापेक्षा अशा शेतीच्या नियंत्रणामुळे रशियाच्या अर्थव्यवस्थेला किती प्रमाणात उपयोग होतो हीच रशियन राज्यकर्त्यांची मुख्य कसोटी आहे. शेतीवरील संपूर्ण नियंत्रणामुळे त्यातील पीक मिळण्याची हुकमी सोय झाली. औद्योगिक धोरणाला प्रचंड स्वरूपात चालना देता आली. जीवनोपयोगी उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनापेक्षा अवजड कारखानदारीवर अधिक भर देता आला. या धोरणामुळे अन्नधान्याचा प्रश्नच सुटू शकला नाही, पण त्याच बरोबर भारी उद्योगधंदे आणि युद्धसाहित्य यांत जलदगतीने वाढ करता आली. रशियाच्या शस्त्र व शास्त्र संशोधनाला जो अफाट खर्च लागतो तो शेतीच्या विशिष्ट धोरणामुळेच उपलब्ध होऊ शकतो. राजकारण आणि अर्थव्यवस्था, कारभार आणि शास्त्रीय संशोधन या सर्वांची अशा प्रकारे घट्ट सांगड घातली असल्यामुळे स्टालीनला तेथील सामाजिक जीवन पूर्णपणे नियंत्रणाखाली ठेवून झपाट्याने लष्करी सामर्थ्य वाढविता आले. त्यासाठी सामुदायिक शेतीसंबंधीचे त्याचे धोरण शेतकऱ्यांना महाग पडले असले तरी, राज्यकर्त्यांना मात्र अतिशय उपयुक्त ठरले.

## अवजारांचा कारखाना

उझबेक प्रांत मुख्यतः कापसाच्या आणि फळांच्या लागवडीसाठी प्रसिद्ध आहे. आधुनिक यंत्रांनी शेतीची मशागत केली जाते. अशी यंत्रे आणि अवजारे तयार करण्याचा एक मोठा कारखाना ताष्कंदनजीक तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत स्थापन करण्यात आला आहे. शेतीची अवजारे तयार करणारा युरोप आणि आशियामध्ये हा सर्वांत मोठा कारखाना असल्याचे आम्हांला सांगण्यात आले. कारखान्यात कापसाच्या लागवडीसाठी उपयोगी पडणाऱ्या यंत्रांच्या उत्पादनावर प्रामुख्याने भर दिलेला आहे. कारखान्यात आम्ही प्रवेश केला तेव्हा मधल्या सुटीची वेळ होती. बरेच कामगार कँटीनकडे जात होते आणि काही गटागटाने रस्त्याच्या कडेला बसलेले होते. मधल्या सुटीचे जेवण कँटीनमध्ये करण्याची सोय आहे. आम्ही कँटीन पाहण्यासाठी गेलो. तेथे चारपाचशे कामगार जेवणाच्या घाईगर्दीत होते. कँटीनमधे प्रत्येक टेबलावर ब्रेडचे ढीग ठेवलेले दिसत होते. कामगार हवे तेवढे ब्रेड घेऊ शकतो. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ब्रेडला काहीही किंमत आकारण्यात येत नाही. ब्रेड बरोबर इतर वस्तू घेतल्यास फक्त त्यांचीच किंमत आकारण्यात येते. क्रुश्चेव्हच्या काळातली ही नवी सुधारणा आहे. कँटीनमधे ब्रेड फुकट मिळते, या कल्पनेनेच कामगारांना खूप समाधान वाटते. प्रत्येक जेवणाला सामान्यतः तीन ते चार रुबल्स ( सुमारे अडीच ते तीन रुपये

पडतात.) काही कामगार कँटीनच्या बाहेर झाडाखाली किंवा जवळपासच्या इमारतीत व्हरांड्यासारख्या जागेत घरची शिदोरी सोडून मधल्या वेळचा उपाहार घेत होते.

## वेतनातील तफावत

या कारखान्यात चार हजार कामगार काम करतात. आणि त्यातून दररोज १० ते १२ मोठी यंत्रे तयार होऊन बाहेर पडतात. एक यंत्र २०० कामगारांचे काम करू शकते अशी माहिती मिळाली. कामगारांपैकी चाळीस टक्के स्त्रिया आहेत. कामगाराचा किमान पगार महिन्याला ३५० रुबल्स ( सुमारे २८० रुपये ) ठरविलेला असला तरी, शेकडा २० ते २५ टक्के कामगारांना अद्याप हा किमान पगार मिळू शकत नाही. त्याचे कारण सांगताना मॅनेजरने असे म्हटले की कामगाराने दोन वर्षे काम केल्यानंतर तो अर्धकुशल कामगार समजला जातो. त्यानंतर दोन ते तीन वर्षानी त्याला कुशल कामगार समजण्यात येते. या पहिल्या पाच वर्षांच्या काळात त्याला किमान पगाराची हमी देता येत नाही. त्यानंतर मात्र पगारात वाढ होणे हे सर्वस्वी त्याच्या कौशल्यावर, परिश्रमावर आणि कल्पकतेवर अवलंबून आहे. कामगारांना प्रोत्साहन देण्यासाठी काही खास उपाय योजण्यात येतात. उदाहरणार्थ, एखाद्या कामगाराने त्याच्याकडे सोपविलेल्या कामाचे (वस्तूचे) उत्पादन वाढविण्यासाठी एखादा सुलभ आणि स्वस्त उपाय सुचविला तर त्याला खास बोनस मिळतो, पगारवाढ होते आणि कारखान्या-तर्फे त्याचा गौरव करण्यात येतो. इतर कारखान्यांत पाठवून त्याच्या कामाचा आणि कौशल्याचा परिचय करून दिला जातो. त्याने सुचविलेल्या उपायाच्या गुणांवरून त्याची बढती होते.

कारखान्यातील कामगाराचा किमान पगार ३५० रुबल्स सुमारे–२८० रुपये–आहे. वरच्या अधिकाऱ्यांना २५०० रुबल्स-सुमारे २ हजार रुपये-पगार मिळतो. कारखान्याचे इंजिनिअर आणि व्यवस्थापकवर्गातील वरिष्ठ अधिकारी यांना हा सर्वात अधिक पगार मिळतो. वयाच्या साठाव्या वर्षी कामगार सेवानिवृत्त होऊ शकतो. त्या-नंतर त्याला मूळ पगाराच्या प्रमाणानुसार २५० ते १००० रुबल्सपर्यंत–सुमारे दोनशे ते आठशे रुपये–सेवानिवृत्तीचे वेतन मिळते.

## सरकारी कामगारसंघटना

कारखान्यात आठ तास काम करावे लागते. गैरहजेरी किंवा कामाची टाळाटाळ करणे अशासारख्या गोष्टींना पायबंद घालण्यासाठी कडक उपाय योजण्यात येतात. सर्व कारखाने सरकारी नियंत्रणाखाली चालत असल्यामुळे कामगाराला एक कारखाना सोडून दुसऱ्या कारखान्यात नोकरी मिळणे शक्य नसते. अगदी अपरिहार्य कारण

असेल तरच कामगारसंघटनेच्या शिफारशींनुसार कामगारांना नोकरीचे ठिकाण बदलता येते. प्रत्येक कारखान्यासाठी एक कामगार-संघटना स्थापन केलेली असते. व्यवस्थापकवर्गाशी वाटाघाटी करून ही संघटना कामगारांच्या सोयीसवलतीकडे पाहते. कामगार संघटनेचा–ट्रेड युनियनचा–अध्यक्ष कारखान्याच्या बाहेरचा असतो. आणि त्याचे संबंध देशव्यापी संघटनेशी जोडलेले असतात. कारखान्यातील कामगारांनी निवडून दिलेले १५ ते २० सभासद आणि व्यवस्थापकवर्ग यांच्या सहकार्याने कामगार संघटनेचा अध्यक्ष कामगारांच्या हितांच्या दृष्टीने काम करीत असतो. कामगार संघटनेचे स्वरूप जवळ जवळ सरकारी संघटनेसारखेच असल्यामुळे सरकारचे कामगार-विषयक जे धोरण असेल त्याला कामगारसंघटना विरोध दर्शवू शकत नाही. कामगारांची चळवळ, संप, निषेध, सरकारविरोधी ठराव इत्यादि सर्व शब्द आणि त्यामागील कल्पना रशियाच्या कामगारसंघटनेतून काढून टाकलेल्या आहेत. त्यामुळे कामगारसंघटनेचे अस्तित्व, सरकारने कामगारविषयक केलेल्या कायद्यांची व नियमांची अंमलबजावणी कारखान्याच्या व्यवस्थापकांकडून नीटपणे पार पाडली जाते किंवा नाही येवढे पाहण्यापुरतेच असते. सरकारच्या नियमांना किंवा धोरणाला विरोध दर्शविता येत नाही. संघटनेच्या सभासदाला एक टक्का रक्कम वर्गणीदाखल द्यावी लागते. सभासद होणे ऐच्छिक स्वरूपाचे असले तरी बहुधा सर्व कामगार सभासद होतात.

रशियात निरनिराळ्या उद्योगधंद्यांत पुरुष आणि स्त्रिया मिळून पाच कोटी लोक गुंतलेले आहेत. १९२८ साली पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली, तेव्हा दीड कोटी लोक उद्योगधंद्यांत काम करीत होते. याचा अर्थ तीस वर्षांत त्यांची संख्या तिपटीपेक्षा अधिक वाढलेली आहे. उद्योगधंद्यात उत्पादनाचा वेग झपाट्याने वाढत गेला त्याबरोबर कामगारांची संख्याही खूपच वाढत गेली. पण आरंभीच्या काळात या संख्यावाढीबरोबर कामगारांच्या कौशल्याचे प्रमाण वाढू शकले नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे शेतीप्रधान असलेल्या रशियासारख्या देशाला कारखानदारीची परंपरा नव्हती. कारखान्यात जो कामगारवर्ग आला तो मुख्यतः शेतकरीवर्गातून. त्याला यंत्रांशी काम करण्याची सवय नव्हती आणि यांत्रिक शिक्षण घेण्याची सवडही नव्हती. या सर्वांचा परिणाम रशियात तयार होणाऱ्या मालावर अद्यापही दिसून येतो. त्यात सुबकपणा किंवा चकाकी आढळत नाही.

ताष्कंदमधील ज्या कारखान्यांचा वर उल्लेख केला आहे तेथे तयार होणारी यंत्रसामुग्री प्रचंड स्वरूपाची होती; पण एकंदर कारखान्याचे स्वरूप अस्ताव्यस्त वाटले. कारखान्याच्या बांधणीपासून कामगारांच्या पोशाखापर्यंत रेखीवपणा फार थोडा दिसून येत होता. बऱ्याच ठिकाणी तेल, चिखल, चुना, विटांचे तुकडे आणि कारखान्यातील मोडतोड झालेल्या यंत्राचे सुटे भाग विखुरलेले होते. प्रत्यक्ष जेथे मालाचे उत्पादन होते तेथेही अपुरा प्रकाश आणि धूर दिसत होता. आधुनिक यंत्रांच्या कारखान्यांवर

जशी एक चकाकी दिसून यावी आणि कामगारांच्या कामाच्या पद्धतीत जी टापटीप व्यक्त व्हावी अशी अपेक्षा असते ती या कारखान्यात तरी पूर्ण होऊ शकत नव्हती. व्यवस्थापकाच्या कचेरीपासून कँटीनपर्यंत सर्व ठिकाणी एकप्रकारचा मंदपणा आणि धुरकटलेले वातावरण आढळून येत होते.

## संपाचा हक्क नाही

रशियातील कामगारसंघटनेचा उद्देश आणि कार्यपद्धती इतर देशांतील कामगार-संघटनेपेक्षा फार निराळी असते. कामगारांना वेतनवाढ मिळवून देणे किंवा इतर सोयी-सवलती प्राप्त कशा होतील यासाठी प्रयत्न करणे हे रशियन कामगार-संघटनेचे मुख्य उद्दिष्ट नसते. कारण कामगारांचे वेतन आणि इतर सोयी-सवलती सरकारने ठरवून दिलेल्या असतात. त्यांत बदल घडवून आणणे कामगारसंघटनेस शक्य नसते. देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेच्या संदर्भात कामगारांच्या वेतनाचा विचार केला जातो. त्याचा अर्थ, देशाच्या अर्थव्यवस्थेत राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे जे चढउतार होतात ते सर्व कामगारांना सहन करणे अपरिहार्य असते. एखादी कामगारसंघटना आपल्यापुरते प्रश्न सोडबिण्याचे प्रयत्न करू शकत नाही. त्यामुळे कामगारांना केवळ संघटनेच्या जोरावर एखादी मागणी पूर्ण करून घेणे शक्य नसते. उत्पादनवाढ करणे, आणि सरकारने ठरविलेल्या कामगारविषयक कायद्यांना अनुसरून सर्व साधारण कामगारांचे हित पाहणे हेच कामगार संघांचे माफक उद्दिष्ट मानले जाते.

## कामगारांवर निर्बंध

रशियात कामगारांचा संपाचा हक्क मानलेला नाही. गेल्या ४० वर्षांत रशियात एकही संप झाला नाही. याचा अर्थ कामगारांचे सर्व प्रश्न सुटले होते आणि त्यांच्या सोयीसवलतींसंबंधी काहीही करण्याची गरज उरली नव्हती अथवा नाही, असा करता येत नाही. कामगारांचे अनेक प्रश्न अद्यापही सुटावयाचे आहेत आणि काही प्रश्नांचे बाबतीत क्रुश्चेव्हच्या धोरणामुळे अगदी अलिकडे कामगारांना सोयी उपलब्ध झाल्या आहेत. कामगारांची हुकूमशाही ( Proletariat Dictatorship ) अधिकारावर असलेल्या देशांत १९३०-३२ पासूनच अनेक प्रकारे कामगारांचा वेळोवेळी छळ झाल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ, १९३२ मध्ये कामगार-कायद्यात एक दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीप्रमाणे एक दिवसाच्या गैरहजेरीबरोबर कामगाराला कामावरून काढून टाकण्यात येई. त्याचे शिधापत्र काढून घेण्यात येई आणि मग त्याला सरकारच्या इच्छेप्रमाणे कोठेही रवाना करण्यात येई. सर्व उत्पादनसाधने सरकारच्या मालकीची असल्यामुळे एकदा नोकरी गेलेल्या

असते. त्यामुळे अनेकदा कारखान्याच्या तंत्रज्ञापेक्षा अशा कार्यकर्त्यांचेच कारखान्याच्या व्यवस्थेत अधिक वर्चस्व असते. कामगार संघटनेचा प्रमुख, कारखान्याचा व्यवस्थापक आणि कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता अशा तीन व्यक्ती कारखान्याच्या उत्पादनाकडे निरनिराळ्या हेतूंनी लक्ष ठेवीत असतात. उत्पादन घटले तर त्याची जबाबदारी मुख्यतः व्यवस्थापकावर असते. पण ते वाढले तर त्याचे श्रेय पक्षाच्या कार्यकर्त्यालाच मुख्यतः मिळते.

## धंद्यांचे राष्ट्रीयीकरण

सामुदायिक शेती आणि सरकारी उद्योगधंदे या दोन मार्गांनी रशियाची अर्थ-व्यवस्था बनलेली आहे. तिचे स्वरूप, कार्यपद्धती आणि प्रगतीची दिशा या सर्वांचे रहस्य वरील दोन साधनांच्या द्वारा समजू शकेल. रशियाची अर्थव्यवस्था योजनाबद्ध आहे. याचा अर्थ देशाची साधनसामुग्री आणि मनुष्यबळ यांना एका नियंत्रणाखाली आणून पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे त्यांचा उपयोग करण्यात येतो. सरंजामशाही आणि शेती-प्रधान देशांत औद्योगीकरण करणे हे रशियाच्या आर्थिक नियोजनाचे एक मूलभूत तत्त्व मानलेले होते. शेतीचे सामुदायिकीकरण करणे आणि उत्पादनसाधनांची यंत्रसामुग्री तयार करणे या दोन उद्दिष्टांवर मुख्य भर होता. त्यासाठी शासनसंस्थेच्या नियंत्रणाखाली देशाची अर्थव्यवस्था आणणे अपरिहार्य होते. एकाच पक्षाच्या मार्गदर्शनाने आणि सरकारच्या नियंत्रणाखाली एका नव्या बलाढ्य राष्ट्राची उभारणी करावयाची होती. त्यासाठी शेती आणि उद्योगधंदे यांचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करणे आवश्यक मानले गेले.

## भारी उद्योगधंद्यांचा बडेजाव

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच भारी उद्योगधंद्यांच्या वाढीवर आणि उभारणी-वर सर्वांत अधिक भर होता. उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या नियंत्रणाखाली ठेवाव-याची म्हटले की त्यासाठी योजनाबद्ध कार्यक्रम अपरिहार्य असतो. दैनंदिन उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर तुलनेने कमी लक्ष देणेही आवश्यक होते. कारण त्याशिवाय साधनसामुग्रीचा आणि मनुष्यबळाचा ओघ भारी उद्योगधंद्यांकडे वळविता आला नसता. १९२८ मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आरंभ झाला, त्यावेळी सरकार-जवळ पुरेशी आकडेवार माहिती उपलब्ध नव्हती. आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा प्रयोगही अगदी प्रथमच करण्यात येत होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट चार

वर्षांतच पूर्ण झाले आणि ती योजना ९३ टक्के यशस्वी झाली असे रशियाने जाहीर केले. या योजनेच्या काळात पोलादाचे उत्पादन चाळीस टक्के वाढले. यंत्रसामुग्री आणि वाहतुकीची साधने यांचे उत्पादन झपाट्याने सुरू झाले. नवी औद्योगिक शहरे वसविण्यात आली. देशातील बेकारी कमी झाली.

बेकारी कमी झाली होती, याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला काम करणे सक्तीचे करण्यात आले होते. त्यावेळी किमान वेतनाची हमी नव्हती. आणि सोपविलेल्या कामाविषयी तक्रार करण्याची मुभा नव्हती. सरकारकडून जे वेतन मिळेल ते निमूटपणे स्वीकारून दहा बारा तास काम करण्याखेरीज कामगारांना गत्यंतर नव्हते. ज्या काळात जगातील इतर देशांत मंदीची लाट पसरली होती त्या काळात रशियात योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा पाया घातला जाऊ लागला. धान्य, कापड, घरगुती सामान, घरे इत्यादि उपभोग्य वस्तूंचा तुटवडा खूपच जाणवत होता. त्यांचे उत्पादन समाधानकारकपणे चालू झाले नव्हते. सामुदायिक शेतीचा प्रयोग नुकताच सुरू झाला होता. शेतकऱ्याच्या मनातील अढी कायम होती. या सर्व कारणांमुळे अर्थव्यवस्थेवर विलक्षण ताण पडून लोकांचे जीवन कमालीचे ओढगस्तीचे बनलेले होते.

## विरोध कापून काढला

दुसरी पंचवार्षिक योजना १९३३ साली सुरू झाली. या योजनेत औद्योगिक विस्ताराचे क्षेत्र अधिक व्यापक करण्यात आले. याच काळात शेतीचे सामुदायिकीकरण पूर्ण झाले. जगात, विशेषतः युरोपमध्ये युद्धाचे ढग जमू लागले. रशियन राज्यकर्त्यांना त्याकडे दुर्लक्ष करता येणे शक्य नव्हते. पण त्याच वेळी रशियातील अंतर्गत असंतोषही वाढत होता. तो थांबविण्यासाठी स्टालिनने आपल्या हजारो सहकाऱ्यांचे आणि लक्षावधी जनतेचे जीवन उध्वस्त केले. कम्युनिस्ट पक्षाची पुर्नघटना केली. देशासाठी नवी राज्यघटना बनविली. नियंत्रणे अधिक कडक केली. रशियाच्या इतिहासात इतके नियंत्रित जीवन क्वचितच झाले असावे असे १९५६ मध्ये खुद्द क्रुश्चेव्हनेच जाहीर केले आहे.

## सतत वस्तूंचा तुटवडा

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला (१९३७ ते १९४२) युद्धामुळे थोडा विस्कळीतपणा आला. योजनेच्या मूळ कार्यक्रमाप्रमाणे ती अंमलात येऊ शकली नाही. युद्धाला उपयोगी पडावे अशा वस्तूंचे उत्पादन करणे आवश्यक झाले. त्यामुळे नियंत्रणे अधिकच वाढली. युद्धोपयोगी साहित्य मोठ्या प्रमाणावर तयार होऊ लागले. आणीबाणीच्या परिस्थितीसाठी जी व्यवस्था करावी लागते ती करण्यात आली. या सर्व

कारणांनी युद्धकाळ संपेपर्यंत योजनेचे मूळ कार्य स्थगित झाले. या काळात जीवनोपयोगी वस्तूंचा तुटवडा अधिकच जाणवू लागला. शेती आणि उद्योगधंद्यांचे उत्पादन युद्धसाहित्याच्या निर्मितीसाठी उपयोगात आणले जाऊ लागले. लोकांची ओढगस्त परिस्थिती पूर्ववत चालू होती. किंबहुना ती अधिकच जिकीरीची बनली.

## युद्धोत्तर पुनर्घटना

चौथ्या पंचवार्षिक योजनेचे काम १९४६ मध्ये सुरू झाले. युद्धकाळात उद्योगधंद्यांची झालेली हानी भरून काढणे आणि मोडतोड झालेल्या कारखान्यांची पुन्हा उभारणी करणे हे चौथ्या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते. याच काळात रशियाचे मध्य युरोपातील देशांशी निकटचे संबंध आले. पोलंड, पूर्व जर्मनी, चेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, बल्गेरिया, इत्यादि देशांच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीवर रशियाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. एका अर्थाने या सर्व देशांची युद्धोत्तर पुनर्रचनाही याच काळात सुरू झाली होती. कोरियाचे युद्ध आणि बर्लीनचा प्रश्न या दोन घटनांचीही तीव्रता याच काळात वाढली होती. या सर्वांचा परिणाम म्हणून पुन्हा रशियाची अर्थिक परिस्थिती अधिक नियंत्रित झाली व सत्तेचे केंद्रीकरण शिगेला पोहोचले.

पाचव्या पंचवार्षिक योजनेचा आरंभ १९५१ मध्ये झाला. या योजनेतही भारी उद्योगधंद्यांवर अधिक भर देण्यात आला. विशेषतः पोलादाचे कारखाने आणि अणुशस्त्रांचे संशोधन यांवर अधिक खर्च करण्याची तरतूद करण्यात आली. पण त्याचबरोबर घरबांधणी आणि उपभोग्य वस्तू यांच्या उत्पादनाचे कार्यक्रमही हाती घेतले. सगळ्याच वस्तूंचा तुटवडा भासत होता. त्यामुळे उपयोग्य वस्तूंच्या उत्पादनाला गौण मानणे अशक्य होऊन बसले होते. युद्धकाळात सर्व लक्ष युद्धसाहित्याच्या निर्मितीवर केंद्रित करणे अपरिहार्य होते. नंतरच्या काळातही युद्धोत्तर पुनर्रचनेची आवश्यकता नाकारता येत नव्हती. पण पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मात्र उपभोग्य वस्तूंचे प्रमाण वाढले पाहिजे अशी मागणी होऊ लागली. घरांची टंचाई सर्वात अधिक जाणवत होती. या योजनेच्या मध्यावर स्टालिन निधन पावला आणि त्याच्या वारसदारांत अंतर्गत संघर्ष सुरू झाला. बेरियाचा खून, मेलेन्कॉव्हची बढती आणि नंतर बुल्गानिन व क्रुश्चेव्ह यांची सरशी अशा राजकीय उलथापालथी याच काळात घडल्या. मेलेन्कॉव्हने शेतीच्या कार्यक्रमात आपल्या अपयशाची कबुली दिली. त्यावरून त्याची पक्षातून हाकालपट्टी करण्यास क्रुश्चेव्ह आणि त्याचे सहकारी यांना महत्त्वाचे कारण सापडले. मेलेन्कॉव्हला पंतप्रधान पदावरून बडतर्फ करण्याबरोबर स्टालिनच्या कारकीर्दीचा एक महत्त्वाचा कालखंड संपला आणि क्रुश्चेव्हच्या नव्या कारकीर्दीचा आरंभ झाला. या

सर्व घटना रशियाच्या राजकारणाप्रमाणेच तेथील आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणणाऱ्या ठरल्या.

### क्रुश्चेव्हचा नवा कालखंड

सहावी पंचवार्षिक योजना १९५६ साली सुरू झाली. या योजनेत वीजउत्पादन, तेल, अणुशक्ती यांच्याबरोबरच अन्नधान्य, कापड आणि घरबांधणी यांच्या उत्पादनाला अधिक महत्त्व देण्यात आले. क्रांतीनंतरच्या रशियाच्या चाळीस वर्षांच्या इतिहासात आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या हा एक नवा कालखंड सुरू झाला. क्रुश्चेव्हने स्टालिनच्या अपकृत्यांवर आणि दुष्कृत्यांवर झगझगीत प्रकाश टाकण्याची मोहीम सुरू केली. शेतीच्या क्षेत्रात अनेक नव्या सुधारणा घडवून आणल्या. उत्पादनाच्या वाढीसाठी प्रोत्साहान देणाऱ्या सवलती दिल्या. कामगारांच्या दृष्टीनेही किमान वेतनाच्या कायद्यासारखे कायदे केले. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाची विशेष दखल घेतली. शहरांतील घरबांधणीच्या कार्यक्रमाला प्राधान्य दिले. राजकीय बंधने काही प्रमाणात सैल करून देशाच्या वातावरणात मोकळेपणा निर्माण केला. शास्त्रीय संशोधनात पाश्चात्यांच्या बरोबरीचे स्थान मिळविण्याचा चंग बांधला. उत्तर व पूर्व रशियात धान्याच्या उत्पादनासाठी शेतीचे फार मोठ्या प्रमाणात नवे प्रयोग सुरू केले.

### योजनेची फेरतपासणी

पण एकाच वेळी अनेक आघाड्या सुरू केल्यामुळे या योजनेच्या काळात हाती घेतलेले कार्यक्रम काही प्रमाणात आवाक्याबाहेर गेले. योजनेच्या दुसऱ्या वर्षीच भांडवली खर्चाच्या दृष्टीने अनेक अडचणी उद्‌भवू लागल्या. त्यामुळे १९५७ मध्ये योजनेची फेरतपासणी करण्याचे ठरले. तिची उद्दिष्टे आणि लक्ष्ये यांत कपात करण्याची गरज उत्पन्न झाली. उपयोग्य वस्तूंची मागणी फार मोठ्या प्रमाणात वाढू लागली. शेवटी ही पंचवार्षिक योजना १९५८ मध्ये रद्द ठरवून नवी सप्तवार्षिक योजना सुरू झाली.

### सर्व क्षेत्रांत सरकारी मालकी

रशियाची अर्थव्यवस्था योजनाबद्ध आहे आणि ती ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे पार पाडण्यात येते, या गोष्टींवर विशेष भर देऊन तिच्या हेतूकडे काही वेळा दुर्लक्ष केले जाते. रशियासारख्या एके काळी शेतीप्रधान असलेल्या देशाने चाळीस वर्षांत जगातील उद्योगप्रधान देशांच्या बरोबरीचे स्थान मिळविले, तेव्हा या अर्थव्यवस्थेमागची कारणपरंपरा व कार्यपद्धती यांविषयी कुतूहल वाटणे स्वाभाविक

आहे. वस्तुतः रशियाच्या अर्थव्यवस्थेत परस्परविरोधी असे काही चमत्कार दृष्टीस पडतात. करांसंबंधीचेच उदाहरण घ्या. मिळकतीवरील कर पाच ते तेरा टक्यांच्या दरम्यान आहेत. तेरा टक्के कर भरणारांची संख्याही फारच थोडी आहे. मासिक ३५० रुब्लसपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला कर भरावा लागत नाही. सर्व देशाच्या उत्पन्नापैकी फक्त आठ टक्के कराचे उत्पन्न आहे. मुक्त अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांपेक्षा ही परिस्थिती अगदी निराळी आहे. करांचे उत्पन्न इतके कमी असताना रशियाची अर्थव्यवस्था कशावर आधारलेली आहे ? उत्पादनवाढीला भांडवल कोठून मिळते ? कारभारविषयक खर्च कसा केला जातो ? या प्रश्नांचे उत्तर एकच आहे: रशियातील सर्व उत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण.

रशियातील जमीन, उद्योगधंदे, दळणवळणाची साधने आणि उत्पादनाची यच्चयावत सर्व साधने सरकारच्या मालकीची आहेत. उत्पादनाप्रमाणेच वाटपाची आणि विक्रीची व्यवस्थाही सरकारच्याच हाती आहे. या सर्वांपासून जो नफा मिळतो तो सर्वच्या सर्व सरकारी तिजोरीतच जातो. फक्त आठ टक्के उद्योगधंदे सहकारी व्यवस्थेखाली चालतात. कारखाने, खाणी, शेती, गिरण्या, वर्कशॉप्स, घरबांधणी या सर्वांची मिळकत सरकारकडेच जमा होते. या सर्व मिळकतीचा खर्च कसा, कोठे आणि किती करावयाचा हेही सरकारच ठरविते. देशातील घाऊक आणि किरकोळ खरेदी-विक्रीचे व्यवहार व परदेशांशी होणारे व्यापारी करार या सर्वांची सूत्रे सरकारच्याच हाती आहेत. उत्पादनसाधनांची मालकी, व्यवस्था आणि नियंत्रण सरकारकडे असल्यामुळे उत्पादित मालाच्या किंमती काय ठेवावयाच्या हेही सरकारच ठरविते. त्यामुळे रशियन नागरिकाला आपल्या उत्पन्नापैकी कराच्या स्वरूपात फार थोडा भाग द्यावा लागला तरी, वस्तूंच्या किंमतीच्या स्वरूपात त्याला आपले उत्पन्न अधिक प्रमाणात खर्च करावे लागते. नागरिक बाजारात जातो तेव्हापासून घरी परत येईपर्यंत ज्या लहानमोठ्या वस्तू विकत घेतो त्या प्रत्येक वस्तूवरील नफा सरकारला मिळतो. म्हणजे कच्चा माल, त्यापासून पक्का माल तयार होण्याची प्रक्रिया आणि शेवटी तो बाजारात विक्रीला ठेवण्यापासून गिऱ्हाइकाच्या पदरात पडेपर्यंत सर्व टप्प्यांवर सरकारचे नियंत्रण असल्यामुळे प्रत्येक टप्प्यावर मिळाणारा नफा प्रत्यक्ष सरकारकडेच जमा होतो.

## किंमती ठरविण्याचे शास्त्र

मालाच्या किंमती सरकार ठरविते. याचा अर्थ, गिऱ्हाइकाच्या खरेदीशक्तीचा जास्तीत जास्त भाग सरकारला वसूल करता येतो. मुक्त अर्थव्यस्था असलेल्या राष्ट्रांत मागणी आणि पुरवठा यांच्या गणिताने वस्तूंच्या किंमती निश्चित होतात. पण रशियात सरकारी उद्योगधंद्यासाठी व सरकारने ठरविलेल्या राजकीय उद्दिष्टासाठी भांडवल संचय करण्याची दृष्टी पुढे ठेवून सरकार किंमती ठरविते. उत्पादित मालपैकी, बाजारात

विक्रीसाठी किती माल ठेवावयाचा हेही सरकारच्या आर्थिक धोरणाला अनुसरूनच ठरते. लोकांच्या हातात पैसा वाढत आहे असे दिसताच उपभोग्य वस्तूंच्या किंमती कोणत्याही क्षणी एकदम वाढविल्या जातात किंवा वस्तूंची संख्या बाजारात घटवून तुटवडाही निर्माण करता येतो. अशा वेळी ज्यांची खरेदीशक्ती अधिक आहे ते लोक अधिक किंमत देऊनही वस्तू खरेदी करतात. पण कमी उत्पन्नाच्या लोकांचे मात्र हाल होतात. मालाच्या नफ्यावरील स्वरूपात गिऱ्हाइकाकडून सरकारला पैसा ओढता येतो.

कमी कर पण वस्तूंची जादा किंमत नागरिकांकडून घेऊन सर्वसत्ताधारी सरकारला अथव्यवहाराची घडी बसविता येते.

## प्रत्यक्ष व्यवहारात काय घडते ?

मार्क्सने असे म्हटले होते की ज्याच्या हाती उत्पादनाची साधने असतात त्याच्याच हाती समाजाच्या शासनव्यवस्थेची सूत्रे असतात. मार्क्सचा हा सिद्धान्त भांडवलदारी सत्तेप्रमाणेच सोव्हिएट सत्तेलाही लागू होतो. किंबहुना सोव्हिएट सत्ताधाऱ्यांच्या हाती इतर सत्ताधाऱ्यांपेक्षा सत्तासूत्रे अधिक निर्णायक स्वरूपाची असतात. अर्थात तत्त्वतः समाजवादी अर्थरचनेत सर्व समाजच, म्हणजे सर्वसामान्य लोक या अर्थव्यवस्थेचे चालक आणि मालक असतात. त्यामुळे तेथे ही मालकी समाजाला उपयुक्त ठरणारी आणि म्हणून समर्थनीय मानली जाते. सोव्हिएट सत्ताधारी संपूर्ण जनतेचे प्रतिनिधी या नात्याने अर्थव्यवस्थेचे संचालन करीत असतात. तसेच अर्थव्यवस्थेतील नफाही जनतेच्या हितासाठीच उपयोगात आणला जातो. म्हणून रशियातील उत्पादनाची सर्व साधने आणि खरेदीविक्रीचे व्यवहार संपूर्णपणे सरकारच्या हाती ठेवलेले असतात.

रशियातील अर्थव्यवस्थेत मिळणारा नफा सरकारच्या तिजोरीत जातो असे म्हटले जाते, ‘ तेव्हा सरकार म्हणजे जनता, ’ असे मानले जावे अशी मार्क्सवाद्यांची अपेक्षा असते. तात्त्विक दृष्ट्या हे खरेही असेल. पण प्रत्यक्ष व्यवहारात काय घडते ? स्टालिनच्या कारकीर्दीचा भयानक इतिहास प्रत्यक्ष कुश्चेव्हच्या मुखातून जगाला सांगितला गेला तेव्हा, ‘ सरकार ’ या शब्दाचा अर्थ आणि संदर्भ पार बदलून गेला. सरकार आणि जनता हे समानार्थी समजण्याऐवजी सरकार आणि स्टालिन यांना समान अर्थ प्राप्त झाला. याचा अर्थ असा की व्यावहारिक दृष्ट्या समाजाला सत्ताधारी वर्गावर किती प्रमाणात आपला प्रभाव कायम ठेवता येतो यावरून एखाद्या देशाची अर्थव्यवस्था समाजाच्या हाती आहे की सत्ताधारी वर्गाच्या हाती आहे हे समजू शकते. स्टालिनकालिन राजवटीत सर्वसामान्य रशियन लोक निष्प्रभ ठरले होते. सर्व सत्तासूत्रे स्टालिनच्या भोवती केंद्रित झाली होती. आणि समाजवादी राज्यव्यवस्था एक-

पक्षीय असल्यामुळे एकदा केंद्रित झालेली सत्तासूत्रे परत काढून घेण्यासाठी सर्वसामान्य लोकांजवळ मार्गच उरला नव्हता.

केंद्रित सत्तेमुळे शासनसंस्थेला सर्व निर्णय झटपट घेता येतात. ठरविलेला कार्यक्रम कोणत्याही विरोधाला न जुमानता पार पाडता येतो. औद्योगिक प्रगतीला वेग मिळतो. यंत्रांची उभारणी, वीजनिर्मिती, रासायनिक द्रव्ये, पोलाद आणि इतर धातूंचे कारखाने यांच्या वाढीला प्राधान्य देऊन प्रसंगी उपभोग्य वस्तूंचें उत्पादन कमी करता येते. उत्पादनापैकी किती प्रमाण लष्करी उपयोगासाठी, किती लष्करी दृष्ट्या उपयुक्त अशा यांत्रिक व तांत्रिक संशोधनासाठी उपयोगात आणावयाचे हे सरकारला सहजतेने ठरविता येते. आणि त्यामुळेच आर्थिक सत्ता शासनसंस्थेच्या हाती अधिक केंद्रित होत जाते तेवढ्या प्रमाणात ती राजकीय क्षेत्रातही अधिक प्रभावी निर्णय घेऊ शकते.

## हे फक्त रशियातच घडू शकते

रशियातील शासनसंस्थेला भांडवल उभारणीची अडचण किती झटपट दूर करता येते याचे अगदी अलिकडेच घडलेले एक ठळक उदाहरण पाहू या ! वीस वर्षांपूर्वी काढलेल्या सरकारी कर्जरोख्यांची मुदत १९५७ साली संपली होती. आणि त्याच वर्षी रशियाच्या सहाव्या पंचवार्षिक योजनेत भांडवली खर्चाच्या दृष्टीने तूट जाणवू लागली होती. अशा वेळीं सरकारी कर्जरोख्यांची रक्कम जनतेला दिली गेली असती तर भांडवलात आणखी मोठी तूट उद्‌भवली असती. शिवाय लोकांच्या हाती पैसा गेला तर उपभोग्य वस्तूंची मागणीही वाढली असती. ती पुरविणे शक्य नव्हते. म्हणून सरकारने सव्वीस हजार कोटी रुबल्सचे सर्व कर्जरोखे आणखी वीस वर्षांच्या मुदतीने वाढवून दिले. त्यामुळे वीस वर्षांपूर्वी ज्यांनी कर्जरोख्यात रकमा गुंतवल्या त्यांच्या हाती प्रत्यक्ष काहीही पडू शकले नाही. नागरिकांनी सरकारी रोख्यात पैसे गुंतवावेत म्हणजे ते सव्याज असुक मुदतीनंतर रोख रकमेच्या स्वरूपात परत मिळतील अशी कर्जरोख्यांच्या बाबतीत सरकारने हमी घेतलेली असते. कर्जरोख्यात पैसे गुंतविण्याचे प्रोत्साहन देण्यासाठी काही लोकांनी कारखान्यातून परस्पर वेतनातून रकमा गुंतविल्या जाव्यात अशी व्यवस्था केली होती. त्यावर चार टक्के व्याज देण्याचे ठरले होते. पण सरकारने असे जाहीर केले की ते कर्जरोखे जसेच्या तसे सरकारकडेच राहतील आणि त्यांची मुदत आणखी वीस वर्षांनी वाढविली जाईल. सरकारच्या या निर्णयामुळे कर्जरोख्यांत आपली मिळकत गुंतविणाऱ्या लोकांना काहीही मिळू शकले नाही. या उदाहरणाच्या संदर्भात एक गोष्ट लक्षात अशी येते की, रशियात नागरिकाकडून कर कमी घेतला जातो ही जशी वस्तुस्थिती आहे, तशीच भांडवल उभारणीसाठी सरकार कोणताही व केव्हाही निर्णय घेऊ शकते, हीही वस्तुस्थिती आहे. रशिया ज्यांना भांडवलदारी

देश म्हणतो त्या देशांत अशी घटना घडली असती तर, तेथील सरकार एक क्षणही अधिकारावर राहू शकले नसते. लोकांच्या प्रक्षोभापुढे त्याला आपले धोरण बदलावे लागले असते, नाहीतर आपले आसन तरी रिकामे करून द्यावे लागले असते.

## खासगी मालमत्ता

रशियात खासगी मालमत्ता ही चीजच नाही की काय ? या प्रश्नाला दोन उत्तरे देता येतील. रशियन नागरिकाला घरगुती सामान, कपडे, पुस्तके, वैयक्तिक वाहन, काही जनावरे आणि मर्यादित प्रमाणात बँकेतील ठेव खासगी मालकीची म्हणून ठेवता येतात. शक्य असल्यास आणि पूर्वपरवानगी घेतली असेल तर, रशियन नागरिक आपल्या मालकीचे घरही बांधू शकतो. क्रुश्चेव्हने खासगी घरबांधणीला प्रोत्साहन दिले आहे. त्यासाठी कमी व्याजाचे कर्ज दिले जाते. आणि नियंत्रित दराने सामुग्रीही पुरविली जाते. घराची जमीन मात्र सरकारी मालकीची असते. ही सर्व खासगी मिळकत आपल्या वारसांसाठी ठेवता येते. वारसा हक्क बदलताना फक्त दहा टक्के मिळकत घटविली जाते. अर्थात या अलिकडच्या सुधारणा. स्टालिनच्या काळात त्यांचा मागमूस नव्हता. ज्या साधनाने वैयक्तिक नफा मिळविता येतो किंवा दुसऱ्या व्यक्तीला राबविता येते अशा मार्गाने मिळकत करण्यास रशियाच्या घटनेत पूर्णपणे बंदी केलेली आहे.

## ताष्कंदचा निरोप

ताष्कंद सोडताना उझबेक प्रांताने केलेल्या प्रगतीचा ठसा आमच्या मनावर उमटलेला होता. शैक्षणिक आणि अर्थिक क्षेत्रात मध्ययुगीन वातावरणात असलेल्या एका मागासलेल्या प्रदेशाने क्रांतीनंतर विलक्षण प्रगती केली आहे ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात येत होती. ज्यांना लिपी नाही, ज्यांना यंत्रांचा परिचय नाही, ज्यांनी विज्ञानाचे कधीही दर्शन घेतले नाही, जे परंपरागत विचारांना घट्ट चिकटून बसले होते अशा ऐंशी लाख उझबेकी लोकांना प्रगतीची संधी मिळाल्यामुळे एक नवे जग निर्माण करता आले. उझबेकी नागरिक जितका सौंदर्यवान आहे तितकाच शालीनही आहे. त्याच्या वागण्यातील मार्दव आणि बोलण्यातील नम्रता परदेशी माणसांना आकर्षित करतात. ताष्कंदच्या मुक्कामात आमच्याबरोबर जे पत्रकार आणि भारत–रशिया सांस्कृतिक मित्र संघटनेचे कार्यकर्ते होते त्यांनी अतिशय आत्मीयता दाखविली. ताष्कंदच्या विमानतळावर निरोप द्यावयास आलेल्या उझबेकी पत्रकारांविषयी आम्हांलाही

आपुलकी आणि जिव्हाळा वाटू लागला. त्यांना हिंदी किंवा इंग्रजी भाषा येत नव्हती आणि आम्हांलाही उझबेकी भाषेचा गंध नव्हता. तरीही त्यांचे प्रसन्न हास्य अनेक पटींनी बोलके बनले होते.

## देशातही परवाना हवा

ताष्कंद विमानतळावर विमानात प्रवेश करताना नियमाप्रमाणे आम्ही आपले पासपोर्ट संबंधित अधिकाऱ्याला दाखविले. तो अधिकारी पासपोर्ट उघडून पहावयाचा, त्यातील फोटो आणि समोरची व्यक्ती एकच आहेत असे पाहून किंचित स्मित करावयाचा आणि मग प्रवाशाने विमानात जावयाचे असा तो औपचारिक कार्यक्रम विमानतळावर पार पडत होता. आमच्या मागेच आमच्या बरोबर असलेले दोघेही रशियन दुभाषे आपले पासपोर्ट हातात घेऊन उभे होते. रशियन नागरिकालाही परदेशी प्रवाशाप्रमाणे पासपोर्ट आवश्यक का असावा हे प्रथम आमच्या लक्षात आले नाही. आम्ही सर्वजण विमानात जाऊन बसल्यावर दुभाषाजवळून मी पासपोर्ट मागून घेतला आणि त्याला त्यांच्या देशातील देशात प्रवास करण्यासाठी पासपोर्ट घेण्याची का आवश्यकता असावी असे विचारले. विमानाच्या प्रवासाप्रमाणेच रेल्वे किंवा इतर वाहनांच्या प्रवासासाठीही अशाच पासपोर्टची गरज असते असे त्याने सांगितल्यावर तर अधिकच आश्चर्य वाटले. मुंबईहून कलकत्त्याला जाणाऱ्या हिंदी नागरिकाला परवाना घेणे आवश्यक ठरविले तर ! पण ही कल्पनाच मनाला पटत नव्हती. नागरिकाला आपल्या देशात कोठेही आणि केव्हाही मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य असलेच पाहिजे. किंबहुना ते तसे असतेच असे आपण गृहीत धरलेले असते. पण रशियात तशी स्थिती नव्हती आणि अद्यापही काही प्रमाणात नाही.

स्टालिनच्या काळात कुणाही नागरिकाला एका गावाहून दुसऱ्या गावी जाण्यासाठी परवाना घ्यावा लागत असे. तसेच गाव सोडताना आणि मुक्कामाला पोहोचल्यानंतर दोन्ही ठिकाणी अनुक्रमे आपल्या निघण्याची आणि पोहोचल्याची पोलिसाकडे नोंद करावी लागत असे. त्याशिवाय, आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय परगावी सात दिवसांपेक्षा अधिक मुक्काम करता येत नसे. अंतर्गत पासपोर्ट सर्वांस आवश्यक असे. त्यात वृद्ध किंवा सोव्हिएट युनिअनने गौरविलेले काही सन्माननीय अपवाद असत. ज्यांना पासपोर्ट आवश्यक असेल त्यांच्या पत्त्यात बदल झाला तर त्यासंबंधी ताबडतोब पोलिसांकडे कळवावे लागत असे. या निर्बंधामुळे रशियन नागरिकांच्या हालचालींवर सरकारला बारकाईने लक्ष ठेवता येत असे आणि नागरिकांनाही परवाना घेणे, त्याची नोंद करणे, परगावी गेल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना आपल्या आगमनाची वर्दी देणे इत्यादि कामे अंगवळणी पडली होती. यात नागरिक हक्काच्या दृष्टीने काही

अयोग्य आहे किंवा अनावश्यक आहे याची जाणीवही राहिलेली नसावी. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करण्यासाठी तिकिट काढणे जसे आवश्यक असते तसेच परवाना घेणे आणि त्याची नोंद करणे अपरिहार्य मानले जात असे.

क्रुश्चेव्हने या पद्धतीत पुष्कळच बदल केला आहे. पूर्वी एका गावाहून दुसऱ्या गावी जाण्यासाठी परवाना घ्यावा लागत असे. आता एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात जाण्यासाठी अशा परवान्याची आवश्यकता असते. 'पंजाबमधील नागरिक आपल्या प्रांतात कोठेही जाऊ शकतो. पण त्याला केरळमधे जावयाचे असेल तर मार्गातील राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या सर्व प्रांतांचे अगोदर परवाने घ्यावे लागतात;' असा क्रुश्चेव्हच्या नव्या सवलतीचा अर्थ आहे. अर्थात ही सुधारणाही रशियन नागरिकाला खूप मोठे स्वातंत्र्य मिळाल्यासारखी वाटते. आमच्या दुभाषाच्या बोलण्यातही ती भावना व्यक्त होत होती.

## सायबेरियाची संपत्ती

ताष्कंद ते लेनिनग्राडच्या मार्गावर आमचे विमान स्वर्दलॉव्ह येथे थांबले. उराल पर्वताच्या कुशीत असलेले हे शहर आपल्या निसर्गरम्य परिसरामुळे आकर्षक वाटते. पण या शहराला त्याच्या भौगोलिक स्थानामुळे निराळे वैशिष्ट्य प्राप्त झालेले आहे. सायबेरियाच्या अनेक नव्या औद्योगिक केंद्रांचा संबंध या शहराशी जोडलेला आहे. जेमतेम सात लाख वस्ती असलेले हे शहर, पण भोवतालच्या प्रदेशात प्लॅटिनम, तांबे, सोने आणि इतर मौल्यवान धातूंच्या खाणी असल्यामुळे त्याचे महत्त्व विशेष वाढले. या धातूंच्या शुद्धीकरणाचे कारखाने शहराभोवती पसरलेले आहेत. शास्त्रीय संशोधनाच्या संस्था आणि खनिज द्रव्यासंबंधी उच्च शिक्षण देणारी केंद्रे यांमुळे शहराच्या शैक्षणिक वैशिष्ट्यात भर पडली आहे. या शहराला भौगोलिक महत्त्व आहे, तसेच उल्लेखनीय ऐतिहासिक पार्श्वभूमीही आहे. सोव्हिएट रशियाचे पहिले अध्यक्ष आणि लेनिनचे निष्ठावंत सहकारी स्वर्दलॉव्ह याच शहराचे रहिवासी होते. त्यांच्या मृत्यूनंतर शहराचे जुने नाव बदलून नवे नाव देण्यात आले. वस्तुतः मूळ शहर अगदी छोटे आणि विशेष महत्त्व नसलेले होते. अठराव्या शतकाच्या आरंभी कॅथेरिन महाराणीच्या लहरीखातर या शहराची स्थापना झाली. उराल पर्वताच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर एक नवे शहर वसविले जावे अशी महाराणीला इच्छा झाली आणि त्यातूनच या शहराचा जन्म झाला. महाराणी आपल्या लवाजम्यासह मधूनमधून या शहरात रहावयास येत असे. त्यामुळे त्याला काही काळ हंगामी राजधानीचेही स्वरूप येत असे. शहरात काही शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्था स्थापन झाल्या. रशियाचा

महाकवी पुष्कीन झारच्या अवकृपेमुळे काही काळ हद्दपार झाला होता तेव्हा तो याच शहरात रहात असे. ऐतिहासिक दृष्ट्या या शहरातील शेवटची घटना म्हणजे याच शहरातील एका अंधारकोठडीत शेवटच्या झारचा झालेला खून. क्रांतीनंतर थोड्याच दिवसांनी झारला एका जुन्या इमारतीच्या तळघरात कोंडून ठेवले होते. त्याच्या भोवती क्रांतिसेनेचा सक्त पहारा होता. यादवीच्या काळात राजनिष्ठ फौजा स्वर्दलॉव्हच्या रोखाने चाल करून येत आहेत असे समजताच शहराचा ताबा हाती असलेल्या क्रांतिकारकांनी झारवर अंधारकोठडीतच गोळ्या झाडल्या आणि त्याला ठार केले. नंतर असे समजले की स्वर्दलॉव्हच्या नजिक आलेल्या फौजा क्रांतिकारकांना कुमक देण्यासाठी पाठविलेल्या होत्या. पण तोपर्यंत झार मरण पावला होता. ऐन क्रांतीच्या धुमश्चक्रीत त्याचे प्राण वाचले, पण शेवटी मास्कोपासून दूर अंधारकोठडीत त्याचा मृत्यू घडून आला.

## सक्तीच्या कामगार-छावण्या

सायबेरियामध्ये महायुद्धाच्या काळापासून काही नवीन उद्योगधंदे सुरू करण्यात आले आहेत. सामुदायिक शेतीची प्रचंड योजनाही आखण्यात आली. पण त्या प्रदेशात अत्यंत थंड हवामान आणि एकाकी जीवन कंठण्याचा प्रसंग. यामुळे स्वखुषीने जाण्यास सहसा कुणीही तयार होत नसे. स्टालिनने त्यासाठी सक्तीच्या कामगार छावण्या उघडल्या आणि लक्षावधी लोकांना त्या छावण्यांतून काम करण्यासाठी पाठवून दिले. तसेच स्टालिनच्या राजकीय रोषाला बळी पडलेले, त्याच्या अवकृपेमुळे हद्दपार झालेले लक्षावधी लोकही त्या प्रदेशात पाठवून देण्यात येत असत. अत्यंत प्रतिकूल हवामानात त्या सर्वांना काम करावे लागत असे. स्टालिनने सुरू केलेल्या त्या सक्तीच्या कामगार-छावण्यांतून किती लोक रहात असत याची निश्चित आकडेवार माहिती उपलब्ध नाही. तरीपण अलिकडे स्टालिनविरोधी सुरू झालेल्या प्रचारमोहिमेतील उल्लेखावरून किमान तीस लाख लोक तरी त्या छावण्यांत सक्तीने राबविले जात होते असे दिसते. अर्धपोटी राबून त्यांना काम करावे लागत असे. कामाला वेळेचे बंधन नसे आणि कामाच्या बाबतीत आवडीनिवडीला वाव नसे. पोलिसांच्या कडक नियंत्रणाखाली या छावण्यांचे काम चाले. इ. स. १९३१ पासून छावण्यांची संख्या वाढत गेली आणि युद्धाच्या अखेरीपर्यंत त्यांत खंड पडला नाही. अनेक वर्षे लक्षावधी लोकांना आपल्या घरादारांपासून आणि कुटुंबियांच्या सहवासापासून शेकडो मैल दूर सक्तीच्या छावण्यांत आयुष्य कंठावे लागत असे. क्रुश्चेव्हच्या काळात त्या छावण्यांतून परत आलेल्या लोकांनी तेथील परिस्थितीची आणि छळाची केलेली वर्णने अत्यंत भयानक आहेत. अनेक अमानुष प्रकारांनी लोकांचा तेथे छळ केला जाई आणि काही वर्षांनंतर त्याला परत आपल्या कुटुंबियांत जाण्याची परवानगी मिळे. पण इतक्या भयंकर

छळातून जगून फारच थोडे लोक परत येऊ शकत असत. धान्याचे व कारखानदारीचे उत्पादन वाढविण्यासाठी हे छळ करणे आवश्यक आहे, असे त्याचे समर्थन होत असे.

## क्रुश्चेव्हची नवी मोहीम

क्रुश्चेव्हने ही परिस्थिती पार बदलून टाकली आहे. त्याने सायबेरियातील जवळ जवळ सर्व सक्तीच्या छावण्या बंद केल्या. त्यातील सर्व कामगार आणि शेतकरी मुक्त केले. तेथेच राहून काम करण्याची इच्छा असेल त्यांना आपल्या कुटुंबियांसह राहण्यासाठी सुखसोयी उपलब्ध करून दिल्या. देशातील इतर सामुदायिक शेतांप्रमाणे सायबेरियातील सामुदायिक शेतीची व्यवस्था सुरू केली. तेथील विषम हवामानात काम करणे जड जाऊ नये म्हणून भरपूर नव्या सवलती दिल्या. नवे कारखाने, विद्युत-निर्मितीची केंद्रे, जंगलवाढीच्या योजना, लष्करी साहित्य निर्मितीचे कारखाने यांची उभारणी केली. त्याबरोबरच वहातुकीची आणि दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणात वाढविली. रशियाच्या इतर भागांतील शेकडो इंजिनिअर, शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ त्या प्रदेशात पाठवून संपूर्ण कायापालट केला. रशियाच्या धान्यपुरवठ्याची कोठारे या प्रदेशात निर्माण करता यावीत अशा महत्त्वाकांक्षेने रशियन सरकारने अनेक योजना आखल्या. पाश्चात्य देशांच्या, विशेषतः अमेरिकेच्या बरोबरीने धान्य-उत्पादनात वाढ करता यावी यासाठी या प्रदेशातील सर्व उपलब्ध साधनसामुग्रीचा उपयोग करण्याची एक प्रचंड मोहीमच अलिकडे हाती घेण्यात आली आहे. या सर्व मोहिमांचे नियंत्रण मुख्यतः स्वर्दलॉव्ह शहरातून केले जाते. क्रुश्चेव्हचे स्वयंपूर्णतेचे स्वप्न या मोहिमेवर अवलंबून असल्यामुळे स्वर्दलॉव्ह येथे चाललेल्या औद्योगिक आणि शेती-विषयक हालचालींकडे रशियन राज्यकर्त्यांचे लक्ष केंद्रित झालेले असते.

## हिमधारांचा वर्षाव

स्वर्दलॉव्ह विमानतळावर फक्त अर्धा तास विमान थांबणार होते. पण तेवढ्यात जोराची हिमवृष्टी सुरू झाली. हवामान उड्डाणाला अनुकूल नसल्याचे समजले आणि विमानतळाच्या हॉटेलमध्ये आमचा दोन तास मुक्काम वाढला. हॉटेलच्या उबदार खोल्यांत बसल्या जागेवरूनच हिमवृष्टीचे ते अदभूत दृश्य पाहतांना भोवतालच्या सर्व हाल-चालींचा पूर्णपणे विसर पडला होता. हिमवृष्टीचे प्रकारही अनेक आणि क्षणाक्षणाला बदलणारे रंगही विविध होते. तो निसर्गचमत्कार पाहण्यात मन केव्हाच तन्मय होऊन गेले. प्रथम पिंजलेला कापूस सर्वत्र उधळल्यासारखे वाटले, पण लगेच त्याला विरल शुभ्र वस्त्रांचे स्वरूप प्राप्त झाले. क्षणातच त्याचे धागे अधिक स्पष्ट होऊ लागले. त्यांच्या दरम्यानचे अंतर वाढत गेले आणि सर्वत्र दुग्धधारांचा अविरत वर्षाव होऊ लागला.

क्षणाभराने धारा अधिक विरल झाल्या आणि जमिनीवर पोहचण्यापूर्वीच शतशः विदीर्ण होऊन त्या वातावरणात विरून जाऊ लागल्या. पाण्याचे लक्षावधी कण हवेत उधळून द्यावेत किंवा चकचकीत स्फटिकाचे तुकडे दृष्टीसमोर नाचत रहावेत तसे ते दृष्य होते. पण क्षणात तेही दृष्य बदलले आणि वातावरणात पांढरे शुभ्र वस्त्र फडफडत रहावे असा त्याला आकार आला. हिमधारांची गती, स्थिती बदलत होती आणि लगेच त्यांचा विलयही घडून येत होता. पण तेवढ्याच वेळात त्यांचे चाललेले मनोहर नृत्य पाहून अक्षरशः भान हरपून गेले होते. त्यापूर्वी हिमवर्षावाचे दर्शन कधीही घडलेले नव्हते. यामुळे त्या अभूतपूर्व अनुभवात तरल वृत्ती काहीशा अज्ञात आनंदाने पुलकित झाल्या. भोवतालचे सर्व वस्तुजात अदृष्य झाले होते. दृष्टीसमोर फक्त त्या हिमधारांच्या विविध मनोहर आकृती आणि त्यांतून सहजगत्या निर्माण होणारा बहुरंगी चित्रपट येवढेच काय ते दिसत होते.

पण तेवढ्यात दुभाषा जवळ आला आणि खांद्यावर हात ठेवून म्हणाला, 'चला, स्वर्दलॉव्ह खूपच आवडले आहे वाटतं तुम्हांला ? एव्हाना आपण लेनिनग्राडला पोहोचलो असतो.'

मी तंद्रीतून जागा झालो आणि हॉटेलबाहेर पडून रस्त्यावर आलो. सर्वजण विमानाच्या दिशेने निघाले होते. आपली छोटी बॅग आणि कॅमेरा संभाळीत मीही त्यांच्या मागोमाग निघालो. रस्त्यात सर्वत्र पांढरे शुभ्र रांगोळीचे कण उधळून दिल्यासारखे दिसत होते. बर्फाचा थर साचला होता. आणि एक स्त्री झटपट तो बाजूला सारीत होती. तेवढ्यात ऊन पडले. पण ते ऊन कसले ? त्यात ऊब नव्हती आणि झगझगाटही नव्हता. आजारातून उठलेल्या पांढऱ्या फटफटीत चेहऱ्याच्या माणसाची आठवण झाली. ते ऊन निस्तेज आणि निष्प्रभ होते. थंड वारे त्या उन्हाची सारी शक्ती खेचून घेत होते. पुन्हा हिमधारा आकाशातून गळू लागल्या. उन्हाच्या किरणांना भेदून येणाऱ्या त्या धारांनी हजारो इंद्रधनुष्ये बनत आणि लगेच विरूनही जात.

पण हे सर्व पहावयाला अधिक वेळ नव्हता. पुन्हा पुढचा प्रवास सुरू झाला. पंचवीस ते तीस हजार फूट उंचीवरून ताशी पाचशे मैल वेगाने विमान लेनिनग्राडच्या दिशेने निघाले.

# लेनिनग्राड

## पश्चिमेचे महाद्वार

लेनिनग्राडच्या विमानतळावर स्वागतासाठी काही पत्रकार आले होते. तसेच लेनिनग्राड विद्यापीठातील दोन प्राध्यापकांनीही मुद्दाम आमचा परिचय करून घेऊन स्वागत केले. त्यांपैकी एक हिंदीचे प्राध्यापक होते आणि दुसरे मराठीचे. मराठीचे प्राध्यापक प्रो. पॅचिंको आरंभी खडबडीत मराठी बोलण्याचा प्रयत्न करू लागले, पण नंतर त्यांची गाडी हिंदीच्या रुळावर गेली. त्यानंतर ते प्रत्येक खेपेला आमच्याशी हिंदीतूनच बोलत होते. त्यांना इंग्रजी भाषा चांगली येते. पण ते इंग्रजीतून बोलण्याचे कटाक्षाने टाळीत. 'एक वर्षभर मी पुण्याला होतो', अशी त्यांनी स्वतःसंबंधीची माहिती सांगितली आणि आमचे कुतूहल जागृत झाले आहे असे पाहून ते लगेच म्हणाले, 'मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी मी पुण्याला आलो होतो. सध्या शिवाजी महाराजांचे चरित्र लिहीत आहे.' येवढे सांगितल्यानंतर प्रो. पॅचिंको यांच्याविषयी आमच्या मनात आत्मीयता वाढली असल्यास नवल नाही. लेनिनग्राडच्या मुक्कामात ते सतत आमच्याबरोबर होते.

लेनिनग्राड शहराचे पहिले दर्शन अत्यंत लोभस आणि प्रसन्न वाटले. सुसंस्कृत समाजात वावरताना जो आनंद वाटतो तोच लेनिनग्राडच्या रस्त्यांवरून फिरताना वाटत होता. मॉस्कोनंतर रशियातील सर्वांत मोठे शहर म्हणून तर लेनिनग्राडला महत्त्व आहेच, पण रशियात युरोपच्या कलेची, संस्कृतीची आणि शास्त्राची आयात करण्याचे ते एक महाद्वार आहे असे अद्यापही मानले जाते. लेनिनग्राडच्या भोवती गेल्या तीनशे वर्षांतील रशियाचा इतिहास घडलेला आहे. पीटर्सबर्ग हे त्याचे मूळ नाव. नंतर पेट्रोग्राड असे त्याला नाव मिळाले. आणि लेनिनच्या निधनानंतर त्याची स्मृती म्हणून लेनिनग्राड हे नवे नाव त्याला देण्यात आले. रशियाच्या आधुनिक संस्कृतीचा जन्म आणि विकास याच शहरात झाला आणि रशियाच्या राज्यक्रांतीचा प्रचंड विजयही याच शहरातील जनतेने घडवून आणला. झारकालीन इतिहासाच्या अनेक भव्य खुणा त्यावेळच्या सामाजिक आणि राजकीय घटनांची आठवण करून देतात, तर क्रांतिकालातील अनेक वस्तू आणि वास्तू क्रांतीचे दिव्य कसे घडले याची जिवंत साक्ष देतात. कलापूर्ण आणि भव्य राजवाड्यांमुळे या शहराचे ऐतिहासिक वैशिष्ट्य सहज डोळ्यांत भरते आणि त्याच राजवाड्यांच्या सभोवतालची भव्य पटांगणे क्रांतिकारकांच्या

बलिदानाची आठवणही करून देतात. या शहराने अनेक उलथापालथी पाहिल्या. सर्व प्रकारचे बादशाही वैभव उपभोगिले. कलेच्या क्षेत्रात युरोपीय शहरांचा दर्जा मिळविला आणि अलीकडे रशियाच्या औद्योगिक प्रगतीलाही हातभार लावला.

लेनिनग्राडच्या शिक्षणसंस्था, कला-प्रदर्शने, वस्तु-संग्रहालये या सर्वांना रशियातील इतर कोणत्याही शहरापेक्षा एक निराळे तेज अन निराळे वैशिष्ट्य लाभलेले आहे. जणू सर्व परिसर ऐतिहासिक घटनांनी रंगून गेलेला आहे आणि शहरातील सर्व प्रमुख ठिकाणे कलेच्या विविध नमुन्यांनी मोहरून गेली आहेत.

## मागासलेपणाची भावना

लेनिनग्राडची स्थापना पीटर दि ग्रेट किंवा पहिला पीटर ( १६७२ ते १७२५ ) याने केली. रशियाच्या आधुनिक इतिहासाचा आरंभही पीटरच्या काळापासूनच झाला. इ. स. १७०० मध्ये स्वीडनने रशियाचा पराभव केला. त्यापूर्वी रशियाचे असे अनेकदा पराभव झाले होते. चेंगिझखानाच्या वंशजांपासून तारतारांच्या लुटारू टोळ्यांपर्यंत अनेकांनी रशियाचे लचके तोडले होते. आणि निरनिराळ्या प्रदेशांवर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. पण स्वीडनने केलेला पराभव पीटरला सहन होऊ शकला नाही. त्याचे संपूर्ण सामर्थ्य, स्वाभिमान, कल्पकता आणि आधुनिक काळाकडे बघण्याची दृष्टी एकदम डिवचली गेली. आपला देश मागासला आहे; युरोपीय देशांच्या तुलनेने शिक्षण, कला, शास्त्र, संस्कृती या सर्वच क्षेत्रांत आपण मागे आहोत आणि नेमकी हीच गोष्ट आपल्या पराभवाला आणि परागतीला नेहमी कारणीभूत ठरते, असा विचार पीटरच्या मनात जागा झाला आणि त्याने युरोपची बरोबरी करण्याची प्रतिज्ञा केली.

पश्चिम युरोपपेक्षा रशियाचा इतिहास काहीसा निराळा आहे. औद्योगिक क्रांतीचे पडसाद उमटण्यास तेथे बराच अवधी लागला. शेती आणि सरंजामशाही यांच्या अविच्छेद्य भितीमुळे पश्चिमेकडील पुनरुज्जीवनाच्या विचारांचे वारेही रशियात पोहोचण्यास खूपच काळ जाऊ द्यावा लागला. आर्थिक दृष्ट्या दरिद्री आणि वैचारिक-दृष्ट्या मागासलेपणा अशी दोन ओझी वागवीत रशियाचा इतिहास आपोआप घडत होता. या जाणीवेतूनच रशियातील राजकीय चळवळीलाही मधूनमधून चालना मिळत होती. आणि त्याच जाणीवेमुळे एक प्रकारच्या न्यूनगंडाची भावनाही रशियन जनतेच्या मनात खोलवर रुजत जात होती. युरोपपेक्षा आपण कोणत्याही प्रकारे मागासलेले नाही हे आजचा रशियन माणूस आवर्जून सांगू लागतो, तेव्हा त्याच्या मनातील मागासलेपणाचे शल्य लक्षात आल्याशिवाय राहत नाही. या न्यूनगंडाच्या भावनेमुळे युरोपच्या बरोबरीचे स्थान मिळवून देण्याची प्रतिज्ञा करणारा राज्यकर्ता रशियन जनतेत एकदम लोकप्रिय होतो. त्या मनस्थितीत अशा राज्यकर्त्याने केलेला

रा. म. १५०५४

अनन्वित छळही रशियन जनता सहन करते आणि केव्हा तरी पाश्चात्य शास्त्राची आणि संस्कृतीची बरोबरी आपण करू शकू, अशा आशेने तो त्या राज्यकर्त्यांकडे बघत असतो. पहिला पीटर, कॅथरीन राणी, दुसरा ॲलेक्झँडर आणि स्टालिन या चौघांचाही इतिहास रशियन जनतेच्या भावनेतून पाहिला तर युरोपची बरोबरी करण्याचे त्या जनतेचे स्वप्न त्यात दिसू लागते.

सतत अडीचशे वर्षे रशियाची सत्ता तारतारांच्या ताब्यात होती. पंधराव्या शतकाच्या अखेरीस त्यांची पकड ढिली झाली. पण नेमका हाच काळ युरोपच्या इतिहासात अनेक नव्या कल्पनांनी, पुरोगामी विचारांनी आणि शास्त्रीय संशोधनाच्या प्रयोगांनी फुलत होता. परंपरागत धार्मिक रुढींच्या आणि रोमन चर्चच्या वर्चस्वातून युरोपीय लोक हळूहळू मुक्त होत होते. रशियन भूमी मात्र तारतारांसारख्या अत्यंत राकट, जुलमी आणि असंस्कृत लोकांच्या पकडीत कायम राहिली होती. त्यांच्या अप्रगत कल्पना आणि संस्था यांचे संस्कार रशियाच्या इतिहासावर आणि मनोभूमीवरही दीर्घकाळ कायम राहिले. या जोखडातून मुक्त करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी इव्हान-द-ग्रेट या रशियन बादशहाने इ. स. १४८० साली पार पाडली. तो सर्व रशियाचा सार्वभौम बादशहा बनला. यानंतर सव्वाशे वर्षांनी रशियाच्या भूमीवर पुन्हा नवे संकट आले. हे संकट उत्तरेकडून आलेले होते. पोलंडने रशियावर आक्रमण करून त्याला आपल्या सत्तेखाली ठेवण्याचा प्रयत्न केला. पण पोलंडचे हे धाडस एक दशकापेक्षा अधिक काळ टिकू शकले नाही. मायकेल रोमेनॉव्ह या झारने पोलीश सत्तेचे उच्चाटन केले आणि इ. स. १६१३ मध्ये नव्या राजघराण्याची स्थापना केली. झारचे हे घराणे सतत तीनशे वर्षे रशियावर राज्य करीत होते. बोल्शेव्हिक क्रांतीच्या क्षणापर्यंत झारची सत्ता उलथून पडेल अशी कल्पनाही कोणी करू शकले नसते इतकी त्या सत्तेची पाळेमुळे खोल रुजली होती. धर्माची सत्ता, राजाची सत्ता आणि सरंजामदारांची सत्ता या सर्वांचा मूर्तिमंत आविष्कार झारच्या स्वरूपात झालेला होता. त्याला प्रतिदेवतेचे महात्म्य प्राप्त झाले होते. याच घराण्यात पीटर-द-ग्रेट हा शूर आणि आधुनिक दृष्टीचा बादशहा झाला. लेनिनग्राड शहराला त्यानेच वसविले आणि घडविले.

पीटरचा इतिहास म्हणजे रशियाच्या आधुनिक कालखंडाच्या उदयाचा इतिहास आहे. तो शूर पण अत्याचारी, स्वाभिमानी पण छळवादी अशा विलक्षण परस्परविरोधी सामर्थ्यांचा शूर पुरुष होता. त्याने १६८९ मध्ये सत्तेची सूत्रे हाती घेतली. आणि १७०७ मध्ये त्याच्या कारकीर्दीत स्वीडनने रशियावर आक्रमण केले. पश्चिमेकडून होणाऱ्या या स्वाऱ्यांचा कायमचा निकाल लावण्याच्या ईर्षेने पीटरने अभिनव उपक्रम हाती घेतले. रशियाला अंधारयुगातून बाहेर काढून आधुनिक संस्कृतीच्या प्रकाशात आणण्याचे श्रेय त्यालाच दिले जाते. युरोपीय राष्ट्रांची राज्यपद्धती, उद्योगधंदे,

युद्धशास्त्र या सर्वांची रशियात आयात करण्याचा त्याने प्रचंड खटाटोप केला. सरदारांना दाढ्या काढून युरोपीय पद्धतीचे पोशाख घालवयास भाग पाडण्यापासून नवे आरमार उभारण्यापर्यंत त्याने अनेक सुधारणा केल्या. त्याच्या प्रत्येक प्रयोगागणिक त्याची लोकप्रियता वाढतच गेली. कोणत्याही जुन्या घटनेचा उल्लेख करताना, पीटरपूर्वकालीन, असे म्हणण्याची प्रथा पडलेली आहे. व्यक्तिशः तो अनेक कलांत निष्णात होता. जहाज बांधण्याचे तंत्र त्याला अवगत होते. दारूगोळ्याचे शास्त्र त्याला माहीत होते. तो चित्रकार होता, तसाच कुशल दंतवैद्यही होता. सुंदर पादत्राणे बनविण्याचा त्याचा छंद सर्वश्रुत आहे. त्याने अनेक अत्याचार केले आणि तेवढेच पराक्रमही केले. त्याची कारकीर्द अनेक भव्य आणि भयानक, अनेक दिव्य आणि दहशतवादी कृत्यांनी गाजलेली आहे. त्याने समाजाला खूप झोडले. तरीही त्याची लोकप्रियता वाढतच गेली. त्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे त्याने रशियाला युरोपच्या इतर देशांप्रमाणे आधुनिक बनविण्याचा प्रयत्न केला. युरोपीय देशांची बरोबरी करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा रशियन लोकांना भारून टाकीत होती. रशियनांची हीच भावन इव्हान-द-टेरिबल आणि स्टालिन यांच्या काळांतही अनेक प्रसंगांनी दिसून आली.

## पीटरचे कर्तृत्व

युरोपीय संस्कृतीच्या प्रवाहात रशियाला आणून सोडण्यासाठी पीटरने जे प्रयत्न केले त्यांत सेंट पीट्र्सबर्ग ( सध्याचे लेनिनग्राड ) या शहराच्या स्थापनेचा उल्लेख करता येईल. रशियाला बंदर नव्हते, आरमार नव्हते, जहाज बांधणीचा व्यवसाय अवगत नव्हता आणि त्यामुळे रशियाचा पश्चिम युरोपशी संबंधच येऊ शकत नव्हता. ही अलिप्ततेची कोंडी फोडण्यासाठी पीटरने सेंट पीट्र्सबर्गचे सुंदर बंदर बांधले आणि जहाजबांधणीचा कारखानाही सुरू केला. पश्चिमेकडून कलेची आणि संस्कृतीची आयात करावी आणि रशियाच्या वैभवाचे प्रदर्शनही करता यावे असा सेंट पीट्र्सबर्ग शहराच्या स्थापनेचा दुहेरी उद्देश पीटरच्या मनांत होता. परदेशात प्रवास करणारा पीटर हाच पहिला रशियन सम्राट. प्रवासाहून परत आल्यावर त्याने रशियातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. रशियन लिपीत सुधारणा केली. नवे उद्योगधंदे उभारले. यंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ, शिल्पकार आणि चित्रकार यांना इंग्लंड, फ्रान्सहून मुद्दाम आणविले. भव्य राजवाडे आणि वस्तुसंग्रहालये स्थापन केली. रशियाच्या इतिहासाला एक नवी कलाटणी दिली. पीटरच्या या सर्व प्रयत्नांचे व प्रयोगांचे मुख्य केंद्र लेनिनग्राड शहरच होते.

## भयंकर महाराणी

पीटरनंतर अर्ध्या शतकाने सम्राज्ञी कॅथरीन रशियाच्या इतिहासात अनेक

कारणांनी गाजली. तिच्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत रशियात साहित्य आणि कला, विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांची समृद्धी होत होती, आणि त्याच वेळी शेतकऱ्यांचे उठावही होत होते. अत्यंत छांदिष्ट असा तिचा लौकिक होता. सैन्याचा जुलूम, जमीनदारांची छळणूक आणि चर्चच्या अधिकाऱ्यांचा अन्याय या सर्व प्रकारांनी रशियन जनता त्रस्त झाली होती. तिच्या काळात अमेरिकेने स्वातंत्र्ययुद्ध केले आणि नवे लोकशाही राज्य स्थापन केले; फ्रेंच राज्यक्रांतीची महान घटना झाली आणि नेपोलिअनचाही उदय झाला; इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीने सुरू केलेली चक्रे त्या देशाच्या साम्राज्यात आणि संपन्नतेत अमाप भर टाकीत होती. पण कॅथरीनने यांपैकी कशाचीही दखल घेतली नाही. उलट, फ्रेंच राज्यक्रांतीला विरोध दर्शविला, अमेरिकेच्या नव्या राजवटीला मान्यता दिली नाही आणि इंग्लंडमधील राजकीय सुधारणांविषयी तुच्छता दर्शविली. युरोपात लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, धार्मिक सुधारणा, यंत्र आणि तंत्र यांचे शोध अशा कितीतरी नव्या मूल्यांची जोपासना चालू होती आणि त्याच वेळी रशियात भूदासांवर अधिक कडक नियंत्रणे बसविण्यात येत होती.

महाराणी कॅथरीनच्या काळात इ. स. १७७३ मध्ये पुगोचेव्ह याच्या नेतृत्वाखाली शेतकरी लोकांनी मोठे बंड उभारले. अर्थात ते मोडून काढणे कॅथरीनला अशक्य नव्हते. तिने बंड मोडण्यासाठी अनेक दहशतीचे प्रकार केले. साम्राज्यविस्तारासाठी मध्य अशियापर्यंत मोहिमा काढल्या. बंडखोर शेतकऱ्यांना त्या मोहिमांवर पाठविले. लेखकांना आणि पत्रकारांना हद्दपार केले. कॅथरीनच्या काळातच रशियातला पहिला लेखक सायबेरियात पाठविण्यात आला आणि त्यानंतर तीच प्रथा स्टालिनच्या काळापर्यंत चालू होती.

## स्वातंत्र्याची मोहीम

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी रशियात झारविरुद्ध अनेक राजकीय उठाव होऊ लागले. युरोपातील राजवटीप्रमाणे रशियातही घटनात्मक बदल करण्यात यावा अशी या उठावामागे विचारसरणी होती. इ. स. १८२५ मध्ये सर्वांत मोठे बंड झाले. त्या बंडात, अर्ज-विनंत्या करून राजकीय सुधारणा मागणारेही अनेक सुशिक्षित, विचारवंत होते. त्यांची झारने कत्तल केली. ते सुधारणावादी विचारवंत मरण पावले पण ' डिसेंबरवादी ' या नावाने रशियाच्या इतिहासात त्यांचे नाव अमर झाले. पुढच्या अनेक घटनांना, आंदोलनांना आणि बंडखोरीला त्यांनी प्रेरणा दिली. त्यांच्या मृत्यूमुळे रशियन सुशिक्षित वर्ग खडबडून जागा झाला. त्याच्या मनात असंतोषाची ठिणगी धुमसत राहिली. दुसऱ्या अलेक्झांडरच्या काळात त्या असंतोषाला उग्र स्वरूप आले. ॲलेक्झांडरने काळाची गरज ओळखून राजकीय सुधारणा जाहीर केल्या. भूदासांना मुक्त करण्याची घोषणा केली. पण लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या आणि

झारच्या सुधारणा त्यापुढे अपुऱ्या पडत होत्या. दहशतवादी चळवळीला ऊत आला आणि शेवटी १८८१ साली ॲलेक्झांडरचा खून झाला. त्यानंतर गादीवर आलेल्या झारने अत्याचारांची परमावधी केली. सूडाला सीमा राहिली नाही. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या मनातही जमीनदारीविरुद्ध आग भडकत गेली. शेतकऱ्याला जमिनीची भूक लागली होती आणि जमीनदारांना त्यासाठी भलामोठा मोबदला हवा होता. या क्रियाप्रतिक्रियेतून रशियात अनेक ठिकाणी जमीनदारांचे खून पडले, धान्याची लूट होऊ लागली, मालमत्तेचा विध्वंस झाला आणि झारच्या सत्तेला तडे जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस झारची सत्ता आणि नव्यानेच उदयास येऊ लागलेला मार्क्सवादी क्रांतिकारकांचा पंथ यांची झटापट सुरू झाली. या क्रांतिकारकांमध्ये रशियातील मध्यमवर्ग आघाडीवर होता. आणि त्याला मॉस्को व सेंट पीटर्सबर्ग यांच्या परिसरांत वाढू लागलेल्या कारखान्यांतील कामगारांची साथ मिळू लागली.

या सर्व घटनांचा पहिला मोठा स्फोट १९०५ साली लेनिनग्राडमध्येच झाला.

## पहिल्या क्रांतीच्या ठिणग्या

इ. स. १९०५ ची क्रांती लेनिनग्राड शहरात झाली. त्या क्रान्तीच्या अनेक खुणा शहरात रस्तोरस्ती दाखविण्यात येतात. त्या वेळी या शहराचे नाव पेट्रोग्राड होते. क्रांतीच्या इतिहासातील मुख्य प्रकरण विंटर पॅलेससमोरच्या मैदानात घडले. रविवार २२ जानेवारी १९०५ रोजी जॉर्जी गॅपोन या एका लोकप्रिय धर्माधिकाऱ्याने त्या क्रांतीचे पुढारीपण स्वीकारले होते. तो राजनिष्ठ होता, धर्मनिष्ठ होता आणि त्याचबरोबर झारच्या अन्यायामुळे त्रस्त झालेल्या प्रजेच्या हक्कासाठीही झगडत होता. झारने राजकीय सुधारणा कराव्यात आणि लोकांच्या असंतोषाला वाव ठेवू नये अशा सदिच्छेने झारला भेटण्यासाठी तो विंटर पॅलेसकडे निघाला. त्याच्या मागे हजारो लोकांचा जमाव होता. 'झार चिरायू होवो' अशा घोषणा करीत लोक विंटर पॅलेसच्या मैदानापुढे जमले. झारला ही सर्व घटना अपमानकारक वाटली. त्याने सैन्याला गोळीबार करण्याचा हुकूम दिला. त्यात हजारो लोक जागच्या जागीच ठार झाले. भाकरी मागावयाला गेलेल्या लोकांना अशा पाशवी पद्धतीने ठार केल्यामुळे झारविरुद्ध रशियाभर भयंकर असंतोषाची लाट पसरली. देशभर त्या घटनेचे पडसाद उठले. अर्ज-विनंत्यांनी राजकीय सुधारणा मिळविण्याची ही शेवटची वेळ होती. त्यानंतर सशस्त्र क्रांतीच्या घोषणा होऊ लागल्या. झारला वाटले, आपण क्रांती दडपून टाकली. पण प्रतिक्रिया अगदी उलट होत होती. १९०५ ची क्रांती एका अर्थाने अयशस्वी झाली. पण तिने पुढच्या क्रांतीचे सुरुंग पेरून ठेवले. १९१७ च्या क्रांतीला यशस्वी करणारा तरुणवर्ग याच क्रांतीच्या प्रेरणेने कोणतेही कृत्य करण्यास तयार झाला. त्यावेळी सोशल डेमोक्रॅट या नावाने मार्क्सवादी विचारसरणीचा पक्ष अधिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम....३८६४२...... दि: ...१-५-१९६५...
क्रमांक ....३६४...... नों. दि. ...२५।५।६५...



संघटित झाला. पण १९०३ साली त्या पक्षातही फूट पडली होती. बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक असे दोन गट त्या पक्षाचे वारसदार बनले होते. पण १९०५ च्या क्रांतीनंतर त्या गटांना पुन्हा संघटित होण्याची संधी मिळाली.

विंटर पॅलेससमोर घडलेल्या त्या भयानक घटनेने पेट्रोग्राडमधील विद्यार्थी आणि कामगार खवळले. कामगारांनी सोव्हिएट किंवा मंडळे स्थापन केली. ही घटना निकोलस झारला भयानक वाटू लागली. त्याने राजकीय सुधारणा देण्याचे मान्य केले. निवडणुका होऊन पार्लमेंटही ( ड्युमा ) स्थापन झाले. पण ड्युमाची रचना, घटना आणि निवड वरिष्ठ वर्गीयांना पोषक अशीच होती. मवाळ राजकीय पक्षांनी त्यात भाग घेतला. पण क्रांतिकारकांनी भूमिगत होऊन झार आणि ड्युमा यांच्या विरुद्ध लोकांचा असंतोष संघटित करण्याची तयारी चालविली. थोड्याच दिवसांनी पहिले महायुद्ध सुरू झाले आणि लोकांच्या इच्छेविरुद्ध झारने महायुद्धात भाग घेण्याची घोषणा केली. रशियन सैनिक देशातील परिस्थितीमुळे अगोदरच त्रस्त झाले होते. युद्धात जागजागी त्यांचा पराभव होऊ लागला. त्यामुळे ते अधिकच वैतागले. अशा क्रुद्ध मनःस्थितीत झारच्या विरुद्ध ते जनतेला सहकार्य करू लागले. युद्धाच्या आघाडी-वरील अशा निराशाजनक परिस्थितीमुळे अंतर्गत अवस्थाही अत्यंत नाजूक बनली होती. लोकांना अन्न मिळेना. हलाखी वाढली आणि त्यातच झारच्या नोकरशाहीचे लाचलुचपतीचे प्रकारही वाढले. शासनयंत्र पोखरून गेले. सत्तेचा डोलारा केव्हा कोसळून पडेल याचा नेम राहिला नव्हता. राजघराण्यात अनेक विपरीत कृत्ये चालू होती. सरदारांचा वर्ग ख्यालीखुशालीत दंग होता आणि भरीस भर म्हणून रासपुतीन नावाच्या एका लफंग्या बुवाने झार आणि झारीना यांना संपूर्णपणे आपल्या कह्यात घेतले होते.

## अद्भुत वल्ली

रासपुतीन नावाची वल्ली रशियाच्या इतिहासात गाजण्याइतकी अद्भुत आणि विक्षिप्त होती. त्याने झारीनाच्या भोवती असे काही मोहजाल पसरले की त्यात सर्व राजघराणे पार गुरफटून गेले. झार झारीनाच्या तंत्राने वागत असे. आणि झारी-नाला रासपुतीनचा शब्द म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीच आज्ञा वाटत होती. तो सांगेल तो पर्वकाळ आणि बोलेल ती आज्ञा. जणू काय रशियावर त्याचेच राज्य चालू होते. जादूटोणे, मंत्रतंत्र इत्यादींसारख्या मार्गांनी त्याने राजवाड्यात प्रवेश केला आणि चांगलेच बस्तान बसविले. अशा विकृत माणसाच्या वर्तनाचा आणि दुष्कृत्यांचा लोकांना अतिशय उपद्रव होऊ लागला. शेवटी एका संतप्त माणसाने रासपुतीनचा खून केला आणि रशियन जनतेच्या मनावरील दडपण काढून टाकले. पण त्याची प्रतिक्रिया म्हणून हजारो लोक केवळ संशयावरूनही झारने ठार केले अथवा

देशोधडीला लावले.

## क्रांतीला तोंड लागले

पहिल्या महायुद्धाच्या काळात रशियातील परिस्थिती अशा अनेक घटनांनी अधिकच चिघळत होती आणि त्यातच १९१७ साली त्या दुर्दैवी देशाला दुष्काळाने ग्रासले. पेट्रोग्राड शहरात धान्यासाठी दंगली होऊ लागल्या. लोकांचा असंतोष शिगेला पोहोचला होता आणि त्याचबरोबर झारचे अत्याचारही परिसीमेला पोहोचले होते. राजधानीला असंतोष, अस्थिरता आणि अराजक यांनी पूर्णपणे घेरले होते. अखेर ८ मार्च १९१७ रोजी क्रांतीला तोंड लागले. पाच दिवसपर्यंत क्रांतिकारकांना चढत्या क्रमाने विजयच मिळत गेला. पण ते असंघटित होते. त्यांच्याजवळ क्रांतीची योजना नव्हती आणि नेतृत्वही नव्हते. आंधळेपणाने क्रांतिकारक वाटेल तेथे वार करीत चालले होते.

लोकांचा प्रचंड जमाव १० मार्च रोजी राजवाड्याच्या दिशेने निघाला. हजारो सैनिकही त्यात सामील झाले. पेट्रोग्राडच्या कामगारांनी तर आघाडीच स्वीकारली होती. क्रांतीच्या घोषणा करीत राजवाड्याच्या दिशेने चाललेला तो जमाव म्हणजे रशियाच्या इतिहासातील एक अभूतपूर्व घटना होती. फ्रेंच राज्यक्रांतीखेरीज एवढा प्रचंड सामुदायिक उद्रेक इतिहासात क्वचितच व्यक्त झाला असेल. पण त्या उद्रेकामागची स्फोटक मनःस्थिती आणि परिस्थिती झारला आकलन होणे शक्य नव्हते. जमावाला चिरडून टाकण्याचा त्याने हुकूम सोडला. प्रथम घोडेस्वारांनी त्या निःशस्त्र लोकांवर आपले हत्यार चालविले, पण नंतर तेही क्रांतिकारकांना सामील झाले. दुसरे दिवशी पुन्हा प्रक्षुब्ध जमाव अधिक त्वेषाने राजवाड्याच्या दिशेने निघाला. त्याच्यावर पोलीस गोळीबार करू लागले. पण सैनिक लोकांच्या जमावात सामील झाले. त्याबरोबर क्रांतिकारकांना सामील झालेले सैनिक आणि सरकारच्या बाजूचे पोलीस यांच्या दरम्यान चकमकी झडू लागल्या. पेट्रोग्राडच्या रस्त्यांना रणांगणाचे स्वरूप प्राप्त झाले. सैनिक आणि कामगार यांनी काही मंत्र्यांना आणि सेनाधिकाऱ्यांना अटक केली. तुरुंगाची दारे तोडून राजबंद्यांची मुक्तता केली. पेट्रोग्राड शहरात क्रांतीचा विजय झाला. मास्कोतही या क्रांतीची आवृत्ती निघाली. खेड्यापाड्यापर्यंत शेकडो क्रांतिकथा पसरू लागल्या. त्या दिवशी झार राजधानीबाहेर होता आणि झारीना एका वैभवशाली उपनगरात होती. दळणवळणाची सर्व साधने आणि मार्ग क्रांतिकारकांच्या हाती गेल्यामुळे झारला राजधानीला पोहोचणे अशक्य झाले.

## ढगाळलेली परिस्थिती

पेट्रोग्राडमधील प्रत्यक्ष परिस्थिती आणि खवळलेला लोकसागर पाहिलेल्या

सेनापतीने झारला सत्तात्याग करणाऱ्याचा सल्ला दिला आणि त्याच्या ऐवजी दुसरा झार सत्तेवर आणण्याची खटपट सुरू केली. पण लोकांना झार हे नावच नको होते. दरम्यान कामगार व सैनिकांनी राजवाड्याचा बराच मोठा भाग ताब्यात घेतला. राजवाड्यात ड्युमाचा अध्यक्ष आणि काही सभासद भेदरलेल्या अवस्थेत कसेबसे जीव वाचवून होते. कामगार व सैनिक यांनी आपल्या सोव्हिएटची कचेरी राज-वाड्यात स्थापन केली. येथवर सर्व ठीक झाले. पण मिळालेल्या सत्तेचा वापर कसा करावयाचा याची कोणालाच कल्पना येईना. शेवटी सोव्हिएटचे शिष्टमंडळ ड्युमाच्या अध्यक्षाला भेटले व मंत्रिमंडळ स्थापण्याच्या दृष्टीने त्याने प्रयत्न करावा असे सुचवू लागले. अध्यक्षाला सत्ता नको होती, पण सत्ता हस्तगत करण्याच्या संकटातून त्याची सुटकासुद्धा होत नव्हती. त्या भयभीत अवस्थेतच त्याने मंत्रिमंडळ स्थापन केले. क्रांतीच्या संक्रमणकालातील ते पहिले हंगामी सरकार. १७ एप्रिलपर्यंत त्या दुबळ्या हंगामी सरकारचा कारभार चालू होता. पण एकंदर परिस्थिती विलक्षण ढगाळलेली होती. झारशाहीचा अस्त झालेला नव्हता आणि क्रांतीचा प्रकाशही दिसत नव्हता. तो संक्रमणकाल जनतेला अधिकच गोंधळून टाकीत होता. लोकांच्या मनात अनेक संभ्रम उत्पन्न होत होते.

### लेनिनच्या घोषणा

रशियन क्रांतीला खऱ्या अर्थाने क्रांतिकारक कलाटणी देणारी घटना १७ एप्रिल रोजी घडली. त्या दिवशी लेनिनने रशियात प्रवेश केला आणि क्रांतिकारकांच्या मनात आशेचा स्फुलिंग फुलविला.

लेनिन स्वित्झरलंडमध्ये हद्दपारीचे जीवन जगत होता. क्रांतीच्या बातम्या समजताच त्याने जर्मन सत्ताधाऱ्यांशी संगनमत करून एका खास गाडीने रशियात प्रवेश केला. त्याने क्रांतिकारकांना तीन घोषणा सांगितल्या : लोकशाही गणराज्याची स्थापना करणे, जमीनदारांच्या जमिनी ताब्यात घेणे आणि कामगारांसाठी आठ तासांचा दिवस ठरविणे. या घोषणांनी क्रांतीला नवा अर्थ प्राप्त झाला. क्रांतिकारकां-मध्ये चैतन्य उत्पन्न झाले. बोल्शेव्हिक संघटित झाले. सोव्हिएटमध्ये त्यांनी बहुमत मिळविले. एवढे झाल्यावर हंगामी मंत्रिमंडळ उलथून पाडणे अवघड नव्हते.

राजधानीत या घटना घडत असताना ग्रामीण भागात मात्र खूपच अराजक माजले होते. राज्यकारभार केव्हाच कोलमडून पडला होता. त्या स्थितीत हंगामी मंत्रिमंडळ बरखास्त होणे अपरिहार्य होते. त्याच्या जागी केरेन्स्कीचे नवे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्याच वेळी लेनिन जर्मनांचा हस्तक आहे, असा प्रचार सुरू झाला. शेवटी लेनिनला अटक करण्यासाठी केरेन्स्कीने हुकूम सोडला. पण लेनिन, ट्रॉट्स्की आणि त्यांचे अनेक सहकारी भूमिगत झाले. शहरात मोठ्या प्रमाणात धरपकड सुरू

झाली. सोव्हिएट विरुद्ध केरेन्स्की असे क्रांतीला नवे वळण मिळाले. क्रांतीची दुसरी फेरी सुरू झाली. राजधानीत कोणाचे राज्य चालू आहे याची नीटशी कल्पनाही येऊ नये इतकी परिस्थिती गोंधळलेली बनली होती.

## क्रांतीचा प्रहार

लेनिनला फार दिवस भूमिगत राहणे शक्य नव्हते. प्रगट होऊन केरेन्स्कीची सत्ता हाती घेण्याचे त्याने ठरविले. क्रांतीची योजना आखली. ट्रॉटस्कीकडे लष्करी व्यवस्थेची सूत्रे दिली आणि शेवटी ७ नोव्हेंबर रोजी क्रांतीचा घनाघाती प्रहार करण्याचे ठरविले. त्याच दिवशी रशियातील सर्व सोव्हिएटच्या कॉंग्रेसचे अधिवेशन पेट्रोग्राड येथे भरणार होते.

६ नोव्हेंबर १९१७ च्या रात्री क्रांतिसेनेच्या शिपायांनी पेट्रोग्राड शहरातील सर्व मोक्याची ठिकाणे ताब्यात घेतली. ७ नोव्हेंबर रोजी लोक झोपेतून उठले ते क्रांतीच्या नव्या प्रकाशातच. रशियन क्रांतीचा लेनिनच्या नेतृत्त्वाखाली विजय झाला. राजधानीची सूत्रे हाती आल्याबरोबर रशियातील इतर मोठ्या शहरांची सूत्रेही सोव्हिएटच्या हाती येणे अवघड नव्हते.

## क्रांतीनंतरचे उत्पात व निःपात

लेनिनग्राडचा इतिहास क्रांतीपूर्व कालात अशा अनेक रोमांचकारी घटनांनी भरलेला आहे. क्रांतीनंतरही त्या शहराने कितीतरी अत्याचारी घटना पाहिल्या, अनुभवल्या . स्टालिनच्या काळात तर या शहरात अनेक राजकीय उत्पात आणि निःपात घडले. वस्तुतः त्यांचा आरंभ लेनिनच्या सहकाऱ्यांनी केलेल्या विरोधापासूनच झाला. झिनॉव्हिव हा लेनिनचा विश्वासू सहकारी. पण १९२० मध्ये त्याचे लेनिनशी मतभेद झाले आणि त्याने बंड उभारले. लेनिनच्या हाती सर्व सूत्रे केंद्रित होत आहेत आणि त्यामुळे क्रांतिकालात त्याग केलेल्या कार्यकर्त्यांना कोठेच स्थान मिळत नाही, अशी झिनॉव्हिवची तक्रार होती. लेनिनच्या मागे बहुमत असल्यामुळे आणि लेनिनचे व्यक्तित्व अत्यंत प्रभावी असल्यामुळे झिनॉव्हिवचे बंड मोडणे अवघड नव्हते.

लेनिनग्राड शहरात १९३४ मध्ये किरॉव्हचा खून झाला. आणि त्या घटनेने संपूर्ण रशियात एक भयंकर अत्याचाराची लाट पसरली. किरॉव्ह स्टालिनचा विश्वासू सहकारी. क्रांतिकालात त्याने फार मोठी कामगिरी बजावली होती. तो पॉलिट ब्युरोचा सभासद आणि लेनिनग्राडचा सर्वाधिकारी होता. त्याच्या विरुद्ध पक्षातील एका गटाने संघर्ष सुरू केला. आणि त्यातच किरॉव्हचा खून झाला. त्याच्या खुनाचे निमित्त

करून स्टालिनने १९३६ ते १९३८ पर्यंत देशातील सर्व विरोधकांची कत्तल केली. कोणालाही आणि कोठेही अटक करण्याचे पोलिसप्रमुखांना परवाने मिळाले होते. त्यामुळे स्टालिन आणि त्याचा गट यांच्या विरुद्ध ज्यांनी केव्हा तरी आपला विरोध दर्शविला होता त्या सर्वांवर अतिशय क्रूरपणे सूड घेतला गेला. त्या तीन वर्षांत हजारो खटले सुरू झाले. आणि त्यांचे झटपट निकाल लावून तथाकथित आरोपींना फासावर लटकविले जाई किंवा सायबेरियातील सक्तीच्या छावण्यांमध्ये पाठवून दिले जाई.

## नव्वद लाख बळी पडले

त्यावेळी खटल्याचे एक नवे तंत्र सुरू झाले आणि तेच पुढे सर्व कम्युनिस्ट देशांत चालू राहिले. अटक झालेल्या इसमाला देशद्रोही, जनतेचा शत्रू, गुतहेर, दहशतवादी इत्यादि संबोधून आरोप ठेवावयाचा आणि त्याचा अत्यंत छळ करून त्याच्याकडूनच अरोपाची कबुली मिळवावयाची. त्याच्या नातेवाईकांच्या साक्षी घेऊन पुराव्यादाखल त्याचा उपयोग करावयाचा. पतीविरुद्ध पत्नीची साक्ष, बापाकडून मुलाचा निषेध किंवा प्रेयसीकडून प्रियकराच्या गुप्त रहस्याची निवेदने अशी माहिती न्यायालयासमोर मिळवावयाची आणि मग तोच पुरावा ग्राह्य समजून आरोपीला शिक्षा व्हावयाची. सतत तीन वर्षे असे मानवसत्र चालू होते. त्यात किती लोक ठार झाले असतील किंवा देशोधडीला लागले असतील याची आकडेवार माहिती उपलब्ध असणे शक्य नाही. पण विसाव्या काँग्रेसमध्ये क्रुश्चेव्हने स्टालिनचा निषेध केल्यानंतर असे सांगितले की, स्टालिनच्या अत्याचारांना त्या तीन वर्षांत निदान ८० ते ९० लाख लोक बळी पडले असावे. एका अर्थाने रशियाची क्रांती रक्तशून्य झाली. कारण क्रांतीच्या दिवशी कोणीही मारला गेला नाही–सत्तांतर सहजपणे झाले. पण स्टालिनने क्रांतीला अति रक्तरंजित केले. कॅथरीनच्या काळात पोपोव्हिच याने शेतकऱ्यांचे बंड उभारले म्हणून त्याला पकडण्यात आले. जेथे अटक झाली तेथून एका लाकडी पिंजऱ्यात त्याला लेनिनग्राडला आणले आणि भर रस्त्यावर फाशी दिले अशी हकीगत सांगण्यात येते. क्रांतिपूर्व काळात झारविरुद्ध असंतोष निर्माण करण्याकरता या हकीगतीचा कम्युनिस्ट पक्षाने भरपूर उपयोग करून घेतला. पण स्टालिनने केलेले अत्याचार आणि त्यामुळे बळी पडलेले हजारो लोक यांच्या हकीगती कॅथरीनच्या कृत्यालाही लाजवितील इतक्या भयानक स्वरूपाच्या होत्या.

अलीकडे अशी माहिती उपलब्ध झाली आहे की स्टालिननेच आपल्या हस्तकांकडून किरावहचा खून करविला होता. आपल्या विरोधकांना नष्ट करण्यासाठी त्याला कारण हवे होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हे शहर दोन वर्षे नाझी सैन्याच्या ताब्यात

होते, त्यावेळी या शहराने जो पराक्रम केला आणि जी कणखर मनोवृत्ती दाखविली ती युद्धकालीन इतिहासात विशेष उल्लेखनीय ठरली. नाझी सैन्याने केलेल्या अत्याचारांची वर्णने ऐकून लेनिनग्राडच्या नागरिकांचे रक्त अद्यापही उसळून येते आणि नाझींविरुद्ध त्यांचा त्वेष जागृत होतो. त्या अत्याचारांना बळी पडलेल्या लोकांचे एक भव्य स्मारक शहराच्या नजीक उभारले आहे. स्मारकाच्या प्रवेशद्वारातच एक अखंड ज्वाला प्रज्वलित ठेवलेली असून त्याच्या पुढे एका विस्तीर्ण उद्यानात मातृदेवतेचा भव्य पुतळा उभारला आहे.

## पुनः निःपाताची लाट

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर ‘लेनिनग्राडचा खटला’ या नावाने आणखी एक प्रकरण त्या शहरात घडले. झाडोनॉव्ह आणि त्याचे सहकारी यांच्या निमित्ताने १९४८ मध्ये स्टालिनने पुन्हा एकदा दहशतीचे वातावरण निर्माण केले. झाडोनॉव्हचे सहकारी पॉलिट ब्युरोचे सभासद होते. ते सर्वच्या सर्व १९४८ मध्ये बेपत्ता झाले. १९५६ पर्यंत त्यांच्यासंबंधी काहीही माहिती उपलब्ध नव्हती. पण विसाव्या काँग्रेसच्या अधिवेशनात क्रुश्चेव्हने त्यावेळच्या घटनांवर प्रकाश टाकला आणि असे स्पष्ट जाहीर केले की त्या सर्व लोकांना स्टालिनच्या हुकुमाने अटक करून गोळ्या घालून ठार करण्यात आले. त्याच्या मागे मुख्यतः मेलेन्कॉव्हचा हात होता. आठ वर्षे बेपत्ता झालेले कम्युनिस्ट नेते क्रुश्चेव्हच्या भाषणाच्या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेचे विषय बनले आणि स्टालिनच्या अत्याचारांच्या यादीत त्यांनी आणखी एक भर घातली.

## बेरियाचा खून

लेनिनग्राडमध्ये अगदी अलीकडे घडलेली सर्वांत मोठी उल्लेखनीय घटना म्हणजे बेरियाचा खून. बेरिया स्टालिनचा विश्वासू सहकारी आणि पोलिसखात्याचा प्रमुख होता. रशियातील पोलिसखात्याच्या प्रमुखाचे काम सामान्यतः आपल्या देशातील गृहमंत्र्यासारखे असते. बेरियाने स्टालिनच्या काळात जी दुष्कृत्ये केली होती आणि पक्षातील प्रामाणिक कार्यकर्त्यांनाही देशोधडीला लावले होते त्याचा सूड घेण्याची संधी स्टालिनच्या मृत्यूनंतर काही महिन्यांतच त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना मिळाली. स्टालिननंतर रशियाचे सर्वाधिकारपद आपल्याकडे येईल अशी सुखस्वप्ने तो पाहात होता. त्याचे सहकारी स्टालिनचा वारस म्हणून त्याला भरीस घालीत होते. त्या दिशेने त्याचे कारस्थानही सुरू झाले होते. पण मेलेन्कॉव्ह, मोलोटॉव्ह, क्रुश्चेव्ह इत्यादि पुढाऱ्यांनी त्याचा खून करविला आणि सत्तास्पर्धेच्या क्षेत्रातील कायमचा काटा काढून टाकला.

## सांस्कृतिक केंद्र

लेनिनग्राडच्या भूमीने अशा रक्तपाती घटना पाहिल्या असल्या तरी तिचे खरे वैशिष्ट्य साहित्य, कला, संस्कृती यांचा विकास घडवून आणण्यात व्यक्त झालेले आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या गळेकापू सत्तास्पर्धेमुळे क्रांतीनंतर वर उल्लेखिलेले प्रकार लेनिनग्राडच्या नागरिकांना बघावे लागले. वस्तुतः या शहरातील शास्त्रीय संशोधनाच्या संस्था, कला-प्रदर्शने, नाट्यगृहे, ग्रंथालये इत्यादि सांस्कृतिक केंद्रे पाहिल्यानंतर त्या शहराचे बौद्धिक आणि कलात्मक वैशिष्ट्ये किती श्रेष्ठ आहेत हे लक्षात येते. लेनिनग्राड विद्यापीठाची स्थापना १८०४ मध्ये म्हणजे, क्रांतीपूर्वी शंभर वर्षे झाली. सध्या या विद्यापीठात इतर विषयांबरोबर पूर्वेकडील देशांतील संस्कृती आणि भाषा यांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र विभाग सुरू केले आहेत. शहरात दीड हजार ग्रंथालये आहेत. त्यातील सर्वांत मोठ्या ग्रंथालयात एक कोटींपेक्षा अधिक पुस्तके असून सायन्स लायब्ररीमध्ये विज्ञान आणि तंत्र यांच्यासंबंधीचे ऐंशी लाख ग्रंथ आहेत. लेनिनग्राडमधील ड्रामा थिएटर इ. स. १८३२ मध्ये बांधले आणि अद्यापही त्याची निर्दोष रचना वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. बॅले थिएटर १७८३ मध्ये बांधून पूर्ण झाले आणि त्याची गणना अशा प्रकारच्या युरोपमधील इतर थिएटर्समध्ये प्रामुख्याने केली जाते. शहरातून अनेक कालवे काढलेले आहेत. रस्त्यांच्या समांतर असलेल्या या काल्व्यांतून वाहतूक चालू असते. त्यावर सहाशे पूल बांधलेले असून शहरात रस्ते आणि कालवे यांची स्पर्धाच चालू आहे असे वाटू लागते. पुलांच्या रचनेतही कलात्मक दृष्टी दाखविली आहे. प्रत्येक पुलावर लेनिनग्राडच्या इतिहासातील एखाद्या प्रसंगाचा पुतळा बसविलेला दिसून येतो.

## सोव्हिएट कला कोठे आहे?

पण या सर्वांपेक्षा लेनिनग्राडच्या कलेचे सर्वश्रेष्ठ आणि वैभवशाली दर्शन हर्मि-टेजमधील वस्तुसंग्रहालयात घडते. पीटर बादशहा व कॅथरीन महाराणी यांनी युरोपीय देशांतील चित्रकलेचे आणि मूर्तिकलेचे हजारो नव्हे, अक्षरशः लक्षावधी नमुने आणून हर्मिटेजमध्ये ठेवलेले आहेत. अनेक पाश्चात्य कलावंतांना आश्रय देऊन त्यांची अभिजात कला या वस्तुसंग्रहालयात जतन करुन ठेवली. कित्येक रशि-यन कलावंत इंग्लंड आणि फ्रान्स या देशांना पाठवून कलेचे उच्च शिक्षण त्यांना दिले. हर्मिटेजमधील वस्तुसंग्रहालय जगातील एक अप्रतीम संग्रहालय मानले जाते. कॅथरीन-पासून क्रांतीच्या उद्रेकापर्यंत दीडशे वर्षांच्या कालखंडात रशियात अनेक राजकीय उत्पात झाले. पण हर्मिटेज कलासंग्रहाला त्यामुळे धक्का बसला नाही. किंबहुना प्रत्येक झार त्यात काही तरी नवीन भरच घालीत असे. रेंब्रँड्स, पिकासो, रुबेन्सेस यां-

सारख्या जगविख्यात चित्रकारांची अनेक चित्रे या संग्रहालयाची भूषणे मानली जातात. लिओनार्द द व्हिन्सी याच्या फक्त चौदा मूळ कलाकृती जगातील निरनिराळ्या वस्तु-संग्रहालयांत आहेत. त्यांपैकी दोन कलाकृती हर्मिटेजच्या कलावैभवात भर घालतात. चित्रकलेप्रमाणेच मूर्तिकला, रत्नजडित अलंकार, अत्यंत तलम आणि कलात्मक वस्त्रे, अनेकविध ऐतिहासिक शस्त्रे यांचा संग्रहही निरनिराळ्या दालनांत पाहावयास मिळतो.

हर्मिटेजच्या भव्य इमारतीत पंधराशे छोटीमोठी दालने आहेत असे दुभाषाने सांगितले. त्यांपैकी फक्त चारशे दालनांत वस्तुसंग्रहालय असून बाकीच्या दालनांचा इतर कामासाठी उपयोग केला जातो.

हर्मिटेजमध्ये पूर्वेकडील देशोदेशींच्या कलांचेही काही विभाग केलेले आहेत. भारतीय कलेचे प्रदर्शन एका छोट्याशा दालनात मांडलेले आहे, तर चीन आणि जपानच्या कलात्मक वस्तूंचा संग्रह दुसऱ्या एका दालनात ठेवलेला आहे.

क्रांतीनंतरच्या ' सोव्हिएट कलेचे नमुने ' पाहण्याची इच्छा आम्ही दर्शविली तेव्हा दुभाषाने एका भव्य दालनात नेले. पण, अगोदर इतर दालनांतील कलाकृतींनी डोळे इतके दिपवून टाकले होते की, त्यामुळे ' सोव्हिएट कला ' म्हणजे ' शालेय विद्यार्थ्यांचें कलाप्रदर्शन ' वाटू लागले. आम्ही ते दुभाषाला बोलून दाखविल्यावर तो म्हणाला, ' क्रांतीनंतरच्या रशियन कलेचा एक स्वतंत्र कलासंग्रह मॉस्कोत तुम्हांला पाहावयाला मिळेल. '

## इतिहासाच्या खुणा

आमचा मुक्काम हॉटेल युरोपामधे होता. झारच्या काळात युरोपीय लोकांसाठी बांधलेल्या या हॉटेलचा दरबारी थाट प्रेक्षणीय आहे. इमारतीच्या रचनेपासून फर्निचरपर्यंत सर्व वस्तूंचा मध्ययुगीन घाट आकर्षक वाटतो. प्रशस्त दालने, मौल्यवान फर्निचर, जुन्या घाटाची काचेची आणि चिनीमातीची भांडी, खिडक्यांच्या जाळींना केलेली कारागिरी या सर्व गोष्टींमुळे आपण एखाद्या सुंदर राजवाड्यात वावरत आहोत की काय असे वाटते. हॉटेलचे जुने वैभव कायम ठेवून अनेक आधुनिक सोयी केल्या आहेत. खिडकीच्या बाहेर डोकावल्याबरोबर समोरच पुष्कीन थिएटर आणि त्याच्या शेजारीच एक टोलेजंग नृत्यगृह पाहावयास मिळते. दुभाषाने त्या इमारतींची ऐतिहासिक माहिती सांगितली आणि लगेच तो म्हणाला, ' लेनिनग्राडमधे तुम्ही कोणत्याही रस्त्यावर गेलात तरी तेथे तुम्हांला दहापाच तरी ऐतिहासिक इमारती आणि त्यांच्यामागचा मनोरंजक इतिहास ऐकावयास मिळेल. किंबहुना हे सर्व शहरच इतिहासामधे रंगून निघालेले आहे. कोठेही पाऊल ठेवा आणि लगेच तुम्हांला तेथे काहीतरी इतिहासाची खूण सापडेल.

दुभाषाचे सांगणे प्रत्यक्ष अनुभवास यावयाला फार वेळ लागला नाही. विंटर

पॅलेसच्या दिशेने आम्ही जाऊ लागलो. रस्त्यात एक भव्य चर्च दिसले. त्याची बांधणी आकर्षक होती. उंच शिखरावर सोनेरी मुलामा चढविलेला होता. त्यामुळे त्याचे वैभव आणि शोभा एकदम नजरेत भरत होती. दोनशे वर्षांपूर्वी बांधलेल्या त्या चर्चच्या गाभाऱ्यात आणि छतावर बायबलमधील अनेक मनोहर प्रसंग चित्रित केलेले आहेत. ह्या वेधक चित्रांतील रंगसंगती आणि चित्रित केलेल्या व्यक्तींच्या मुखावरील भाव अद्यापही ताजे वाटावे इतके चांगल्या स्थितीत ठेवलेले आहेत. त्या चर्चमधे आता कोणी प्रार्थनेला जात नाही. तेथे ग्रंथालय स्थापन केले आहे. क्रांतीनंतर काही वर्षे धर्मासंबंधीच्या चमत्कारिक कल्पना कम्युनिस्टांच्या डोक्यात होत्या. 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे मार्क्सने म्हटले होते. त्याला अनुसरून क्रांतिकारकांनी पहिला हल्ला धर्मकल्पनांवर केला. त्या तडाख्यात काही चर्चची मोडतोडही झाली. पण नंतर त्या सुंदर ऐतिहासिक वस्तूंची जपणूक करण्याची आवश्यकता पटू लागली. काही चर्चेसमधून अलीकडे वृद्ध लोक प्रार्थनेला जाऊ लागले आहेत. ईस्टर आणि ख्रिसमस यांसारखे सणही पाळण्यात येत आहेत. दुभाषाने सांगितले की गेल्या चारपाच वर्षांत रविवारी चर्चमध्ये जाणाऱ्या भक्तांची संख्या वाढू लागली आहे.

वर उल्लेखलेल्या चर्चप्रमाणे लेनिनग्राडमध्ये आणखी अनेक चर्चेसमधून ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, बालक मंदिरे इत्यादी संस्था स्थापन केल्या आहेत.

## पीटर राहिला, स्टालिन गेला

विंटर पॅलेस आणि त्याच्या सभोवतालचा सर्व परिसर ऐतिहासिक प्रसंग आणि कलात्मक पुतळे यांनी व्यापून टाकलेला आहे. नेवा नदीच्या किनाऱ्यावर या भव्य राजवाड्याची उभारणी अठराव्या शतकाच्या मध्यावर झाली. युरोपातील भव्य प्रासादांत विंटर पॅलेसची गणना केली जाते. त्याच्या एका बाजूला पीटर आणि कॅथरीन यांचे पुतळे उभारले आहेत आणि दुसऱ्या बाजूला कॅथरीनच्या आमदानीत बांधलेली हर्मिटेज ही कलात्मक वास्तू आहे. पीटर आणि कॅथरीन यांचे पुतळे काढून टाकण्यात यावेत अशी क्रांतीनंतरच्या काळात मोहीम सुरू केली होती. पण त्या ऐतिहासिक पुतळ्यांचे महत्त्व ओळखून त्यांना तेथून हलविण्याची कल्पना सोडून देण्यात आली. 'सरंजामशाहीची' प्रतिके अद्याप तेथे उभी आहेत. किंबहुना अलीकडच्या काळात त्यांना काहीसे गौरवाचे स्थानही मिळत आहे. पण आश्चर्य असे की या सर्व भागात किंबहुना सर्व लेनिनग्राड शहरात स्टालिनचा मात्र एकही पुतळा पाहावयास मिळाला नाही. विसाव्या काँग्रेसनंतर स्टालिनच्या सर्व पुतळ्यांची अणि चित्रांचीही उचलबांगडी करण्यात आली. पीटर आणि कॅथरीन कायम राहावीत आणि स्टालिनचे उच्चाटन व्हावे या घटनांची सुसंगती आमच्या दुभाषाला लावता येणे शक्य नव्हते. त्यासंबंधी काही प्रश्न विचारला तर कधी त्याकडे कानाडोळा करून तर कधी इतर

काहीतरी माहिती सांगून तो उत्तर देण्याचे टाळींत असे.

## मराठीचा वर्ग

नेवा नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर लेनिनग्राडमधे बांधलेल्या सर्वांत जुन्या इमारती पीटर आणि पॉल हे किल्ले आहेत. आपल्या इकडील किल्ल्याच्या कल्पनेवरून पीटर आणि पॉल किल्ल्यांची कल्पना येणार नाही. त्या केवळ दोन उंच इमारती आहेत. शिखराची उंची तीनशे मीटर आणि नजीकच्या भव्य घुमटाचा आकार शंभर मीटर व्यासाचा आहे. त्याच्या जवळच झारच्या काळातील तुरुंग असून त्यात आता टांकसाळ चालू आहे. याच भागात लेनिनग्राड विद्यापीठ आहे. विद्यापीठाची इमारत जुन्या पद्धतीची आहे. पूर्वेकडील देशांच्या भाषा आणि संस्कृती शिकविण्यासाठी या विद्यापीठात खास विभाग सुरू केलेला आहे. त्यात मराठी भाषेचाही एक विभाग असून पाच सहा विद्यार्थी तेथे मराठीचा अभ्यास करतात. प्रोफेसर पॅचिंको यांनी त्या विभागाची माहिती सांगितली आणि काही विद्यार्थ्यांना मुद्दाम मराठीत प्रश्न विचारण्यासही सुचविले. त्या विभागात मराठीचे छोटेसे ग्रंथालयही आहे. हरिभाऊ आपटे, कोल्हटकर, गडकरी, खांडेकर यांची पुस्तके अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली आहेत. विद्यापीठ प्रामुख्याने उत्तर युरोप आणि रशियाच्या लगतचे देश यांच्या भाषांचा अभ्यास करण्यासाठी विशेष प्रसिद्ध आहे आणि अलीकडेच पूर्वेकडील देशांच्या भाषा शिकविण्याची तेथे सोय केलेली आहे.

## लेनिनची कर्मभूमी

रशियाच्या क्रांतीनंतर ज्या इमारतीतून लेनिनने पहिले भाषण केले ती इमारत आणि त्या भोवतालचे वातावरण पूर्वीसारखेच कायम ठेवण्यात आले आहे. ज्या सभागृहात लेनिनने भाषण केले ते सभागृह आता कम्युनिस्ट पक्षाच्या खास सभा घेण्यासाठी उपयोगात आणले जाते. ही इमारत म्हणजे मूळचा एका सरदाराचा प्रासाद होता. लेनिनचे सैनिक आणि झारचे सैनिक यांची पहिली झटापट येथेच झाली. लेनिनच्या सैनिकांनी तो प्रासाद जिंकून आत प्रवेश मिळविला आणि तेव्हांपासून लेनिनने तेथेच आपली कचेरी थाटली. क्रांतीनंतरची गाजलेली भाषणे आणि क्रांतिकारकांना मार्गदर्शनपर केलेल्या सर्व आज्ञा यांचे मूळ उगमस्थान हीच इमारत आहे. याच इमारतीच्या एका भागात लेनिन राहात असे. त्याच्या त्या निवासस्थानात तो उपयोगात आणीत असलेल्या सर्व वस्तू संग्रहित करून ठेवलेल्या आहेत त्याची दुर्मिळ छायाचित्रे, हस्तलिखित कागद, भाषणांच्या रेकॉर्ड्स, सोफासेट, टेबल, लॅंप इत्यादि सर्व वस्तू मुद्दाम दाखविण्यात येतात.

या इमारतीच्या शेजारीच आणखी एक इमारत ऐतिहासिक प्रसंगामुळे विशेष गाजलेली दाखविण्यात आली. या इमारतीत केरेन्सीच्या हंगामी सरकारने आपली कचेरी थाटली होती. आता तेथे कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी शिक्षण देण्याचे केंद्र स्थापन केलेले आहे.

## लेनिनग्राडमधील लग्नमंडप

लेनिनग्राडच्या ऐतिहासिक वातावरणातून बाहेर पडून अलीकडल्या रशियन सामाजिक जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या एका नव्या इमारतीत आम्ही प्रवेश केला. लेनिनग्राडमधील ते सर्वात मोठे विवाह-मंदिर होते. अनेक दालने, सुंदर सजावट आणि कलावस्तू यांमुळे त्या इमारतीची आकर्षकता वाढली आहे. एखाद्या मोठ्या लग्नमंडपासारखे गजबजलेले वातावरण आणि नटून सजून आलेल्या वधूवरांच्या जोड्या यामुळे त्या इमारतीला एक निराळीच शोभा आलेली आहे.

या लग्नमंडपात दररोज पन्नास ते साठ विवाह पार पडतात. शहरात विवाह नोंदणीची कार्यालये आणखी बरीच आहेत. पण तेथे केवळ विवाह सरकारी अधिकाऱ्यापुढे नोंदविला जातो. येथे मात्र नोंदणीबरोबरच छोटासा समारंभ करण्याचीही सोय आहे. त्यामुळे नोंदणीच्या रुक्ष आणि औपचारिक विधीशिवाय मित्र आणि नातेवाईकांच्या मेळाव्यात वधूवरांना 'मिरविण्याचा' आनंदही लुटता येतो. पूर्वी अशा अनौपचारिक समारंभाची सोय कोठेच नव्हती. पण अलीकडे क्रुश्चेव्हच्या कारकीर्दीत सार्वजनिक लग्नमंडपांची सोय करण्यात आली आहे. रशियातील इतर शहरांतही अशी सरकारी 'मंगल कार्यालये' सुरू झाली आहेत.

आम्ही एका विवाहाचा संपूर्ण विधी पाहण्याची इच्छा दर्शविली. अर्थात हा सर्व विधी केवळ अर्ध्या तासात पूर्ण झाला.

वधूवरांची माहिती नमूद केलेली सर्व कागदपत्रे अगोदरच तयार करून ठेवलेली होती. वधू आणि वर निरनिराळ्या दालनांत आपापल्या नातेवाईकांबरोबर बसलेले होते. दोघांचीही मित्रमंडळी जमली होती. थट्टाविनोद चालू होता. व्यवस्थापिकेने आमची वधूवरांशी ओळख करून दिली. थोड्याच वेळात वधू आणि वर एकत्र एका मोठ्या सभागृहाच्या दाराशी आले. भोवताली 'वऱ्हाडी' मंडळी उभी होती. पाच मिनिटांत सभागृहाचे दार उघडले. वधूवरांनी आत प्रवेश केला. सभागृहात मध्यभागी विवाहनोंदणी करणारी स्त्री बसली होती. तिच्या एका बाजूला लेनिनग्राड नगरपालिकेची एक सदस्या आणि दुसऱ्या बाजूला आणखी एक स्त्री बसलेली होती.

नोंदणी करणाऱ्या स्त्रीने प्रथम छोटेसे भाषण केले: तुम्हांला एकमेकांची निवड पसंत आहे ना? विवाहाने तुम्ही जीवनाचे साथीदार झाला आहात. तुम्ही

समाजाची एक नवी जबाबदारी स्वीकारली आहे. इत्यादि.

या प्रास्ताविक भाषणानंतर नगरपालिकेची सदस्या वधूवरांजवळ गेली. तिनेही एक छोटेसे भाषण करून लेनिनग्राडच्या नागरिकांतर्फे वधूवरांचे स्वागत केले. त्यानंतर वधूवरांनी नोंदणीवहीवर सह्या केल्या. एकमेकांना पुष्पगुच्छ दिले. त्यांच्या अगदी निकटच्या नातेवाईकांनी भेटीदाखल काही वस्तू त्यांना दिल्या. प्रेक्षकांनी टाळ्या वाजविल्या आणि संपला विवाह. लगेच वधूवर दुसऱ्या दाराने आणखी एका दालनात जातात. त्याच वेळीं मुख्य प्रवेशद्वाराशी आणखी एक जोडपे नोंदणी करण्यासाठी उभे होते.

याच इमारतीत एका दालनात विवाहितांना भेटीदाखल द्यावयाच्या वस्तूंचे दुकान थाटलेले आहे. पुष्पगुच्छ, दागिने, कपडे, कलाकुसरीच्या वस्तू आणि मद्य या 'स्टोअर'मध्ये विक्रीसाठी ठेवल्या आहेत. विवाहविधी पार पडला की मद्यपानाचा छोटासा कार्यक्रम झाल्यावर वऱ्हाडी मंडळी लग्नमंडपातून बाहेर पडतात.

आम्ही दुभाषामार्फत एका वृद्ध स्त्रीला तिच्या काळातील विवाहासंबंधीची माहिती विचारली. तिचे स्वतःचे लग्न कशा पद्धतीने झाले असे विचारले. तेव्हा ती खूप मोठ्याने हसली आणि दुभाषाच्या पाठीवर हलकीशी चापटी मारून म्हणाली, 'माझ्या लग्नाचे काय विचारतोस. त्याला पन्नास पंचावन्न वर्षे होऊन गेली.' तेव्हा दुभाषा म्हणाला, 'माझ्याबरोबर आलेली ही सर्व मंडळी भारतीय आहेत. त्यांना क्रांतीपूर्वी विवाह कशाप्रकारे साजरे केले जात असत याची माहिती हवी आहे.' त्यानंतर त्या म्हातारीने आपल्या विवाहासंबंधी माहिती सांगितली. ती म्हणाली, "माझे लग्न एका छोट्या खेड्यात झाले. माझे पती त्याच गावात राहात असत. प्रथम ते शेती करीत होते आणि नंतर त्यांना लष्करात प्रवेश मिळाला. लग्नाच्या दिवशी दोन्ही पक्षांकडील मंडळी एकत्र जमली. सर्व स्त्री-पुरुष गाणी म्हणत आणि व्होडका पीत दिवसभर आनंदात वेळ घालवीत होते. एकमेकांची थट्टामस्करी करण्यात असा बराच वेळ गेल्यानंतर आम्ही चर्चमध्ये गेलो. तेथे असलेल्या फादरने आम्हांला समोरासमोर उभे केले आणि विचारले : 'तुम्ही दुसऱ्या कोणाला प्रेमाचे आश्वासन दिले नाही ना?' आम्ही 'नाही' म्हटल्यानंतर त्याने धार्मिक मंत्र म्हटले आणि सभोवती जमलेल्या लोकांना उद्देशून तो म्हणाला, 'आता हा ईश्वराचा सेवक वर आणि ही ईश्वरनिर्मित वधू विवाहित झाली आहेत असे मी जाहीर करतो.' त्यानंतर त्याने चमच्याने मद्य प्राशन करण्यास दिले. शेवटी आम्ही बायबलचे चुंबन घेतले व विवाहविधी संपला. आम्ही पुन्हा घरी आलो. तेथे जमलेल्या सर्व नातेवाईकांना खूप मोठी मेजवानी दिली. रात्रभर सामुदायिक नृत्य, गायन आणि व्होडका यांचा धुमाकूळ चालू होता."

एवढे सांगून ती वृद्ध स्त्री दोन मिनिटे विचारांच्या तंद्रीत मग्न झाली. जणू काय

ती आपल्या वैवाहिक जीवनाच्या स्मृतीत गुंग होऊन गेली.

## मुक्त प्रेमाचा प्रताप

क्रांतीनंतर रशियन समाजाच्या वैवाहिक जीवनात बरीच स्थित्यंतरे झाली. मार्क्सवादाचे सिद्धान्त डोक्यात खच्चून भरलेले होते. त्यामुळे आरंभी कुटुंबसंस्था, वैवाहिक जीवन इत्यादि सर्व प्रकार चेष्टेचे विषय बनलेले होते. विवाहसंस्था सरंजामशाहीचे चिन्ह आहे असे मानण्यात येत असे. विवाह केवळ स्त्री-पुरुषांचा वैयक्तिक प्रश्न आहे, त्यासाठी एखाद्या कराराची किंवा सामाजिक रूढीची गरज नाही, असे प्रतिपादन करण्यात येई. शासनसंस्थेप्रमाणे विवाहसंस्थाही अल्पावधीतच विरघळून जाईल आणि मग स्त्री-पुरुषांच्या शुद्ध संबंधाने सामाजिक व्यवहार चालू लागतील; त्यासाठी त्यांना एखाद्या कृत्रिम बंधनाने एकत्र जखडून ठेवण्याची आवश्यकता नाही. साम्यवादी समाजात संततीच्या पालनपोषणाची जबाबदारी समाजाकडे असेल. त्यामुळे कुटुंबाचे भांडवलदारी अवडंबर माजविण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारच्या कल्पना त्यावेळी पुरस्कारल्या जात आणि क्रांतीनंतरच्या उत्साहाच्या भरात त्या स्वीकारल्याही जात. या कल्पनांना तात्त्विक बैठक देण्याचे कार्य कोलोन्ती या महिलेने केले. कम्युनिस्ट पक्षाच्या वरच्या श्रेणीमध्ये तिला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे तिच्या शब्दाला खूप महत्त्व होते. तिने मुक्त प्रेमाचा सिद्धान्त मांडला : विवाहसंस्था आणि तीतून निर्माण होणारी कुटुंबव्यवस्था प्रतिगामी समाजपद्धतीचे अवशेष असल्यामुळे त्यांची आवश्यकता संपलेली आहे. स्त्री-पुरुषांचे संबंध मुक्त प्रेमावर आधारले पाहिजेत. त्यांत संबंधित स्त्री-पुरुषांच्या इच्छेचा आणि आवडीचा विचार केला जावा. इतर विचारांना किंवा बंधनांना त्यात स्थान देण्याची गरज नाही.

कोणत्याही जुन्या कल्पनेवर टीका करणे पुरोगामित्वाचे लक्षण मानण्याची मार्क्सवाद्यांची सर्वसाधारण प्रथा असल्यामुळे मुक्त प्रेमाचा सिद्धान्त लोकप्रिय व्हावयाला फारसा अवधी लागला नाही. पण त्यामुळे वैवाहिक बंधने शिथिल होऊन समाजात गोंधळ निर्माण करणारे प्रश्न उद्‌भवू लागले. कौटुंबिक जीवनाविषयी बेजबाबदार वृत्ती वाढू लागली. जुन्या पिढीविषयी अनादर आणि संततीविषयी बेफिकीर वृत्ती यामुळे समाजातील वृद्ध आणि मुले यांच्या पालनपोषणाचे प्रश्न निर्माण झाले. अनिर्बंध प्रेमाच्या नावाखाली उच्छृंखल प्रकार वाढले. विवाहबाह्य संततीची संख्या वाढली. या संततीच्या सर्व जबाबदाऱ्या स्वीकारणे आणि पार पाडणे शासनसंस्थेला अवघड होऊ लागले. ही परिस्थिती लक्षात येऊ लागली तसतशी तिच्यात बदल करण्याची भाषाही सुरू झाली.

लेनिननेही कोलोन्तीच्या अनिर्बंध प्रेमाच्या सिद्धान्ताबद्दल नापसंती व्यक्त केली होती. त्यामुळे त्या सिद्धान्ताच्या पुरस्काराची धार बरीच कमी झाली. तरी पण

साम्यवादी समाजात वैवाहिक आणि कौटुंबिक बंधनांची आवश्यकता नसावी असे प्रतिपादन करण्याची प्रथा कमी झाली नाही. जुन्या वैवाहिक प्रथा झुगारून दिल्या आणि नव्या प्रथा अनावश्यक मानण्यात येऊ लागल्या. शेवटी त्यातून बाहेर पडण्यासाठी विवाहासंबंधी एक संहिताच तयार करण्यात आली. या संहितेतही वैवाहिक बंधन शिथिल राहील अशीच तरतूद होती. पुरोगामित्वाच्या कल्पनेने भारलेले शासनकर्तेही या बाबतीत निश्चित धोरण स्वीकारण्यास धजत नव्हते. पण १९३० मध्ये मात्र विवाहबंधनाला महत्त्व देण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली. विवाह रजिस्टर करण्याची सक्ती करण्यात आली. धार्मिक पद्धतीनेही विवाह करण्याची मुभा होती. पण तो विवाह कायदेशीर मानला जात नव्हता. त्यासाठी पुन्हा नोंदणी करावी लागत असे. विवाहनोंदणीच्या सक्तीबरोबरच संततीच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी कुटुंबाकडे सोपविण्यात आली.

विवाहाप्रमाणेच घटस्फोटांसंबंधी कायदे काहीसे कडक करण्यात आले. विवाहनोंदणी करण्यासाठी फार मोठ्या सोपस्काराची गरज नसते. पण घटस्फोट घेणे तितके सोपे ठेवलेले नाही. घटस्फोटासाठी दोन्ही पक्षांना प्रथम जनता न्यायालयापुढे हजर व्हावे लागते. त्या न्यायालयात दोन्ही पक्षांना घटस्फोट घेण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला जातो. पण तडजोड होऊ शकली नाही तर ते प्रकरण वरच्या न्यायालयाकडे पाठविले जाते. घटस्फोट घेतलेल्या इसमाच्या अंतर्गत पासपोर्टवर तसे नमूद केले जाते. त्याखेरीज अलीकडे घटस्फोट घेतलेली व्यक्ती काहीशी कमी प्रतीची मानण्यात येऊ लागली आहे.

सर्वसाधारण नागरिकांसाठी असलेल्या या नियमांपेक्षा कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांसाठी अधिक कडक नियम केलेले आहेत. पक्षाच्या सभासदाला संपूर्णपणे स्वतःच्या इच्छेप्रमाणे लग्न करता येत नाही. त्यासाठी पक्षाची संमती घ्यावी लागते. पक्षनिष्ठा आणि कुटुंबनिष्ठा यांत संघर्ष उत्पन्न झाला तर पक्षनिष्ठेला अग्रहक्क मिळाला पाहिजे अशी त्यामागची भूमिका.

## स्त्रियांची प्रतिष्ठा

क्रांतीपूर्व काळात स्त्रियांना दुय्यम प्रतीचे स्थान असे. इतर कोणत्याही देशातील सरंजामशाही समाजाप्रमाणे रशियन समाजातही पुरुषाचे स्थान महत्त्वाचे मानण्यात येत असे. रशियात त्या काळी स्त्रियांना शिक्षण मिळण्याची सोय नव्हती आणि स्त्रियांनी शिक्षण घेणे अनावश्यक मानले जाई. पण क्रांतीनंतर ती परिस्थिती संपूर्णपणे पालटली आहे. स्त्री-पुरुषांची समता आणि त्यामुळे समाजात स्त्रियांना मिळालेली प्रतिष्ठा या दोन्ही गोष्टी क्रांतीनंतरच्या सामाजिक जीवनाची वैशिष्ट्ये

म्हणून मानल्या जातात. औद्योगीकरण झपाट्याने वाढू लागले, तसतसे स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्यही वाढू लागले. त्यांचे शिक्षण आणि त्यामुळे त्यांना विविध क्षेत्रांत मिळणारा प्रवेश या गोष्टीही औद्योगिक प्रगतीबरोबर वाढत गेल्या. शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रात सध्या स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा अधिक आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांना अनेक सवलती दिल्या जातात. प्रसूतिकाळची रजा आणि त्यानंतर सक्तीची विश्रांती यांमुळे स्त्रियांच्या आरोग्याविषयी काळजी घेण्याची तरतूद झाली आहे. कारखान्याच्या आवारातच लहान मुलांना सांभाळण्याची सोय झाल्यामुळे स्त्रियांना काम करून आर्थिक मिळकत करता येते. मुले मोठी झाल्यावर पायोनिअर, कोमोस्मोल इत्यादि संघटनांत त्यांचा पुष्कळ वेळ जातो. शिक्षणाची जबाबदारी शासनसंस्थेकडे असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या त्यासाठी कुटुंबाला निराळी विवंचना करण्याची गरज नाही.

## शास्त्रावर भर

लेनिनग्राडमध्ये आम्ही पाहिलेल्या प्राथमिक शाळेचे स्वरूप ताष्कंदमध्ये पाहिलेल्या शाळेपेक्षा काहीसे दृष्टींनी निराळे होते. ताष्कंदमधील शाळेत भाषा आणि इतिहास या विषयांवर अधिक भर दिलेला होता, तर येथे शास्त्र, भूगोल, हस्तव्यवसाय यांना अधिक महत्त्व दिलेले होते. या शाळेत एक हजार विद्यार्थी असून प्रत्येक वर्गात ४० ते ४५ विद्यार्थी होते. सर्व मुलांना फी माफ आहे. पण दुपारचे जेवण शाळेतच घ्यावे लागते. (ताष्कंदमध्ये अशी सक्ती नाही.) दुपारच्या जेवणासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला दररोज दीड रुबल (सुमारे १ रुपया व ३ आणे) पडतात. विद्यार्थ्यांची आरोग्याची तपासणी नियमितपणे केली जाते. त्यासाठी प्रत्येक शाळेत एका स्त्री-डॉक्टरची नेमणूक केली जाते, असे सांगण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेत सहा तास अभ्यास व एक तास खेळ करावे लागतात. मुलांना आपल्या भागातील शाळेतच प्रवेश मिळू शकतो. त्याला एक शाळा सोडून दुसऱ्या शाळेत जाता येत नाही. एकदा प्रवेश घेतलेल्या शाळेतच सर्व प्राथमिक शिक्षण पूर्ण करावे लागते. नापास होणारांचे प्रमाण शेकडा चारपाच टक्के असते. नापास झालेल्या मुलाला त्याच वर्गाचा पुन्हा अभ्यास करावा लागतो.

## शिक्षणाची गती

रशियातील शिक्षणाची गती जगाला दिपवून टाकणारी आहे. क्रांतीपूर्वी शिक्षणाचा प्रसार वरच्या वर्गापुरताच आणि विशिष्ट क्षेत्रातच मर्यादित होता. क्रांती-

नंतर शिक्षणाचे क्षेत्र विस्तारले, त्याचा आशय बदलला आणि कार्यपद्धतीही पूर्णपणे बदलली.

रशियात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे करण्यात आले आहे. सर्व पातळींवर ते मोफतही केलेले आहे. दुय्यम शिक्षणापासूनच विज्ञानावर भर देण्यात येतो आणि उच्च शास्त्रीय संशोधनाच्या अनेक शाखा व उपशाखा समृद्ध बनल्या आहेत. निरनिराळ्या साठ भाषांतून प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यात आली असून तांत्रिक शिक्षणाची प्रात्यक्षिके आणि प्रत्यक्ष कार्यपद्धती उपलब्ध करणाऱ्या सोयी वाढविल्या आहेत.

प्राथमिक आणि दुय्यम शाळांच्या बाबतीतही काही महत्त्वाचे टप्पे लक्षात घेण्यासारखे आहेत. १९३२ पर्यंतचा पहिला कालखंड मार्क्सवादी तत्त्वांवर आधारलेल्या शैक्षणिक प्रयोगांचा होता. वस्तुतः क्रांतीच्या अगोदर म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या काळातच त्या वेळच्या ड्युमाने ( पार्लमेंटने ) १९२२ पासून सार्वत्रिक सक्तीचे शिक्षण सुरू करण्याची योजना आखली होती. पण युद्ध, क्रांती आणि यादवी यांमुळे ती योजना तशीच पडून राहिली. क्रांतीनंतरही नव्या शासनसंस्थेला ताबडतोब शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेता आले नाही.

प्रथम इ. स. १९३० मध्ये प्राथमिक शिक्षण देशभर सक्तीचे करण्याची मोहीम हाती घेतली. पहिल्या पंचवार्षिक योजनेचाच तो एक भाग होता. ते प्राथमिक शिक्षण फक्त चार वर्षांचे होते. नंतर इ. स. १९४९ पासून ते सात वर्षांचे करण्यात आले. इ. स. १९५८ मध्ये क्रुश्चेव्हने जाहीर केलेल्या नव्या सुधारणांप्रमाणे प्राथमिक शिक्षणाची मुदत आठ वर्षांची करण्यात आली आहे. आणि तीच पद्धती सध्या चालू आहे. त्यापूर्वी इ. स. १९५२ मध्ये प्राथमिक शिक्षणाची मर्यादा दहा वर्षांची करावी अशी योजना आखली होती. आणि ती इ. स. १९६० पासून अमलात येणार होती. पण स्टालिनच्या काळातील सर्वच योजना रद्द ठरविण्याची क्रुश्चेव्हने जी मोहीम हाती घेतली, तिचा एक भाग म्हणून ही दहा वर्षांची प्राथमिक शिक्षणाची योजनाही रद्द करण्यात आली.

रशियात शालेय शिक्षण घेणारांची संख्या तीन कोटींच्या जवळपास आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे आहे आणि त्यासाठी पालकांना खर्च करावा लागत नाही. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार अतिशय वेगाने झाला. १९५६ पूर्वी प्राथमिक शिक्षणानंतर पुढच्या शिक्षणासाठी फी द्यावी लागत असे. फीशिवाय इतरही बराच खर्च येत असे. क्रुश्चेव्हने इ. स. १९५६ साली सर्व क्षेत्रांतील आणि सर्व प्रकारचे शिक्षण संपूर्णपणे मोफत केले. या आर्थिक सवलतीप्रमाणे क्रुश्चेव्हने आणखी एक महत्त्वाची सुधारणा जाहीर केली आणि ती म्हणजे प्राथमिक शिक्षणाची सात वर्षांची मर्यादा आठ वर्षांपर्यंत वाढविली. वयाच्या सातव्या वर्षी सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू होते

आणि वयाच्या १५ व्या वर्षापर्यंत ते चालू ठेवावे लागते. या अभ्यासक्रमाला अपूर्ण दुय्यम शिक्षण असेही नाव दिलेले आहे. याचा अर्थ या काळात दुय्यम शिक्षणाचा आरंभ होतो आणि ते पुढच्या तीन वर्षांत संपविले जाते, संपूर्ण होते. प्राथमिक शिक्षणाचा आठ वर्षांचा अभ्यासक्रम देशभर सर्वत्र सारखाच ठेवलेला आहे. विद्यार्थ्याला आपल्या मातृभाषेतून तो पूर्ण करता येतो. तत्त्वशः शिक्षणाचें माध्यम म्हणून विद्यार्थ्यांसमोर ६० निरनिराळ्या भाषांची यादी असते आणि त्यांतील कोणती भाषा निवडायची ते विद्यार्थ्यांचे पालक ठरवितात. रशियनेतर शाळांतून शेवटची तीन वर्षे रशियन भाषा सक्तीचा विषय ठेवलेला असतो.

आठ वर्षांचा हा शिक्षणक्रम संपला म्हणजे पुढचे शिक्षण घेणारांसाठी तीन मार्ग मोकळे असतात : (१) धंदेशिक्षणाच्या शाळा. या शाळांत एक ते तीन वर्षांचे निरनिराळे व्यावसायिक अभ्यासक्रम स्वीकारता येतात. कारखान्यांतून कुशल कामगारांचा वर्ग तयार करण्यासाठी याच शाळांचा प्रामुख्याने उपयोग होतो. या शाळांतून शिक्षण घेणारांना शिक्षणाबरोबर काही वेतनही मिळते. (२) सर्वसाधारण दुय्यम शिक्षणाच्या शाळा. या शाळांत तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. उच्च शिक्षणाची पूर्व तयारी आणि निरनिराळ्या हस्तव्यवसायांचे शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम आखलेला आहे. हे शिक्षण निरनिराळ्या सतरा भाषांतून दिले जाते. रशियन भाषा आवश्यक मानली जाते. (३) व्यावसायिक दुय्यम शिक्षण संस्था. या शाळांचा अभ्यासक्रम तीन ते चार वर्षांचा असतो आणि त्यांत सर्व प्रकारच्या तांत्रिक शिक्षणाची तरतूद केलेली असते. विद्यापीठातील तांत्रिक विषयांची पूर्वतयारी या शाळांतून केली जाते.

वरील अभ्यासक्रम संपल्यावर सर्वच विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळू शकत नाही. त्यासाठी निरनिराळ्या चाचण्या आणि कसोट्या ठेवलेल्या आहेत. त्यातून पार पडलेले विद्यार्थी विद्यापीठातून पाच वर्षांचे निरनिराळे अभ्यासक्रम निवडू शकतात.

अलीकडे वसतिगृहाच्या शाळा सुरू करून त्यांत निवडक विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची सोय केलेली आहे. सध्या अशा दोनशे शाळा सुरू झाल्या असून त्यांत पंचवीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांतूनच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

दुय्यम शाळांपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व अभ्यासक्रमात विज्ञानावर भर दिलेला असल्यामुळे समाजविषयक शास्त्रांकडे फार थोडे विद्यार्थी प्रवेश घेतात. मॉस्को विद्यापीठातील वीस हजार विद्यार्थ्यांपैकी सुमारे सोळा हजार विद्यार्थी शास्त्रीय विषय शिकतात आणि फक्त चार हजार विद्यार्थी भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादि विषय शिकतात.

क्रांतीपूर्वी रशियात तेरा विद्यापीठे होती आणि शास्त्रीय संशोधन करणाऱ्या काही नामवंत संस्थाही अस्तित्वात होता. पण त्यांतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांच्या जीवनाला आणि ज्ञानाला निश्चित अशी दिशा नव्हती. सध्या रशियात एकूण चाळीस विद्यापीठे आणि तेवढ्याच उच्च शास्त्रीय संशोधन करणाऱ्या संस्था, तांत्रिक शिक्षण देणारी शेकडो विद्यालये आणि सुमारे सव्वादोन लाख प्राथमिक शाळा शिक्षणप्रसाराचे कार्य करीत आहेत.

क्रांतीनंतर इतर क्षेत्रांप्रमाणे याही क्षेत्रात राजकारण आले व मार्क्सवादाच्या कल्पनांनी धुमाकूळ घातला होता. विद्यापीठात प्रवेश देताना बौद्धिक तयारीपेक्षा राज-कीय निष्ठेला अधिक महत्त्व देण्यात येत असे. विद्यार्थी आपल्या अभ्यासाबरोबर कामगारसंघटनेशी संबंधित असल्यास किंवा कॉमोस्मोलसारख्या युवक कम्युनिस्ट संघटनेत सामील असल्यास त्याला महाविद्यालयात प्रवेश मिळण्याचे बाबतीत प्राधान्य देण्यात येत असे. कम्युनिस्ट पक्षाची विचारसरणी मनात रुजलेला, राज्यकर्त्यांचा एक नवा वर्ग निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांचा राजकीय रंग तपासणे आवश्यक आहे असे समर्थन केले जात असे. पण या पद्धतीमुळे विद्यापीठांतून बाहेर पडणारा पदवीधरांचा वर्ग, राजकारणात कसाही असला तरी ज्ञानाच्या क्षेत्रांत कमी प्रतीचा ठरतो असे लक्षात येऊ लागले. तेव्हापासून महाविद्यालयाचे शिक्षण देण्याच्या कसो-टीत हळूहळू बदल झाला आणि आता प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कुवतीला महत्त्व देऊनच उच्च शिक्षणासाठी त्याची निवड केली जाते.

राजकीय कसोटीला प्राधान्य दिल्यामुळे आरंभीच्या काळात भरपूर प्रमाणात विद्यार्थी मिळू शकत नव्हते. पदवीधरांचा पक्षासाठी किती उपयोग होईल याकडे लक्ष ठेवल्यामुळे बुद्धिमान विद्यार्थी तिकडे आकर्षित होऊ शकत नव्हते. याचा परिणाम शिक्षणाप्रमाणेच इतर क्षेत्रांतही होऊ लागला. दुय्यम शिक्षणाची कक्षा ओलांडल्या-नंतर चांगल्या बुद्धिमान विद्यार्थ्यांनाही कारखान्यात किंवा सामुदायिक शेतीवर सामान्य प्रतीच्या कामासाठी पाठविण्यात येत असे. विद्यापीठांची स्थापना, त्यांच्या संख्येत झालेली वाढ, त्यांचा कालानुक्रम लक्षात घेतला म्हणजे उच्च शिक्षणाच्या बाब-तीत कशी कोंडी निर्माण झाली होती हे लक्षात येईल. क्रांतीनंतर सव्वीस नवी विद्या-पीठे स्थापन झाली. त्यांपैकी आरंभीच्या चार वर्षांत म्हणजे १९२१ पर्यंत बारा विद्यापीठे अस्तित्वात आली. त्यानंतरच्या वीस वर्षांच्या काळात म्हणजे १९४० पर्यंत फक्त दोन विद्यापीठे आणि तीही दक्षिणेकडील राज्यांत. त्यानंतर पुढच्या वीस वर्षांत म्हणजे १९६० पर्यंत पुन्हा बारा विद्यापीठांची स्थापना झाली. १९४० पासून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात राजकारणापेक्षा विज्ञानक्षेत्राला अग्रक्रम मिळाला. युद्ध काळात तोच कायम राहिला आणि नंतरच्या कालखंडातही त्यात बदल झाला नाही.

## विद्यार्थी व कम्युनिझम

मार्क्सवाद आणि कम्युनिस्ट पक्षाचे धोरण यांचा परिचय विद्यार्थीदशेपासूनच करण्याच्या दृष्टीने तीन संघटना कार्य करीत असतात. त्यांपैकी प्राथमिक शाळेत 'ऑक्टोबरवादी' ही संघटना कार्य करीत असते. ही संघटना मुलांना, कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांचा, त्यांच्या कार्याचा, क्रांतिकाळातील कथांचा परिचय करून देते. या कालात तात्त्विक विवेचनावर भर देणे शक्य नसते आणि आवश्यकही नसते. यानंतर वयाच्या नवव्या वर्षी मुले 'पायोनिअर' या संघटनेत सामील होतात. चौदाव्या वर्षापर्यंत या मुलांना रशियातील प्रगती, त्यामागे उभा असलेला कम्युनिस्ट पक्ष, मार्क्स, लेनिन आणि त्या त्या वेळचे कम्युनिस्ट नेते यांच्यासंबंधी माहिती दिली जाते. 'रशियावर प्रेम करणे आणि लेनिन व कम्युनिस्ट पक्ष यांच्या शिकवणीप्रमाणे जीवन व्यतीत करणे हे माझे कर्तव्य आहे,' अशी प्रतिज्ञा पायोनिअरला घ्यावी लागते. या संघटनेतील कम्युनिझमचे धडे देण्याचा भाग सोडला तर इतर कार्यक्रम मुलांच्या विकासाच्या दृष्टीने खरोखरच अतिशय उपयुक्त ठरणारे असतात.

लेनिनग्राडमध्ये एका पायोनिअर पॅलेसला भेट देण्याची संधी आम्हांला मिळाली होती. पूर्वीच्या सरदारांचा एक भव्य राजवाडाच या संघटनेच्या कार्याने व्यापला होता. तेथे मुलांच्या जिज्ञासेला चालना देण्यासाठी खेळांचे आणि करमणुकीचे अक्षरशः शेकडो प्रकार पाहावयास मिळाले. काही मुले बुद्धिबळे खेळत होती, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष यंत्रांची कामे शिकविली जात होती. विजेचे छोटे पॉवर हाऊस, मोटारीच्या इंजिनांचे अनेक नमुने आणि तत्सम कितीतरी यांत्रिक व तांत्रिक उपकरणे मुले हाताळीत होती. हे शिक्षण घेण्यासाठी दररोजचा शालेय अभ्यास सोडण्याची गरज नसते. शाळा सुटल्यानंतर, सुट्टीच्या दिवशी किंवा कोणत्याही फावल्या वेळी मुलांना तेथे जाऊन काम करण्याची परवानगी असते. आठवड्यातून किमान सहा तास मुलाने पायोनिअर पॅलेसमध्ये घालविले पाहिजेत अशी अट असते. त्यामुळे शाळा सुटल्यानंतरचा वेळ बहुधा मुले या संस्थेतच घालवितात. खेळाची व नवीन ज्ञान मिळविण्याची साधने प्रत्यक्ष समोर असतात आणि एकदा त्यासंबंधी मुलांच्या मनात गोडी उत्पन्न झाली म्हणजे ती सहसा पायोनिअर पॅलेसमध्ये येण्याचे टाळीत नाहीत, असा अनुभव तेथील एका शिक्षकाने सांगितला.

पायोनिअर पॅलेसमधील वातावरण आकर्षक आणि उत्साहवर्धक असते यात शंका नाही. पण चौदाव्या वर्षानंतर मुलांना तेथे प्रवेश मिळत नाही. त्यानंतर त्यांतील काही निवडक मुलांना 'यंग कम्युनिस्ट लीग'मध्ये प्रवेश दिला जातो. ही संस्था 'कॉमोस्मोल' या नावाने प्रसिद्ध आहे. कम्युनिस्ट पक्षाचे भावी कार्यकर्ते याच संघटनेत आपल्या राजकीय जीवनाची पूर्वतयारी करीत असतात. वयाच्या सव्विसाव्या

वर्षापर्यंत या संस्थेचे सभासद राहता येते. त्या वेळी मुलगा दुय्यम शाळेत किंवा कॉलेजमधे शिक्षण घेत असतो. संघटनेच्या कार्यक्रमात खेळ, लष्करी कवायत आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडले जातात. संघटनेची काही नियतकालिके आहेत. त्यांतून अलीकडे देशाच्या शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांवर अधिक धीटपणाने चर्चा करण्यात येत आहे. राजकीय शिक्षण देणे आणि त्यानंतर कम्युनिस्ट पक्षाच्या दृष्टीने संघटनेची उपयुक्तता वाढविणे यांवर विशेष भर दिला जातो. पूर्वतयारी म्हणून पक्षाच्या धोरणाचा प्रचार करण्याचे काम या संघटनेतील युवकांकडे सोपविले जाते. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, विशेषतः साहित्य, कला आणि नाट्य यांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीनेही कॉमोस्मोलचा उपयोग केला जातो. हे सर्व चालू असताना या युवकांपैकी राजकीयदृष्ट्या किती युवक उपयोगी पडतील यावर संघटनेच्या चालकांचे सतत लक्ष असते. त्यांतूनच काही निवडक युवकांना नंतर पक्षाचे सभासदत्व दिले जाते. मार्क्सवाद आणि लेनिनवाद यांचे शिक्षण, कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास, जागतिक कम्युनिस्ट-चळवळ, आर्थिक धोरण, आंतरराष्ट्रीय राजकारण, क्रांतीसंबंधीचे डावपेच इत्यादि अनेक प्रश्नांचा अभ्यास आणि चर्चा कॉमोस्मोलच्या सभासदांना करावी लागते. त्यामुळे तो जेव्हा कम्युनिस्ट पक्षाचा सभासद म्हणून कार्य करू लागतो तेव्हा त्याची बौद्धिक 'लाईन' तयार झालेली असते. अलीकडे कॉमोस्मोलचे कार्य अधिक प्रमाणात वाढविले आहे. त्यामुळे सरकारच्या धोरणाला समाजात पाठिंबा मिळविण्याच्या दृष्टीने अधिक सहजतेने शक्य होते, असा कम्युनिस्ट नेत्यांचा अनुभव आहे.

## लेनिनग्राड आणि मुंबई

लेनिनग्राडहून परतताना नकळत माझ्या मनात या शहराची मुंबईशी तुलना होऊ लागली. दोन्ही शहरांवर पाश्चात्त्य संस्कृतीची छाप आहे. तसेच, दोन्ही शहरांना आपापल्या देशांच्या स्वातंत्र्यसंग्रामात अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतात पाश्चात्त्य भाषा, विचार, शासनपद्धती, साहित्य, कला यांचा प्रवेश प्रामुख्याने मुंबईच्या महाद्वारातून झाला. लेनिनग्राडची तर स्थापनाच मुळी पाश्चात्त्य संस्कृती, शास्त्र आणि कला यांच्या आयातीसाठी झालेली आहे. रशियाचे राजकीय सत्ताकेंद्र मॉस्को असले तरी रशियन समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत लेनिनग्राडने मिळविलेले अग्रस्थान मॉस्कोला हिरावून घेता आलेले नाही. दिल्ली आणि मुंबई यांच्या परस्परसंबंधाविषयी असेच म्हणता येणार नाही काय? लेनिनग्राड आणि मुंबई बंदरांची गणना जगातील उत्कृष्ट बंदरात होते. त्यांच्या परिसरात वाढलेली कारखानदारी व देशी-परदेशी व्यापारांमुळे त्यांना लाभलेले आर्थिक क्षेत्रातील महत्त्व दोन्ही शहरांच्या बाबतीत सारखेच आहे.

## लाल बाण

लेनिनग्राडहून मॉस्कोला आम्ही रेल्वेमार्गाने निघालो. लेनिनग्राडच्या स्टेशन-वर निरोप देण्यासाठी आलेल्या पत्रकारांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या लेनिन-ग्राडच्या सुसंस्कृतपणाला शोभेशाच होत्या. स्टेशनहून रात्री साडेबारा वाजता आमचा प्रवास सुरू झाला. ही रेल्वे रशियातील सर्वात उत्कृष्ट समजली जाते. लेनिनग्राड ते मॉस्को तीनशे मैलांचे अंतर असून नऊ तासांत गाडी मॉस्कोला पोहोचते. पहिल्या महायुद्धापूर्वी झारच्या काळांत हा रेल्वेमार्ग तयार झाला. या मार्गाला कोठेही वळण, वाकण असता कामा नये अशा झारचा सक्त हुकूम होता. त्यामुळे संपूर्ण मार्ग सरळ रेषेत आखलेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीकडून रशियाला मिळालेल्या अनेक वस्तूंमध्ये रेल्वेची साधनसामुग्रीही समाविष्ट होते. त्यांतील उत्तम वस्तू आणि यंत्रसामुग्री या रेल्वेसाठी उपयोगात आणून तिला अद्ययावत केले आहे. ‘ रेड ॲरो एक्सप्रेस ’ असे या रेल्वेचे नाव आहे. गाडी सुटली तेव्हा घंटा वाजली नाही आणि गार्डची शिटीही ऐकू आली नाही. ठरलेली वेळ झाली आणि गाडी निघाली. प्लॅट-फॉर्मवर बोलत उभे असलेले पत्रकार घाईघाईने डब्यात शिरले. अनपेक्षितपणे गाडी सुरू झाल्यामुळे नव्या प्रवाश्यांचा तरी खूपच गोंधळ उडाला. डब्यात झोपण्याची सोय होती. बाहेर कडाक्याची थंडी होती. पण विजेच्या सहाय्याने डब्याचा आंतील भाग उबदार ठेवण्याची व्यवस्था होती. रेल्वेत पहिला आणि दुसरा असे दोन वर्ग होते. पहिल्या वर्गाच्या दोन प्रवाश्यांना मिळून एक स्वतंत्र खोली आणि गरम पांघरुणाची सोय असते. छोटासा रेडियो आणि टॉयलेटचे इतर सामानही ठेवलेले असते. दुसऱ्या वर्गाच्या डब्यात एका बाकावर दोन प्रवाशांना बसण्याची सोय केलेली असते आणि त्यांच्यापैकी ज्यांना हवी असतील त्यांना पांघरुणे पुरविली जातात.

रशियात असो की पूर्व युरोपातील इतर कोणत्याही देशात असो, प्रवाशाजवळ अगदी थोडे सामान असते. बेडिंग किंवा त्यासारखे मोठ्या ओझ्याचे सामान नेण्याची गरज पडत नाही. स्टेशनवर हमाल नसतात. त्यामुळे प्रवासी आपल्याला झेपेल तेवढेच सामान आपल्याबरोबर नेतात. मोठे कुटुंब प्रवासाला निघाले असेल तर त्याच्या-बरोबर पुष्कळ सामान नेणे आवश्यक असते. अशा वेळी ते वाहून नेण्यासाठी स्टेशन-वर छोट्या ढकलगाड्या मिळू शकतात. डोक्यावर ओझी वाहून नेण्याची प्रथा नाही आणि हमालाने डब्यात घुसून सामान मिळविण्यासाठी धडपड करण्याची पद्धतही नाही. स्टेशनवर फेरीवाल्यांची गर्दी नसते. लेनिनग्राड स्टेशनच्या वेटींगरूममध्ये दीड-दोनशे प्रवासी तरी बसलेले होते. पण मोठ्याने बोलणे, ओरडणे आणि गोंधळ उडवून देणे असले प्रकार आढळले नाहीत. अनेक प्रवासी काहीतरी वाचीत बसले होते आणि जे गप्पा मारीत होते तेही अत्यंत हलक्या आवाजात. त्यामुळे स्टेशनचे वातावरण

अतिशय शांत होते. कोठेही गडबड नाही, गोंधळ नाही आणि प्रवाश्यांची धावपळही नाही.

## लेनिनग्राडचे ' मॉस्को स्टेशन '

रेड ॲरो एक्सप्रेस लेनिनग्राडहून मध्यरात्री निघाल्यामुळे भोवतालचा प्रदेश पाहता आला नाही. तसेच जेथे गाडी थांबत असे तेथेही बाहेर थंडीमुळे तोंड काढून पाहण्याची सोय नव्हती. गाडी सकाळी नऊ वाजता मॉस्कोच्या लेनिनग्राड स्टेशनवर पोहोचली. रशियात स्टेशनांची नावे देण्याची ही पद्धती गमतीदार वाटते. ' लेनिनग्राडच्या मॉस्को स्टेशनहून गाडी निघते व मॉस्कोच्या लेनिनग्राड स्टेशनवर ती पोहोचते,' असे म्हणताना आपल्या नेहमीच्या अंगवळणी पडलेल्या स्टेशनांच्या नावापेक्षा हा प्रकार अगदी निराळा जाणवतो. पुण्याच्या ' मुंबई स्टेशन 'हून डेक्कन क्वीन निघाली आणि मुंबईच्या ' पुणे स्टेशनवर ' ती पोहोचली, असे आपण म्हणू लागलो तर तो एक विनोदाचा विषय होईल. पण मॉस्को आणि लेनिनग्राड यांना जोडणारे अनेक रेल्वेमार्ग आणि त्यांच्या निरनिराळ्या दिशा लक्षात घेऊन चटकन ओळखण्याच्या दृष्टीने कदाचित तेथे अशी सोय केलेली असावी.

मॉस्कोचे पहिले दर्शन छाप पाडणारे वाटले. स्टेशनमध्ये शुकशुकाट होता. स्टेशनबाहेर चक्क ऊन पडले होते. हवा प्रसन्न होती. पुरेशा टॅक्सी नसल्यामुळे पायऱ्यांवर पंधरावीस मिनिटे सर्वजण उभे होते. रस्त्यावर विशेष वर्दळ नव्हती. जाणारायेणारा आमच्याकडे बघून तोंडातल्या तोंडात पुटपुटत पुढे निघून जाई. क्वचित एखादी धीट आसामी ' इंडिया ', ' इंडिया ' असे हसून म्हणे आणि चालायला लागे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८५७२ वि:
क्रमांक ३५४ नों. दि. २१।६।८५

मॉस्को

## मस्कवा नदीच्या काठी

हॉटेल युक्रेनिया म्हणजे एक छोटे गावच आहे. मॉस्कोच्या मध्यभागी मस्कवा नदीच्या काठावर बांधलेल्या या अठ्ठावीस मजल्यांच्या हॉटेलची भव्यता आणि उंची भोवतालच्या इतर इमारतींत उठून दिसते. हे हॉटेल अलीकडेच बांधून पूर्ण झाले आहे. मुख्यतः आशिया आणि आफ्रिका खंडांतील प्रवाश्यांची तेथे सोय केली जाते. युरोप किंवा अमेरिकेचे प्रवासी इतर हॉटेलमध्ये उतरतात. हॉटेल युक्रेनियामधे एकाच वेळीं पंधराशे प्रवाश्यांना राहता येईल एवढी सोय केलेली आहे. हॉटेलच्या पुढे सुंदर उद्यान आणि त्याच्या लगत नदीचा किनारा असल्यामुळे तो एकंदर सर्व परिसर आकर्षक बनला आहे.

हॉटेलमधे प्रवेश केल्याबरोबर पहिल्याच मजल्यावर एक भव्य हॉल असून त्याच्या दोन्ही बाजूला वरच्या मजल्यावर जाण्यासाठी लिफ्टस् आहेत. हॉलच्या समोरच्या बाजूला छोटेसे कँटीन, पोस्ट ऑफीस, वर्तमानपत्रांचा स्टॉल, आणि प्रवाश्यांना माहिती देणारे केंद्र अशी सोय केलेली आहे. एका बाजूला पुस्तक-विक्रीचे आणि भेटीदाखल द्यावयाच्या वस्तूंचे दुकान थाटलेले आहे. मधल्या हॉलमध्ये उभे राहून सभोवती नजर टाकल्याबरोबर तेथे जमलेल्या प्रवाश्यांत अफ्रिकेतील प्रवाश्यांची संख्या अधिक असल्याचे लक्षात येते. काही भारतीय प्रवासीही तेथे आढळले. त्यांत दोन तीन व्यापारी आणि काही तंत्रज्ञ होते. हिंदी इंजिनिअरांचे एक शिष्टमंडळ वाटाघाटी करण्यासाठी त्यावेळी आलेले होते. संन्याशाच्या वेशात असलेल्या एका स्वामी महाराजांनी सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. काही खादीधारी खासदार आणि त्यांच्या भेटीला आलेले मॉस्कोतील दोन तीन हिंदी विद्यार्थी हॉलच्या एका कोपऱ्यात बोलत बसलेले दिसले.

## बावीसाव्या मजल्यावर

हॉटेलच्या बावीसाव्या मजल्यावर मला जागा मिळाली होती. खोलीत टेलिफोन आणि रेडिओ होता. इतर फर्निचर मात्र हॉटेलच्या भव्यतेच्या मानाने फार तोटके वाटत होते. रेडिओवर मॉस्को रेडिओ स्टेशन कायमचे लावून ठेवलेले होते. त्यात दुसरे स्टेशन लावण्याची सोय नव्हती. बावीसाव्या मजल्यावरून शहराचे दृश्य मात्र

अतिशय सुंदर दिसत होते. परराष्ट्र खात्याची कचेरी आणि मॉस्को विद्यापीठ सोडल्यास हॉटेल युक्रेनियाएवढी उंच आणि भव्य इमारत मॉस्कोत नाही.

या हॉटेलमध्ये एक दिवसाचे फक्त राहण्याचे भाडे शंभर रुबल्स ( सुमारे ८० रुपये ) आहे. त्यात न्याहारीचा समावेश होतो. राहणे व जेवण यांचा मिळून रोजचा खर्च एकशेपंचवीस रुबल्स ( सुमारे शंभर रुपये ) आहे. त्याशिवाय परदेशी प्रवाश्याला टॅक्सी व गाईडची आवश्यकता असते. टॅक्सी व गाईड यांचा दर तासाचा दर ३३ रुबल्स ( सुमारे २६ रुपये ).

मॉस्कोतील कार्यक्रम दुभाषाने अगोदरच ठरवून ठेवला होता. क्रेमलीन, शेती आणि औद्योगिक प्रगती दाखविणारे प्रदर्शन, मॉस्को विद्यापीठ, भुयारी रेल्वे, बोलशॉय थिएटरचा एक नाट्यप्रयोग, गॉर्की स्ट्रीट, 'गम' स्टोअर, उपनगरातील नवी घरे, स्टेडियम इत्यादि, इत्यादि. या कार्यक्रमाच्या यादीत अर्थातच त्याने क्रेमलिनचा क्रम पहिला लावला होता. आम्हांलाहि क्रेमलिन पाहण्याची अधिक उत्सुकता होती. क्रेमलिन, लाल चौक, लेनिन-स्टालिनची समाधी, ही नावे अनेकदा ऐकलेली, वाचलेली असल्यामुळे त्यांच्यासंबंधी मनात कमालीचे कुतूहल होते. न्याहारी झाल्याबरोबर आमचा काफिला क्रेमलिनच्या दिशेने निघाला.

## लाल चौक

क्रेमलिनच्या बाहेर तटाला लागूनच एक विस्तीर्ण मैदान आहे. त्याला 'रेड स्क्वॉयर' किंवा लाल चौक असे म्हणत असले तरी, तो लालही नाही आणि चौकही नाही. 'रेड' याचा अर्थ सुंदर. झारच्या काळात शहराचा तो भाग अतिशय सुंदर समजला जात असे. तेच नाव अद्यापही लोकप्रिय आहे. क्रांतिकारकांच्या रक्ताने ती भूमी लाल झाली आणि म्हणून त्याला लाल चौक असे नाव पडले असावे अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण ती सपशेल चुकीची आहे. तसेच त्या भागाला चौकासारखाही आकार नाही. एक लांबट चौकोनासारखे पसरलेले मैदान येवढेच त्याचे वर्णन करता येईल. हिंदुस्थानातील जुन्या क्षेत्रांचे रस्ते काळ्या दगडांच्या फरशीचे बांधलेले असतात, तशा प्रकारचीच पक्की फरशी या चौकात घातलेली आहे. अर्थात दगडांऐवजी लाल रंगाच्या मोठमोठ्या विटा बसविलेल्या आहेत.

लाल चौकाला मुळात राजकीय अर्थ नसला तरी अलीकडे मात्र त्याला राजकीय तीर्थक्षेत्राचे स्थान प्राप्त झाले आहे. रशियन जनतेच्या श्रद्धेचे आणि आदराचे ते स्थान बनलेले आहे. याच चौकात क्रेमलिनच्या तटाला लागून लेनिनची समाधी बांधलेली आहे. काहीशा भूमिगत खोल दालनाप्रमाणे असलेल्या या समाधीच्या वर एक विस्तीर्ण गच्ची आहे. क्रांतीदिन, मे दिन किंवा अशाच राष्ट्रीय महोत्सवाचे वेळी रशियन नेते या गच्चीवर उभे राहून, लाल चौकातून जाणाऱ्या सैन्याची सलामी

घेतात. समाधीच्या आतल्या गाभाऱ्यात लेनिनचे शव एका मोठ्या हवाबंद पेटीत ठेवलेले आहे. त्याच्याच शेजारी दुसऱ्या पेटीत स्टालिनचे शव आहे. ( अलीकडेच ते शव तेथून अचानकपणे कोठेतरी अज्ञात स्थळी नेले आहे. ) लेनिन-स्टालिनच्या समाधींचे दर्शन घेण्यासाठी लाल चौकात दररोज दहा ते पंधरा हजार लोक जात असावेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत लेनिनभक्तांची एक मोठी रांग लागलेली असते. समाधी पुढच्या रस्त्यांवरून वाहनांची वर्दळ काहीशी मर्यादित केलेली असावी. पण पायी फिरणारे लोक, मुलांचे घोळके आणि कबुतरांच्या झुंडी या सर्वांमुळे तो रस्ता सतत गजबजलेला असतो. समाधीची गच्ची आणि क्रेमलिनचा तट यांच्या दरम्यान असलेल्या लांबलचक पट्ट्यात स्वरदेलॉव्ह आणि इतर कांही प्रमुख रशियन नेत्यांचीही छोटी मोठी थडगी दिसतात. लाल चौकातील गर्दीत मधेच कोठे तरी एखादा चित्रकार आणि छायाचित्रकारही दिसतो.

लाल चौकाच्या दक्षिणेला एक प्रचंड चर्च आहे. सेंट बेसिल चर्च या नावाने ते ओळखले जाते. त्याच्या गोल घुमटाची रचना आणि रंग आकर्षक वाटतात. मधल्या मुख्य घुमटाखेरीज भोवताली आणखी नऊ लहान वर्तुळाकार घुमटे बांधलेली आहेत. घुमटांचे विविध रंग आणि त्यांवरील चकचकीत सोनेरी कळस आकाशाच्या पार्श्व-भूमीवर लक्ष वेधून घेतात. सोळाव्या शतकात हे चर्च बांधलेले आहे. आता चर्चच्या गाभाऱ्यात एक मोठे वस्तुसंग्रहालय आहे. चर्च बांधून पूर्ण झाल्याबरोबर त्यावेळच्या इव्हान बादशहाने ते बांधणाऱ्या शिल्पकाराचे डोळे काढले अशी कथा सांगण्यात येते. क्रेमलिनच्या आजवरच्या इतिहासाशी ही कथा सुसंगतच आहे.

## क्रेमलिन : मार्क्सवाद्यांचे तीर्थक्षेत्र

क्रेमलिनचा तट पश्चिमेच्या बाजूला जेथे संपतो तेथे उंच बुरुजांवर एक प्रचंड लाल तारा प्रज्वलित करून ठेवलेला आहे. स्टालिनच्या काळात क्रेमलिनमध्ये प्रवेश करण्याची परवानगी नसे. पण आता अगदी थोडा भाग वगळून कोठेही जाण्यास प्रतिबंध नाही. पूर्वी झारच्या काळात राजघराण्यातील स्त्रीपुरुषांची प्रार्थनास्थळे आता त्यावेळच्या सोन्या-चांदीच्या कलात्मक वस्तूंची प्रदर्शने बनलेली आहेत. मॉस्को-हून पिटर्सबर्गला ज्या घोडागाडीतून झार जात असे ती सोन्याची गाडी जशीच्या तशी एका विभागात ठेवली आहे. घोड्यांचे रत्नजडीत साजशृंगार आणि राजघराण्यातील स्त्रीपुरुषांची मौल्यवान् वस्त्रे व अलंकार तेथेच ठेवलेले आहेत. या चर्चच्या समोरच रशियाच्या पार्लमेंटची भव्य इमारत आणि तेथून काही अंतरावर क्रुश्चेव्हचे कार्यालय आहे. स्टालिनचे निवासस्थान आणि त्याची कचेरी एकत्रच असल्यामुळे त्या भागात जाण्यास पूर्वी पूर्ण बंदी असे. क्रेमलिनमध्ये एखाद्याला प्रवेश मिळाला तरी, स्टालिनच्या निवासस्थानाकडे जाण्याचा तो परवाना समजला जात नसे. त्यामुळे

एवढ्या मोठ्या किल्ल्यासारख्या प्रचंड इमारतीत जवळजवळ शुकशुकाट असे. आता मात्र परिस्थिती बदलली आहे आणि क्रेमलिनचे सर्व विभाग सकाळपासून संध्याकाळपर्यंत पाहावयाला येणाऱ्या शेकडो लोकांनी फुलून गेलेले दिसतात.

क्रेमलिनची मूळ कल्पना चौदाव्या शतकात एका इटालियन शिल्पकाराने सुचविली आणि इव्हानच्या काळात तिला मूर्त स्वरूप देण्याचा आरंभ झाला. हे बांधकाम दोन तीन शतके चालू होते. प्रत्येक झारला क्रेमलिनच्या सौंदर्यात आणि वैभवात भर टाकण्याची महत्त्वाकांक्षा असे. आणि त्या दृष्टीने प्रत्येक पिढी क्रेमलिनमधे काहीतरी नवे बांधकाम करीत असे. मस्कोव्हा नदीच्या तीरावर एका छोट्या टेकडीची जागा निवडण्यापासून त्याच्या प्रचंड भिंती आणि आतील राजवाडे बांधण्यापर्यंत इटली, फ्रान्स, जर्मनी इत्यादि देशांच्या वास्तुशास्त्रज्ञांनी आणि शिल्पकारांनी हातभार लावला आहे. त्यांच्या कलेचे आणि कल्पकतेचे चीज करण्यात झारनीही अहमहमिकेने भाग घेतला आणि त्यातून क्रेमलिनची भव्य वास्तू निर्माण झाली. गेली चाळीस वर्षे रशियाच्या सत्तेचे सर्वश्रेष्ठ केंद्र हेच ऐतिहासिक स्थळ आहे. केवळ रशियाच्या सत्तेचे स्थान नव्हे, तर जागतिक साम्यवादी चळवळींचे मुख्य पीठ हेच क्रेमलिन बनलेले आहे. मार्क्सवादाचे भाष्य याच क्रेमलिनमधील सत्ताधारी करीत असतात आणि त्याला अनुसरून जगातील अनेक राष्ट्रांच्या कम्युनिस्ट पक्षांच्या हालचाली होत असतात. या सर्व कारणांनी क्रेमलिन म्हणजे जागतिक राजकारणातील महान सत्तास्थान आणि मार्क्सवाद्यांचे तीर्थक्षेत्र मानले जाते.

याच क्रेमलीनमधून स्टालिनने सत्ता गाजविली, सतत तीस वर्षे रशियांतील वीस कोटी लोकांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवले. आणि देशोदेशींच्या कम्युनिस्ट पक्षांची सूत्रे हलविली. झारच्याही स्वप्नात आले नसेल एवढे प्रचंड राज्य मुठीत ठेवण्याची किमया स्टालिननें याच क्रेमलिन राजवाड्यामधून करून दाखविली.

## कर्तबगार क्रूर पुरुष

स्टालिनच्या राजवटीसंबंधी गेली पंचवीसतीस वर्षे अनुकूल आणि प्रतिकूल मजकूर एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाला आहे की तितका उल्लेख होण्याचे भाग्य फार थोड्या व्यक्तींना लाभले असेल. त्याची कारकीर्द काळीकुट्ट रंगविण्याचा रशियातील अलीकडील प्रयत्न योग्य आणि आवश्यक आहे की नाही हा प्रश्न बाजूला ठेवला तरी, त्या कारकीर्दीचे दोष पाश्चात्य विचारवंतांनी पूर्वीच दाखविले होते. त्यावेळी दोष दाखविणारे साम्राज्यसत्तेचे हस्तक आणि भांडवलशाहीचे प्रचारक मानले जात होते. त्यामुळे त्यांच्या विचारांना पक्षपाती समजून स्टालिनला ' पुरुषोत्तम ' मानण्याची एक पुरोगामी प्रथा पडलेली होती. वस्तुतः स्टालिनचे विचार आणि

आचार यांच्या अनुषंगाने प्रखर टीका करताना त्याच्या असामान्य कर्तृत्वाकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्याने अवघ्या पाव शतकात एका प्रचंड राष्ट्राची उभारणी करून जगाला आपल्या सामर्थ्याच्या जोरावर आव्हान दिले. जॉर्जियातील एका खेड्यात रस्त्यावर बसून पादत्राणे शिवणाऱ्या चांभाराच्या घरात अत्यंत दरिद्री अवस्थेत तो जन्मला आणि वाढला. माणूस केवढे विलक्षण कर्तृत्व करू शकतो याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून स्टालिनचा उल्लेख केला जाईल. इतके असामान्य कर्तृत्व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतील व्यक्तीकडून घडल्याचे जगात हिटलरसारखे एखादेच उदाहरण असेल. रशियन राज्यक्रांतीपूर्वी त्याने अनेक दहशतवादी कृत्ये करून क्रांतिकारक गटाचा दरारा वाढविला होता. विलक्षण संघटनाकुशल आणि प्रबळ इच्छाशक्तीचा कार्यकर्ता अशा दुहेरी नात्याने त्याचे सामर्थ्य लेनिनच्या नजरेस पडले. त्याने इ. स. १९१३ साली या तरुणाला हाताशी धरले आणि त्याच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या. सत्तेची अतिलालसा आणि स्वतःच्या सामर्थ्याविषयी अतिआत्मविश्वास या दोन गुणांमुळे स्टालिनची कर्तृत्वशक्ती सतत वाढत गेली. प्रत्यक्ष क्रांतीच्या वेळी लेनिनग्राडमधे तो नव्हता. पण त्यानंतर लगेच त्यानें लेनिनच्या विश्वासू सहकाऱ्यांत स्थान मिळविले आणि इ. स. १९२२ साली तो रशियन कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस बनला. त्याने अमानुषपणा आणि क्रूरता यांची परमावधी गाठली होती असे आता रशियातील सामान्य नागरीकही सांगत असतो. पण याच नागरिकांनी राज्यक्रांतीच्या आरंभाच्या काळात त्याच्या नेतृत्वाचा जयघोष केला होता. रशियाच्या विशिष्ट ऐतिहासिक पार्श्वभूमीवर त्याची भलीबुरी कृत्ये पचू शकली. राज्यक्रांतीच्या प्रेरणेने उफाळून उठलेल्या जनतेने स्टालिनच्या त्या कृत्यात आपल्या भावी प्रगतीची आशादायक चिन्हे पाहिली. झारच्या अत्याचारी आणि प्रतिगामी राजवटीच्या मगरमिठीतून मुक्त झालेल्या जनतेने स्टालिनची योजना आणि ध्येयदृष्टी आपल्या आकांक्षाशी जुळती करून घेतली आणि या सर्वांना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा आधार दिल्यामुळे त्याची सर्व कृत्ये योग्य आणि अपरिहार्य मानण्यात आली. त्यामुळेच एका महान ध्येयासाठी आपल्या क्रांतीचा जन्म झाला आहे, अशा भावनेने जी जनता लेनिनच्या मागे उभी राहिली तीच स्टालिनच्या कार्यासाठीही उत्साहाने तयार झाली.

पण क्रांतीच्या नवाळीचे पहिले पर्व संपले. यादवी आणि परकीय आक्रमण यांच्या भीतीतूनही देश बाहेर पडू लागला आणि मग सत्तास्पर्धेचे नवे पर्व सुरू झाले. त्या वेळी लेनिन निधन पावला होता. सत्तास्पर्धेला उघडउघड वैयक्तिक स्वरूप प्राप्त झाले. शेवटी स्पर्धेत ट्रॉटस्की आणि त्याचे सहकारी यांना नामोहरम करण्यात स्टालिन यशस्वी झाला. स्टालिनच्या कारकिर्दीची सुरुवात त्याच्या भावी यशाची नांदी ठरली. त्या पहिल्या फेरीत त्याने फड जिंकला आणि विरोधकांचा अत्यंत निर्दयपणे मुळासकट काटा काढला. पॉलिट ब्युरोतील सात सभासदांपैकी लेनिन व स्वतः स्टालिन वगळून

बाकीचे पाच सभासद म्हणजे ट्रॉटस्की, झिनोव्हिव्ह, कॉमेनेव्ह, बूबनॉव्ह, शोकोलनिकॉव्ह हे सर्व ठार झाले वा देशोधडीस लागले. शेवटी, स्टालिन हा एकटाच टिकला आणि त्याने आपले नवे सहकारी निवडले. हीच त्याच्या कर्तृत्वाची पहिली फेरी.

## मार्क्सची पोथी, सत्तेचा आसूड

प्राप्त तत्त्वज्ञान आणि रशियाची मागासलेली आर्थिक परिस्थिति यांचा मेळ घालण्याचा स्टालिनने प्रयत्न केला. ज्या तत्त्वज्ञानाचा अपरिहार्य परिणाम म्हणून औद्योगिकदृष्ट्या विकास पावलेल्या देशांत कामगारक्रांती होईल असा दावा होता ते तत्त्वज्ञान रशियासारख्या शेतीप्रधान देशात लागू करावयाचे होते. अर्थात त्यासाठी शेती आणि उद्योगधंदे यांचा अत्यंत जलद गतीने आणि फार मोठ्या प्रमाणावर विकास घडवून आणणे आवश्यक होते. ज्या देशात लोकशाहीच्या प्रथा नाहीत आणि जो देश झारसारख्या सरंजामदार बादशहाच्या राजवटीने पिचलेला होता अशा देशात हे सारे घडवून आणावयाचे होते. त्यामुळे एका हातात मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची पोथी आणि दुसऱ्या हातात हुकूमशाही सत्तेचा आसूड घेऊन स्टालिनने आपले धोरण पुढे रेटीत नेले. त्यात जे भरडले गेले त्यांच्याविषयी स्टालिनला क्षिती बाळगण्याची गरज वाटत नव्हती. कारण मार्क्सच्या तत्त्वाप्रमाणे साम्यवादाच्या ध्येयाच्या आड येणारी व्यक्ती प्रतिगामी ठरते. ती नष्ट होणे अपरिहार्य आहे. अपरिहार्यतेच्या जंजाळात एकदा गुरफटल्यानंतर त्यातून बाहेर पडणाऱ्या सर्व चीजांचे समर्थन करणेही अपरिहार्य होऊन बसते आणि मग हे चक्र कोठेही थांबू शकत नाही. ही परिस्थिती लक्षात घेतली म्हणजे स्टालिनवर टीका करताना त्याच्या वैयक्तिक गुणदोषांचा वाटा आणि 'मार्क्सवादी' अपरिहार्यतेचा वाटा या दोन्हींचा एकत्र विचार करावा लागेल.

मार्क्सवादाच्या अर्थाने आणि मार्क्सवादाच्याच मार्गाने रशियन राज्यक्रांती स्थिर करण्यात स्टालिनने भरघोस यश मिळविले. त्याने रशियाला सरंजामशाहीच्या अवस्थेतून औद्योगीकरणाच्या नव्या पातळींवर आणून बसविले. शस्त्रास्त्रनिर्मिती आणि सैन्यबळ वाढवून रशियाचे युद्धसामर्थ्य वाढविले. जगाला आव्हान देऊ शकेल एवढी रशियाची तयारी केली. पीटर बादशहानंतर स्टालिनएवढा कणखर, कल्पक आणि कर्तबगार शासनकर्ता रशियाला मिळाला नव्हता. पीटरने रशियाला आधुनिक युरोपच्या पातळीवर आणून बसविण्याची प्रतिज्ञा केली होती. रशियाला अनेक शतके आक्रमकांच्या हल्ल्यामुळे संघटित होता आले नाही. हा दुबळेपणा काढून टाकण्यासाठी पीटर बादशहा उभा ठाकला तेव्हा रशियन लोकांनी त्याने केलेले अनन्वित छळही सहन केले. स्टालिनने त्याच महत्त्वाकांक्षेला नव्या स्वरूपात आणि नव्या संदर्भात चालना दिली. साम्यवादी विचारांचा आधार मिळाल्यामुळे त्याच्या प्रत्येक कृतीला ध्येयवादाची झिलई देण्यात येत होती. रशियन जनतेला आवाहन करताना १९३१ मध्ये त्याने असे बोलून

दाखविले होते, "रशियाचा मागासलेपणा त्याच्या आजवरच्या परिस्थितीला कारणीभूत आहे. या मागासलेपणामुळेच रशियाचा इतिहास म्हणजे पराभवाचा इतिहास असे समीकरण होऊन बसले आहे. मोगल खानाने या भूमीवर आक्रमण केले. तुर्की बादशहाने तिच्यावर आपले वर्चस्व गाजविले. स्वीडिश सरंजामदारांनी अनेक वर्षे तिला पराभूत अवस्थेत ठेवले. पोलंड आणि लीथोनिया यांसारख्या छोट्या देशांनी तिची लांडगेतोड केली. इंग्लिश आणि फ्रेंच साम्राज्यवाद्यांनी तिचे आर्थिक शोषण केले; जपानसारख्या पूर्वेकडील छोट्या राष्ट्राने तिचा अपमानास्पद पराभव केला. या सर्व पराभवांचे आणि पारतंत्र्याचे कारण रशियाच्या मागासलेपणात आहे. लष्करी सामर्थ्यात, शासनयंत्रणेत, औद्योगिक प्रगतीत, शेती उत्पादनात आणि सांस्कृतिक क्षेत्रात पश्चिम युरोपच्या तुलनेने रशिया मागासलेला आहे. हा मागासलेपण नाहीसा करण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करीत आहोत." स्टालीनने हे सर्व प्रयत्न आपली संपूर्ण इच्छाशक्ती पणाला लावून आणि सर्व सूक्तासूक्त, योग्यअयोग्य आणि न्याय्य-अन्याय्य मार्ग स्वीकारून बहुतांशी सफल केले. 'रशियाला पुन्हा पराभव पत्करावयाचा नसेल तर त्याने आत्यंतिक छळ सोसूनही प्रगती केली पाहिजे,' हे स्टालिनचे आवाहन रशियन नागरिकाच्या अनेक वर्षांच्या पराभूत मनाला उभारणी आणणारे वाटले असावे. म्हणूनच, स्टालिनइतका क्रूर आणि जुलमी राज्यकर्ताही लोकांनी खपवून घेतला. स्टालिनच्या आवाहनात पीटर बादशहाने अडीचशे वर्षांपूर्वी केलेल्या आवाहनाची पुनरावृत्ती त्यांना आढळून आली असल्यास नवल नाहीं. रशियन जनतेने सतत तीस वर्षे स्टालिनचे अत्याचार कसे सहन केले, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. त्याचे उत्तर रशियाच्या मनःस्थितीत आणि परिस्थितीत आढळून येते. अर्थात या प्रश्नाचे हे संपूर्ण उत्तर नव्हे. संपूर्ण उत्तर शोधण्यासाठी मार्क्सवादाचाही शोध आणि बोध घेतला पाहिजे. क्रेमलीन राजवाड्याचा इतिहास, त्यात स्टालिनने गाजविलेली कारकीर्द आणि ती सोसणारा रशियन समाज यांच्या संदर्भात मार्क्सवादाचा विचार वगळता येत नाही.

## क्रुश्चेव्हची टीका

कुश्चेव्हने स्टालिनचा निषेध करताना त्याच्यावर जे अनेक आरोप केले आहेत त्यांतील एक मुख्य आरोप असा की, स्टालिनने मार्क्सवाद-लेनिनवादाची मूळ क्रांतिकारक भूमिका सोडली आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणे सत्तेचा वापर केला. याचा अर्थ असा की, मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांप्रमाणे स्टालिनची कारकीर्द नव्हती. तिची भूमिका काहीतरी निराळी, किंबहुना मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांशी विसंगत अशी होती. क्रुश्चेव्हचे हे विधान केवळ स्टालिनचाच नव्हे तर त्याच्या काळातील संपूर्ण रशियन राजवटीचा निषेध करणारे ठरते.

मार्क्सवाद रशियाच्या तात्त्विक आणि व्यावहारिक मार्गांचा ध्रुवतारा मानला जातो. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे, त्याने सांगितलेल्या क्रांतीच्या मार्गांचे आणि त्याने रेखाटलेल्या समाजाच्या प्रगतीचे चित्र याविषयी रशियन जनतेला विलक्षण आकर्षण वाटते. त्याच्या विचाराच्या प्रेरणेने रशियन राज्यक्रांती झाली आणि लेनिननें त्याच विचारांचा धागा उचलून रशियन समाजाची पुनर्घटना सुरू केली. स्टॅलिनने आर्थिक नियोजनाच्या मार्गाने पुढची प्रगती ठरवून टाकली. पण क्रुश्चेव्हच्या मते : स्टालिनने मार्क्स-लेनिन यांच्या विचारांचा मार्ग न अनुसरता आपल्या वैयक्तिक सत्तेचा बडेजाव निर्माण केला. वस्तुतः रशियात त्याच्या कारकीर्दीत जी प्रचंड प्रगती झाली तिचे श्रेय स्टालिनला देण्याची गरज नाही. जे काही घडले ते सर्व कम्युनिस्ट पक्षामुळे आणि त्या पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाने घडले. मूळ मार्क्सवाद आणि लेनिनवाद यांची भूमिका स्टालिनने सोडली नसती व तो सत्तापिपासू बनला नसता तर, रशियन जनतेला अनन्वित छळ सोसावा लागला नसता.

मार्क्सच्या विचारांचा अर्थ लावण्याची क्रुश्चेव्हची ही पद्धती रशियाच्या संदर्भात नवीन नाही. लेनिनने जे विचार मांडले ते सर्व मार्क्सवादाच्या आधारावरच. स्टालिनही मार्क्सवादाचाच आधार घेऊन आपण रशियाची प्रगती करीत आहोत, असे म्हणत असे. आणि आता क्रुश्चेव्हही त्याच मार्क्सवादी विचारसरणीचा आधार घेऊन स्टालिनची कारकीर्द निषेधार्ह होती असे सांगत आहे. शंभर वर्षांपूर्वी मार्क्सने कम्युनिस्ट जाहीरनामा प्रसिद्ध केला. मध्यंतरीच्या कालखंडात जगात प्रचंड औद्योगिक क्रांती झाली. तांत्रिक आणि शास्त्रीय संशोधनात उच्चांक गाठले. त्याचा परिणाम आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रावर घडून आला. पहिल्या महायुद्धानंतर तर मी मी म्हणणाऱ्या साम्राज्यशाहीचे विघटन सुरू झाले. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका या खंडांतील अनेक देश आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात यशस्वी झाले. त्यांना स्वातंत्र्य मिळाले. पण हे सर्व मार्क्सवादाचा अर्थ लावताना लक्षात घेतले नाही तर ते एक प्रकारचे सनातनीपणाचे लक्षणच ठरते. स्टालिन मार्क्सवादाप्रमाणेच राज्य करीत होता आणि क्रुश्चेव्हही त्या मार्क्सवादी विचाराला आपले मार्गदर्शक तत्त्व मानीत आहे. मार्क्स थोर तत्त्वज्ञ होता. पण अत्यंत मोठ्या तत्त्वज्ञाच्या विचारालाही कालाच्या मर्यादा पडतात. त्या मर्यादांचे आकलन न करून घेतले तर अंधःश्रद्धेला वाव मिळतो. स्टालिनचा निषेध करण्यासाठी क्रुश्चेव्ह मार्क्सवादाचा उपयोग करतो, तेव्हा त्याचा हेतू स्टालिनच्या निषेधाने आपली सत्ता दृढ करण्याचा असतो की मार्क्सवादाविषयी आत्यंतिक श्रद्धेचा असतो ?

स्टालिनचे दोष आणि उणीवा दाखवून त्याची सर्व कृत्ये मार्क्सवादाच्या विरोधी होती, अशा नकारात्मक भूमिकेतून क्रुश्चेव्हने आपला मार्क्सवाद निवेदन केला आहे आणि असे करीत असताना, आपण सांगतो तोच खरा मार्क्सवाद, ही भूमिकाही त्याने

आग्रहाने मांडली.

## तरीही मार्क्सवादच ?

मार्क्सवादाची सर्वांगीण चिकित्सा या ठिकाणी करणे शक्य नाही. पण मार्क्सच्या मूळ गृहीत तत्त्वांतील दोषांचा उल्लेख केला तरी तो रशियाच्या संदर्भात पुरेसा होईल. मार्क्सने सर्व प्रकारच्या ऐतिहासिक घटनांना वर्गीय लक्षणेचे स्वरूप देऊन इतर अनेक घटनांकडे दुर्लक्ष केले. शोषण होणाऱ्या समाजातील सर्व वर्गांचे प्रतिनिधित्व फक्त कामगारवर्गच करतो हे त्याचे दुसरे सूत्रही सामाजिक जीवनातील इतर वर्गांकडे दुर्लक्ष करणारे आहे. तिसरी गोष्ट म्हणजे, राष्ट्रवादाच्या सामर्थ्याच्या जाणिवेचा अभाव. राष्ट्रवादाची पकड मनुष्याच्या मनावर अत्यंत प्रबळ असते. पण ती कमी लेखून समाजाची विभागणी त्याने परस्परविरोधी अशा दोन वर्गांत केली. या दोन वर्गांचे परस्परविरोधी हितसंबंध क्रांतीनंतर नाहीसे होतील व सर्व समाज वर्गमुक्त होईल असे मार्क्सने भाकीत केले. त्याच्या कल्पनेप्रमाणे उद्योगधंद्यांची विशिष्ट अवस्थेपर्यंत प्रगती झाली की, भांडवलदारी राष्ट्रांना आपला माल खपविण्यास वसाहती मिळविण्यासाठी स्पर्धा करावी लागेल. अशा वेळीं भांडवलदारी राष्ट्रे एकमेकाविरुद्ध उभी राहून युद्धासारख्या आपत्तीत नष्ट होतील व मग राष्ट्राच्या कृत्रिम भिंती कोसळून सर्व जग राष्ट्रवादाच्या कल्पनेतून मुक्त होईल. राष्ट्रांचे परस्परविरोध नाहीसे होतील. साम्राज्यवादी राष्ट्रांकडून पिळल्या जाणाऱ्या निरनिराळ्या राष्ट्रांचे हितसंबंध एक होतील व ती सहकार्याने राहू लागतील. मार्क्सच्या या विचाराचे समर्थन लेनिनने केले, स्टालिनने केले आणि आता क्रुश्चेव्हही करीत आहे. पण राष्ट्रवादाची पकड जबरदस्त आहे. आफ्रिकेतील मागासलेली राष्ट्रे देखील आपली वैशिष्ट्ये वेगळेपणाने कायम राखू इच्छितात. मार्क्सवादाची दीक्षा घेतलेल्या राष्ट्रांनाही आपला राष्ट्रवाद सोडता आलेला नाही. पोलंड, पूर्व जर्मनी आणि हंगेरी या देशांतील उठाव राष्ट्रवादाच्या कल्पनेतून झाले होते हे कदाचित मार्क्सवाद्यांना मान्य होणार नाही; पण युगोस्लाव्हियाने रशियाविरुद्ध पुकारलेले बंड आणि अगदी अलीकडे अल्बानियासारख्या कम्युनिस्ट राजवट असलेल्या छोट्याशा देशाने रशियाविरुद्ध घेतलेली भूमिका काय दर्शविते ? मार्क्सवाद मान्य केलेल्या राष्ट्रांच्या भिंतीदेखील कोसळू शकत नाहीत.

जगातील सर्व कामगार राष्ट्रवादी भावना विसरून एक होतील, ही मार्क्सची कल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भाबडी ठरली. जर्मन कामगारांनी प्रथम ब्रिटिश आणि फ्रेंच कामगारांविरुद्ध युद्धे पुकारली आणि नंतर रशियन कामगारांशीही युद्ध केले, मार्क्सचा असा एक सिद्धान्त होता की भांडवलदारीच्या वाढीबरोबर कामगारांचे दारिद्र्यही वाढू लागेल आणि मग वर्गीय संघर्ष वाढून कामगारक्रांती होईल. अशी क्रांती अर्थातच औद्योगिकदृष्ट्या विकास झालेल्या देशांत घडेल. कारण त्या

देशांतच कारखानदारी आणि कामगार यांचे प्रमाण वाढलेले असेल. पण प्रत्यक्ष मात्र तसे घडले नाही. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इत्यादि औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशांत क्रांती झाली नाही. कारखानदारीबरोबर कामगारांचे जीवनमानही त्या देशांत वाढत गेले. आर्थिकदृष्ट्या कामगार अधिक सुखी झाला. कल्याणकारी राज्याच्या अनेक सोयी आणि सवलती यांचा लाभ त्यांना मिळत गेला. क्रांतीची धार बोथट बनली.

प्रत्यक्ष क्रांती घडली ती रशियासारख्या औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या देशात. क्रांतीच्या वेळीं रशिया उद्योगधंद्यांच्या दृष्टीने मागासलेला होता. तेथे शेतीचा विकासही विशेष झालेला नव्हता. अशा स्थितीत तेथे क्रांती झाली आणि मार्क्सचे भाकीत चुकीचे ठरले. गेल्या चाळीस वर्षांतील जागतिक घटनांचा आढावा घेतला तरी हीच गोष्ट प्रामुख्याने दिसून येते. आशियासारख्या मागासलेल्या खंडात कम्युनिझमचा प्रसार होत आहे आणि पश्चिम युरोपातील ‘ भांडवलदारी ’ देशांतील कामगार मात्र मार्क्सवादाची दीक्षा घेण्यास तयार नाही.

## जे पेरले तेच उगवले

रशियात क्रांतीनंतर घडलेल्या सर्व अनिष्ट घटनांची जबाबदारी स्टालिनच्या माथी मारून क्रुश्चेव्ह व त्याचे सहकारी मोकळे होतात. पण मार्क्सवादाची परिणती त्यापेक्षा निराळी कशी झाली असती हे मात्र ते सांगत नाहीत. मार्क्सवादाने केवळ आर्थिक विकासाचाच मार्ग सांगितला नाही. त्याबरोबर एक नीतितत्त्वही सांगून ठेवले. कोणतेही साध्य मार्क्सवादाच्या ध्येयाप्रमाणे साधावयाचे असेल तर, त्यासाठी कशा प्रकारची साधने वापरावयाची याचा विधिनिषेध बाळगण्याची गरज नाही, असे मार्क्सनेच सांगून ठेवले आहे. ‘चांगल्या’ साध्यासाठी कोणतेही साधन वापरले तरी ते समर्थनीय ठरते, असे एकदा गृहीत धरल्यावर स्टालिनने जे अत्याचार केले, जी हिंसा केली ती सर्व समर्थनीय मानलीच पाहिजे. कारण त्याने ही सर्व साधने कम्युनिझमच्या साध्यासाठीच उपयोगात आणली. म्हणूनच रशियात ज्या काही विपरीत घटना घडल्या असे क्रुश्चेव्ह सांगतो, त्याची पाळेमुळे मार्क्सच्या तत्त्वज्ञानातच रुजलेली होती आणि ते तत्त्वज्ञान जोपर्यंत तशाच स्वरूपात प्रत्यक्षात आणण्याचा आग्रह धरला जाईल तोपर्यंत त्याची परिणती स्टालिनने केलेल्या कृत्यांपेक्षा निराळी कशी होईल ?

कम्युनिझमचा प्रयोग करताना फक्त एकच एक राजकीय पक्ष—कम्युनिस्ट पक्ष—अस्तित्वात असावा आणि त्याच्याच हाती समाजाच्या सर्व क्षेत्रांची सूत्रे दिली जावीत; कामगार–क्रांतीचे आणि क्रांतीनंतरचे सर्व धोरण याच पक्षाने ठरवावे, असा मार्क्सने स्पष्ट आदेश दिला आहे. तीच भूमिका स्वीकारून मार्क्सचे अनुयायी क्रांती झाल्या-बरोबर आपल्या देशातून सर्व विरोधकांची हकालपट्टी करतात. स्टालिनने याच तत्त्वाप्रमाणे प्रचंड निःपात घडवून आणले व त्याचे समर्थनही मार्क्सच्याच तत्त्वानुसार

केले. त्याची नैतिक बैठक मार्क्सवादातच तयार करून ठेवलेली आहे. 'पक्षाचा शत्रू तो कामगारांचा शत्रू आणि तोच सर्व जनतेचा शत्रू' असे समीकरण मार्क्सच्या विचारातच मांडून ठेवलेले आहे; त्याचीच प्रत्यक्ष आवृत्ती स्टालिनने काढली. इतर कम्युनिस्ट देशांतही त्याच धर्तीवर प्रकार घडले. क्रुश्चेव्हनेही आपल्या सर्व सहकाऱ्यांना सार्वजनिक जीवनातून नष्ट करण्यासाठी याच समीकरणाचा उपयोग केला. मार्क्सवादाला जे अभिप्रेत होते तेच झाले.

या ठिकाणी मार्क्सवादाची चिकित्सा करताना व्यक्तिशः मार्क्सच्या जीवनावर टीका करण्याचा दोष येऊ नये. मार्क्सने जे तत्त्वज्ञान मांडले ते दलित आणि श्रमजीवी लोकांच्या व्यापक सहानुभूतीतून आणि मानवतेच्या भूमिकेवरून मांडले. त्याच्या हेतूविषयी यत्किंचितही शंका घेण्याचे कारण नाही. महान तपस्व्याप्रमाणे वर्षानुवर्षे चिंतनात आयुष्य व्यतीत करून एका तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या मार्क्सच्या आयुष्याला स्वार्थाचा लवलेशही नव्हता. पण त्याचा हेतू कितीही उदात्त असला तरी त्याच्या विचारांची परिणती, त्याची इच्छा असो वा नसो, विपरीत झाली. म्हणून ज्यावेळी स्टालिनच्या कारकीर्दीची चीरफाड केली जाते तेव्हा तेथेच थांबूत चालत नाही. त्याने पत्करलेल्या विचाराचे बीज मार्क्सवादात शोधावे लागते.

## भविष्य चुकले

मार्क्सने ऐतिहासिक घटनांची एक परंपरा सांगितली. यापूर्वीचा इतिहास तसाच घडला आणि त्यांचा अपरिहार्य परिणाम म्हणून पुढच्या घटना घडतील, असे त्याने प्रतिपादन केले. त्याच्या मते, सरंजामशाहीत जमीनमालक आणि भूदास, भांडवलशाहीत कारखानदार आणि मजूर अशा क्रमाने संघर्ष घडतील आणि शेवटी कामगारांची क्रांती होऊन एक नवा समाज निर्माण होईल. भांडवलशाहीचे अवशेष नष्ट करण्यासाठी कामगारांची हुकूमशाही काही काळ सत्तेवर राहील आणि त्यानंतर समाज साम्यवादाच्या दिशेने जाऊ लागला म्हणजे शासनसंस्थेची गरज उरणार नाही, ती हळूहळू विरून जाईल. जगात साम्यवादी जीवन निर्माण होण्यासाठी वरील सर्व घटना इतिहासक्रमाने घडणे अपरिहार्य आहे. स्टालिनने कामगार-हुकूमशाहीच्या सर्वश्रेष्ठ सत्ताधाऱ्याची भूमिका स्वतःकडे घेतली आणि मार्क्सने प्रतिपादन केलेल्या घटनांचा क्रम सुरू झाला आहे, असे जनतेला आश्वासन दिले. वर्तमानकालापेक्षा भविष्यावर अधिक भर देऊन त्याने रशियन जनतेला सुखी जीवनाची आशा दाखविली. त्यामुळे लोकांच्या अपेक्षा उंचावल्या. पुढच्या सुखासाठी आता क्लेश सोसलेच पाहिजेत अशा समजुतीने लोकांनी स्टालिनच्या कार्यक्रमाला आरंभी तरी स्वयंस्फूर्तपणे पाठिंबा दिला. शासनसंस्था विरून जाण्याची आशाळभूतपणे वाट पाहणाऱ्या लोकांची मात्र दिवसेंदिवस निराशा होत गेली. कारण शासनसंस्था विरून जाण्याऐवजी स्टालिनच्या

हातात ती अधिकाधिक केंद्रित होऊ लागली आणि एकदा तिची पकड घट्ट झाल्यावर त्यातून बाहेर पडणे अशक्य होऊन बसले.

## एकपक्षीय कारभार

रशियात कम्युनिस्ट पक्ष आणि प्रशासन ही समान अर्थीच आहेत. तेथे दुसरा राजकीय पक्ष अस्तित्वात नाही; अस्तित्वात येऊ शकत नाही. रशियाच्या राज्यघटनेतच तशी तरतूद केली आहे. सर्व समाजाचा कर्ता आणि हर्ता हा एकच पक्ष आहे. मित्र, मार्गदर्शक, पालक आणि तत्त्वज्ञ अशा सर्व भूमिका एकच पक्ष पार पाडीत असतो. आणि ही एकपक्षीय राजवट सतत पंचेचाळीस वर्षे चालू आहे. क्रांतीपूर्वकाळात पार्लमेंटरी पद्धतीची जुजबी राज्यव्यवस्था रशियात दहा बारा वर्षे अस्तित्वात होती. तो काळही क्रांतिकारक उठावाने, आंदोलनाने आणि युद्धाने गजबजून गेलेला असल्यामुळे रशियन जनतेला राजकीय क्षेत्रात पक्षपद्धती जवळ जवळ परिचित नाहीच असे म्हटले तरी चालेल.

झारच्या काळात त्याचा एकतंत्री कारभार चालत असे. आणि क्रांतीनंतरच्या काळात कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्याचा एकतंत्री कारभार चालू झाला. या दोन्ही राजवटीत महदंतर आहे. दोन्ही शासनव्यवस्थांची ध्येये आणि धोरणे वेगवेगळी आहेत. पण एकतंत्री शासनपद्धतीच्या दृष्टीने त्या दोन्हींमध्ये फार मोठे साम्य आहे. स्टालिनने इ. स. १९२२ साली कम्युनिस्ट पक्षाच्या चिटणीसपदाची सूत्रे हाती घेतली आणि सतत तीस वर्षे ती तशीच आपल्या मुठीत घट्ट पकडून ठेवली. त्याच्या निधनामुळेच पक्षाच्या अधिकारपदात बदल झाला. सतत तीस वर्षे एकाच व्यक्तीची प्रदीर्घ राजवट ऐतिहासिक काळातील राजसत्तेप्रमाणे निरंकुशपणे चालू राहिली.

## शेवटी एकच नेता

रशियाच्या राज्यघटनेप्रमाणे कम्युनिस्ट पक्ष संपूर्ण सत्तेचा एकमेव सूत्रधार आहे. देशात दुसरा पक्ष नाही. मार्क्सने प्रतिपादन केलेल्या विचारपद्धतीचा तो एक परिपाक आहे. क्रांतीनंतर कामगार हुकूमशाही अस्तित्वात येईल आणि तिची सूत्रे कम्युनिस्ट पक्षाच्या हाती राहतील; शासनसंस्था विरघळून जाईपर्यंत याच पक्षाने सत्तेचे आणि समाजाचे मार्गदर्शन केले पाहिजे, अशी कार्यपद्धती मार्क्सने आपल्या ग्रंथात आखून दिली आहे. लेनिनने तीच कार्यपद्धती अमलात आणली आणि क्रांतीनंतर प्रथम सर्व विरोधी पक्षांचे उच्चाटन केले. स्टालिनने त्याच्यापुढे पाऊल टाकून आपल्या पक्षातीलच सर्व विरोधक नष्ट केले. अशा प्रकारे बहुपक्षाकडून एकपक्षाकडे

आणि एकपक्षाकडून एकनेत्याकडे शासनसंस्थेचा प्रवास झाला. या प्रवासात विरोध करणारे, मतभेद व्यक्त करणारे, टीका करणारे नष्ट झाले, नष्ट करण्यात आले.

## लुटुपुटूची निवडणूक

रशियात एकच एक पक्ष सर्वंकष सत्ताधारी असल्यामुळे त्याच्याकडून मिळणारा आदेश हाच शासनसंस्थेच्या कारभाराचा मार्ग ठरतो. 'पक्ष हा शरीराचे नियंत्रण करणारा, त्याला पुढचा मार्ग दाखविणारा मेंदू आणि शासनसंस्था शरीर,' अशी या संदर्भात तुलना केली जाते. तत्त्वतः स्थानिक सोव्हिएटकडून कारभार चालविण्यात येतो. स्थानिक सोव्हिएट प्रत्येक खेड्यात, सामुदायिक शेतीत, कारखान्यात आणि शहरात स्थापन झालेले आहेत. त्यांना आपल्या भागातील,कारखान्यातील किंवा सामुदायिक शेतावरील कामगार व शेतकरी यांचे प्रतिनिधी मानले जाते. सोव्हिएटचे सभासद प्रत्यक्ष आणि गुप्त मतदानपद्धतीने निवडलेले असतात. अठरा वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला सोव्हिएटच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे. अशा प्रकारे निवडलेल्या सर्व सोव्हिएटच्या प्रतिनिधींची संख्या पंधरा लक्षांपेक्षा अधिक आहे. त्यांच्या निवडणुकीच्या वेळी शासनसंस्थेच्या धोरणाचा प्रचार केला जातो. त्यामुळे एका अर्थाने त्यांचे धोरण शासनसंस्थेच्या सर्वोच्च सूत्रधारांनी अगोदरच ठरवून ठेवलेले असते. निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांप्रमाणे इतर नागरीकही उभे राहू शकतात. पण सर्वच उमेदवारांची निवड स्थानिक कम्युनिस्ट पक्षाकडून केली जाते. दुसरा पक्षच अस्तित्वात नसल्यामुळे याच पक्षाने पुरस्कार केलेल्या उमेदवारांपैकी कोणाची तरी निवड नागरिकांना करावी लागते. विरोधी पक्ष, त्याचे निराळे धोरण, शासनसंस्थेच्या चुकांची किंवा दोषांची नागरिकांना माहिती देणे इत्यादि काहीही प्रकार नसल्यामुळे निवडणुकीच्या प्रचारात विरोध दिसलाच तर तो स्थानिक कामकाजापुरता आणि काही व्यक्तींच्या गुणदोषांपुरताच दिसून येतो. थोडक्यात, मूलभूत धोरण वरचे सत्ताधारी निश्चित करतात आणि त्या धोरणाच्या अंमलबजावणी बद्दल काही किरकोळ मतभेद असल्यास त्यांना सोव्हिएटच्या निवडणुकीच्या वेळी स्थान मिळते. खेडे, शहर, जिल्हा, प्रांत आणि राज्य अशा चढत्या क्रमाने सोव्हिएट प्रत्यक्ष मतदानाने निवडले जाते. शासकीयदृष्ट्या सर्वांत पहिली पायरी स्थानिक सोव्हिएट आणि सर्वांत शेवटची पायरी सुप्रीम सोव्हिएट.

## सुप्रीम सोव्हिएट

देशाचे कायदे बनविणारी सर्वोच्च विधानसभा म्हणजेच सुप्रीम सोव्हिएट. आपल्या देशातील संसदेशी तिची तुलना करता येईल. सुप्रीम सोव्हिएटच्या सभासदांची

मुदत चार वर्षांची असते. सुप्रीम सोव्हिएटची वर्षांतून दोन अधिवेशने व्हावीत अशी घटनेत तरतूद आहे. साधारणतः एक आठवडा हे अधिवेशन चालते आणि त्यात मंत्रिमंडळ आपल्या कार्यांचा अहवाल सांगून पुढच्या कार्यक्रमाची रूपरेषा निवेदन करते. नंतर त्यावर सभागृहात चर्चा होते.

सुप्रीम सोव्हिएटची दोन सभागृहे आहेत. त्यांचा दर्जा समान मानला जातो. सोव्हिएट ऑफ दि युनियन ( लोकसभेशी सदृश असलेली संस्था ) आणि सोव्हिएट ऑफ दि नॅशनॅलिटी (राज्यसभेशी सदृश असलेली संस्था). सोव्हिएट ऑफ दि युनियन या विधानसभेचे सर्व प्रतिनिधी प्रत्यक्ष मतदानाने निवडले जातात. तीन लक्ष लोकांमागे एक प्रतिनिधी असे त्यांचे प्रमाण असते. सोव्हिएट ऑफ दि नॅशनॅलिटी या सभागृहात निरनिराळ्या राष्ट्रीय हितसंबंधांना प्रतिनिधित्व दिले जाते. प्रत्येक घटक राज्याकडून २५ प्रतिनिधी, प्रत्येक स्वायत्त राज्याचे अकरा प्रतिनिधी, प्रत्येक स्वायत्त प्रदेशाचे पाच प्रतिनिधी आणि प्रत्येक राष्ट्रीय विभागाचा एक प्रतिनिधी अशा सर्व प्रतिनिधींची मिळून सोव्हिएट ऑफ दि नॅशनॅलिटी किंवा राज्यसभा बनलेली असते.

घटनेप्रमाणे सुप्रीम सोव्हिएटच्या निवडणुकीसाठी एकवीस वर्षांवरील कोणीही नागरिक उभा राहू शकतो. अर्थात प्रत्यक्षात तसा कोणीही उभा राहू शकत नाही. कम्युनिस्ट पक्षाने निवडलेला उमेदवारच उभा राहू शकतो. आपला प्रतिनिधी अयोग्य वर्तन करीत आहे असे एखाद्या मतदारसंघाला वाटले तर त्या प्रतिनिधीला परत बोलावण्याची तरतूद घटनेत केलेली आहे. सध्याच्या सुप्रीम सोव्हिएटमध्ये १३४७ सभासद आहेत. त्यांपैकी ७०८ सभासद सोव्हिएट ऑफ दि युनियनचे सभासद असून ६३९ सोव्हिएट ऑफ दि नॅशनॅलिटीचे सभासद आहेत. या सर्व सभासदांपैकी सुमारे पंचवीस टक्के महिला आहेत. या सभासदांना वेतन दिले जात नाही. पण दर महिन्याला एक हजार रुबल्स ( सुमारे ८०० रुपये) भत्ता मिळतो. त्याशिवाय सभागृह चालू असेल तेव्हा जादा भत्ता दिला जातो. प्रतिनिधी आपापल्या भागातील अहवाल सभागृहाला सांगतात.

## एकाच साचाचे अहवाल

स्टालिनच्या काळात अशा अहवालांचे देखील एक तंत्र ठरून गेले होते. त्यावेळी स्टालिनच्या धोरणाला विरोध दर्शविण्याची शक्यता नसल्यामुळे सर्व राज्यांच्या अहवालांचा एकच छाप बनलेला होता. उत्पादन खूप वाढत आहे, योजना अचूक पद्धतीने चालू आहे, इत्यादीसारखे ठराविक मुद्दे अहवालात नमूद केले जात आणि त्यांच्या समर्थनासाठी आकडेवार माहिती दिली जाई. परंतु अलीकडे क्रुश्चेव्हच्या राजवटीत ही पद्धत बरीचशी बदलत चालली आहे.

क्रुश्चेव्हने प्रतिनिधींना टीका करण्याचे एका विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य

दिलेले आहे. त्यामुळे प्रतिनिधींच्या अहवालांत विविधता आढळते. ते आपल्या स्थानिक प्रश्नांची माहिती सांगताना सरकारच्या धोरणावर, किंवा अधिक अचूक सांगावयाचे तर धोरणाच्या अंमलबजावणीवर टीकाही करीत असतात. मर्यादित अर्थाने का होईना अहवाल निवेदनाचे लोकशाहीकरण होत आहे.

## सत्तेचे एकमेव केंद्र

सुप्रीम सोव्हिएटच्या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे प्रिसिडीयम किंवा अध्यक्ष-मंडळ असते. या अध्यक्ष मंडळात तेहतीस सभासद असून सुप्रीम सोव्हिएटच्या बैठकी चालू नसतील तेव्हा अध्यक्ष-मंडळाने सर्व कारभार चालवावयाचा असतो. अध्यक्ष-मंडळात प्रत्येक राज्याचा अध्यक्ष सामील असतो. अध्यक्ष मंडळाच्या धोरणाने दैनंदिन कारभार करण्यासाठी एक मंत्रिमंडळ निवडले जाते. किंबहुना प्रिसिडियमकडून मंत्रिमंडळाची नेमणूक केली जाते असे म्हणणे अधिक अचूक ठरेल. सुप्रीम सोव्हिएटच्या प्रीसिडियमचा किंवा अध्यक्ष-मंडळाचा अध्यक्ष हाच रशियाचा राष्ट्राध्यक्ष होय. त्याच्या हाती प्रत्यक्ष सत्ता जवळ जवळ काहीही नसते. सर्व सत्ता मंत्रिमंडळाकडे, आणि काटेकोरपणे सांगावयाचे झाल्यास, मंत्रिमंडळाच्या अध्यक्षाकडे असते. मंत्रिमंडळाचा अध्यक्ष म्हणजेच देशाचा पंतप्रधान. रशियाच्या मंत्र्यांना पूर्वी ' पीपल्स कमीसार ' असे म्हटले जात असे. पण १९४६ पासून कमीसार हे नाव बदलून त्यांनाच मंत्री असे म्हटले जाऊ लागले. सध्याच्या मंत्रिमंडळात पंचवीस मंत्री आहेत.

## पक्षाचे पहारेकरी

शासनसंस्थेच्या नियंत्रणाची आणि मार्गदर्शनाची सर्व सूत्रे कम्युनिस्ट पक्षाच्या हाती असतात. पक्षाच्या संघटनेची रचना पिरॅमिडप्रमाणे आणि सोव्हिएट संघटनेशी समांतर अशी आहे. याचा अर्थ, प्रत्येक खेड्यात, सामुदायिक शेतीवर आणि चढत्या क्रमाने तालुका, जिल्हा, विभाग, राज्य अशा पक्षशाखा स्थापन केलेल्या आहेत. या सर्व ठिकाणी अशाच क्रमाने सोव्हिएट, म्हणजे शासनसंस्थेच्या समित्याही काम करीत असतात. रशियात फक्त कम्युनिस्ट पक्षच अस्तित्वात असल्यामुळे स्थानिक सोव्हिएटमध्ये या पक्षाचे वर्चस्व असते. किंबहुना स्थानिक सोव्हिएटच्या मार्गदर्शनासाठीच त्याला समांतर अशी पक्षाची समिती स्थापन केलेली असते.

सामुदायिक शेती किंवा औद्योगिक केंद्रे यांतील किमान तीन लोकांची पक्ष शाखा स्थापन होऊ शकते. खालची पक्षशाखा आपल्या वरच्या शाखांसाठी प्रतिनिधींची निवड करते. त्यापुढे शहर, जिल्हा, राज्य अशा क्रमाने पक्षाची बांधणी

केली जाते. प्रतिनिधींची निवड गुप्त मतदानपद्धतीने होते. पक्षाची सर्वोच्च संघटना म्हणजे 'ऑल युनिअन पार्टी काँग्रेस.' पार्टी काँग्रेसच्या दोन अधिवेशनाच्या दरम्यानच्या काळासाठी 'सेंट्रल कमिटी ऑफ दि पार्टी' किंवा पक्षाची मध्यवर्ती समिती काम पहाते. या मध्यवर्ती समितीची निवड पार्टी काँग्रेसकडून केली जाते. त्यानंतर मध्यवर्ती समिती चिटणीस मंडळाची आणि प्रिसिडियम ( पॉलीट ब्युरो ) यांची निवड करते.

सोव्हिएट प्रिसिडियम आणि पक्षाचे प्रिसिडियम या दोन्हीं मध्ये घोटाळा करण्याची गरज नाही. सोव्हिएट प्रिसिडियम हे शासनसंस्थेचे अध्यक्ष-मंडळ आहे आणि कम्युनिस्ट पक्षाचे प्रिसिडियम हे त्या पक्षाचे अध्यक्ष मंडळ आहे. शासन संस्थेवर पक्षाची अधिसत्ता असते. त्यामुळे पक्षाच्या प्रिसिडियमला (अध्यक्ष मंडळाला) अनन्यसाधारण महत्त्व असते. प्रिसियडिमच्या सभासदांपैकी बरेच जण मंत्री असतात आणि बाकीचे पक्षसंघटनेचे काम करतात.

सध्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे १३२ पूर्ण सभासद असून १२२ पर्यायी सभासद आहेत. मध्यवर्ती समितीच्या बैठकीचे कामकाज गुप्तपणे चालते. त्या समितीचे सभासद हेच खरे रशियाचे राज्यकर्ते. पर्यायी सभासदांना समितीच्या बैठकीत भाषण करता येते. पण मतदानाचा अधिकार नसतो.

ऑल युनियन पार्टी काँग्रेसची बैठक दर दोन वर्षांनी भरावी असे पक्षाच्या घटनेत म्हटले आहे. पण आतापर्यंत ती इतक्या नियमितपणे क्वचितच भरली असेल. १९३० नंतर पुढच्या सव्वीस वर्षांत फक्त ४ वेळा भरली. स्टालिनच्या काळात या बैठकी किती अंतराने भरल्या याची कल्पना पुढील माहितीवरून सहज येऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| १६ वी काँग्रेस | १९३० | |
| १७ वी काँग्रेस | १९३४ | ( चार वर्षांनंतर ) |
| १८ वी काँग्रेस | १९३९ | ( पांच वर्षांनंतर ) |
| १९ वी काँग्रेस | १९५२ | ( तेरा वर्षांनंतर ) |
| २० वी काँग्रेस (क्रुश्चेव्हच्या काळात) | १९५६ | ( चार वर्षांनंतर ) |

वस्तुतः नियमितपणे दोन वर्षांनी काँग्रेसची बैठक झाली असती तर पक्षाच्या चिटणीस-मंडळाला आणि अध्यक्ष-मंडळाला आपल्या कार्याचा अहवाल सादर करून पुढच्या कार्यक्रमासंबंधी मंजुरी घ्यावी लागली असती. पण देशाची संपूर्ण सत्ता स्टालिन आणि त्याच्या भोवती असलेली मूठभर पुढारी मंडळी यांच्या हाती केंद्रित झाल्यामुळे पक्षाची बैठक भरविण्याची त्यांना गरज वाटली नाही. 'स्टालिन रशियाचा सर्वसत्ताधीश, अनभिषिक्त सम्राट बनला होता,' असा क्रुश्चेव्हने त्याच्यावर केलेला आरोप सिद्ध करण्यासाठी पक्षाच्या बैठकींची वरील माहितीही पुरेशी आहे.

क्रुश्चेव्हने मात्र १९५६ पासून दर दोन वर्षांनी नियमितपणे पक्षाच्या बैठका भरवून कार्याचा अहवाल मांडलेला आहे. अर्थात पहिल्या बैठकीत त्याने स्टालिनच्या

व्यक्तिमहात्म्यावर आणि त्याच्या अनुयायांच्या अंधभक्तीवर कडाडून टीका केली आणि तीच प्रथा त्याने पुढच्या बैठकीत अधिक तीव्रतेने आणि त्वेषाने चालू ठेवली. स्टालिनचे रशियात नावगावही राहू नये याचा त्याने पक्षाच्या बैठकीतच बंदोबस्त करून टाकला. आणि त्याला कायमचे विस्मृतीच्या गर्तेत ढकलून दिले.

## बादशहाला कुर्निसात

ऑल युनियन पार्टी काँग्रेसचे एकूण १३५५ सभासद आहेत. दर पाच हजार पक्ष सभासदांना एक प्रतिनिधी या हिशोबाने त्यांची निवड केली जाते. स्टालिनच्या काळात पार्टी काँग्रेसचे अधिवेशन कधीकाळीं भरलेच तर त्यात टीका करण्याची सोय नसे. सभा चालू असताना प्रिसिडियमचा सभासद सभागृहात प्रविष्ट झाल्याबरोबर सर्व सभासदांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात त्याचे स्वागत करावयाचे अशी प्रथा असे. बादशाही दरबारात बड्या अमीर-उमरावांचे आगमन झाल्याबरोबर दरबारी मंडळींनी उभे राहून कुर्निसात करावयाचा आणि त्याच्या स्वागताबद्दल एक प्रकारे आपल्या दास्य मनोवृत्तीचे प्रदर्शन करावयाचे अशी प्रथा सरंजामशाहीच्या काळात सर्रास चालू असे. स्टालिनच्या काळातील या गुलामी पद्धतीचे क्रुश्चेव्हने उच्चाटन केले. पार्टी काँग्रेसच्या प्रतिनिधींमध्ये आता स्टालिनच्या काळापेक्षा शेतकरी व कामगार प्रतिनिधींची संख्या अधिक आहे. क्रुश्चेव्हने अधिवेशनात प्रतिनिधींना टीका करण्याचे स्वातंत्र्य एका विशिष्ट मर्यादेपर्यंत दिलेले आहे. शेवटचा निर्णय पक्षाचे सर्वोच्च नेतेच घेत असले तरी, आपल्या टीकेकडे त्यांना अगदीच कानाडोळा करता येणार नाही, अशी अपेक्षा प्रतिनिधींना वाटत असावी. स्टालिनच्या काळात रशिया बाहेरची मंडळी क्वचितच येत असत. क्रुश्चेव्हने परदेशी पाहुण्यांसाठी दार बऱ्याच प्रमाणात उघडलेले आहे. पार्टी काँग्रेसच्या अधिवेशनासाठीही परदेशांतील प्रमुख कम्युनिस्ट नेत्यांना निमंत्रित करण्याचा नवा पायंडा क्रुश्चेव्हने पाडला आहे. त्याच्याही पुढे जाऊन अलीकडे पार्टी काँग्रेसच्या चर्चेचा वृत्तांत प्रसिद्ध करण्याची प्रथा त्याने सुरू केली. काही बैठकींना बातमीदारांनाही हजर राहू दिले जाते. या सभेत क्रुश्चेव्ह आपली भाषणे दोन विभागांत वाचून दाखवितो. एका विभागात रशियाच्या आर्थिक योजनांसंबंधीचा कार्यक्रम सांगितलेला असतो. हे भाषण सर्वांना उपलब्ध होऊ शकते. दुसऱ्या विभागात पक्षांतर्गत कटकटींचा उल्लेख असतो. कोणत्या प्याद्यांना कोठे ठेवायचे याचे डावपेच नेता त्यात सांगतो. क्रुश्चेव्हने आतापर्यंत झालेल्या तीन अधिवेशनांत स्टालिन, त्याचे सहकारी, मेलेन्कॉव्हपासून होरोशिलॉव्हपर्यंतचे प्रमुख नेते आणि स्टालिनची कारकीर्द या सर्वांवर प्रखर टीका केली. अनेकांना पक्षातून घालवून दिले. या सर्व प्रकारांसंबंधी केलेल्या भाषणाच्या प्रती मात्र जाहीरपणे उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे पक्षाच्या अंतर्गत किती प्रकारचे भेद आणि उपभेद आहेत याची निश्चित कल्पना

रशियातील जनतेलाही येऊ शकत नाही. १९५६ साली भरलेल्या विसाव्या कॉंग्रेसमध्ये क्रुश्चेव्हने स्टालिनच्या विभूतिपूजेवर झोड उठविली. त्या भाषणाची प्रत प्रथम अमेरिकेत प्रसिद्ध झाली आणि त्यानंतर भाषणाचा विस्तृत वृत्तांत रशियन जनतेला समजू शकला.

## सभासदांची परीक्षा

रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे एकंदर ऐंशी लाख सभासद आहेत. त्यांपैकी अडीच लाख सभासद पूर्ण वेळ काम करणारे आहेत. एखाद्या व्यक्तीला पक्षाचा सभासद व्हावयाचे असेल तर ठराविक वर्गणी देऊन किंवा प्रवेशपत्रिकेवर स्वाक्षरी करून काम भागत नाही. प्रथम तीन पक्षसदस्यांनी त्या व्यक्तीची शिफारस केली पाहिजे. या शिफारसपत्रासह त्या व्यक्तीचे नाव आणि इतर माहिती स्थानिक पक्षशाखेतर्फे वरच्या शाखेकडे पाठविली जाते. तेथे त्याला मंजुरी मिळाल्यास एक वर्ष उमेदवारी करावी लागते. या काळात आपल्या वेतनाच्या तीन टक्के रक्कम पक्षाच्या वर्गणीदाखल भरावी लागते. येवढे सर्व झाल्यावर उमेदवाराची चाचणी घेण्यात येते. उमेद्वार अयोग्य आहे असे चाचणी घेणारांचे मत झाले तर त्याची उमेदवारी रद्द होते. आपल्या कामात हेळसांड करणे किंवा पक्षाविषयी संपूर्ण निष्ठा नसणे; मार्क्सवाद, लेनिनवादावर विश्वास नसणे इत्यादि मुद्दे उमेदवारी रद्द होण्यास पुरेसे असतात. शिस्त आणि सार्वजनिक वर्तन या दोन गोष्टींनाही उमेदवारीच्या काळात विशेष महत्त्व दिले जाते. उमेदवाराला सभासद झाल्याबरोबर कोणत्याही क्षेत्रातील कामगिरी पत्करून त्यासंबंधीचे अहवाल आपल्या संबंधित शाखेला सादर करावे लागतात. कारखान्यातील कामगार, सामुदायिक शेतीवरील शेतकरी यांना पक्षाच्या धोरणाचे आणि मार्क्सवाद लेनिनवाद यांवरील श्रद्धेचे शिक्षण दिले जाते. त्यासाठी प्रमुख शहरांत रात्रीचे वर्ग चालविण्यात येतात. अशा वर्गांचे निरनिराळे अभ्यासक्रम आखलेले आहेत. एखाद्या कारखान्यातील सभासदाने विशेष कामगिरी करून दाखविली तर त्याला लगेच पक्षाच्या विद्यालयात दोन किंवा तीन वर्षांसाठी मार्क्सवादी तत्त्वज्ञान शिकण्यासाठी प्रवेश दिला जातो. या काळात त्याचा पगार चालू असतो. त्याशिवाय पक्षाच्या विद्यालयात त्याची सर्व व्यवस्था विनामूल्य केली जाते. अशा दीर्घकालीन अभ्यासक्रमाखेरीज, मार्क्सवादाचा परिचय करून घेण्यासाठी सायंकाळचे वर्ग चालविण्यात येतात. त्यात कोणीही कामगार जाऊन शिक्षण संपादन करू शकतो. मार्क्सवादाचा अर्थ त्यावेळच्या सत्तागटाकडून ठरविला जातो.

## प्रतिष्ठेचे स्थान

वर उल्लेखिलेल्या विद्यालयाच्या अभ्यासक्रमात स्टालिनच्या काळात जे शिक्षण

देण्यात येत असे. त्यात मार्क्सवाद–लेनिनवादाबरोबर स्टालिनच्या विभूतिपूजेचे प्रकरणही समाविष्ट केलेले होते. क्रुश्चेव्हने तो सर्व अभ्यासक्रम बदलून टाकला आहे. पक्षाच्या धोरणातही जे बदल घडून येतात त्यांना अनुसरून त्या त्या वेळी 'आयडीयालॉजी'ची संथा दिली जाते. पक्षाच्या कार्यक्रमाचा देशभर प्रचार करण्यासाठी ही वैचारिक पूर्वतयारी सत्तागटाला उपयोगी पडते. हे शिक्षण घेणारांना त्यांच्या कारखान्यांत किंवा सामुदायिक शेतीवर प्रतिष्ठेचे स्थान मिळते. अधिकाराच्या दृष्टीनं या प्रतिष्ठेचा उपयोग होतो. देशाच्या सत्तेत आपापल्या कुवतीप्रमाणे पक्षसदस्याला भागीदारी मिळते. आणि वेतनही मिळते. सभोवतालच्या समाजावर या नव्या वर्गाला भरपूर वर्चस्व गाजविता येते.

ज्या वेळी सरकार एखाद्या महत्त्वाच्या धोरणासंबंधी निर्णय घेते त्या वेळी हजारो पक्षसदस्य तो निर्णय नेत्यांच्या शब्दाबरहुकूम देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत नेऊन पोहोचवितात. सभा, चर्चा, पत्रके अशा सर्व साधनांनी प्रचाराची कामे इतक्या झपाट्याने पार पाडली जातात, की त्या प्रचाराची दुसरी बाजू असू शकेल, याचा विचार करण्याची लोकांना संधीही मिळू शकत नाही. या प्रचाराचे तंत्र आणि मंत्र सांगणारा एक भला मोठा ग्रंथही तयार केलेला आहे. पक्षाच्या धोरणात बदल झाला की या ग्रंथाची नवी आवृत्ती निघते. लगेच त्याच्या लाखो प्रती एकाच वेळी खेडोपाडी प्रचारासाठी पाठविल्या जातात. त्याच वेळी वृत्तपत्रांतूनही प्रचार चालू असतो. नभोवाणी आणि चित्रवाणी यांचेही तेच कार्यक्रम चालू असतात. प्रचाराची अशी सर्व बाजूंनी धमाल उडवून दिली जाते आणि ती सतत आठपंधरा दिवस चालू ठेवली जाते. प्रचाराच्या एवढ्या प्रचंड प्रवाहाबरोबर सर्वसामान्य नागरिक वाहून गेला नाही तरच नवल.

## प्रचारात वाहून गेले

नागरिकांना प्रचाराच्या प्रवाहाबरोबर काहीशा अगतिकपणाने कसे वाहात राहावे लागते याची काही उदाहरणे अगदी अलीकडे घडलेली आहेत. मेलेन्कॉव्ह, बुल्गानिन, मोलोटॉव्ह, होरोशिलॉव इत्यादि बड्या नेत्यांना क्रुश्चेव्हने सत्तास्थानावरून खाली खेचले आणि तेही अत्यंत अचानकपणे. पण त्यासंबंधीच्या तुफानी प्रचारापुढे गडगडलेल्या पुढाऱ्यांचे विचार लोकांना कधी समजूच शकले नाहीत. क्रुश्चेव्हने एखादे भाषण करावे, लगेच ते वृत्तापत्रांतून आणि नभोवाणीवरुन सांगितले जावे आणि त्याबरोबरच देशातील हजारो प्रचारकांनी आपापल्या भागात वाचून दाखवावे, पुनः पुन्हा त्याचा उल्लेख करून तेच वातावरण कायम ठेवावे; म्हणजे त्या भाषणातील विचारांपेक्षा निराळे काही सत्य असू शकेल याची कल्पना येणे अशक्य होते. कालचे श्रेष्ठ नेते आज दुष्ट, खलपुरुष आणि देशघातकी ठरतात, त्यांच्या जीवनात एकदम

असा बदल का व कसा घडला याची चिकित्सा होऊ शकत नाही. तसेच, विजयी नेत्याने केलेल्या आरोपांत काही चुकीचा भाग असेल की काय याचीही शंका येऊ दिली जात नाही. सत्तारूढ नेत्याच्या तोंडून शब्द निघावा आणि लगेच त्याच तालसुरात विद्युत्प्रवाहाप्रमाणे जलद गतीने गावोगाव पसरावा, इतकी प्रचाराची जय्यत यंत्रणा तयार असते.

याच संदर्भात क्रुश्चेव्हच्या विसाव्या काँग्रेसमधील भाषणाचा उल्लेख करता येईल. त्या अधिवेशनात क्रुश्चेव्हने स्टालिनवर केलेला हल्ला रशियन जनतेला अनपेक्षित होता. स्टालिनवर इतकी प्रखर टीका कोणी करू शकेल याची रशियन जनतेला कल्पनाही नव्हती. तेव्हा त्या भाषणाची पहिली प्रतिक्रिया लोकांच्या मनावर काय झाली हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. पण लोक अशा प्रश्नाचे उत्तर सरळपणे देत नाहीत. जे उत्तर मिळते तेही एकाच साचाचे. कोणी म्हणतो, भाषण प्रथम ऐकले तेव्हा आम्हांला एक प्रकारचा धक्का बसला. दुसरा सांगतो, त्या भाषणाने वातावरण स्वच्छ झाले आणि समाजवादी कार्यक्रमाला गती मिळाली. स्टालिनच्या दडपणामुळे त्रस्त झालेली एखादी व्यक्ती, ‘ सुटलो एकदाचे ’ असेही सांगेल. पण हे सर्व प्रत्यक्ष भाषण झाल्यानंतर. त्यापूर्वी भाषणातील आशयाचा सुगावा लागला असता तर लोकांची प्रतिक्रिया काय झाली असती हे सांगणे कठीण आहे. सर्वसामान्य लोक प्रचाराने भारावलेल्या अवस्थेत काही वेळा आश्चर्यचकित होऊन, काही वेळा भीतीने, तर काही वेळा प्रवाहपतिताप्रमाणे प्रचार ग्रहण करीत असतात, येवढेच त्या सर्वांचे तात्पर्य आहे.

रशियातील राजकीय घटना लोकांच्या दृष्टीने अनपेक्षितपणे घडतात. त्या घडल्यानंतर लोकांना कळतात आणि प्रचाराच्या सामर्थ्याने त्या मान्यही होतात. राजकीय नेते कोणत्या स्थानावरून कोणत्या अवस्थेत कसे चढले किंवा पडले याची कल्पनाही त्या घटना प्रत्यक्ष घडल्यानंतरच रशियन जनतेला ज्ञात होतात. वस्तुतः रशियाला राज्यघटना आहे. पार्लमेंट, मंत्रिमंडळ, पंतप्रधान यांचे स्थान आणि अधिकार यासंबंधी घटनेत विस्तृत तरतुदीही केल्या आहेत. पण प्रत्यक्ष व्यवहारात त्यांची अंमलबजावणी किती प्रमाणात होते हे गेल्या काही वर्षांतील घटनांवरूनही समजू शकते. राज्याचा प्रमुख सत्ताभ्रष्ट झाला किंवा मृत्यू पावला तर त्याची जागा खुल्या निवडणुकीने किंवा लोकांना सहज समजू शकेल अशा मार्गाने होत नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वोच्च वर्तुळात जे राजकीय डावपेच चालू असतात त्या गुप्त पद्धतीच्या डावपेचांतूनच शेवटी राजकीय नेत्याचे स्थान निश्चित होते. घटनेच्या दृष्टीने कम्युनिस्ट पक्षाचा नेता मध्यवर्ती समितीकडून निवडला जातो. पण प्रत्यक्ष मध्यवर्ती समितीत त्याची निवड होताना कोणत्या तत्त्वांवर आणि कोणी केली, त्याच्या बाजूने किती सभासद होते आणि विरोधी सभासदांनी कोणत्या मुद्द्यावर त्याला विरोध केला, या गोष्टी कधीच बाहेर येत नाहीत. पार्लमेंटरी लोकशाहीमधे

सत्तास्थानावर येणाऱ्या नेत्यांविषयी देशात लोकमत अनुकूल किंवा प्रतिकूल पद्धतीने व्यक्त होत असते, त्यावर उलट सुलट चर्चा होते, विचारविनिमय केला जातो, त्याच्या बऱ्यावाईट कार्यासंबंधी लोकांना परिचय करून दिला जातो, त्याच्या भावी धोरणाची रूपरेषाही समजू शकते. पण रशियात असे प्रकार घडत नाहीत. एकपक्षीय राजवटीमुळे घडू शकत नाहीत. उलट, पक्षाच्या छोट्याशा वर्तुळात पडद्याआड सभासदांची एकमेकांविरुद्ध कारस्थाने चालू असतात. एकमेकांना अधिकारावरून हुसकून लावण्याची प्राणघातकी स्पर्धा चालू असते आणि शेवटी एका नेत्याची हकालपट्टी आणि दुसरा सत्ताधारी बनण्याची अनपेक्षित घटना लोकांना ऐकावयास मिळते. स्टालिनच्या काळात तर या घटनाही चालत नसत. सत्ता काबूत ठेवण्यासाठी त्याने स्वतःवर कोणतीही मर्यादा घातलेली नव्हती. त्यामुळे तो सत्ता मुठीत ठेवण्यासाठी अनन्वित प्रकार बिनदिक्कतपणे करीत असे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

## शिखराकडून पायथ्याकडे

स्टालिनच्या मृत्यूनंतर मेलन्कॉव्ह, बुल्गानिन आणि क्रुश्चेव्ह असे तीन पंतप्रधान झाले. त्यांची निवड लोकमताप्रमाणे झाली की सत्ता हाती घेतल्यानंतर त्यांनी स्वतः-विषयी लोकमत अनुकूल बनविण्याचा प्रयत्न केला हे त्या घटना ज्या क्रमाने घडल्या त्यावरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. रशियातील सत्तेचे आणि धोरणाचे लोण शिखराकडून समाजाच्या पायथ्याकडे कसे पाठविले जाते हेही त्यावरून लक्षात येण्यास हरकत नाही. ज्या नेत्यांना सत्तेवरून खाली खेचण्यात येते त्यांना लोकांपुढे आपली बाजू मांडण्याची संधी मिळू शकत नाही. त्याच्यावर केलेले आरोप खोडून टाकण्यास त्याला वाव नसतो. त्यामुळे आयुष्यभर केलेल्या धडपडीचा आणि सामाजिक, राजकीय कार्याचा एका क्षणात पार निकाल लागतो. सत्ता हाती आलेली व्यक्ती आपली बाजू भडकपणाने आणि पुनः पुन्हा लोकांपुढे, सर्व प्रचारसाधनांचा उपयोग करून मांडू शकते आणि शेवटी तीच बाजू सत्य असल्याचे मानले जाते.

पक्ष आणि शासन, पक्ष आणि देश व पक्ष आणि सामान्य लोक यांचे संबंध गुंतागुंतीचे असले तरी, शेवटी पक्षाच्या नेत्याचा शब्द अखेरचा मानला जातो. लोक-मताचा प्रभाव त्यावर पडू शकत नाही. किंबहुना लोकमत व्यक्तच होऊ शकत नाही.

## ' फ्लुक 'ने रेस जिंकली

स्टालिनच्या मृत्यूनंतर बेरिया, मेलेन्कॉव्ह आणि मोलोटॉव्ह या तीन पुढाऱ्यांत सत्तास्पर्धा होऊन त्यांपैकी कोणीतरी सर्वाधिकारी बनेल, अशी त्या वेळी रशियासंबंधी विशेष अभ्यास केलेल्या लोकांची कल्पना मेलेन्कॉव्ह अधिकारावर आल्यामुळे, काही

अंशाने खरीही ठरली. पण सत्तेच्या क्षेत्रात मेलेन्कॉव्ह अल्पजीवी ठरला आणि क्रुश्चे-व्हने सर्व सूत्रे संपादन केली. क्रुश्चेव्ह स्टालिनच्या वर्तुळात असला तरी इतरांपेक्षा तुलनेने कमी महत्त्वाचा, कमी प्रभावाचा मानला जात असे. अशा कमी परिचित पुढाऱ्याकडे सत्तेचे सर्वाधिकार गेले आणि तेही अनपेक्षितपणे. त्यामुळे रशियातील जनतेला आणि रशियाबाहेरील निरीक्षकांनाही एक प्रकारचा राजकीय धक्काच बसला. घोड्याच्या शर्यतीत "फ्लुक"–सामान्य घोडा–पुढे जावा, तशीच काहीशी स्थिती क्रुश्चेव्हच्या बाबतीत घडली. पण गेल्या सात आठ वर्षांत क्रुश्चेव्हने जे धोरण स्वीकारले, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत जे डावपेच केले त्यावरून तो असामान्य बुद्धीचा धूर्त नेता व मुत्सद्दी आहे हे सिद्ध झाले आहे. त्याने रशियात लोकप्रियता मिळविली आणि ती वाढत्या क्रमाने चालू ठेवली. त्याचे व्यक्तित्व, पक्षातील प्रभाव आणि स्टालिनवादाच्या कचाट्यातून जनतेला मुक्त करण्याची मोहीम, यामुळेच त्याची लोकप्रियता वाढत गेली. स्टालिनप्रमाणे तो दुराग्रही नाही. हुकूमशहाच्या अरेरावी वृत्तीची तो इतरांना जाणीव होऊ देत नाही. स्टालिनच्या अत्यंत कडक राजवटीने रशियन जनतेची मने करकचून आवळलेली आहेत हे त्यानेच प्रथम ओळखले. तो वादकुशल आहे. कोट्या आणि प्रतिकोट्या करून प्रतिपक्षाच्या मनात आपल्याविषयी आपुलकी निर्माण करावयाची हातोटी त्याच्याजवळ आहे. युद्धकालात रशियन जनतेने सोसलेले हाल त्याने प्रत्यक्ष पाहिलेले होते. शेतीच्या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव त्याने मिळविलेला आहे. अशा विविध गुणांमुळे त्याच्या व्यक्तित्वालाच स्टालिनपेक्षा निराळा आकार मिळाला आहे.

## जुने नेते विरुद्ध नवे नेते

क्रुश्चेव्हने ज्या नेत्यांना पदभ्रष्ट केले आणि सत्तेच्या क्षेत्रातून घालवून लावले ते सर्व रशियन राज्यक्रांतीत भाग घेतलेले आणि अनेक वर्षे लेनिन, स्टालिनच्या सहवासात वावरलेले होते. पण त्यामुळेच पक्ष संघटनेत त्यांची मिरासदारी बनलेली होती. राज्यक्रांतीनंतर उदयाला येऊ लागलेला तरुण नेत्यांचा वर्ग कमी प्रतीचा मानून त्याला दुय्यम स्थान देण्यात येत असे. या नव्या नेतृत्वाला स्टालिनच्या मृत्यूपर्यंत स्थान मिळू शकले नाही. क्रांतीत भाग घेतलेले आणि पंचवार्षिक योजना सुरू झाल्यानंतर उदयाला आलेले, असे दोन वर्ग नेत्यांच्या श्रेणीत स्पष्टपणे पडलेले होते. दुसऱ्या वर्गाची दखल घेण्याची त्यावेळी गरज भासली नाही. त्यामुळे पक्ष संघटनेत नव्या नेतृत्वाला प्रतिष्ठेचे स्थान कधीच लाभले नाही. क्रुश्चेव्हने नव्या कार्यकर्त्यांच्या मनांतील ही दबलेली महत्त्वाकांक्षा ओळखली आणि जुन्या मिरासदारांना दूर सारण्यासाठी तिचा पूर्णपणे उपयोग केला. त्यामुळे त्याच्या धोरणाला पाठिंबा देणारा एक गट तयार झाला. त्याच्या बळावर त्याने एकानंतर एक असे जुने नेते सत्तेवरून काढले व हळू-

... ग्रंथालय ... वा. क्र. 74048

हळू सर्व सत्ता हाती घेतली.

## एकाशी मैत्री, दुसऱ्याला गचांडी

क्रुश्चेव्हने पक्षनेत्यांना कसे पदभ्रष्ट केले हे पाहिल्यानंतर त्याच्या धूर्तपणाची कल्पना येईल. इ. स. १९५३ मध्ये मेलेन्कॉव्ह गटाशी मित्रत्व करून त्याने बेरियाला ठार केले. इ. स. १९५५ मध्ये मोलोटॉव्हशी दोस्ती करून मेलेन्कॉव्हचे पंतप्रधानपद काढून घेतले. इ. स. १९५७ मध्ये झुकॉव्हशी हातमिळवणी करून मोलोटॉव्ह आणि कंपनीला परागंदा केले. त्याच वर्षी बुल्गानिनला निकटचा सहकारी बनवून झुकॉव्हचे सरसेनापतिपद काढून घेतले आणि शेवटी मार्च १९५८ मध्ये एकट्या बुल्गानिनला सत्तेवरून हुसकून लावणे त्याला मुळींच अवघड गेले नाही. त्या वेळी त्याच्या पाठीशी कम्युनिस्ट पक्षातील नव्या पुढाऱ्यांचा एक मोठा गट होता आणि तो जुन्या पुढाऱ्यांकडून अनेकदा दुखावलेला होता. त्यांच्या तीव्र भावनांचा क्रुश्चेव्हला अतिशय उपयोग झाला आणि त्याचे नेतृत्त्व सर्वमान्य ठरले.

## रशियन जनतेची 'मुक्ती'

क्रुश्चेव्हने रशियन जनतेला स्टालिनवादाच्या कचाट्यातून मुक्त केले. स्टालिनने केलेल्या चुका शाब्दिक युक्तिवादाने सामान्य नागरिकांना पटण्यासारख्या नव्हत्या. म्हणून क्रुश्चेव्हने स्टालिनला त्याच्या कारकीर्दीतील सर्व दोषांचा मुख्य आरोपी ठरविले. त्याच्या काळातील सर्व कृष्णकृत्ये जास्तीत जास्त भडकपणाने लोकांपुढे मांडली. त्याच्या धोरणाची भयानक परिणती रशियाच्या नागरिकांना कशी सोसावी लागली याची निवेदने केली. स्टालिनला केवळ दोषांचा धनीच नव्हे, तर गुन्हेगारही ठरविले आणि रशियातील प्रचारपद्धतीच्या सहाय्याने लोकांना त्याची तीस वर्षांची सदोष कारकीर्द पटवून दिली. स्टालिनच्या कारकिर्दीच्या अनेक खुणा घटनेवर, कायद्यांवर आणि प्रसंगांवर पक्क्या झालेल्या होत्या. त्या पुसून टाकण्याचे कार्य स्टालिनचा नामनिर्देश न करता होऊ शकत नव्हते. त्यासाठी स्फोटक प्रचार करून लोकांच्या भावना प्रक्षुब्ध करणे आवश्यक होते. हजारो रशियन नागरिक स्टालिनच्या काळात अपराधाशिवाय हद्दपार झाले होते, सक्तीच्या मजुरीचे दुःख भोगीत होते. त्यांना परत समाजात आणून त्यांचे पुनर्वसन समाधानकारकपणे होईल अशी क्रुश्चेव्हने घोषणा करताच त्याची लोकप्रियता वाढणे अपरिहार्य होते. आणि हे करीत असतानाच स्टालिन अट्टल गुन्हेगार होता, त्याचे नावनिशाणही रशियात कोठे ठेवता कामा नये, अशा प्रचाराचीही जोड देण्यात आली. बेरियासारख्या स्टालिनच्या हस्तकांनी लोकांच्या भावना दुखविल्या होत्या. त्यामुळे त्याच्याविषयी लोकांच्या मनात विलक्षण संताप होता. त्या संतापाला वाट मिळाली नसती तर लोकां-

मध्ये वैफल्याची भावना अधिक बळावली असती. अशा स्थितीत स्टालिनचे होते नव्हते तेवढे सर्व दोष जाहीर झाले, त्याच्या शासनपद्धतीमुळे लोकांच्या मनावर पडलेला ताण कमी झाला. या सर्व गोष्टींचे आकलन एकट्या क्रुश्चेव्हला होऊ शकले हेच त्याच्या यशाचे एक रहस्य सांगता येईल.

## जुने कवच फोडले

क्रुश्चेव्हने स्टालिनच्या कारकिर्दीचे कवच फोडून विकासाची वाट मोकळी करून दिली. लोकांना अंतर्गत कारभारात मोकळेपणा मिळू शकला. कौटुंबिक जीवनात गुप्त पोलिसांचा ससेमिरा यापुढे आपल्या मागे लागणार नाही याची हमी वाटू लागली. शेतीच्या क्षेत्रात खाजगी शेताच्या तुकड्यावरील पीक विकण्याची शेतकऱ्यांना मुभा मिळाली. उद्योगधंद्यांच्या दृष्टीने विकेंद्रीकरणाचा प्रयोग सुरू झाला. वृत्तपत्रांतून शासनयंत्रणेतील चुकांवर टीका करण्याची मर्यादित का होईना पण परवानगी मिळाली. नागरिकांना दडपून टाकणारे वातावरण निवळू लागले. शास्त्रीय संशोधनात रशिया जगाच्या आघाडीवर आहे ही स्वाभिमानाची गोष्ट जनतेच्या मनाला उत्साहवर्धक वाटली. जागतिक राजकारणात रशियाने उच्च स्थान मिळविले आहे, किंबहुना एका मोठ्या गटाचे नेतृत्व यशस्वीपणे हाताळले आहे याची जाणीव लोकांना होऊ लागली. या सर्व गोष्टी क्रुश्चेव्हच्या लोकप्रियतेला कारणीभूत झाल्या नसत्या तरच नवल.

## खाणकामगाराचा मुलगा

रशियन राज्यक्रांतीच्या वेळी क्रुश्चेव्हचे वय तेवीस वर्षांचे होते. त्या वेळी तो क्रांतिकारक नव्हता आणि कम्युनिस्ट पक्षाचा सभासदही नव्हता. युक्रेनच्या एका खेड्यात अत्यंत गरीब परिस्थितीत तो जन्मला आणि वाढला. त्याचे वडील काही दिवस शेती आणि काही दिवस कोळशाच्या खाणीत काम करीत असत. क्रुश्चेव्हलाही वडिलांबरोबर खाणीत काम करावे लागले. तेथील परिस्थितीचा त्याच्या मनावर फार खोलवर परिणाम झाला. कारखान्यातील कामगार, शेतीवर राबणारा शेतकरी आणि खाणीतील जीवन जगणारा मजूर यांची निकृष्टावस्था त्याने प्रत्यक्ष पाहिली, अनुभवली. खाणीत होणारे अपघात, स्फोट, मजुरांचे आजार आणि उपासमार या सर्वांचा परिचय त्याला आयुष्याच्या आरंभीच झाला आहे. त्याला शालेय शिक्षण मिळू शकले नाही. क्रांतीनंतर त्याच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. आरंभी कामगारांबरोबर निदर्शने करणे किंवा संपात भाग घेणे यापलीकडे त्याला राजकारण माहीत नव्हते. क्रांतीनंतर एक वर्षाने तो रशियन सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीचा सभासद बनला. थोड्याच दिवसांनी सैन्यात सामील झाला. यादवीच्या काळात युक्रेनमध्ये त्याने प्रत्यक्ष लढाईत भाग घेतला. या काळातच पक्षातील अनेक सुशिक्षित प्रमुख कार्य-

कर्त्यांशी त्याचा संबंध आला. युद्धाचा काळ संपल्यानंतर सेंट पीटर्सबर्ग येथे त्याला शिक्षणासाठी पाठविण्यात आले. शहरी जीवनाचा येथेच त्याला प्रथम परिचय झाला. शिक्षणानंतर युक्रेनमधील खाणकामगारांचा नेता म्हणून तो काम करू लागला. स्टालिनच्या वर्तुळात प्रवेश मिळण्यासाठी त्याला आणखी काही वर्षे उमेदवारी करावी लागली. पण हळूहळू त्याने आपले महत्त्व निदर्शनास आणून पक्षात मोठे स्थान प्राप्त करून घेतले. स्टालिनने युक्रेनमधे १९३७ साली पक्षाच्या कार्यकर्त्यांचे भयंकर शिरकाण केले त्यावेळी क्रुश्चेव्ह मॉस्कोतील पक्षशाखेत काम करीत होता. त्याच्याकडे भूमिगत रेल्वेच्या बांधकामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी सोपविलेली होती. पुढच्याच वर्षी तो पॉलिट ब्युरोचा उमेदवार सभासद बनला आणि त्याला पुन्हा युक्रेनमधे पक्षसंघटनेच्या कामासाठी पाठविण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धात युक्रेनवर ज्या वेळीं नाझींचे आक्रमण झाले त्या वेळी क्रुश्चेव्हने गनिमी युद्धाचा अवलंब करून शत्रूला जेरीस आणण्याची कामगिरी बजावली. स्टालिनग्राडच्या लढ्यात त्याचा बराच मोठा वाटा होता. या सर्व प्रसंगी त्याचे धैर्य आणि अनपेक्षित प्रसंगाला समयसूचकतेने तोंड देण्याची तयारी व्यक्त झाली.

स्टालिनच्या मृत्यूच्या वेळीं पक्षाच्या अध्यक्षमंडळात प्रत्यक्ष कोणत्या घटना घडल्या आणि अंतर्गत सत्तास्पर्धेत प्रमुख नेत्यांची कशी झुंज झाली यासंबंधीचा तपशील अद्याप प्रकाशात आलेला नाही. त्या वेळीं मोठा पेचप्रसंग उद्‌भवला असणार हे उघड आहे. पण त्यात क्रुश्चेव्ह इतर नेत्यांना बाजूला सारून पुढे आला, त्याच्या विरुद्ध उठलेल्या वादळातून सहीसलामत सुटला यातही त्याचे धाडस आणि कौशल्य व्यक्त होते.

क्रुश्चेव्हने इतर प्रमुख नेत्यांच्या स्पर्धेत आघाडी कशी मारली याविषयी मॉस्कोत बऱ्याच कथा सांगण्यात येतात. एक कथा खुद्द त्यानेच सांगितलेली आहे. एका पत्रकाराने त्याला त्याच्या नेतृत्वाचे रहस्य विचारले. तेव्हा त्याने सरळ उत्तर न देता एक गोष्ट सांगितली. तो म्हणाला, युक्रेनमधे एका तुरुंगात चार कैदी होते. एक कडवा अराज्यवादी, दुसरा धूर्त लोकशाही समाजवादी, तिसरा कट्टर साम्यवादी आणि चौथा एक ठेंगू ज्यू होता. त्या सर्वांचे अनेक गोष्टींवर मतभेद असत. राजकारणाप्रमाणेच साध्यासुध्या वस्तू वाटून घेण्याच्या बाबतीतही ते तीव्र मतभेद व्यक्त करीत असत. दररोज वादाचे अनेक प्रसंग उद्‌भवत असल्यामुळे आणि प्रत्येकजण आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे कोणत्याही प्रश्नाचा निकाल म्हणून लागत नसे. शेवटी त्यांनी आपले वाद मिटविण्यासाठी त्या ज्यू गृहस्थाला आपला अध्यक्ष निवडले. त्यांना ठेवलेल्या खोलीची साफसफाई कोणी करावयाची या प्रश्नापासून राजकारणात कोणते धोरण यशस्वी ठरेल याच्या भाकितापर्यंत वाद होऊ लागले आणि ते सोडविण्याची काम-

गिरी ज्यू गृहस्थाकडे आली. एकदा त्या सर्वांनी तुरुंगातून निसटून जाण्याचा बेत केला. त्यासाठी त्यांनी एक भुयार खणले. परंतु ते तयार झाल्यावर त्यातून प्रथम कोणी बाहेर पडावयाचे असा प्रश्न उद्‌भवला. अराज्यवादी, समाजवादी आणि कम्युनिस्ट हे सर्वच निरनिराळी कारणे सांगून त्या भुयारातून बाहेर पडण्याचे टाळू लागले. त्यांची कल्पना अशी की, भुयारातून जो इसम बाहेर पडेल त्याला संरक्षकाची पहिली गोळी खावी लागेल. आणि समजा तो निसटलाच तर बाहेरचा मार्ग खुला आहे असे समजून बाकीच्यांनाही सहज निसटता येईल. या प्रश्नावर मोठा कडाक्याचा वाद झाला. शेवटी तो मिटविण्यासाठी त्या ज्यू गृहस्थाने स्वतः होऊन पुढाकार घेतला. तो म्हणाला, 'तुम्ही मला लोकशाही पद्धतीने नेता निवडले आहे. तेव्हा मीच प्रथम या भुयारातून बाहेर पडतो.'

क्रुश्चेव्हने हा प्रसंग वर्णन केला आणि त्याचे तात्पर्यही सांगितले. तो म्हणाला, प्रत्येक मनुष्य, मग तो कोणीही असो, त्याच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शेवटी उभा राहतो. तो ठेंगू गृहस्थ कोण असेल असे तुम्हांला वाटते ? तो दुसरा तिसरा कोणी नसून मीच होतो.

स्टालिनच्या लहरीपुढे कोणाचेही काही चालत नसे. त्यामुळे अशा प्रसंगी त्याच्या लहरीची पूर्तता करणे यातच शहाणपणा असे, असे क्रुश्चेव्हने आणखी एका प्रसंगाचे वर्णन करताना सांगितले.

क्रेमलिनमध्ये स्टालिन एकदा खुशीत आला होता. अशा वेळीं त्याची कृपादृष्टी कोणावर वळेल याचा नेम नसे. स्टालिनने त्या वेळीं क्रुश्चेव्हला युक्रेनमधील एक विशिष्ट नृत्यप्रकार करून दाखविण्यास सांगितले. क्रुश्चेव्ह लगेच उठला आणि त्याने तो नृत्यप्रकार करून दाखविला. ही कथा खुद्द क्रुश्चेव्हनेच सांगितल्याचा प्रवाद आहे. त्यावरून क्रुश्चेव्ह स्टालिनपुढे लाचार बनला, की त्याच्या लहरीपुढे मान तुकवून त्याने धूर्तपणा दाखविला, यासंबंधी मतभेद होऊ शकतील. पण क्रुश्चेव्हच्या नंतरच्या धोरणावरून असे म्हणावयास हरकत नाही की प्रसंग ओळखण्याचा चाणाक्षपणा त्याच्याजवळ भरपूर आहे आणि त्याचे नेतृत्व लोकप्रिय होण्यास हा गुण त्याच्या उपयोगी पडला. कोणत्याही प्रसंगाला अंतिम व निर्णायक समजायची त्याची तयारी नसते, हे त्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील घोषणा आणि तुटेपर्यंत ओढून न धरता माघार घेणाऱ्या प्रतिघोषणा यावरूनही लक्षात येते.

## व्यवहारी राजकारणी

क्रुश्चेव्हने मार्क्सवादासंबंधी पांडित्य दाखविण्याचा अद्याप तरी प्रयत्न केला नाही. मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांच्या अनुरोधानेच आपले धोरण चालले आहे असे तो सांगत असला तरी तात्त्विक विवेचनाच्या किंवा स्पष्टीकरणाच्या भान-

गडीत तो पडत नाही. स्टालिनने मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांवर भाष्ये केली. आपणही त्यांच्या विद्वत्परंपरेतील मोठे तत्त्वज्ञ आहोत असा आभास निर्माण करण्यासाठी पुस्तके लिहिली. मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारांचा अर्थ लावण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच आहे असा दबदबाही निर्माण केला. त्यामुळे त्याच्या राजवटीत फक्त त्याचाच शब्द शेवटला मानला जात असे. क्रुश्चेव्ह असा तात्त्विक क्षेत्रात शिरत नाही. किंबहुना लोकप्रिय होण्यासाठी काही वेळा तो मार्क्सच्या तत्त्वज्ञानाला मुरड घालण्याची गरजही अप्रत्यक्षपणे सुचवितो. एकदा त्याने असे म्हटल्याचे सांगण्यात येते की, 'मार्क्सचा सिद्धांत सुधारून नागरिकांना पाव आणि लोणी थोडे अधिक मिळत असेल तर, तशी सुधारणा करण्यास मला हरकत वाटत नाही. उपाशी पोटी मार्क्सवाद, लेनिनवाद, समजणे कठीणच असते.' सर्वसामान्य नागरिकांच्या भावनांना हात घालून त्या अनुकूल करण्याचे कौशल्य तर क्रुश्चेव्हच्या वरील उद्गारांत व्यक्त आहेच, पण त्याबरोबरच त्याचा व्यवहारीपणाही स्पष्ट होतो. तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण करून स्वतःला भाष्यकार म्हणवून मिरवण्याचा हव्यास धरणारा नेता शब्दजंजाळात गुरफटतो व शेवटी त्यालाच नव्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप येऊ लागते. विचारांचा आणि आचारांचा कर्मठपणा त्यातून उद्भवतो, त्यामुळे सर्व वर्तनाला ताठरपणा प्राप्त होतो. हुकूमशाही मनोवृत्ती बळावण्यामागे जी अनेक कारणे असतात त्यांपैकी हे एक कारण असते.

युद्धोत्तर काळातील आणि विशेषतः स्टालिनच्या शेवटच्या एकदोन वर्षांतील परिस्थितीत रशियन लोकांची बदलती मनःस्थिती कोणत्या गोष्टींना अनुकूल आहे हे क्रुश्चेव्हला समजू शकले. स्टालिनप्रमाणे नव्या परिस्थितीत संपूर्ण हुकूमशाही पचनी पडणार नाही, क्रेमलिनच्या प्रासादात बसून पूर्वीप्रमाणे राज्ययंत्र चालविता येणार नाही याचीही त्याला खात्री पटली असावी. म्हणूनच तो देशात अनेक ठिकाणी दौरे करतो, लोकांच्या भेटीगाठी घेतो, जाहीर सभांतून भाषणे करतो, कोणत्याही घटनेची प्रत्यक्ष पाहणी करणे आणि त्यासंबंधी स्वतः माहिती मिळवणे त्याला आवश्यक वाटते. त्याने परदेशांत अनेकदा प्रवास केला आणि लोकमतही समजून घेण्याचा प्रयत्न केला.

## स्टालिन आणि क्रुश्चेव

स्टालिनची परिस्थिती याच्या अगदी उलट असे. त्याने आपल्या कारकिर्दीच्या शेवटच्या वीस वर्षांत खुद्द रशियातच कधी प्रवास केला नाही. परदेशांतही फक्त युद्धकाळात अपरिहार्य म्हणून त्याला आंतरराष्ट्रीय बड्यांच्या परिषदांना हजर रहावे लागले. महिनोगणती तो क्रेमलिनच्या बाहेर पडत नसे. शहराबाहेरच्या निवासस्थानी कधी गेलाच तर मोठ्या बंदोबस्तात आणि संरक्षणात जात असे. क्रेमलिनच्या महा-

द्वारापासून शहराबाहेरच्या त्याच्या निवासस्थानापर्यंत दर दहा पाच फुटांवर पोलीस उभे असत. रस्त्यांवरील इतर वाहतूक बंद ठेवली जाई. रस्त्यावर उभे राहणे किंवा रस्त्यालगतच्या इमारतीतून बाहेर डोकावण्याला बंदी असे. अशा निर्मनुष्य रस्त्यावरून स्टालिनची मोटार अचानकपणे निघून जाई. अशा स्थितीत, स्टालिनचे लोकांना आणि लोकांचे स्टालिनला दर्शन घडणे जवळजवळ अशक्यच असे. क्रुश्चेव्हचे वर्तन यापेक्षा निराळे आहे. तो जाहीर सभारंभांत तर भाग घेतोच, पण त्याला जाण्यायेण्यासाठी औपचारिकपणाही पाळावा लागत नाही.

## ' प्रवदा 'च्या कचेरीत

' प्रवदा ' हे रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र. या दैनिकाच्या कचेरीत आम्ही गेलो, तेव्हा प्रथम दाराशीच एक सहसंपादक आणि इंजिनिअर आमच्या स्वागतासाठी उभे होते. आशियातील राजकीय विभागाचे प्रमुख म्हणून सहसंपादकांनी स्वतःची ओळख करून दिली. इंजिनियरने ' प्रवदा 'चा छापखाना दाखवावयाचा आणि सहसंपादकांनी संपादकीय कामकाजाची माहिती सांगावयाची अशी त्यांनी कामाची विभागणी अगोदरच ठरवून ठेवलेली होती. त्याप्रमाणे प्रथम छापखान्याच्या निरनिराळ्या भागांतून आम्ही फिरलो. या छापखान्यात केवळ ' प्रवादा 'च छापला जात नाही. निरनिराळ्या संघटनांची आणखी चार दैनिकेहि तेथे छापली जातात. एकॉनॉमिक गॅझेट, रूरल लाईफ इत्यादि तीस मासिकांचे मुद्रणही याच छापखान्यात केले जाते. आफ्रिकेतील काही भाषांची मासिके आणि पुस्तके छापण्याचा एक स्वतंत्र विभाग अलीकडेच सुरू करण्यात आला आहे. हिंदी, उर्दू आणि बंगाली भाषांतील अनुवादित प्रचारसाहित्यही मोठ्या प्रमाणात येथेच छापण्यात येते.

क्रुश्चेव्हच्या भाषणाचा एक संग्रह इंग्रजीत छापण्याचे काम चालू होते, तेथे थोडा वेळ आम्ही थांबलो. या पुस्तकाच्या किती प्रती छापण्यात येत आहेत, असे विचारले असता प्रेसमनपासून इंजिनिअरपर्यंत सगळेच एकमेकांकडे पाहू लागले. दोन मिनिटांनंतर इंजिनिअरने सांगितले, ' मला निश्चित आकडा माहीत नाही. पण बहुधा दहा ते वीस लाखांच्या दरम्यान असावा. '

रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे सर्व प्रचारसाहित्य येथेच छापले जाते. आणि जगातील बहुधा सर्व देशांच्या कम्युनिस्ट पक्षांना मार्गदर्शन करणारी नियतकालिके, पुस्तके, पुस्तिका आणि इतर साहित्य येथेच मुद्रित होते. त्यामुळे छापखान्याचा पसारा किती अवाढव्य असेल याची कल्पना येऊ शकेल.

संपादकीय कचेरीत—म्हणजे संपादकीय कचेरीच्या आशियाई विभागात—बरीच

छायाचित्रे लावलेली होती. त्यांत इन्डोशियातील कम्युनिस्ट पक्षाची पोलिसांशी झालेली दंगल, मलायातील कम्युनिस्टांचे गनिमी युद्ध इत्यादि प्रसंगांची छायाचित्रेही होती.

सहसंपादकांनी ' प्रवदा 'संबंधी प्राथमिक माहिती सांगितली. या पत्राचा एकंदर खप साठ लाख असून त्यापैकी ३५ लाख खुद्द मॉस्कोत छापले जाते व बाकीची छपाई इतर सोळा ठिकाणी केली जाते. संपादकीय विभागात सोळा खाती असून त्यांतील चार खाती केवळ परराष्ट्रीय धोरणाचा विचार करतात. आठवड्यातून तीन वेळा ६ पाने आणि चार वेळा ४ पाने छापली जातात. 'टास' वृत्तसंस्थेखेरीज देशात आमचे सुमारे १५० आणि मॉस्कोत ३५ बातमीदार आहेत. त्याखेरीज ५५ देशांतही बातमीदार नेमलेले आहेत.

दररोज साठ लाख खप असलेल्या या पत्राची फक्त ४ पाने असतात. न्यूज-प्रिंटचा तुटवडा असल्यामुळे पृष्ठसंख्येत काटकसर करावी लागते असे सहसंपादकांनी सांगितले. चार पानांची किंमत २० कोपेक ( सुमारे १६ नये पैसे) आणि सहा पानांची किंमत ३० कोपेक (सुमारे २४ नये पैसे). भारतातील वृत्तपत्रांच्या किंमतीपेक्षा ती किंमत जवळजवळ तिप्पट अधिक आहे.

' प्रवदा 'च्या चार पानांपैकी दोन पानांत संपादकीय लेख, टीपा टिपणी, रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांची भाषणे, पक्षाचे धोरण जाहीर करणारी पत्रके आणि तत्सम मजकूर असतो. उरलेल्या दोन पानांपैकी एका पानावर रशियातील बातम्या आणि वाचकांचा पत्रव्यवहार आणि एका पानावर जगातील वृत्त दिलेले असते. अलीकडे वाचकांचा पत्रव्यवहार खूपच वाढला आहे. आणि त्यात कारभारावर टीका करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. सरकारी कारभारावर, सामुदायिक शेतीच्या गैरकारभारावर, कारखान्यातील अव्यवस्थेवर लोक टीका करू शकतात. अर्थात हे सर्व दोन तीन कालमांतच आटोपले पाहिजे.

## सर्व वृत्तपत्रे सरकारची

रशियातील सर्व वृत्तपत्रे शासनसंस्थेच्या नियंत्रणाखाली असतात. कम्युनिस्ट पक्षाची निराळी नियतकालिके असली तरी हा पक्षच एकमेव सत्ताधारी असल्यामुळे त्याचे जे धोरण असेल तेच अधिकृत मानले जाते. त्याचाच प्रसार व प्रचार सर्व वृत्त-पत्रांकडून केला जातो. कम्युनिस्ट पक्षाखेरीज कामगार संघटना, युवक संघटना, महिला संघटना यांचीही निरनिराळी नियतकालिके प्रसिद्ध होतात. साहित्य, शास्त्रीय संशोधन, इतिहास, कला, क्रीडा, परदेशी वाङ्मय इत्यादि विविध विषयांचीही अनेक नियतकालिके प्रकाशित होतात. अशा सर्व नियतकालिकांची संख्या दहा हजारापेक्षाही अधिक आहे. मॉस्को आणि लेनिनग्राड येथे प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांची संख्या तुलनेने अधिक असली तरी इतर राज्यांच्या राजधान्यांतही त्या त्या भाषांच्या नियतकालिकांची

संख्याही भरपूर प्रमाणात आहे. रशियात निरक्षरता जवळजवळ राहिलेली नाही. त्यामुळे वाचकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. विविध भाषा प्रचलित असल्यामुळे त्या भाषांतील वाचकांसाठी सर्व प्रकारची वृत्तपत्रे व नियतकालिके प्रकाशित होतात. त्यांपैकी साडेसात हजार वृत्तपत्रे साठ भाषांतून प्रसिद्ध होतात आणि त्यांचा दररोजचा खप सुमारे साडेपाच कोटीच्या जवळपास आहे. त्याशिवाय साप्ताहिके, मासिके आणि इतर नियतकालिके मिळून दोन हजार विविध विषय प्रसारित करतात व त्यांचा खप एकूण छत्तीस कोटीच्या जवळपास आहे.

रशियात संख्येच्या दृष्टीने नियतकालिके भरपूर असली तरी त्यांचे राजकीय धोरण मात्र एकच एक असते. अधिकारारूढ कम्युनिस्ट पक्षाला पाठिंबा देणे आणि त्या पक्षाची धोरणे प्रचारित करणे हेच त्यांचे राजकीय ध्येय. देशात दुसरा पक्ष नाही आणि पक्षातील विरोध जाहीरपणे व्यक्त करता येत नाही. आपले विचार व्यक्त करण्यासाठी कोणालाही वृत्तपत्र अथवा नियतकालिक प्रसिद्ध करण्याची शक्यता नाही. सर्व छापखाने शासनसंस्थेच्या मालकीचे असतात आणि वृत्तपत्रांना लागणारा कागद व इतर साहित्यही शासनसंस्थेच्याच हाती असते. त्यामुळे शासनसंस्थेच्या धोरणाला, दोषांना किंवा चुकांना विरोध व्यक्त करणे शक्य नसते आणि शासनसंस्थेला त्याची आवश्यकताही वाटत नाही. वृत्तपत्रांच्या स्पर्धेचा प्रश्नच तेथे उद्‌भवत नाही. सर्व नियतकालिकांचे आणि वृत्तपत्रांचे अंतिम धोरण कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणावरच अवलंबून असते. कम्युनिस्ट पक्ष, किंवा अधिक अचूक अर्थाने सांगावयाचे तर, त्या पक्षाचे सर्वश्रेष्ठ नेते मार्क्सवाद-लेनिनवादाची सूत्रे ठरवून टाकतात आणि त्या सूत्रांचाच सर्व क्षेत्रांतील नियतकालिकांत प्रसार करण्यात येतो. त्यापेक्षा निराळे स्पष्टीकरण किंवा भाष्य करणे शक्यच नसते. मग ते नियतकालिक राजकीय चर्चा करणारे असो, वाङ्मयीन समीक्षा करणारे असो किंवा संगीतनाट्यादि कलांची मीमांसा करणारे असो. या नियतकालिकांच्या बाबतीत आणखी एक निराळे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक विषयाच्या चर्चेला राजकीय रंग देण्याची त्यांना सवय असते. उदाहरणार्थ, स्पुटनिक अवकाशात सोडल्यामुळे शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रात रशियाने आघाडी मारली. एवढे सांगून रशियन नियतकालिकांचे समाधान होणार नाही. राजकीय विषयाचे नियतकालिक नसले तरी ते " रशियाने भांडवलशाही राष्ट्रांवर विजय मिळविला " असा मथळा देईल.

## प्रवदा आणि इझवेस्तिया

रशियात प्रवदा आणि इझवेस्तिया ही दोन वृत्तपत्रे प्रमुख आहेत. त्यांच्याच छोट्या मोठ्या आवृत्त्या सर्व राज्यांत प्रसिद्ध होतात. प्रवदा (सत्य) हे कम्युनिस्ट

पक्षाचे मुखपत्र आहे. ते एकाच वेळीं सर्व राज्यांत प्रसिद्ध केले जाते. त्याचा प्रसार सर्व रशियात मिळून साठ लाखांच्या जवळपास आहे. त्याची मुख्य कचेरी मॉस्को येथे असून तेथे आवृत्ती तयार झाली की विमानानें याच्या मेट्रीसा (साचे) इतर राज्यांच्या राजधान्यांना पाठवून दिल्या जातात आणि तेथे स्थानिक आवृत्ती म्हणून ते छापले जाते. रशियातील राजकारण आणि परराष्ट्र धोरण या सर्वांची अधिकृत मते प्रथम या पत्रात प्रसिद्ध होतात. आणि नंतर इतर वृत्तपत्रांना ती प्रसिद्ध करता येतात. इझवेस्तिया (वार्ता) रशियन सरकारचें अधिकृत मुखपत्र आहे. त्याचा प्रसार पंधरा ते वीस लाखांच्या दरम्यान असून त्यात सरकारी हुकूम, शासनयंत्रणेतील कामकाजांचे धोरण, इतर राज्यांच्या सरकारांची धोरणे इत्यादि स्वरूपाच्या बातम्या प्रसिद्ध होत असतात.

वृत्तपत्रांना देशातील आणि परदेशांतील बातम्या पुरविण्याचे काम 'टास' या रशियन वृत्तसंस्थेकडून केले जाते. या संस्थेच्या जगभर शाखा असून रशियातील प्रमुख शहरांतही तिच्या कचेऱ्या आहेत. रशियात दुसरी वृत्तसंस्था नाही. आणि बाहेरच्या वृत्तसंस्थांच्या बातम्या 'टास'मार्फतच दिल्या जातात. त्यामुळे जगातील घडामोडी असोत किंवा रशियन सरकारचे धोरण असो, देशातील निरनिराळ्या हालचाली असोत किंवा परदेशांतील घटना असोत, त्या सर्वांची वृत्त-पाणपोई म्हणजे 'टास'. कोणती बातमी किती आणि कशा स्वरूपात प्रसिद्ध करावयाची हे टासचे संचालक ठरवितात आणि हे संचालक शासनसंस्थेने नेमलेले असतात. अशा सर्व परिस्थितीमुळे रशियात ज्या बातम्या प्रसिद्ध होतात त्यांच्या निरनिराळ्या बाजू समजून घेण्याची किंवा त्यांचा खरेखोटेपणा तपासून पाहण्याची शक्यताच नसते. स्थानिक तारखात्याचा जो मुख्य अधिकारी असतो तोच टास वृत्तसंस्थेचाही मुख्य संचालक असतो.

रशियातील वृत्तपत्रे वाचनीय नसतात असा परदेशी वाचकांचा अभिप्राय असतो. रशियन पत्रकारांशी बोलत असताना हा अभिप्राय त्याला सांगितल्यास तो अमान्य करीत नाही. पण पश्चिमेकडील वृत्तपत्रे खळबळजनक बातम्या आणि भडक स्वरूपात घटना रंगवून प्रसिद्ध करतात त्यामुळे तिकडेही त्या घटनेचे सत्य स्वरूप समजू शकत नाही, असा रशियन पत्रकारांचा आक्षेप असतो. पण त्याबरोबरच रशियाबाहेरच्या वृत्तपत्रांत एकाच घटनेची विविध स्वरूपात आणि विविध दृष्टिकोनातून बातमी प्रसिद्ध होते आणि तिचा अन्वयार्थ लावणे वाचकांच्या चिकित्सक वृत्तीवर सोपविण्यात येते. उलट रशियात एकाच स्वरूपाची बातमी प्रसिद्ध होते आणि तीच अधिकृत मानण्यात आल्यामुळे तिची दुसरी बाजू समजून घेता येत नाही. त्यामुळे या वृत्तपत्रांची वृत्ती गुदमरून टाकण्याइतकी एकांगी बनलेली दिसून येते. 'प्रवदा'-सारखे सर्वांत मोठे दैनिक दररोज फक्त सहा पाने आणि मधून मधून चार पाने प्रसिद्ध

करते. यावरून बातम्यांचा किती संकोच होत असेल याची कल्पना येईल.

रशियन वृत्तपत्रांत जाहिराती प्रसिद्ध होत नाहीत. तेथे जाहिराती देऊन माल खपविण्याची गरजही नसते. त्याचे एक कारण म्हणजे सर्व वस्तूंचे उत्पादन सरकारी क्षेत्रातच होत असल्यामुळे मालाची मुद्दाम जाहिरात करण्याचे कारण पडत नाही. वस्तूंची विविधता, निरनिराळी उपयुक्तता, वैशिष्ट्ये आणि किमतीतील फरक असेल तरच त्या वस्तूंचे उत्पादक आपल्या मालाची जाहिरात करून बाजारपेठेतील स्पर्धेत पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतात. पण रशियातील वस्तूंचे उत्पादन आणि विक्री सरकारच्याच हाती असते आणि कोणत्या वस्तूची किती निर्मिती करावयाची हेही सरकारच ठरवीत असते. वस्तूंची संख्या सामान्यतः लोकांच्या गरजा भागविण्या-इतकी उपलब्ध नसल्यास जाहिरात देण्याची गरजच पडत नाही. उलट, अशा तुटीच्या वेळी जाहिरात दिल्यास वस्तू मागणारांचा एक प्रकारे उपद्रवच सुरू होईल. रशियात जीवनोपयोगी वस्तूंचा अद्यापही तुटवडा भासत असल्यामुळे वृत्तपत्रीय जाहिरातींची गरज नसते.

## एकांगी प्रचार

अपघात किंवा तत्सम अनपेक्षित घटना प्रसिद्ध करण्याची रशियात प्रथा नाही. अपघात घडला तरी तो शासनसंस्थेच्या यंत्रणेमार्फतच घडण्याची शक्यता असते. त्यामुळे शासनसंस्थेविषयी मत कलुषित करणे इष्ट समजले जात नाही. रशियन वृत्त-पत्रे मुख्यतः पक्ष आणि सरकार यांच्या धोरणाच्या प्रचारासाठी प्रसिद्ध होत असल्या-मुळे त्यांतील अग्रलेखांची लांबी सहासात कॉलमपर्यंत असते. त्यामानाने बातम्या मात्र अगदी संक्षिप्त आणि त्यांचा तपशीलही क्वचितच दिला जातो. संपादकीय टिपणे आणि पक्षाचे धोरण यांतच वृत्तपत्राची निम्मी जागा अडविली जाते. विसाव्या काँग्रेसमध्ये क्रुश्चेव्हने केलेले ऐतिहासिक स्वरूपाचे भाषण आणि त्यावरील प्रति-निधींची प्रतिक्रिया रशियन वृत्तपत्रांत लगोलग प्रसिद्ध झाली नाही. तसेच स्टालिनच्या मृत्यूपूर्वी मॉस्कोमध्ये डॉक्टरांचे कारस्थान खूपच गाजले होते. काही डॉक्टरांनी कट करून लष्करातील प्रमुख सेनापतींना औषधाऐवजी विष दिले; असे त्या कारस्थानाचे स्वरूप सांगण्यात येत होते. वस्तुतः ही घटना देशाच्या दृष्टीने फार गंभीर स्वरूपाची होती. पण इझवेस्तियामध्ये तिच्यासंबंधी फक्त दहापाच ओळी प्रसिद्ध झाल्या आणि प्रवदाने तर तिची दखलही घेतली नव्हती.

## परदेशी वृत्तपत्रे

रशियात परदेशी वृत्तपत्रे स्टालिनच्या काळात मुळीच येऊ शकत नव्हती. फक्त

परराष्ट्र खात्याच्या कचेरीत थोड्या प्रती आणि त्याही निवडक वृत्तपत्रांच्या येत असत. क्रुश्चेव्हच्या काळातही त्या धोरणात फरक झालेला नाही. अपवाद म्हणजे इंग्लंडमधील कम्युनिस्ट पक्षाचे डेली वर्कर हे वृत्तपत्र. 'डेली वर्करचा खप इंग्लंडपेक्षा रशियात अधिक आहे' असे विनोदाने म्हटले जाते. त्यातील अतिशयोक्तीचा भाग वगळला तरी या वृत्तपत्राखेरीज इतर कोणतेही वृत्तपत्र रशियात विकले जात नाही, आणि मागविताही येत नाही. कम्युनिस्ट देशांची वृत्तपत्रे वाचनालयांत ठेवलेली असतात. भारतीय वृत्तपत्रांना सार्वजनिक ठिकाणी कोठेच स्थान नाही.

## कुठे आहे स्वातंत्र्य ?

'प्रवदा'च्या कचेरीत रशियातील वृत्तपत्रांच्या स्वरूपासंबंधी चर्चा चालू असता, रशियात मुद्रणस्वातंत्र्य नाही असे आमच्यापैकी कोणीतरी विधान केले. त्याबरोबर आम्हांला माहिती सांगणाऱ्या संपादकाने रशियाच्या राज्यघटनेतील १२५व्या कलमाचा उल्लेख केला आणि सांगितले, 'आमच्या घटनेत मुद्रण, भाषण स्वातंत्र्याची हमी दिलेली आहे.'

'पण ही हमी आमच्या दृष्टीने केवळ शाब्दिक वाटते.'

'ती कशी ?'

'मुद्रणाची सर्व यंत्रणा शासनसंस्थेच्या हाती आहे. त्यामुळे मुद्रणाचे स्वातंत्र्य शासनसंस्थेला आहे असे म्हणता येईल. पण सर्वसामान्य नागरिकांनी या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची शक्यता नाही. भाषणस्वातंत्र्याचे असेच म्हणता येईल. शासनसंस्थेच्या प्रवक्त्याशिवाय इतरांना राजकीय प्रश्नांसंबंधी आपले स्वतःचे विचार मांडता येण्याची शक्यताच नसते. एखाद्या सार्वजनिक सभेत तुम्ही शासनसंस्थेच्या किंवा कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणातील दोष दाखवू शकाल काय ? ते शक्य नसेल तर मुद्रणस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य यांना घटनेचा आधार दाखवून कोणाचेही समाधान होऊ शकणार नाही. सर्व वृत्तपत्रे आणि मुद्रणयंत्रे सरकारी मालकीची आहेत. लोकांना मुद्रण यंत्र बाळगताच येत नाही. मग मुद्रणस्वातंत्र्याचा अर्थ काय ?'

'आमच्या देशात शासनसंस्था आणि जनता एकरूप आहेत. त्यामुळे शासनसंस्थेला मिळालेला मुद्रणाचा अधिकार जनतेनेच दिलेला आहे.

'पण हे खरे असेल तर, घटनेत मुद्रणस्वातंत्र्याचा मुद्दाम उल्लेख करण्याची गरजच काय ?'

'तुम्ही ज्याला लोकशाही देश म्हणता त्या देशांतील वृत्तपत्रांचे स्वरूप पाहिल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांना तेथे मुद्रणस्वातंत्र्य कितपत उपभोगता येते ?'

'लोकशाही समजल्या जाणाऱ्या देशांत भांडवलदारांच्या हाती काही वृत्तपत्र

असतात आणि त्यामुळे ते आपल्या हितसंबंधांना उपयोगी पडेल असे धोरण आपल्या वृत्तपत्रांतून अमलात आणतात हे कोणीही नाकारणार नाही. भांडवलदारांच्या धोरणामुळे संपादकांच्या स्वातंत्र्याला मुरड पडते हेही खरे आहे. पण भांडवलदार झाला तरी त्यालाही आपल्या पत्राच्या खपासाठी का होईना अनेक मर्यादा पाळाव्या लागतात. सतत असत्य प्रचार करणारे पत्र आणि एकच एक बाजू सातत्याने भडकपणे रंगविणारे पत्र फार काळ टिकू शकत नाही असा आमचा अनुभव आहे. धंद्याच्या दृष्टीनेही भांडवलदाराला सतत लोकविरोधी भूमिका परवडणे शक्य नसते. आणि या सर्वांपेक्षा महत्त्वाचा मुद्दा असा की, कोणाही नागरिकाला आमच्या देशात वृत्तपत्र प्रकाशित करता येते आणि आपले विचार व्यक्त करता येतात. अशी शेकडो वृत्तपत्रे आमच्या देशात चालू आहेत आणि ती शासनसंस्थेच्या गुणदोषांची निर्भीडपणे चिकित्साही करतात. भांडवलदारांच्या पत्रांचे समर्थन म्हणून नव्हे, पण तुमच्या देशातील वृत्तपत्रांपेक्षा आमच्या देशातील भांडवलदारी वृतपत्रांनादेखील अधिक स्वतंत्रपणे विचार प्रसार करता येतो असे आम्हांला वाटते.'

'तुमच्या देशातील वृत्तपत्रे मी पाहिली नाहीत. पण पश्चिमेकडील बृत्तपत्रे गुन्ह्यांच्या भडक बातम्या देऊन किंवा अपघात, स्त्री-पुरुषांचे संबंध, व्यापारी स्पर्धा इत्यादींना अनावश्यक महत्त्व देतात. लोकांच्या हीन भावनांना उत्तेजित करून खप वाढवितात. जाहिराती मिळविण्यासाठी कारखानदारांची खोटी प्रशंसा करतात. शासनसंस्थेतील एखाद्या गटाला हाताशी धरून गुप्त रहस्ये बाहेर फोडण्यात धन्यता मानतात. वैयक्तिक निंदानालस्ती करून बातम्यांना अधिक रंगीत बनवितात आणि हे सर्व वैयक्तिक नफा मिळविण्यासाठी करतात असे माझे मत झाले आहे. तेथे मुद्रणस्वातंत्र्य असेलच तर ते बड्या बृत्तपत्रांच्या मालकांना असते असे मला वाटते.'

'प्रथम हे विधान सरसकट सगळ्या बृत्तपत्रांना लागू करता येणार नाही. अनेक बृत्तपत्रांना लोकशाहीच्या परंपरा आहेत. त्यांना आपली प्रतिष्ठा केवळ नफ्यासाठी घालविता येत नाही. पण वादाकरिता तुमचे म्हणणे संपूर्ण खरे आहे असे म्हटले तरी, हीच स्थिती पण निराळ्या स्वरूपाची आणि निराळ्या संदर्भात रशियन बृत्तपत्रांचीही दिसून येते. या बृत्तपत्रांचे सूत्र सर्वस्वी सत्तारूढ गटाच्या हाती असते. या गटाने घेतलेला निर्णय भडकपणे प्रसिद्ध करून त्याची सत्ता स्थिर करण्यास या बृत्तपत्रांचा उपयोग होतो. शासनसंस्थेने घेतलेले निर्णय वृत्तपत्रांत छापले जातात आणि ते सर्व शंभर टक्के खरे आहेत असे बृत्तपत्रे प्रतिपादन करीत असतात. त्यामुळे अंतर्गत धोरण असो की परराष्ट्रीय धोरण असो त्यासंबंधीच्या बातम्या आणि भाष्य संपूर्ण सत्य आहे असे येथील वाचक गृहीतच धरून चालतात. अशा स्थितीत राज्यकर्त्यांना सत्य अर्धसत्य किंवा असत्यही आपणास हव्या त्या पद्धतीने लोकांसमोर मांडणे शक्य असते. आणि जनतेच्या हिताच्या नावाने तुमची बृत्तपत्रे त्याचे समर्थनही करीत असतात.

स्टालिनच्या काळात सतत तीस वर्षे अनेक चुका होत गेल्या. त्यांची जंत्री त्याच्या मृत्यूनंतर, क्रुश्चेव्हच्या मुखातून बाहेर आल्यानंतरच तुमच्या वृत्तपत्रांत लोकांना दिसली. अनेक पुढाऱ्यांना सत्तेवरून हाकून लावण्यात आले. अनेक क्रांतिकारकांना फासावर लटकावण्यात आले. पण त्या बिचाऱ्यांना त्यांचे म्हणणे रशियातील एकाही वृत्तपत्रात मांडता आले नाही. यालाच आम्ही लोकांना मुद्रणस्वातंत्र्य नाही असे म्हणतो. अधिकारारूढ गटाने केलेले आरोप मान्य करण्याशिवाय गत्यंतर नसते. कारण ज्याच्यावर आरोप होतो त्याच्याजवळ मुद्रणसामर्थ्य नसते आणि मुद्रणस्वातंत्र्यही नसते.'

'जनतेचे शत्रू किंवा जनतेचा विश्वासघात करणारे लोक यांना आमच्या देशात मुद्रणस्वातंत्र्य मिळू शकत नाही हे खरे आहे.'

'पण ज्यांना तुम्ही जनतेचे शत्रू म्हणता त्यांचे म्हणणे तरी काय आहे हे जनतेला समजले पाहिजे आणि मग जनतेनेच त्यांचा धिक्कार केला पाहिजे, अशी आमची धारणा आहे. तुमच्या वृत्तपत्रांतून याच्या उलट प्रकार दिसून येतो. कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीने निर्णय घेतला की तो तुम्ही प्रकाशित करता आणि जनतेला तो संपूर्णपणे मान्य आहे असेही गृहीत धरता. याचा अर्थ, तुमचा प्रचार एकतर्फी चालतो. त्याला पक्षपाती स्वरूप आहे असे तरी म्हणावे लागेल किंवा शासनसंस्थेने प्रसिद्ध केलेली वृत्तपत्रेच वाचण्याची गेली चाळीस वर्षे सवय जडल्यामुळे स्वतंत्र वृत्तपत्रे काय करू शकतात याचा जनतेला अनुभव नाही असे तरी म्हटले पाहिजे. आमच्या दृष्टीने मात्र वैयक्तिक जीवनाला गुदमरून टाकणारी ही परिस्थिती आहे.'

'आमच्या आणि तुमच्या मूल्यमापनात फरक आहे, एवढेच मी म्हणेन.'

## लेखकांची वसाहत

मॉस्कोपासून काही मैलांवर एक छोटीशी पण टुमदार वसाहत आहे. मॉस्को विद्यापीठाच्या पश्चिमेला 'लेनिन हिल' नावाची एक टेकडी असून तिच्या पलीकडे ही वसाहत वसविलेली आहे. शहराच्या गजबजाटापासून दूर असलेली आणि निसर्गाच्या सान्निध्यात विशेष खुलून दिसणारी ही लेखकांची वसाहत आहे. या शांत आणि रम्य अशा वसाहतीत रशियातील अनेक प्रसिद्ध लेखक, नाटककार, कवी, अनुवादक आणि संपादक राहतात. याच वसाहतीत अलीकडेच गाजलेला जगप्रसिद्ध कवी आणि लेखक पास्टरनॉक राहत होता. त्याच्या डॉ. झिवॅगो या कादंबरीने जगाच्या साहित्यक्षेत्रात नुकतेच वादळ उठविले होते. ही कादंबरी रशियात प्रसिद्ध होऊ शकली नाही. तिचे हस्तलिखित अन्य मार्गाने रशियाच्या सीमेबाहेर गेले. तिकडेच तिचे पहिले

मुद्रण-प्रकाशन झाले. रशियातील शासनपद्धती, राज्यकर्ते, तरुणांची मनःस्थिती, सांस्कृतिक वातावरण इत्यादि अनेक गोष्टींवर या कादंबरीत प्रकाश टाकलेला आहे. रशियन राजकर्त्यांना न आवडणाऱ्या अनेक घटनांचा उल्लेख त्या कादंबरीत झालेला आहे. अशी कादंबरी प्रथम रशियाबाहेर प्रसिद्ध व्हावी ही गोष्ट रशियन राज्यकर्त्यांच्या मनाला खूपच लागली असावी. त्यामुळे पास्टरनॉकवर अनेक निर्बंध लादले गेले. त्याला मिळालेले नोबेल पारितोषिक स्वीकारण्यास बंदी करण्यात आली. लेखकांच्या या वसाहतीत पास्टरनॉक अनेक वर्षे राहत होता. त्याच्या साहित्यावर निर्बंध येऊ लागले तेव्हा त्याने स्वतंत्र साहित्यनिर्मिती सोडून दिली आणि परदेशी वाङ्मयाचे अनुवाद केले.

डॉ. झिवॅगो कादंबरीच्या निमित्ताने साहित्यक्षेत्रात उठणारा वादळाचा असा क्वचित प्रसंग वगळला तर रशियन साहित्य आणि साहित्यिक यांच्या क्षेत्रात वादळ नाही, खळबळ नाही. सारे कसे शांत शांत असते. लेखकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उद्भवत नाही. विचारांच्या बंडखोरीचाही प्रश्न उद्भवत नाही. साहित्यक्षेत्रातही नियोजन आणि नियंत्रण यांचे उपचार चालू असतात. मार्क्सवादाच्या दृष्टिकोनाशी विसंगत लिहिणे, पाखंड मानले जाते. आणि कम्युनिस्ट पक्षाने ठरविलेल्या धोरणावर टीका करणे जनताद्रोह ठरतो. त्यामुळे या दोन वाटांकडे न वळता जो लेखक साहित्यनिर्मिती करतो त्याला काहीही कमी पडत नाही. त्याची सांपत्तिक स्थिती उत्तम बनते. त्याला प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होते. रशियातील सर्वांत संपत्तिमान वर्गात तेथील लेखकांची गणना केली जाते. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक आणि कलावंत या चार वर्गांना समाजात वरचे स्थान मिळते. संपत्ती आणि मानमरातब दोन्ही दृष्टींनी हे वर्ग उच्च समजले जातात. त्यासाठी वर उल्लेखलेली दोन पथ्ये मात्र पाळणे आवश्यक असते. लेखकांच्या वसाहतीत ज्या सुखसोयी उपलब्ध आहेत त्या इतरत्र क्वचितच पाहावयास मिळतील. येवढे सर्व असूनही गेल्या चाळीस वर्षांत अभिजात साहित्यिक म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल असे किती लेखक, कवी आणि नाटककार झाले असा प्रश्न विचारला असता, मिळणारे उत्तर समाधानकारक वाटत नाही. रशियात पुष्कीन, टॉलस्टॉय, डोस्टव्हस्की, टर्जिनॉव्ह, गोगोल, चेकॉव्ह, इत्यादि लेखक श्रेष्ठांची नामावली अभिमानाने सांगण्यात येते. त्यांची परंपरा क्रांतीनंतर खंडीत झाली. की काय असा प्रश्न विचारला जातो, तेव्हा काही 'पुरोगामी' लेखकांची नावे सांगण्यात येतात. त्यांची पुस्तके रशियात लाखांनी खपतात. पण त्यांची नावे रशियाबाहेरच्या वाचकांना क्वचितच परिचित असतात.

## ' नॉट बाय ब्रेड अलोन '

साहित्यक्षेत्रात अगदी अलीकडे एका कादंबरीच्या प्रकाशनामुळे रशियन टीकाकारांत खूपच खळबळ उडाली. क्रुश्चेव्हच्या काळात साहित्यनिर्मितीवरील काही बंधने दूर झाल्याचे जसे ते चिन्ह मानले जाते तसेच, रशियन लेखकांतही विचारांच्या दृष्टीने अशांतता व्यक्त करण्याची धडपड चालू आहे याचेही ते एक प्रतीक आहे. ज्या रशियन कादंबरीने लेखकांना, समीक्षकांना आणि राज्यकर्त्यांनाही अशांत केले त्या कादंबरीचे नाव " नॉट बाय ब्रेड अलोन " असे असून ती डुडीनस्टेव्ह या लेखकाने लिहिली आहे. ' नोव्हि मीर ' या मासिकात ती प्रथम क्रमशः प्रसिद्ध झाली. रशियन वाचकांनी तिचे कल्पनेपेक्षाही अधिक स्वागत केले. स्वतः लेखक युद्धकालांत आघाडीवर होता. त्याने त्या काळचे अनेक प्रसंग कादंबरीत चित्रित केले आहेत. युद्धकालात रशियन मनाच्या प्रतिक्रिया त्यात व्यक्त झाल्या आहेत. रशियाच्या प्रगतिमार्गातील प्रयोग, राज्यकर्त्यांचे धोरण आणि समर्थन हे व्यक्त करीत असताना कादंबरीत त्यावर टीकाही केलेली आहे. स्टालिनच्या काळातील परिस्थितीचे चित्र या कादंबरीत प्रतिबिंबित झाले आहे. पण त्याबरोबरच सोव्हिएट पद्धतीवर प्रखर टीकाही झालेली आहे. त्यामुळे क्रुश्चेव्हच्या राजवटीत या कादंबरीसंबंधी धोरण व्यक्त करणे अडचणीचे होऊन बसले

या कादंबरीचे कथानक तसे पाहिले तर अगदी सुटसुटीत आणि रशियन वास्तववादाच्या चौकटीत बसणारेच आहे. एका शिक्षकाला यांत्रिक विषयाची आवड असते. तो फावल्या वेळीं निरनिराळे प्रयोग करून नवे संशोधन करीत असतो. शेवटी त्याला ड्रेन पाईपच्या एका अभिनव पद्धतीचा शोध लागतो. त्याचे मत असे की, या पद्धतीने ड्रेन पाईप तयार केल्यास देशाचा फार मोठा आर्थिक फायदा होईल. त्याने आपला शोध अनेकांना दाखविला. पण त्याला कोठेही मान्यता मिळाली नाही. वरिष्ठ अधिकारी त्याच्या मार्गात आडवे येऊ लागले. विशेषतः, एका अधिकाऱ्याने तर त्याला इतके नामोहरम केले की शेवटी आत्महत्या करून आपले अपमानित जीवन संपवावे असे विचार त्याच्या मनात येऊ लागले. त्याची उपासमार होऊ लागली. दैन्याबरोबर वैफल्याची आणि निराशेची जोड मिळाली. समाजावर, राज्यकर्त्यांवर, शासनपद्धतीवर आणि स्वतःवरही तो चिडतो, वैतागतो आणि टीका करू लागतो. त्याच्या अशा वागण्याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. तो जनताद्रोही ठरला आणि सायबेरियात त्याची रवानगी झाली. पण त्याच्या खटल्याचे काम ज्या न्यायालयापुढे चालले, त्यातील एका न्यायाधीशाच्या त्या शिक्षक-यंत्रज्ञाची मनःस्थिती लक्षात येते आणि शेवटी त्याच्या प्रयत्नामुळे त्या बिचाऱ्या शिक्षकाची मुक्तता होते. यानंतर कथानकाची नीरगाठ उकलत जाते. त्याच्या शोधाकडे काही

तज्ञांचे लक्ष वेधले जाते. शेवटी त्याला मान्यता मिळते. त्याला छळणाऱ्या आणि त्याच्या शोधाचा दुरुपयोग करून स्वतःच्या नावावर खपविणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरू होते. खऱ्याखोट्याचा उलगडा होत जातो. यंत्रज्ञांच्या प्रयत्नांचे चीज होते. त्याला मानमान्यता मिळते आणि शेवटी, ज्या अधिकाऱ्याने त्याच्या प्रगतीचा मार्ग रोखून ठेवला होता, त्याची पत्नी त्या शिक्षकाबरोबर विवाह करते. कादंबरीचा शेवट अशा प्रकारे आनंददायक होतो.

वस्तुतः या कथानकावर आक्षेप घेण्यासारखे किंवा त्यामुळे खळबळ उडण्यासारखे विशेष काही आढळत नाही. पण रशियन लेखकसंघात त्यावर कडाक्याची चर्चा झाली. स्टालिनच्या काळात अनेक निरपराधी लोकांना किती छळ सोसावा लागत असे, नोकरशाहीच्या जाचामुळे प्रामाणिक संशोधकाचे जीवन कसे उद्ध्वस्त होत असे याचे चित्र कादंबरीत रेखाटले असल्यामुळे ती पुरोगामी आहे असे एका गटाचे मत पडले. पण कादंबरीतील टीका केवळ स्टालिनच्या कारभारावर नसून ती संपूर्ण समाजवादी पद्धतीवर केलेली आहे, असेही काही टीकाकारांचे मत होते. त्यांच्या मते, समाजवादी पद्धतीतील केवळ दोषांचा आविष्कार करून लेखकाने निराशा आणि औदासीन्य यांचा प्रसार केलेला आहे. रशियातील नोकरशाही, तरुणांची वैफल्याची भावना, अन्याय्य पद्धतीने तुरुंगवास व अधिकाऱ्याच्या पत्नीचा शिक्षकाशी विवाह या आणि अशा अनेक घटना आक्षेपार्ह ठरतात.

वादाच्या दोन्ही बाजू हिरिरीने मांडल्या गेल्या. शेवटी ही कादंबरी पुनर्प्रकाशनासाठी तूर्त तरी घ्यावयाची नाही असे ठरले. लेखकाला शिक्षा झाली नाही. पण उपेक्षेने त्याचे वाङ्मयीन जीवन तूर्त तरी स्थगित ठेवलेले आहे. स्टालिनच्या काळात अशी कादंबरी प्रकाशित होऊ शकली नसती. आणि कदाचित प्रकाशित झालीच असती तर तिच्याशी संबंधित असलेल्या सर्वांचे जीवित धोक्यात आले असते.

## साहित्य आणि राजकारण

मॉस्कोत गेली चार पाच वर्षे वास्तव्य करून असलेल्या एका भारतीयाने रशियाच्या साहित्यसृष्टीतील अनेक चमत्कार सांगितले. तेथील साहित्य आणि राजकारण यांचे परस्पर संबंध व्यक्त करण्यास त्यापैकी काही प्रसंगांचा निर्देश करणे पुरेसे आहे.

रशियन लेखक संघाचा माजी अध्यक्ष फेडेयुव्ह याने चार वर्षांपूर्वी आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येमागे क्रुश्चेव्हच्या नव्या मनूचे राजकारण असावे असे हळूच सांगितले जाते. फेडेयुव्ह गाजलेला लेखक होता. पण त्यापेक्षाही त्याची प्रसिद्धी स्टालिनच्या घनिष्ट दोस्तीमुळे अधिक झालेली होती. किंबहुना 'साहित्यक्षेत्रातील स्टालिन,' म्हणूनच तो अधिक ओळखला जात होता. स्टालिनने अनेक लेखकांना सायबेरियात पाठविले. अनेक लेखकांना यमसदनासही रवाना केले. त्या कामी फेडेयुव्ह

हाच त्याचा सल्लागार होता. स्टालिनचा पाठिंबा असल्यामुळे फेडेयुव्हला लेखक संघा-वर जबरदस्त पकड ठेवता आली. स्टालिनलाही त्याच्या मार्फत लेखन आणि लेखक यांच्यावर नियंत्रण ठेवता येत होते. अशा परस्पर सहयोगाचे वाङ्मयीन राजकारण रशियातील अनेक प्रतिभासंपन्न लेखकांना होरपळून काढीत होते. त्यातच अनेकांची प्रतिभा पार कोळपून गेली.

स्टालिनच्या मृत्यूनंतर काळ फिरला. फेडेयुव्हचा पाठीराखा गेल्यामुळे त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी हळूहळू त्याची क्रूर कर्में प्रकाशात आणली. फेडेयुव्हला आपली बाजू मांडता येणे शक्य नव्हते. तो कसलेहि समर्थन करू शकत नव्हता. लेखक संघाच्या अध्यक्षपदावरून त्याची उचलबांगडी झाली 'यंग गार्ड' ही त्याची एकेकाळी गाज-लेली कांदबरी निषेधाचा विषय बनली. स्टालिनच्या काळात या कादंबरीच्या दहा लाख प्रती खपल्या होत्या. रशियन क्रांतीनंतरच्या यादवीची पार्श्वभूमी या कादंबरीत रंग-विलेली होती. स्टालिनच्या मृत्यूनंतर या कांदबरीवर प्रखर टीका झाली. त्या टीकेतील मुख्य मुद्दा असा की, यादवीच्या काळात कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या कामगिरीचा या कांदबरीत पुरेसा उल्लेख केलेला नाही. लेखक संघाच्या नव्या सूत्रधाराने अखेरीस टीकाकारांचा आधार घेऊन फेडेयुव्हची कांदबरी बाजारातून मागे घेण्याचा सल्ला सरकाराला दिला. त्याला अनुसरून ही कादंबरी रद्दबातल ठरविण्यात आली.

त्याच सुमारास, म्हणजे १९५६ साली क्रुश्चेव्हचे नवे राजकीय धोरण जाहीर झाले. या धोरणाप्रमाणे अनेक लेखक, कलावंत आणि कम्युनिस्ट कार्यकर्ते सायबेरियाच्या सक्तीच्या छावणीतून मुक्त करण्यात आले. या लेखकांपैकी अनेकांना फेडेयुव्हच्या कृपेमुळे सायबेरियात भयानक जीवन कंठावे लागले होते. त्या निरपराध लेखकाला तोंड दाखविणे अशक्य झाल्यामुळे त्या 'साहित्यक्षेत्रातील स्टालिनला' आत्महत्या करण्या-शिवाय दुसरा मार्गाच उरला नव्हता. ज्याने अनेक निरपराध लेखकांना जीवनातून उठविले, देशातून घालवून लावले आणि जगातून नष्ट केले; त्याचे भवितव्य क्रुश्चेव्हच्या काळात निश्चित झाले होते. त्याला तुरुंगात तरी जावे लागले असते किंवा सायबेरियातून परत आलेल्या एखाद्या लेखकाच्या सूडाला तरी बळी पडावे लागले असते.

## साहित्य आणि स्वातंत्र्य

मिखेल–नारीसा या लेखकाने १९६० मध्ये 'अन्-प्रॅक्टीसड् सॉंग' या कादंबरीचे हस्तलिखित आणि त्याबरोबर एक विस्तृत पत्र क्रुश्चेव्हला पाठविले. ही काद-बरी आणि पत्र त्याच सुमाराला युरोपमध्ये प्रसिद्ध झाली. त्यांना अर्थातच रशियात प्रसिद्धी मिळणे शक्य नव्हते. पण या पत्राने रशियातील वाङ्मयीन क्षेत्रात एक प्रचंड खळबळ उडवून दिली. मिखेल-नारीसाला अटक झाली. आणि अगदी अलीकडे डॉक्टरांनी त्याला वेडे ठरविल्याचे प्रसिद्ध झाले. त्याचे भवितव्य निराळे सांगण्याची गरज नाही.

मिखेल–नारीसा जातीवंत लेखक मानला जातो. त्याच्या बंडखोर वृत्ती उफाळून आल्यामुळे १९३५ मध्ये स्टालिनच्या पोलिसांनी त्याला अटक केली आणि पत्नी व मुलांसह सायबेरियात त्याची रवानगी केली.

काही वर्षे तुरुंगात आणि काही वर्षे सक्तीच्या मजुरांच्या छावणीत अशी सतत १९ वर्षे तो झिजत होता. त्याचा अनन्वित छळ करण्यात आला. क्रुश्चेव्हच्या काळात सायबेरियातील अनेक प्रकरणांची तपासणी झाली. त्यावेळी मिखेल–नारीसावरील आरोप चुकीचे होते, असा शोध लागला आणि अखेरीस अशा चुकीच्या आरोपांची अत्यंत भयानक दृश्ये सैबरियाच्या काळ्या पाण्यावर पहात बसलेला हा लेखक १९५४ साली मुक्त झाला. मिखेल–नारीसा कृश झाला होता, झिजला होता. पण त्याच्यातील लेखक मात्र जिवंत होता. त्याने स्वतःच्या अनुभवावर आधारलेली एक कादंबरी लिहिली. पण ती रशियात प्रकाशित होणे अशक्य वाटल्यावरून त्याने कादंबरीचे हस्तलिखित परदेशात पाठविले. ते इष्ट स्थळी सुरक्षितपणे पोहचल्याचे कळल्यावर त्याने त्याची एक प्रत आणि त्या सोबत ‘ साहित्य आणि स्वातंत्र्य ’ या संबंधीचे आपले विचार व्यक्त करणारे एक प्रदीर्घ पत्र पंतप्रधान क्रुश्चेव्हला पाठविले. पत्रांत त्याने रशिया सोडून परदेशी जाण्याची परवानगीही मागितली होती.

पण मिखेल-नारीसाची इच्छा पूर्ण झाली नाही. त्याला पुन्हा पकडण्यात आले. त्याची कादंबरी परदेशात प्रसिद्ध झाली. तिचे पडसाद रशियन लेखकांच्या चर्चेत उमटले. त्याने क्रुश्चेव्हला पाठविलेले पत्र म्हणजे त्याच्या दीर्घ कालीन साहित्य तपस्येची फलश्रुती होती. पत्रात त्याने म्हटले होते; ‘ मी भांडवलदारी समाजपद्धतीचा धिक्कार ’ करतो. अनेक अनैतिक आणि भ्रष्ट प्रकारांनी ती समाज पद्धती विकृत बनलेली आहे. पण तुम्ही जिला समाजवादी पद्धती म्हणता, तीही निराळ्या अर्थाने भांडवलदारीच बनली आहे. माझे पुस्तक रशियाबाहेर प्रकाशित होऊ शकते, पण त्याला येथे मज्जाव होतो. याचा अर्थ तेथे थोडे तरी वैचारिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य शिल्लक आहे. पण येथे मात्र कलावंतांना स्वतंत्रपणे विचार करता येत नाही. त्याच्यापुढे पूर्व नियोजित तयार विचार ठेवलेले असतात. तयार नमुन्याकडे पाहून त्याला कलाकृती निर्माण करावी लागते. या ठोकळेबाज प्रक्रियेमुळे त्य.ची स्वतंत्र प्रतिभा हळू हळू कोमेजून जाते आणि विचार नष्ट होतात. अशा परिस्थितीत माझे मन रमणे शक्य नाही. म्हणून मी रशिया सोडून बाहेर जाण्याची परवानगी मागतो. बाहेर स्वर्ग आहे अशी माझी कल्पना नाही. पण इथे मात्र तो निश्चितच नाही याची खात्री झाली आहे. आतापर्यंतच्या जीवनात समाजवादाची सुखे भोगली तेवढी पुरे आहेत. ’

इतक्या परखड शब्दांत आपल्या साहित्याचा आणि स्वातंत्र्याचा आविष्कार करणारा लेखक रशियात, क्रुश्चेव्हच्या काळात देखील पचणे मुळींच शक्य नाही.

## लेखकसंघ

रशियातील लेखकांची एक व्यावसायिक देशव्यापी संघटना आहे. या संघात चार हजार लेखक सभासद असून त्याच्या सर्व राज्यांत शाखा आहेत. प्रत्येक राज्यातील जिल्हा आणि प्रदेश पातळींवर संघाच्या उपशाखा स्थापन केलेल्या आहेत. लेखक संघाचे दोन उद्देश सांगितले जातात : लेखकवर्गाचे प्रतिनिधित्व करून त्याचे हितसंबंध रक्षण करणे, हा सर्वसाधारण स्वरूपाचा एक हेतू. लेखकांची वैचारिक आणि राजकीय निष्ठा कायम ठेवण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे, हा दुसरा हेतू. लेखकसंघातील कम्युनिस्ट पक्षाचे सभासद दुसऱ्या हेतूची पूर्तता करण्यासाठी आपले लक्ष पुरवीत असतात. लेखक संघाचा अध्यक्ष किंवा चिटणीस यापैकी एक पदाधिकारी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद असतो. लेखक संघाचे सुमारे निम्मे सभासद कम्युनिस्ट पक्षाचे सभासद असतात.

लेखक संघाची स्थापना १९३२ साली कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीने केली. त्यावेळीं अस्तित्वात असलेल्या सर्व साहित्य संस्था पक्षाने बरखास्त केल्या. आणि त्याच वेळी रशियन लेखक संघाचे पहिले अधिवेशनही झाले. कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने 'समाजवादी वास्तवते'चा सिद्धान्त (Socialistic Realism) या परिषदेत झाडनॉव्ह याने लेखकांना समजावून सांगितला. लेखक संघाचे तात्त्विक अधिष्ठान या सिद्धान्तावर उभारलेले आहे. सर्व लेखक-सभासदांना ते बंधनकारक मानले जाते. स्टालिनने १९३५-१९३६ मध्ये केलेल्या महान निःपाताच्या वेळी आणि त्यानंतर १९४९-५० मध्ये लेखक संघाच्या मदतीने अनेक लेखकांची ससेहोलपट केली.

लेखक संघाची दुसरी परिषद स्टालिनच्या काळात झालीच नाही. पहिल्या परिषदेनंतर बरोबर २३ वर्षांनी १९५५ मध्ये दुसरी परिषद भरली. या परिषदेत लेखकांनी बऱ्याच मोकळेपणाने एकमेकावर, विविध लेखनप्रकारांवर आणि लेखनामागील प्रेरणांवर टीकाप्रतिटीका केली. लेखक संघाच्या तात्त्विक अधिष्ठानावर-आक्षेप घेण्याचा धीटपणाही काही लेखकांनी दाखविला. लेखक संघाचे सर्व जुने पदाधिकारी काढून टाकण्यात आले. स्टालिनचे हस्तक म्हणून त्यांपैकी काही जणांची निर्भर्त्सना करण्यात आली. सुर्कॉव्ह हा लेखक संघाच्या यंत्रणेचा प्रमुख बनला. त्याने आपल्या चार वर्षांच्या कारकीर्दीत अनेक विरोधकांना हुसकावून लावले. पास्टरनॉकचे प्रकरण त्याच्याच कारकीर्दीत घडले.

लेखक संघाची तिसरी परिषद १९५९ साली झाली. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या काँग्रेसनंतर रशियात बदललेल्या परिस्थितीत भरलेली ही पहिलीच परिषद त्यामुळे या परिषदेत लेखकांनी पूर्वीपेक्षा अधिक मोकळेपणा दाखविला. परिषदेत. क्रुश्चेव्हचे भाषण झाले. त्याने लेखक व कम्युनिस्ट पक्ष यांत एक प्रकारे समझौता

घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या परिषदेच्या वेळी जुन्या लेखकांच्या भावना जणू काय उफाळून आल्या होत्या. त्यांनी स्टालिनच्या लहरीमुळे साहित्यक्षेत्रांत घडलेल्या घटनांची अत्यंत संतापयुक्त स्वरात निवेदने केली. तरुण लेखकांनी काही नव्यावाङ्मयीन प्रयोगांचा उल्लेख करून स्वतंत्र प्रवृत्तींची चुणूक दाखविली. त्याच सुमारास कथाकादंबऱ्यांतून पूर्वीच्या राजवटीची विदारक चित्रे रंगविण्यात येऊ लागली होती. अर्थात, अशा प्रवृत्तींना कोणते वळण लागावे याचे दिग्दर्शन क्रुश्चेव्हच्या भाषणात झालेच होते. याच परिषदेत सुर्कॉव्हची पाच वर्षांची कारकीर्द संपली आणि क्रुश्चेव्हच्या आधिक विश्वासातील लेखक फेडीन याची नवी कारकीर्द सुरू झाली. ' समाजवादी वास्तवते 'ला ' चिकित्सक वास्तवते 'ची नवीन जोड मिळाली. चिकित्सक वास्तवता याचा अर्थ, स्टालिनच्या भयानक काळातील रशियन समाजजीवनाचे चित्रण कथाकादंबऱ्यांतून व्यक्त करणे होय.

## ' समाजवादी वास्तवता '

लेखक संघाचे तात्त्विक अधिष्ठान समाजवादी वास्तवतेच्या सिद्धान्तावर उभारलेले आहे. पण समाजवादी वास्तवता म्हणजे तरी काय ? या प्रश्नाचे मार्क्सवादी परिभाषेतील उत्तर खूपच गुंतागुंतीचे आहे. त्याची मूळ व्याख्या रशियन लेखक संघाची स्थापना करताना स्टालिनच्या मार्गदर्शनाखाली झाडॅनॉव्ह आणि मॅक्झीम गॉर्की यांनी तयार केली. साहित्य आणि कला यांच्या क्षेत्रांत आविष्कार पद्धतीत आणि मूलभूत आशयात मार्क्सवादी तत्त्वज्ञान प्रवाहित करणे हा उद्देश दृष्टीपुढे ठेवून समाजवादी वास्तवतेची व्याख्या करण्यात आली आहे. तिचे स्पष्टीकरण कम्युनिस्ट पक्षाच्या बदलत्या नेतृत्वाला अनुसरून होत असल्यामुळे त्यासंबंधी निश्चित कल्पना येणे कठीण आहे. तरी पण ' समाजाच्या सेवेसाठी कला ' अशी सुटसुटीत शब्दयोजना समाजवादी वास्तवतेचा आशय व्यक्त करू शकेल. साहित्याला सामाजिक आशय असावा याचा अर्थ, ते साहित्य समाजातील राजकीय आणि आर्थिक घडामोडी घडविणाऱ्या राज्यकर्त्यांच्या कार्याचा पुरस्कार करणारे आणि समर्थन करणारेच्च असावे असा आग्रह. स्वतंत्र प्रतिभेच्या लेखकाला हा अर्थ मानवण्यासारखा नाही. राजकीय पराधीनतेमुळे साहित्यात खऱ्याखुऱ्या भावना व्यक्त होऊ शकत नाहीत आणि परिस्थितीचे वास्तव चित्रण करणारे विचारही व्यक्त होऊ शकत नाहीत. राज्यकर्ते बदलतात. नव्या राज्यकर्त्यांचा समाजवादाचा अर्थ बदलतो. त्यामुळे साहजिकच, ' समाजवादी वास्तवता म्हणजे राज्यकर्त्यांची इच्छा ' असा अर्थ होतो. १९३२ साली ' समाजवादी वास्तवते 'ची स्टालिनने केलेली व्याख्या १९५९ सालीं क्रुश्चेव्हच्या आदेशानुसार बदलली. हा बदल तुलनेने इष्ट आसला तरी शेवटी साहित्याचा मोहरा कसा बदलावा हे राज्यकर्त्यांनीच ठरविले. लेखकांपुढे एकच एक राजकीय सत्य ठेवण्याच्या या आग्रहामुळे राज्यक-

अनुक्रम ३८८४२ वि: ...
... ३६४ नों. दि. ...

त्यांना अप्रिय घटनांची आणि प्रतिक्रियांची कल्पना आणून देणारे लेखन होतच नाही. रशियात याचा प्रत्यक्ष परिणाम दिसून येतो. तेथे साहित्याचा प्रसार झाला आणि विस्तारही वाढला. पण साहित्य आणि साहित्यिक यांची उंची वाढली आहे काय असा प्रश्न विचारला जातो. क्रांतिपूर्व काळातील पुष्कीन, टालस्टॉय, चेकॉव्ह, डोस्टोव्हस्की, या लेखकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत साहित्यनिर्मिती केली. त्या परिस्थितीचे पडसाद तर त्यांच्या साहित्यात उमटलेच, पण त्याबरोबरच मानवी मनातील अमर भावना, स्वभाववैचित्र्य, आणि जिवंत व्यक्तिचित्रे त्यांनी वाचकांपुढे उभी केली. ती अभिजातता आणि समर्थता क्रांतीनंतरच्या साहित्यात दिसून येते काय ? क्रांतीनंतरचे साहित्य प्रतिभासंपन्न लेखकांच्या लेखणीतून किती प्रमाणात लिहिले गेले आणि प्रचारक साहित्यिकांच्या लेखणीने त्याचा किती भाग व्यापला यांची तुलना केली म्हणजे रशियातील ' समाजवादी वास्तवते 'चे आणि लेखनस्वातंत्र्याचे वास्तव स्वरूप लक्षात येऊ शकेल.

स्टालिनच्या काळात लेखकाचे स्वतंत्र अस्तित्वच मानले जात नव्हते. पंचवार्षिक योजनांच्या आणि तत्सम कार्यांच्या प्रचारासाठी लिहिलेले वाङ्मय हेच श्रेष्ठ मानले जात असे. त्याच्या प्रकाशनाच्या आणि प्रचाराच्या सर्व सोयी उपलब्ध केल्या जात असत. अशा लेखकांना भरपूर मोबदलाही मिळत असे. अनेक पारितोषिके देऊन आणि मानसन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिले जाई. लेखक शासनसंस्थेचा सेवक मानला गेल्यामुळे त्याने राज्यकर्त्यांच्या प्रयोगांचा आणि प्रयत्नांचा आविष्कार आपल्या लेखनातून चांगल्या प्रकारे करावा, अशीच अपेक्षा बाळगली जात होती. आर्थिक क्षेत्रातील नियोजने आणि नियंत्रणे यांची परिभाषा साहित्यक्षेत्रातही वापरली जात होती.

## नवा कालखंड

क्रुश्चेव्हच्या काळात साहित्य आणि साहित्यिक यांवरील बंधने काहीशी सैल करण्यात आली आहेत. त्याची प्रतिक्रिया वाङ्मयक्षेत्रात अनेक प्रकारांनी दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांत जगातील अभिजात साहित्याचा प्रचंड ओघ रशियाकडे सुरू झाला. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इत्यादि भाषांतील ललित वाङ्मयाचे अनुवाद प्रसिद्ध होऊ लागले. खुद्द रशियातील क्रांतीपूर्व लेखकांच्या ललितकृतींच्या मोठमोठ्या आवृत्त्या प्रकाशित होऊ लागल्या. अनुवाद क्षेत्रात लाखांच्या शब्दांत आवृत्त्यांचे आकडे सांगितले जातात. या सर्वांचा परिणाम अलीकडे नव्या रशियन लेखकांच्या ललित साहित्यातही दिसून येत आहे. त्यांची प्रयोगक्षम मने बंडखोरीच्या सीमेपर्यंत उफाळून येत आहेत. अर्थात रशियाची एकपक्षीय राजकीय घडण लक्षात घेतली म्हणजे लेखकांची मर्यादित बंडखोरीही एका विशिष्ट ' मर्यादेबाहेर ' जाऊ शकत नाही. क्रुश्चेव्हच्या धोरणामुळे साहित्यक्षेत्रात जी नवी परिस्थिती निर्माण होत आहे ती मूल-

भूत स्वरूपाची नाही. कारण, अद्यापि राज्यकर्त्यांच्या धोरणाला पाठिंबा देण्यासाठी प्रतिभेला जुंपण्याची लेखनप्रवृत्ती रशियातून नाहीशी झालेली नाही. त्याविरुद्ध मधूनमधून निराळे सूर ऐकू येतात. पण ते स्पष्ट नाहीत. स्टालिनच्या काळात लाखांनी खपणारी पुस्तके मात्र आता खपत नाहीत, असे सांगितले जाते.

साहित्यक्षेत्रातील नव्या कालखंडाचे प्रतिक म्हणून सुप्रसिद्ध लेखक इऱ्हेनबर्ग याच्या दि थॉ (The Thaw) या साहित्य-स्मृतींचा आवर्जून उल्लेख केला जातो. इऱ्हेनबर्ग अतिशय प्रभावी व निर्भय लेखक मानला जातो. स्टालिनच्या काळात रशियात राहणे अशक्य झाले म्हणून तो अनेक वर्षे पॅरिसला राहात होता. इ. स. १९५६ मध्ये त्याला सन्मानपूर्वक रशियात परत बोलावण्यात आले. त्यानंतरच त्याने आपल्या साहित्य–स्मृती क्रमशः प्रसिद्ध केल्या. त्यांची बहुधा सर्व युरोपीय भाषांत भाषांतरे झाली आहेत. प्रसिद्ध लेखक पास्टरनॉकचे प्रकरण रशियन वृत्तपत्रांनी अतिशय अयोग्य पद्धतीने हाताळले, अशा आशयाची त्याने अलीकडेच टीका केली आहे. अर्थात रशियन वृत्तपत्रांना स्वतंत्रपणे एखादे वादळी प्रकरण हाताळता येते, ही त्यातील गृहित गोष्टच मुळी कितपत बरोबर आहे याविषयी शंका आहे.

## पुस्तकांचे कारखाने

रशियात सर्व पुस्तके, मग ती राजकीय स्वरूपाची असोत की पक्ष प्रचाराची असोत, ती सर्व शासनसंस्थेच्या यंत्रणेमार्फत प्रकाशित करण्यात येतात. कोणताच व्यवसाय खासगी क्षेत्रात होत नसल्यामुळे ग्रंथ प्रकाशनही कोणी लेखक किंवा प्रकाशक व्यक्तिशः करू शकत नाही हे ओघाने आलेच. सर्व प्रकाशनाची सूत्रे सरकारच्या हाती एकवटलेली आहेत. पुस्तकांची निवड करण्यापासून विक्री करण्यापर्यंत सर्व क्षेत्रे सरकारच्याच हाती आहेत. क्रुश्चेव्हच्या काळात पुस्तक–प्रकाशनाचे बाबतीत पूर्वीपेक्षा काही प्रमाणात बंधने कमी केलेली आहेत. तरी पण कोणत्याही हस्तलिखिताना निर-निराळ्या नियंत्रणांच्या चाकोरीतून गेल्यानंतरच प्रकाशनाचा विधी पूर्ण होतो. लेखक प्रसिद्ध असो किंवा अप्रसिद्ध असो, त्याला हे सर्व विधी यथासांग पार पाडावेच लागतात.

छापखान्याकडे हस्तलिखित गेले म्हणजे प्रथम त्यावर स्थानिक नियंत्रण मंडळाची परवानगी आहे किंवा नाही हे पाहिले जाते. नंतर मुद्रण प्रत वरच्या नियंत्रण मंडळाकडे पाठविण्यासाठी अशी परवानगी मिळालेली असेल तर ती प्रत पुन्हा आणखी एका नियंत्रण मंडळाकडून तपासली जाते. मुद्रण प्रतीवर लेखक ज्या भागात राहतो त्या भागातील पोलिसप्रमुखाचा नोंदणी परवाना आवश्यक असतो. त्या पुढची पायरी म्हणजे हस्तलिखितात आवश्यक त्या दुरुस्त्या सुचविणे. या दुरुस्त्यांचे स्वरूप शाब्दिक फेरफारापासून प्रतिपादनाच्या फेरफारापर्यंत सर्व प्रकारचे असू शकते. येवढे संस्कार झाल्यावर ते हस्तालिखित प्रकाशनाच्या दृष्टीने योग्य झाले असे समजण्यात येते. पुस्त-

काची पहिली प्रुफे प्रकाशनाच्या संपादक मंडळाकडून तपासून आली पाहिजेत. हे मंडळ कोणत्याही प्रकारचा बदल करू शकते किंवा काही भाग अजिबात वगळून टाकू शकते. पुस्तकाच्या नमुन्याच्या प्रती म्हणून प्रथम काही प्रती काढल्या जातात आणि त्या पोलीस, प्रकाशन संस्था, प्रकाशनाचा प्रचार विभाग, संरक्षण खात्याची कचेरी या सर्वांकडे पाठविण्यात येतात. पुस्तक सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक स्वरूपाचे असेल तर त्या बाबतीत अधिक दक्षता घेतली जाते. वर उल्लेखलेल्या सर्व खात्याकडून प्रती परत आल्यानंतर त्यावरील सूचना आणि दुरुस्त्या लक्षात घेऊन पुढचे छपाईचे काम सुरू होते. या सर्व विधीमध्ये लेखकाला जवळजवळ काहीही स्थान नसते. एकदा त्याने आपले हस्तलिखित प्रकाशन मंडळाकडे सोपविले म्हणजे त्याचे काम संपले. पुढच्या दुरुस्त्या त्याला मान्यच कराव्या लागतात.

ही सर्व नियंत्रणे परकीय भाषांतील अनुवादित ग्रंथांचे बाबतीत मात्र नसतात. अनुवादित ग्रंथांचे प्रकाशनासाठी एक निराळीच यंत्रणा तयार केलेली असून तिच्या मार्फत निरनिराळ्या भाषांतील ग्रंथ प्रकाशित केले जातात. ललितवाङ्मयाचे प्रकाशन लेखक संघाच्या संमतीनंतर प्रकाशन संघटनेकडे जाते. त्यानंतरच्या सर्व क्रिया वरील ग्रंथ प्रकाशनापेक्षा फारशा निराळ्या नसतात. सरकारी यंत्रणेची नजर त्यावर फिरावीच लागते.

सर्व प्रकाशन संस्था आणि मुद्रणव्यवस्था सरकारच्या हाती असल्यामुळे त्यांचा सत्तेसाठी कसा दुरुपयोग होऊ शकतो याची अनेक उदाहरणे उद्बोधक वाटण्यासारखी आहेत. पुस्तकाच्या दुकानांत आज हजारो प्रती असल्या तर दुसरे दिवशी त्या गुप्त होणे, एखाद्या लेखकाची पुस्तके प्रकाशित न करणे, लेखकाचा उपहास करणे इत्यादींसारखी प्रकरणे तर अगदी सामान्य वाटण्यासारखी आहेत.

### ज्ञानकोश कापण्याची सूचना

एखाद्या प्रसंगाची मोडतोड करून त्याला सोयिस्करपणे प्रकाशित करण्याची प्रथा एकपक्षीय राजवटीतच शक्य असते. पाच वर्षांपूर्वी घडलेला एखादा प्रसंग आज गैरसोयीचा वाटला तर तो रद्द ठरवून नव्याने लिहिण्याची व प्रसिद्ध करण्याची आज्ञा शासनसंस्थेकडून रशियात वेळोवेळी दिली जाते. असे अनेकदा घडलेले आहे. या पद्धतीमुळे ज्ञानकोशासारख्या कायम स्वरूपाच्या ग्रंथातही अनेक वेळा बदल केले जातात. स्टालिननेच प्रथम या कल्पनेला अमलात आणले. ज्या व्यक्तीचा उल्लेख ज्ञानकोशात नकोसा वाटत असेल तिच्यासंबंधी नव्या आवृत्तीत फेरबदल केले तर ते एक वेळ कदाचित क्षम्य ठरेल. पण तो मजकूर त्याच आवृत्तीतून कापून काढावयाचा व त्या जागी तेवढ्याच आकाराचा दुसरा मजकूर डकवून ठेवावयाचा, असे प्रकारही स्टालिनच्या काळात झाले. जुना मजकूर कापणे आणि त्या जागी नवा मजकूर डकवणे

अमूक इतक्या दिवसांतच पूर्ण झाले पाहिजे असेही स्टालिनच्या काळात फर्मावले जात असे. क्रुश्चेव्हच्या काळातही या पद्धतीत विशेष बदल घडून आलेला नाही. पंधरावीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या रशियन ज्ञानकोशाच्या एका आवृत्तीत महात्मा गांधींसंबंधी अत्यंत निंदास्पद मजकूर प्रसिद्ध केला होता. भारतातील स्वातंत्र्याची चळवळ भांडवलदारांची आहे आणि महात्मा गांधी त्या भांडवलदारांचे हस्तक आहेत, असे त्या आवृत्तीत प्रसिद्ध केलेले होते. त्यानंतर भारताशी रशियाचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित होऊ लागले व त्याबरोबर ज्ञानकोशाच्या सर्व प्रतींतून गांधीजींसंबंधीचा जुना मजकूर कापून तेथे नवा मजकूर डकविण्याची ज्ञानकोशाच्या सर्व ग्राहकांना सूचना करण्यात आली. परकीय व्यक्तीसंबंधी उल्लेख करताना एवढी दक्षता घेणारे राज्यकर्ते खुद्द आपल्या देशातील प्रसंग आणि व्यक्ती यांच्यासंबंधी काय करू शकतील याची कल्पना यावरून येऊ शकेल. क्रुश्चेव्हच्या काळात बेरिया आणि मांचुरियाचा एक कम्युनिस्ट पुढारी कँगकाँग यांच्यावर असाच प्रसंग घेतला. त्यांच्या चरित्रपर माहितीचा उल्लेख असलेली पाने कोशातून फाडून टाकली व तेथे त्याच अक्षरांचा निराळा मजकूर सरकारने छापून ज्ञानकोशाच्या ग्राहकांकडे जोडण्यासाठी पाठवून दिला.

असाच प्रसंग आता स्टालिनवर आलेला आहे. त्याची तीस वर्षांची कारकीर्द शून्यवत करण्याचे सर्व प्रयत्न गेली चारपाच वर्षे कटाक्षाने चालू आहेत. प्रथम त्याने लिहिलेली सर्व पुस्तके प्रसारातून मागे घेतली. त्याच्या भाषणांचे संग्रह जप्त करण्यात आले. आणि आता प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याही नियतकालिकात किंवा पुस्तकात स्टालिन हे नावही छापले जाऊ नये याविषयी खबरदारी घेतली जात आहे. याच्या उलट ट्रॉटस्की संबंधीचे उदाहरण सांगता येईल. ट्रॉटस्की हा एकेकाळचा नंबर एकचा पुढारी. लेनिननंतर त्याच्याच हाती सत्तेची सूत्रे येतील अशी सर्वांची कल्पना. पण राजकीय डावपेचांच्या आणि कारस्थानांच्या बाबतीत स्टालिनपेक्षा तो कमी प्रतीचा ठरला आणि शेवटी त्याला रशियातून गुप्तपणे पलायन करावे लागले.

स्टालिनच्या काळात ट्रॉटस्कीचे नाव घेणेही मोठा गुन्हा मानला जात होता. ट्रॉटस्कीवादी हा शब्द देशद्रोह्याच्या समानार्थी वापरला जात असे. पण आता ट्रॉटस्कीच्या नावाचा उल्लेख होऊ शकतो. खाजगी संभाषणात मर्यादित स्वरूपाची का होईना त्याच्यासंबंधी चर्चाही होऊ शकते. कदाचित काही दिवसांनी त्याच्या बाबतीत काही लिहिलेही जाऊ शकेल. आणि शेवटी, स्टालिनच्या काळात हद्दपार झालेल्या किंवा ठार झालेल्या अनेक क्रांतिकारकांप्रमाणे ट्रॉटस्कीचेही पुनर्वसन होईल. अर्थात ट्रॉटस्कीसंबंधी दिसून येणारी ही प्रतिक्रिया कदाचित स्टालिनसंबंधी सूड घेण्याच्या कल्पनेतूनही निघाली नसेल असे म्हणता येणार नाही. ज्या लेखकांची नाटके स्टालिनच्या काळात बंद करण्यात आली, प्रतिगामी मानून त्यांवर अनेक निर्बंध लादले गेले, त्यांची नाटके आता पुनः नव्या जोमाने केली जात आहेत.

## पुराव्याचा कागद

ऐतिहासिक घटनांना नवा अर्थ जोडण्याची जशी राज्यकर्त्यांची एक प्रथा आहे तशीच कोणत्याही घटनेला पुरावे म्हणून दिवंगत व्यक्तींची कागदपत्रे सादर करण्याचीही एक प्रथा आहे. अगदी अलीकडेच असा एक पुरावा प्रसिद्ध करण्यात आला आहे आणि त्या पुराव्याशी लेनिनच्या नावाचा संबंध जोडला आहे. लेनिनने एका प्रदीर्घ लेखात स्टालिनविषयी अत्यंत प्रतिकूल टीका लिहून ठेवली होती. स्टालिन उर्मट आणि सूडबुद्धीचा आहे असे मत लेनिनने त्या लेखात व्यक्त केले होते. स्टालिनचे नाव 'बरखास्त' झाल्यानंतर क्रुश्चेव्हने लेनिनचा तो लेख प्रसिद्ध केला आणि आपल्या मताला लेनिनचाही पाठिंबा आहे असे दर्शविले. पण या सर्व प्रकारात आश्चर्याची गोष्ट अशी की पुराव्यादाखल प्रसिद्ध केलेला लेनिनचा लेख गेली तीसपस्तीस वर्षे कोठे पडून होता, हे कोणीच जाहीर करत नाही. लेनिन म्युझियममध्ये लेनिनची अनेक हस्तलिखिते जतन करून ठेवली आहेत. पण त्यात स्टालिनविरुद्ध असलेला हा लेख ठेवला जाण्याची शक्यता नव्हती. मग एवढा दीर्घकाल या लेखाला कोण जतन करू शकला ? एवढे धाडस कोणी केले ? जणू काय स्टालिनच्यानंतर येणारा राज्यकर्ता आपल्याला अभय देईल असे गृहित धरून तो लेख पस्तीस वर्षांनंतर जाहीर करणे कोणाला शक्य झाले हे समजण्यास मार्ग नाही. स्टालिनने अनेकांची घरे तपासली, अगदी लहानशा संशयावरूनही अनेकांची मालमत्ता ताब्यात घेतली आणि तरीही त्याच्या गुप्तहेरांना हा लेख सापडला नाही. एक तर लेख तरी बनावट असावा किंवा स्टालिनच्या काळातच त्याच्या विरुद्ध पुरावे रक्षण करून ठेवण्याचे अचाट धाडस दाखविणारे लोक तरी असावेत. काहीही असले तरी, तो लेख क्रुश्चेव्हच्या कृत्यांचे समर्थन करण्यासाठी आणि क्रुश्चेव्हने स्टालिनचे केलेले मूल्यमापन योग्य आहे असा लेनिनकडून आशीर्वाद घेण्यासाठी ऐनवेळी धावून आला एवढे मात्र खरे. त्याचे ऐतिहासिक महत्त्व काहीही असो, वर्तमानकालिन महत्त्व निश्चित आहे.

## स्टालिनचा निःपात

स्टालिनचा असा विविध प्रकारांनी निःपात केल्यामुळे रशियात नेमके काय घडले ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी विशेष साक्षीपुराव्यांची गरज पडत नाही. रशियातील कोणत्याही शहरात आणि शहराच्या कोणत्याही प्रसिद्ध भागात परदेशी प्रवासी फिरू लागला तरी त्याला स्टालिनबाबतचे अनेक चमत्कार दिसू लागतात. दुभाषा थोडासा बोलका असेल तर तो तुम्हांला स्टालिनचे सटीप वर्णन करून त्याच्या भ्रष्ट अवशेषांच्या खुणा मुद्दाम दाखवू लागेल. जणू काय व्यक्तिशः त्याचे स्टालिनने

भले मोठे नुकसान केलेले असावे आणि मग त्याचा सूड घेण्यासाठी तो तुम्हांला माहिती पुरवीत आहे. रशियातील अनेक प्रसिद्ध स्थळांबरोबर स्थानभ्रष्ट स्टालिनच्या काही खुणा आणि आख्यायिका तो तुम्हांला सांगू लागेल. एके काळीं रशियाच्या समाजाचा सर्वश्रेष्ठ देव आणि जागतिक साम्यवादी चळवळींचा एकमेव सूत्रधार असे अनन्यसाधारण स्थान मिळविलेला स्टालिन संपूर्ण रशियातून लुप्त झाला आहे.

स्टालिन गेला आणि क्रेमलिन राजवाड्यात सर्वसामान्य नागरिकालाही फिरण्याची सवलत मिळाली. त्या राजवाड्यातील अनेक ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे आता घेता येतात. लाल चौकात टोळक्या टोळक्याने उभे राहून लोकांना गप्पा मारता येतात. रस्तोरस्ती दर दहावीस फुटांवर उभे असलेले किंवा दबा धरून बसलेले पोलीस आता दिसत नाहीत. पोलिसांचा प्रवेश आता कोणत्याही इमारतीत आणि केव्हाही होणे पूर्वीइतके सोपे राहिले नाही.

स्टालिनच्या मृत्यूनंतर जेमतेम त्याचे दोन मृत्युदिन पाळले गेले. पण त्यानंतर वृत्तपत्रांत त्याच्यासंबंधी एकही ओळ प्रसिद्ध झाली नाही. सार्वजनिक सभा आणि उत्सव यांसारखे प्रकार सरकारी अधिकाऱ्यांशिवाय इतरांनी साजरे करण्याची प्रथा नसल्यामुळे कोठेही सभा, भाषणे झाली नाहीत. त्याचा स्मृतिदिन साजरा करण्याची गरज वाटली नाही. जणू काय स्टालिन नावाची कोणी एखादी व्यक्ती रशियात होऊन गेली याचाच लोकांना विसर पडला. इ. स. १९५६ पासून तर स्टालिनच्या स्मृतिचिन्हांवर प्रत्यक्ष आघात होऊ लागले. त्याच्या छायाचित्रांची उचलबांगडी झाली. १९५७ साली देशातील सर्व ठिकाणचे त्याचे पुतळे हलविण्यात आले. काही अतिउत्साही लोकांनी दोर लावून ते पाडले आणि त्याच्या मूर्ती शतशः विदीर्ण केल्या. संपूर्ण रशियात त्याचा एकही पुतळा उभा राहिला नाही. पुतळ्याचे अवशेष देखील शिल्लक राहू दिले नाहीत. साहित्य, शिल्प, चित्र आणि छायाचित्र अशा कोणत्याच स्वरूपात त्याचे दर्शन घडू नये अशी मोहिम सुरू झाली. ❀

❀ इ. स. १९६१ साली त्याच्या शेवटच्या पण अत्यंत महत्त्वाच्या अवशेषाचा निःपात करण्यात आला. त्याचे शव लाल चौकातील समाधीत लेनिनच्या शवाच्या शेजारी ठेवलेले होते. दररोज त्याचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांच्या रांगा लागत असत. पण अचानक एके दिवशी त्यांना समाधीतील स्टालिनचे शव नाहीसे झाल्याचे दिसून आले. ते कोठे अज्ञात स्थळी नेण्यात आले की फेकून दिले याचा पत्ता नाही. लेनिन–स्टलिनची ती संयुक्त समाधी लक्षावधी रशियन लोकांच्या श्रद्धेची जागा होती. त्यातील एक शवपेटी क्षणात नाहिशी झाली. पण येवढे होऊनही लोकांमध्ये प्रक्षोभ झाला नाही. इतक्या सहजतेने आणि एवढी मोठी घटना फक्त रशियातच घडू शकते. राज्यकर्त्यांची श्रद्धा, मतभेद, वैर आणि सूडाची भावना यांच्या बदलत्या स्वरूपाबरोबर लोकांच्या भावनाही त्याचवेळी इतक्या तीव्रतेने आणि तशाच क्रमाने बदलत जातात हा ‘ लोकमता ’चा एक विलक्षण चमत्कार आहे.

## बिचारा स्टालीन !

स्टालिनच्या जीवनाशी संबंधित असलेल्या अनेक वस्तूही लोकांच्या निदर्शनाला येऊ नयेत याची व्यवस्था करण्यात आली आहे. पुष्कीन म्युझियममधे त्याच्या अनेक वस्तू ठेवलेल्या होत्या. आणि त्या अभिमानाने दाखविल्या जात असत. क्रांति-वस्तु-संग्रहालयांतील अनेक वस्तूंवरही स्टालिनच्या कर्तृत्वाचे ठसे प्रेक्षकांना दिसत असत. पण या सर्व वस्तू आता भूमिगत झाल्या आहेत. क्रांतीकाळात स्टालिनवर भूमिगत होण्याचा प्रसंग आला असेल, तसाच प्रसंग त्याच्या तत्कालिन वस्तूंवर आणि स्मृति-चिन्हांवर आता ओढवला आहे. 'मार्क्स–एंजिल्स–लेनिन–स्टालिन इन्स्टिट्युट'च्या नावातील स्टालिनचे नाव तोडून टाकले. शहरे, कारखाने, रस्ते, प्रेक्षणीय स्थळे इत्यादि हजारो स्थळांना स्टालिनचे नाव दिलेले होते, त्या सर्वांना आता नवी नावे लाभली आहेत. लहानशा प्राथमिक शाळेपासून पार्लमेंटच्या सभागृहापर्यंत आणि स्टेशन-पासून विमानतळापर्यंत जेथे जेथे लेनिनच्या शेजारी स्टालिनची छायाचित्रे किंवा पुतळे होते, त्या सर्व ठिकाणांतून स्टालिनची हकालपट्टी झालेली आहे. काही ठिकाणी पुतळा काढून ठेवल्याच्या जागा अद्याप स्पष्ट दिसतात. पुतळ्याच्या खालचे चौथरे विद्रुप झालेले, ओरखडलेले किंवा अर्धवट पडलेले दिसतात. स्टालिनच्या नावाने शांतता पारितोषिक दिले जात होते. पण आता ते बंद केले आहे आणि आता त्या जागी लेनिन पारितोषिक देण्यात येते. शास्त्र, साहित्य, कला आणि तत्सम इतर अनेक क्षेत्रांत ज्या पारितोषकांना स्टालिनचे नाव दिलेले होते ती पारितोषिके आता लेनिनच्या नावाशी जोडली आहेत. रशियातील प्रगतीचा आढावा घेणारे लेख आणि अहवाल क्रांतिमहोत्सवाच्या वेळी दरवर्षी प्रसिद्ध होतात. पण गेली पाचसहा वर्षे या अह-वालात स्टालिनचा चुकूनही उल्लेख केला जात नाही. जणू काय रशियाच्या प्रगतीशी त्याचा काहीही संबंध नव्हता, अशाच तऱ्हेने सर्व लेखांची आणि इतिवृत्तांची रचना केली जाते. ज्ञानकोशात स्टालिनच्या चरित्राची लांबी इतर चरित्रांपेक्षा बरीच मोठी होती. पण नव्या आवृत्तीत त्याच्या चरित्राची केवळ काही ओळीतच बोळवण केली आहे.

रशियात प्रवास करणाऱ्या परदेशियाला एक विशेष आश्चर्य असे वाटते की जेथे सम्राट पीटर आणि कॅथरीन महाराणी यांचे प्रचंड पुतळे शाबूत राहावेत, किंबहुना त्यांच्या संबंधीची माहिती मुद्दाम गौरवपूर्वक सांगितली जावी, तेथे स्टालिनचा उल्लेख न करण्याची दक्षता घेतली जाते. एके काळी सरंजामशाहीचे पुरस्कर्ते आणि प्रतिगामी, जुलमी अशा शेलक्या शब्दांत पीटर आणि कॅथरीन यांचा उद्धार होत असे तेथे आता त्यांना ऐतिहासिक मानाचे स्थान मिळू लागले आहे. बिचारा स्टालिन मात्र दृश्य स्वरूपात तरी रशियाच्या सार्वजनिक जीवनातून पार नाहीसा झाला आहे. रशियन नागरिकांपैकी कितीजणांच्या मनात त्याचे स्थान शाबूत आहे ते कळायला मार्ग नाही.

खरेच का रशियन जनतेला स्टालिनचा पूर्ण विसर पडला असेल ! त्याचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व यांना वगळून ते रशियाच्या आधुनिक इतिहासाचा विचार करीत असतील का ? तसे त्यांना करता येणे शक्य आहे काय ? ते काय करीत असतील ते सांगता येत नाही. पण आम्हाला मात्र त्यांची मने आणि मते तपासायला मॉस्कोच्या पहिल्या फेरीत तरी मुळीच अवधी नव्हता. नियोजित कार्यक्रमाप्रमाणे जागतिक पत्रकारपरिषदेला हजर राहण्यासाठी कूच करायचा मुहूर्त जवळ आला होता. मॉस्कोहून विमानाने प्राग आणि तेथे एक दिवस मुक्काम करून पुढे व्हिएन्ना व बादेन, असे आमच्या प्रवासाचे पुढचे टप्पे होते

●

## बादेनच्या वाटेवर

मॉस्कोहून प्रागच्या दिशेने आमचे बिमान निघाले, पण मन मात्र मॉस्कोतच गुंतले होते. मेट्रो, विद्यापीठ, बोल्शाय थिएटर, गॉर्की स्ट्रीट, कृषि-उद्योग प्रदर्शन... हे सर्व पाहायचे राहिले होते. मॉस्कोतील काही हिंदी मित्रांना भेटायचे होते. पण... पण ते सर्व परतीच्या वेळी. क्रांती-दिनाच्या महोत्सवात सामील होण्यासाठी मॉस्कोला परत यायचे अगोदरच ठरलेले होते.

प्रागलाही आम्ही पहिल्या फेरीत अधिक थांबू शकत नव्हतो. पत्रकारपरिषद संपवून परत जाताना वाटेत प्रागला आम्ही काही दिवस मुक्काम करावा असे चेक पत्रकारसंघाने निमंत्रण देऊनच ठेवले होते. म्हणूनच प्रागचा छोटा मुक्काम संपवून चेक पत्रकारांसह बसने पुढच्या प्रवासाला निघालो.

प्राग ते व्हिएन्ना तीनशे मैल आणि पुढे बादेन केवळ पंधरा मैल. प्रागहून बदेनला पोचायला चौदा तास लागले. प्रवासात दोन ठिकाणी कस्टमची पाहणी झाली. पण सर्व कामे व्यवस्थित आणि झटपट होत असल्यामुळे कोठेही खोळंबून राहावे लागले नाही. चेक पत्रकारांनी प्रवास मुळीच कंटाळवाणा होऊ दिला नाही. बादेन येथे हॉटेल एडनमध्ये आमचा मुक्काम होता. परिषदेसाठी निवडलेले ते छोटे गाव युरोपातील एक प्रख्यात आरोग्यधाम समजले जाते. या गावानजीक गंधकाच्या पाण्याचे झरे आहेत. संधिवात आणि त्वचारोगावर हे पाणी गुणकारी ठरते म्हणून जगातील अनेक श्रीमंत आजारी या गावात उपचारासाठी येतात. त्यामुळे गावात गंधकाच्या पाण्याची स्नानगृहे आणि हॉटेले यांची गर्दी झालेली आहे. अशा निसर्गरम्य आणि आरोग्यवर्धक गावात पत्रकार परिषदेच्या निमित्ताने पाच दिवस राहण्याची अपूर्व संधी मिळाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६४२ वि: [illegible]
क्रमांक ३६४ नों दि २५।६।६५

बेलग्रेड

## पत्रकारांचे राजकारण

युगोस्लाव्हियाच्या पत्रकारांनी दिलेले निमंत्रण अनपेक्षित होते. युगोस्लाव्हियाचा दौरा आमच्या मूळ कार्यक्रमात समाविष्ट नव्हता. पण बादेन येथे जागतिक पत्रकार परिषदेत भारत आणि युगोस्लाव्हिया यांच्या पत्रकारांचे सर्वांत अधिक साधर्म्य दिसून आले आणि त्यांतूनच या दोन्ही देशांच्या पत्रकारांचे संबंध निकटचे झाले. जागतिक राजकारणाप्रमाणे जागतिक पत्रकार परिषेदत या दोन्ही देशांच्या पत्रकारांनी कोणत्याही गटात सामील न होण्याची भूमिका स्वीकारलेली होती. चिनी पत्रकारांचे अतिरेकी वर्तन असे. त्यांना जपान, इंडोनेशिया, इंडोचायना आणि आफ्रिकेतील काही देश यांचा पाठिंबा मिळत असल्यामुळे कोणत्याही ठरावात पश्चिमी राष्ट्रांविरुद्ध तोंडसुख घेतल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. रशिया आणि पूर्व युरोपातील इतर कम्युनिस्ट देशांतील पत्रकार चिनी पत्रकारांच्या भूमिकेला अप्रत्यक्षपणे पाठिंबा देऊन आपण त्यातले नव्हत, असे भासविण्याचा प्रयत्न करीत असत. त्यामुळे चर्चेला पत्रव्यवसायापेक्षा आंतरराष्ट्रीय राजकारणाचाच अधिक रंग चढत असे. अशा स्थितीत घरंगळत जाणाऱ्या चर्चेच्या गाडीला पुन्हा मूळ विषयाच्या मार्गावर आणण्याचे काम भारत व युगोस्लाव्हिया यांना करावे लागे. या दोन्ही देशांच्या सहकार्यामुळे परिषदेचा तोल कायम राहण्यास तर मदत होत असेच; पण त्याबरोबरच त्यांचे आपसात मैत्रीचे संबंधही अधिक दृढ होत गेले. परिषद संपण्याच्या सुमारास युगोस्लाव्हियाच्या पत्रकारांनी भारतीय पत्रकारांना आपल्या देशाला भेट देण्याचे निमंत्रण दिले. अर्थात ही गोष्ट रशियन पत्रकारांना तितकीशी आवडली नाही आणि चीन व त्याच्या साथीदार देशांच्या पत्रकारांनी तर त्या निमंत्रणाची टवाळीही केली. चीन आणि युगोस्लाव्हिया यांचे संबंध अतिशय दुरावलेले आहेत. त्यामुळेच युगोस्लाव्हियाच्या कोणत्याही धोरणाचा चिनी पत्रकारांनी धुव्वा उडविण्याचा जणू चंगच बांधला होता.

## वकिलातीतील अनुभव

युगोस्लाव्हियाच्या दौऱ्यावर जावयाचे म्हणजे व्हिसा मिळविण्यापासून तयारी करावयाची होती. त्यासाठी व्हिएन्ना येथे युगोस्लाव्हियाच्या वकीलातीत आम्ही गेलो तेव्हा आमच्या कल्पनेप्रमाणे व्हिसा मिळण्यासाठी एखादा दिवस तरी लागेल असे

वाटले होते. पण सर्व काम केवळ पंधरा वीस मिनिटांत झाले. एवढेच नव्हे तर युगोस्लाव्हियाच्या वकिलाने मुद्दाम भेटून आम्हांला छोटीशी पार्टीही दिली. या वकिलातीपासून अर्ध्या फर्लांगाच्या अंतरावर असलेल्या हिंदी वकिलातीच्या कचेरीत मात्र याच्या अगदी उलट अनुभव आला. काही पत्रकारांच्या पासपोर्टवर युगोस्लाव्हियाचा समावेश करावयाचा होता. त्यासाठी आम्ही हिंदी वकीलातीत गेलो तेव्हा तेथे धड कोणी माहिती सांगावयासही तयार नव्हते. आमच्या कामासंबंधी एका अधिकाऱ्याला सुचविले. तेव्हा जणू काय एक नवी कटकट उपस्थित झाली, अशा अर्थाने त्याने आमची संभावना केली व आमचे काम ताबडतोब होऊ शकणार नाही असे स्पष्ट सांगितले. कलेक्टर कचेरीतील सामान्य कारकुनापेक्षाही अधिक उद्धटपणाची त्याची वागणूक होती. शेवटी अतिशय जिकीरीने आमचे काम कसेबसे तीनचार तासांनंतर पूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर युगोस्लाव्हियन वकिलातीतील अनुभव अधिकच आनंददायक वाटला. त्याच वेळीं आम्ही बेलग्रेडमधे मार्शल टिटो यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली व त्यासाठी पूर्वसूचना द्यावी, असेही म्हटले. युगोस्लाव्हियाच्या वकिलाने आमची सूचना तत्परतेने मान्य केली. एवढेच नव्हे तर व्हिएन्नाच्या स्टेशनवर पोहोचविण्यापासून युगोस्लाव्हियाच्या हद्दीतील पहिल्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचल्यावर तेथे उतरण्याच्या सोयीपर्यंत सर्व व्यवस्था त्याने करून दिली.

युगोस्लाव्हियात पहिला मुक्काम मारीबोर या छोटेखानी शहरात होता. त्यानंतर झाग्रेब हे औद्योगिक दृष्टया पुढारलेले शहर आणि नंतर बेलग्रेड.

## निष्ठा दुभंगली

युगोस्लाव्हियात प्रवास करण्याची संधी मिळाल्यामुळे एक नवा देश पाहण्याच्या कुतूहलापेक्षा काहीतरी अधिक जिज्ञासा मनात होती आणि ती पुष्कळ अंशी पूर्ण होऊ शकली. बारा वर्षांपूर्वी टिटो आणि स्टालिन यांची खडाजंगी उडाली आणि मार्क्सवादी निष्ठावंतांच्या श्रद्धेला एक जबरदस्त तडा गेला. त्यावेळी मार्क्सवादाच्या ग्रंथांची अनेक पारायणे करणाऱ्या कम्युनिस्टांना टिटो आणि स्टालिन यांच्या भांडणाने गोंधळून टाकले होते. मार्क्सवादाला संपूर्ण निष्ठा वाहिलेल्या दोन भक्तांची भांडणे विकोपाला का जावीत हे त्यांच्या लक्षात येत नव्हते. हा वाद साम्राज्यवाद्यांनी आपल्या प्रचारासाठी निर्माण केला असावा असे प्रथम त्यांना वाटत होते. पण रशियाच्या प्रचारामुळे या वादाच्या दोन्ही बाजू स्पष्ट होऊ लागल्या आणि मग जगातील सर्वच कम्युनिस्ट पक्ष रशियाची बाजू खरी गृहीत धरून युगोस्लाव्हियाविरुद्ध चाललेल्या प्रचारात सामील झाले.

पण रशियाचा हा प्रचार त्यावेळीं एकतर्फी वाटत होता आणि नंतरही युगोस्लाव्हियाचे म्हणणे कोठेच नीटसे समजू शकत नव्हते. विशेषतः युगोस्लाव्हियासारखे

छोटेसे राष्ट्र रशियासारख्या बलाढ्य राष्ट्राविरुद्ध बंड पुकारते, तेव्हा त्याच्यामागे काहीतरी निश्चित भूमिका असली पाहिजे असे वाटत होते. ती भूमिका प्रत्यक्ष युगोस्लाव्हियात जाऊन समजून घेण्याची संधी मिळाली. प्रथम युगोस्लाव्हियातील पत्रकार किंवा पुढारी रशिया आणि युगोस्लाव्हिया यांच्या संबंधाविषयी बोलण्याचे टाळतात असे दिसून आले. म्हणून काही पत्रकारांना विश्वासात घेतल्याशिवाय आपली जिज्ञासा पूर्ण होणार नाही असे लक्षात आले. मारीबोरपासून बेलग्रेडपर्यंत जेथे जेथे संधी मिळाली तेथे या प्रश्नाची चर्चा करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः बेलग्रेडच्या मुक्कामात या चर्चेला अधिक समाधानकारक स्वरूप आले. आणि दोन कम्युनिस्ट राष्ट्रांतील विरोध कोणत्या थराला जाऊ शकतो याचीही कल्पना आली.

## प्रे. टिटो आणि पपोव्हिच

बेलग्रेडच्या मुक्कामात युगोस्लाव्हियाच्या दोन सर्वश्रेष्ठ नेत्यांची भेट घेण्याची संधी मिळाली. युगोस्लाव्हियाचे परराष्ट्रमंत्री पपोव्हिच आणि अध्यक्ष मार्शल टिटो या दोन नेत्यांच्या अनुभवांत, स्वभावात आणि अधिकारात फरक असला तरी त्यांनी आमच्याशी वागण्यात दाखविलेली आत्मीयता मात्र सारखीच होती.

मि. पपोव्हिच पंचाहत्तर वर्षांचे गृहस्थ असून युगोस्लाव्हियाच्या स्वातंत्र्य चळवळीचे फार जुने कार्यकर्ते आणि जाणकार राजकारणी आहेत. त्यांनी युगोस्लाव्हियाच्या आर्थिक आणि राजकीय भूमिकेची कल्पना दिली आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रांपेक्षा युगोस्लाव्हियाचे निराळेपण नेमके कशात आहे हेही सांगितले. यावेळीं इतर राजकीय पुढारीही उपस्थित होते. त्यांच्याशी झालेल्या पुढील प्रश्नोत्तरांवरून युगोस्लाव्हियाच्या धोरणाची व विचारांची कल्पना येऊ शकेल.

## मुक्ति-सेना

‘दोन कम्युनिस्ट राष्ट्रांत भांडणे व्हावीत आणि ती विकोपाला जावीत हे आम्हांला तरी न उलगडणारे कोडे वाटते. दोन खिश्चन राष्ट्रांत अनेकदा युद्धे झाली. दोन बौद्ध-धर्मीय राष्ट्रांनीही एकमेकांना रणक्षेत्रावर लोळविल्याची उदाहरणे आहेत. दोन इस्लामी राष्ट्रांची युद्धे तर सतत चालूच असतात. पण मार्क्सधर्मीय राष्ट्रांतही असाच वाद का व्हावा हे मात्र समजत नाही. कारण मार्क्सवादी राष्ट्र एकमेकाविरुद्ध आक्रमण करून काही स्वार्थ साधू इच्छित असतील अशी निदान त्यांच्या तात्त्विक भूमिकेवरून तरी कल्पना करता येत नाही. म्हणूनच रशिया आणि युगोस्लाव्हिया यांच्या संघर्षाचा अर्थ आम्हांला समजू शकत नाही.’

‘त्यासाठी आपल्याला या वादाचा थोडा इतिहास समजून घेतला पाहिजे.

मार्च १९४८ पासून या वादाला तोंड लागले. युद्ध संपल्यापासूनच रशियाने शेजारच्या छोट्या राष्ट्रांवर आपला प्रभाव पाडण्यास सुरुवात केली होती. त्याला आपल्या प्रभावाचे क्षेत्र पूर्व युरोपीय देशांत वाढवावयाचे होते. पश्चिम युरोप आणि रशिया यांच्या दरम्यान छोट्या राष्ट्रांचा एक गट आपल्या संरक्षणाखाली ठेवल्यास रशियाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने त्याचा उपयोग होईल अशी रशियाची कल्पना. त्यासाठी स्टालिनने पूर्व युरोपमधील देशात काम करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांना हाताशी धरले. पोलंडपासून अल्बानियापर्यंत सर्व देशात रशियाच्या फौजा युद्धकाळात पसरलेल्या होत्या. युद्ध संपल्यानंतरही ते लष्करी तळ तेथेच कायम ठेवण्यात आले.'

'त्यांना लष्करी तळ म्हणावयाचे की मुक्ति-सेना म्हणावयाचे याचा त्या त्या देशांनी अगोदरच निर्णय घेऊन टाकला होता. त्यामुळे त्या मुक्ति-सेना म्हणजे छोट्या राष्ट्रांच्या दृष्टीने उपकारक नव्हत्या का?'

'असतीलही! ज्या देशांनी रशियाच्या लष्करी सामर्थ्यावर आपले अस्तित्व टिकविले त्यांना रशियाच्या फौजा म्हणजे मुक्ति-सेना वाटत असतील. पण आम्ही आमचे स्वातंत्र्य स्वतःच्या बळावर मिळविलेले होते. त्यामुळे या तथाकथित मुक्तिसेनेचा बडेजाव आम्हांला मान्य नव्हता. शिवाय, या सैन्याचा सर्व खर्च आम्हांलाच करावा लागे. आमच्या सेनाधिकाऱ्यांपेक्षा रशियन सेनाधिकाऱ्यांचे पगार तिप्पट ते चौपट अधिक होते. शिवाय त्यांची भावना अशी की आपण या देशावर उपकार करण्याकरिता आलो आहोत. त्यांच्या वागण्यातही हाच दर्प दिसून येत असे.'

'पण यात वावगे काय? युद्धाच्या वेळी त्या सैन्याने तुम्हांला मदत केली, संकटातून वाचविले. मग त्यांनी थोडे वरचढपणाचे वर्तन केले तर ते खपवून घेणे शक्य नव्हते काय?'

## अपमानकारक वागणूक

'हीच दृष्टी असेल तर पश्चिमी राष्ट्रांच्या सैन्याला साम्राज्यवादी म्हणून हिणविण्यात काही अर्थ नाही. आमचा तरी अनुभव असा आहे की साम्राज्यवादी सैन्याने वसाहतींशी वागावे तसेच रशियन सैन्य आमच्याशी वागत होते. ही अपमानकारक वागणूक आम्हांला खपवून घेण्याची गरज नव्हती. पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देश, तेथील कम्युनिस्ट पक्ष आणि युद्धकाळ तील त्यांची परिस्थिती ही सर्व युगोस्लाव्हियापेक्षा वेगळी आहेत. पोलंड, चेकोस्लाव्हाकिया, बल्गेरिया, आल्बानिया, रुमानिया इत्यादि सर्व देशांतील कम्युनिस्ट पक्ष रशियाच्या सहाय्याने अधिकारावर आलेले आहेत. अत्यंत अल्पसंख्य आणि आपापल्या देशांच्या राष्ट्रीय जीवनात अत्यंत दुर्बल असूनही रशियाच्या बळावर त्यांनी अधिकार मिळविला. त्यामुळे ते सर्वस्वी परावलंबी आहेत, परतंत्र आहेत. त्यांना स्वतंत्र स्थान नाही. आपापल्या देशातही ते रशियाच्या धोरणा-

प्रमाणे वागतात आणि त्यांचे परराष्ट्र धोरण तर सर्वस्वी रशियाच्याच हाती आहे. युगोस्लाव्हियाची परिस्थिती तशी नाही. आमच्या कम्युनिस्ट पक्ष प्रथमपासूनच स्वतंत्र आहे. त्याचे सामर्थ्य स्वतःच्या संघटनेत आहे. युद्धकाळातही आम्ही आमच्या बळावर लढलो. गनिमी युद्धाच्या डावपेचांनी आम्ही फॅसिस्ट सैन्याला जेरीस आणले. आमच्या जनतेने अधिक कष्ट सोसले, यातना सोसल्या. लक्षावधी निरपराधी लोक-युद्धात मारले गेले. तरी आम्ही शरणागती पत्करली नाही. अर्थात या कामी रशियाचे सहाय्य मिळाले, तसेच पश्चिमी राष्ट्रांचेही मिळाले. मग युद्धानंतर आम्हीं केवळ रशियाच्या धोरणाप्रमाणेच का वागावे ?'

## स्टालिनची महत्त्वाकांक्षा

'आमच्या मते रशिया मार्क्सवादी राष्ट्र आहे आणि युगोस्लाव्हियालाही मार्क्सवादाचीच वैचारिक बैठक आहे. अशा स्थितीत दोन समान धर्मीयांनी एकत्र नांदावे अशीच अपेक्षा असते. रशिया अनेक वर्षे मार्क्सवादाचा प्रयोग करीत आहे आणि त्याचा फायदा युगोस्लाव्हियाला मिळाला तर तो उपयुक्तच ठरणार नाही का ?'

'तात्त्विक दृष्टया हा युक्तिवाद बरोबर आहे. पण युद्धानंतर रशियाने, विशेषतः अधिक अचूक सांगावयाचे तर स्टालिनने जे धोरण स्वीकारले ते मार्क्स-वादाच्या विरुद्ध होते. पूर्व युरोपच्या कारभारासाठी रशियाने एक चौकटच तयार केली. त्या राष्ट्राची राष्ट्रीय वैशिष्टये हळू हळू नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू केले. तेथील अर्थकारण आणि राजकारण यांची सूत्रे हाती घेतली. युगोस्लाव्हिया या चौकटीत बसू इच्छित नव्हता. आम्ही रशियाशी बरोबरीच्या नात्याने वागण्याची अपेक्षा करीत होतो. कम्युनिस्ट राष्ट्रांपैकीं सबल राष्ट्राने दुर्बल राष्ट्रांना आपल्या पंखाखाली ठेवण्याची रशियाची महत्वाकांक्षा आम्हांला पटू शकत नव्हती. त्यामुळे आम्ही आमचे मतभेद व्यक्त करू लागताच स्टालिनने आमच्या विरुद्ध काहूर उठविले.'

## अंतर्गत हस्तक्षेप

'रशियाच्या कारभारव्यवस्थेला 'वसाहतीची चौकट' असे जे आपण म्हटले आहे त्याचा अर्थ काय ?'

'रशियाने आमच्या देशात अनेक ठिकाणी सैन्य ठेवले. दर खेपेला पश्चिमी राष्ट्रांच्या आक्रमणाची भीती दाखवून या सैन्याचा मुक्काम वाढविला. त्यामुळे आमच्या शूर सैनिकांना दुय्यम स्थान मिळाले. सैन्याबरोबरच आर्थिक व राजकीय सल्लागारही रशियाने पाठविले. जणू काय आमचा देश अफ्रिकेतील एखाद्या वसाहतीप्रमाणे मागासलेला आहे आणि त्याला रशियाच्या पंचवार्षिक योजनांची संथा

द्यावयाची आहे, अशा भावनेने हे सल्लागार वागत असत. त्यांना आमच्या देशातील हवी ती माहिती पाहिजे होती. आमच्या अंतर्गत कारभारात आणि विकास योजनांत त्यांचा सतत हस्तक्षेप होत असे. त्यांना माहिती पुरविली नाही तर तो अपमान समजून क्रेमालिनकडे आमच्या विरुद्ध तक्रारी करीत असत. सल्लागारांच्या नावाखाली अनेक रशियन हेर आमच्या देशात भटकू लागले. आमच्या परराष्ट्र धोरणावरही नियंत्रण ठेवण्याचा स्टालिनचा प्रयत्न चालू होता. अनेक गुप्त माहिती रशियाकडे जाऊं लागली. त्याविरुद्ध काही आक्षेप घेतला तर रशिया पालकाच्या भूमिकेवरून आम्हांला समज देऊ लागला. ही सर्व परिस्थिती अत्यंत जाचक आणि पुढे मागे हानिकारक ठरेल अशीच होती.’

## रशियन सैन्याचे अत्याचार

युद्धानंतर तुमच्या देशांत ब्रिटीश लष्करही होते ना ?’

‘होय. काही दिवस ब्रिटीश सैन्याच्या तुकड्या आमच्या देशात होत्या. ब्रिटीश सैनिकांचे वर्तन रशियन सैनिकांच्या वर्तनापेक्षा अधिक सभ्य आणि सुसंस्कृत होते. रशियन सैनिकांनी काही ठिकाणी अत्याचार केले आणि त्याबद्दल वाच्यता करताच रशियन नेते संतापले. स्टालिनने तर अशा अत्याचारांचे अप्रत्यक्ष समर्थनच केले. आणि, युद्धकाळात कामगिरी केलेल्या सैनिकांची मनःस्थिती समजून घ्या, असा आम्हालाच उलट उपदेश केला. ही गोष्ट युगोस्लाव्हियाच्या नागरिकांना चीड आणणारी वाटली. साहजिकच रशियाच्या धोरणाविरुद्ध आमच्या देशात टीका वाढू लागली.’

## मार्क्सवादाचे मारेकरी

‘यावर रशियाची प्रतिक्रिया काय झाली ?’

‘स्टालिनने सूड घेण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने प्रथम आम्हांला ‘मार्क्स-वादाचे मारेकरी’ म्हटले. वस्तुतः आमच्या टीकेमुळे स्टालिनला भीती वाटत होती, तिचे कारण निराळेच होते. आमच्या बंडखोरीमुळे इतर कम्युनिस्ट राष्ट्रांत राष्ट्रवादी भावना जागृत होतील आणि त्याचा परिणाम रशियाच्या एकंदर धोरणावर अनिष्ट होईल असे त्याला वाटत होते.’

‘त्याची भीती खरी ठरली. पोलंड, पूर्व जर्मनी आणि हंगेरी या देशात अलि-कडेच झालेले उठाव म्हणजे राष्ट्रवादी भावनांचेच उद्रेक होते. आणि त्याचा आरंभ तुमच्या देशापासूनच झाला आहे.’

‘होय. त्याचे श्रेय आम्हांला मिळत असले तर वाईट वाटण्याचे कारण नाही.

आम्ही रशियाच्या दडपणापासून बाहेर पडू इच्छितो. त्यासाठी आम्ही निर्भय राष्ट्रीयता व्यक्त केली. या राष्ट्रीयतेमागे जनतेच्या भावना होत्या. तसेच मार्शल टिटो यांचे प्रभावी व्यक्तिमत्वही होते. मार्शल टिटो स्टालिनइतकेच श्रेष्ठ नेते आहेत. त्यांना हे नेतृत्व बाहेरच्या देशांपासून मिळालेले नाही. ते स्वतः अनेक स्वातंत्र्य चळवळीतून यशस्वी झाले व मोठे बनले आहेत. त्यामुळेच स्टालिनला त्यांच्या राष्ट्रीय विचारांची अधिक भीती वाटत होती.'

## राष्ट्रीय मार्क्सवाद

'तुम्ही राष्ट्रीय मार्क्सवादी बनलात आणि मार्क्सवादाची आंतरराष्ट्रीय दृष्टी सोडून दिलीत असाच याचा अर्थ नाही काय?'

'नाही. आम्ही रशियाइतकेच मार्क्सवादी आहोत. पण प्रत्येक राष्ट्राचे निराळे वैशिष्ट्य असते. सामाजिक विकास निरनिराळ्या पद्धतीने झालेला असतो. ऐतिहासिक परंपरा आणि भौगोलिक परिस्थिती वेगळी असते. म्हणून मार्क्सवादाचा प्रयोग करताना ही निराळी वैशिष्ट्ये लक्षात घेतली पाहिजेत, असे आम्हाला वाटते. रशियाने केलेल्या प्रयोगाची नक्कल इतर देशांत होऊ नये. त्यासाठी रशियाने दडपण आणू नये. सल्लागारांच्या नावाने आमच्या तिजोरीवर ओझे वाढवू नये. आमच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होता कामा नये. आमचे परराष्ट्र धोरण स्वतंत्र असले पाहिजे. रशिया समर्थ बनला म्हणून त्याने शेजारच्या छोट्या राष्ट्रांना आपल्या पंखाखाली ठेवून जागतिक राजाकरणात हवा तसा त्यांचा उपयोग करू नये. सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांचे संबंध बरोबरीचे असले पाहिजेत. छोट्या राष्ट्रांच्या प्रतिष्ठेला धक्का बसू नये. आमच्या या अपेक्षांत वावगे काय आहे?'

'रशिया आणि युगोस्लाव्हिया यांची वैचारिक साम्यता असता त्यांचा मतभेद का व्हावा?'

'स्टालिनच्या एकतंत्री कारभारामुळे रशियात मार्क्सवाद दूषित झाला आहे. त्याला सत्तेची अति महत्वाकांक्षा असून त्यातूनच रशियाच्या विस्तारवादाचे धोरण अंमलात येत आहे. त्याच्या वैयक्तिक सत्तेचे लालसेमुळे इतर राष्ट्रांचे स्वातंत्र्य तो मान्य करीत नाही. मार्क्सवादाचे भाष्य करण्याचा आपलाच अधिकार आहे अशी त्याची कल्पना झालेली आहे. असा मार्क्सवाद आम्हांला मान्य नाही. म्हणून आम्हांला तो पाखंडी, मार्क्सवादविरोधी, असे म्हणतो. त्याने प्रथम सर्व कम्युनिस्ट देशांत आमच्या विरुद्ध प्रचार सुरू केला. रेडियो, वृत्तपत्रे इत्यादि साधनांनी एखाद्या साम्राज्यवादी राष्ट्रापेक्षाही अधिक विषारी प्रचार केला. त्यानंतर आम्ही साम्राज्यवाद्यांचे हस्तक आहोत अशी शिवीगाळ सुरू केली. तेवढे पुरेसे नव्हते म्हणून आमच्या देशाची आर्थिक कोंडी केली. आर्थिक मदत देण्याची सर्व आश्वासने मागे घेतली. दिलेली यंत्र-

सामुग्री व इतर माल परत नेला. आमच्या योजना बंद पडतील असे धोरण चालू ठेवले. व्यापार बंद केल्यामुळे आमच्या आयात निर्यातीवर विलक्षण परिणाम झाला. आर्थिक-हालखी पराकोटीला पोहोचली. एवढ्यानेही आम्ही शरण येत नाही असे पाहून आमच्या देशातील काही फुटीर लोकांना हाताशी धरून युगोस्लाव्हियाबाहेर त्यांचा पक्ष स्थापन केला. अशा फितुरांकडून सर्वत्र खराखोटा प्रचार करण्यात आला. हेही साधन निरुपयोगी ठरल्यानंतर आमच्या पक्षाच्या संघटनेवर हल्ला सुरू झाला. मार्शल टिटो यांची वैयक्तिक बदनामी चालू झाली. मार्शल टिटो बाल्कनचे भूत आहे; ते खुनी, हेर, फॅसिस्ट आहेत, असे म्हणून त्यांना मार्क्सवादाचे शत्रू संबोधण्यात आले.'

## सीमा-वाद

'युगोस्लाव्हिया आणि बल्गेरिया यांच्या सीमा जेथे भिडतात तेथे काहीतरी खुसपटे काढून वाद सुरू केले. ही सीमाविषयक भांडणे विकोपाला जावीत आणि मग युगोस्लाव्हियाविरुद्ध बल्गेरियाकडून सीमेवर चकमकी झडाव्यात असा त्यामागे डाव होता. पण युगोस्लाव्हियाने ग्रीस आणि तुर्कस्थान यांच्याशी संरक्षण करार केल्या-मुळे सीमावाद अटीतटीला गेला नाही. सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांची मिळून कॉमिनफॉर्म ही संघटना युद्धानंतर स्थापन झाली होती. त्या संघटनेतून आम्हांला काढून टाकले. आणि त्याचे कारण देताना रशियाविरुद्ध आम्ही शत्रुत्वाची भावना बाळगली आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रांशी उद्धटपणाचे वर्तन केले, असा आमच्यावर आरोप केला.'

'रशियाच्या या धोरणामुळे आमची अर्थिक परिस्थिती अत्यंत संकटांत साप-डली आणि राजकीय दृष्ट्याही आम्ही निराधार बनलो. आमच्यापैकी जे फितुर बनले त्यांचाही उपद्रव सुरू झाला. आगोदरच युद्धामुळे आमची भयंकर हानी झाली होती. पुनर्घटनेच्या योजना सुरू होतात न होतात तोच रशियाने आतून आणि बाहेरून आमच्यावर दडपण आणले. शेवटी त्यातून मार्ग काढण्यासाठी कोणाची तरी मदत घेणे अपरिहार्य होते. १९५० मध्ये अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स यांचेकडे आम्ही आर्थिक मदतीची मागणी केली आणि त्या मदतीमुळेच आमच्या पुनर्घटनेच्या योज-नांना पुनः चालना मिळाली. पश्चिमी राष्ट्रांची आर्थिक मदत स्वीकारल्याबरोबर रशियाने आमच्या विरुद्ध प्रचाराचे ताळतंत्रच सोडले. म्हणजे एकीकडे आर्थिक कोंडी केली आणि दुसरीकडे आम्ही कोणाचीही मदत घेऊ नये, याचा अर्थ एकतर रशियाच्या पारतंत्र्यात रहावे किंवा नष्ट व्हावे असाच होतो.'

'तुम्ही सांगितलेल्या माहितीवरून असे वाटते की टिटोने रशियाविरुद्ध पुकार-लेले बंड हे साधेसुधे नाही. रोमन पोपच्या कर्मकांडाविरुद्ध बंड पुकारणारा मार्टिन ल्युथर आणि मॉस्कोच्या मार्क्सवादी मंत्रतंत्राविरुद्ध बंड पुकारणारे मार्शल टिटो यांत आम्हांला फार मोठे साम्य वाटते.'

'युगोस्लाव्हियाचे धोरण आणि मार्शल टिटो यांचे व्यक्तित्व यांसंबंधी तुम्हांला जे मूल्यमापन करावयाचे असेल ते करा. पण युगोस्लाव्हियासंबंधी बरे शब्द काढणारे अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते रशियाच्या अवकृपेला पात्र झाले. आमच्याशी संबंध ठेवल्याच्या आरोपावरून शेजारच्या राष्ट्रांतील नेत्यांचा छळ झाला. त्यांना पक्षातून काढून टाकले आणि काही जणांना ठार केले. बल्गेरियात कोस्टोव्ह आणि चेकोस्लोव्हाकियात स्लान्स्की यांच्यासारख्या खंद्या मार्क्सवाद्यांना ठार केल्याची उदाहरणे अगदी ठळक आहेत. त्यांच्यावर खोटे खटले भरले, त्यांचा छळ करून जबान्या मिळविल्या. ते टिटो-वादी होते असे आरोप करून त्यांना फाशी दिले. रशियामध्ये बर्नस्टाइन, बुखरिन, ट्राटस्की इत्यादींचा ज्या पद्धतीने उल्लेख केला जातो त्याच पद्धतीने मार्शल टिटो यांचाही उल्लेख केला जातो.'

## आर्थिक धोरण निराळे

'युगोस्लाव्हियांच्या अर्थिक धोरणात आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रांच्या अर्थिक धोरणात नेमका कोणता फरक आहे ?'

'युगोस्लाव्हिया मुख्यतः शेतीप्रधान देश; पण ही शेती पिकाच्या दृष्टीने निकृष्ट दर्जाची आहे. सामुदायिक शेती करूनही उत्पादन वाढविणे शक्य होणार नाही असे वाटल्यावरून युगोस्लाव्हियाने शेतीची वैयक्तिक मालकी कायम ठेवली आणि सामुदायिक शेती ऐवजी सहकारी शेतीला उत्तेजन दिले. पण ही गोष्ट मार्क्सवादाच्या चौकटीत बसत नाही असा रशियाचा आरोप आहे. उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाबाबतही आम्ही असेच तारतम्याचे धोरण पाळलेले आहे. काही छोटे उद्योगधंदे वैयक्तिक मालकीचे ठेवले आहेत. मोठ्या उद्योगधंद्यातही पक्षाच्या नियंत्रणाऐवजी कामगार समित्यांचे वजन वाढविले आहे. आमच्या वरिष्ठ सभागृहात व्यवसायानुरूप मतदार संघ असून त्यांत व्यावसायिक प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. 'सोशालिस्ट अलायन्स' हीं आमच्या देशातील सामुदायिक राजकीय आघाडी आहे. तिच्यात कम्युनिस्ट आहेत, इतर पक्षांचे लोक आहेत आणि अपक्षीयही आहे. त्यांना पक्षाच्या कारभारावर टीका करता येते. एवढेच नव्हे तर त्यांची निराळी वृत्तपत्रे आहेत. त्यांच्या वेगळ्या सभाही होतात. ते आपले उमेदवार उभे करू शकतात. व्यापारी देववेव, सहकारी संस्थांच्या मार्फत केली जाते. माल उत्पादन करणारे कारखाने आणि विक्री करणारे संघ यांचे संबंध त्यांच्या परस्पर विचारविनिमयातून निर्माण होतात. त्यात सरकार हस्तक्षेप करीत नाही. उत्पादन वाढीच्या योजनेला बाधा येणार नाही आणि वैयक्तिक मालकी-मुळे इतरांचे शोषण होणार नाही, या दोन कसोट्या पाळणाऱ्यांना आर्थिक क्षेत्रात आम्हीं स्वातंत्र्य कायम ठेवले आहे आणि त्याचा परिणामही आम्हांला चांगला दिसून येतो.'

## विकेंद्रीकरणाचा प्रयोग

'युगोस्लाव्हियात विकेंद्रीकरणाची कल्पना अधिक दृढ करण्यात येत आहे असे म्हटले जाते ते कोणत्या अर्थाने ?'

'युद्ध संपल्यानंतर काही काळ आम्हांला कारखानदारी आणि राज्यकारभार यांच्या केंद्रीकरणावर अधिक भर द्यावा लागला. पण अलिकडे आम्ही उत्पादक-संघ आणि ग्राहक--संघ यांचे जाळे सबंध देशभर पसरवून आर्थिक व्यवहार विकेंद्रित पद्धतीने चालू करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होत आहे. युरोपीय कम्युनिस्ट देशांत केंद्रीकरणावर अधिक भर दिला जातो. त्यामुळे हुकूमशाहीचा धोका अधिक वाढतो.ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे. आमच्या पार्लमेंटचे स्वरूप विकेंद्रीकरणाला पोषक ठरेल असे केले आहे. प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या संघाचे प्रतिनिधी "हाऊस ऑफ प्रोड्युसर्स" या वरिष्ठ सभागृहात असतात; आणि सर्वसाधारण जनतेचे प्रतिनिधी "हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह" या सभागृहात असतात. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या कामगारांचे हितसंबंध व जनतेचे हितसंबंध यांत समतोलपणा राखण्याचा प्रयत्न केला जातो. कारखान्याचा अंतर्गत कारभार कामगार संघटनांच्या पुढाकाराने केला जातो. आणि शहराचा कारभार नगरपालिकांच्या हाती अधिक प्रमाणात दिला जातो. राजकीय आणि आर्थिक विकेंद्रीकरणाची मोहीम म्हणून जिचा उल्लेख केला ती या मार्गांनी चालू ठेवली जाते.

'विकेंद्रीकिरणाला राजकीय, अर्थिक, सामाजिक असे विविध अर्थ आहेत. या ठिकाणी मी तुम्हांला तात्त्विक विवेचनाच्या चर्चेत अधिक गुरफटून ठेवू इच्छित नाही. आम्ही प्रत्यक्ष कोणत्या दिशेने समाजवादाची व विकेंद्रीकरणाची वाटचाल करीत आहोत याची कल्पना देण्यासाठी मी आमच्या देशातील काही प्रातिनिधिक संघटनांची कार्यपद्धती सांगतो. या संघटनांत समाजवादी आघाडी ( सोशालिस्ट अलायन्स ), कम्यून्स, मतदार सभा आणि कामगार मंडळे ( वर्कर्स कौन्सिल ) यांचा मुख्यतः समावेश होतो.

## समाजवादी आघाडी

'दुसऱ्या महायुद्धानंतर देशाची सर्व सूत्रं कम्युनिस्ट पक्षाने हाती घेतली. या पक्षाच्या नेतृत्त्वाखालीच देश स्वतंत्र झाला होता. त्यामुळे स्वाभाविकतःच त्याचे नेतृत्वहि या पक्षालाच मिळाले. त्यावेळी देशात आणखी काही राजकीय पक्षही अस्तित्वात होते. कम्युनिस्ट पक्षाची सत्ता रशियाप्रमाणे समाजाचे स्वातंत्र्य नष्ट करण्यास कारणीभूत होऊ नये व शासनसत्तेने इतर पक्षांचेही सहकार्य मिळवावे म्हणून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3८६४२ दि: ३/.८१५१५
३६८ नों दि २५|६|६५



१९५३ मध्ये कम्युनिस्ट पक्षाचे विसर्जन करण्यात आले. तो पक्ष आता पक्ष म्हणून राहिला नाही. इतर सर्व पक्षही विसर्जित करण्यांत आले. या सर्व विसर्जित पक्षांचीच एक समाजवादी आघाडी बनविण्यात आली. 'सोशालिस्ट अलायन्स' या नावाने ही आघाडी किंवा पक्ष सर्व देशाचे मार्गदर्शन करीत आहे. इतर कम्युनिस्ट देशात शासन-संस्था आणि कम्युनिस्ट पक्ष ही दोन्ही एकच मानली जातात. पण मार्क्सच्या मता-प्रमाणे शासनसत्ता जर वितळून टाकावयाची असेल तर, त्याबरोबरच कम्युनिस्ट पक्षही वितळत गेला पाहिजे. नाही तर पक्ष निरंकुशपणे बळकट होतो, सत्ता केंद्रित होत जाते आणि तिचा केंद्रबिंदू स्टालिनसारखा एकमेव सर्वाधिकारी बनतो.

'हा दोष टाळण्यासाठी सोशॅलिस्ट अलायन्स किंवा समाजवादी आघाडीची स्थापना केली आहे. देशातील ७५ टक्के लोक या आघाडीचे सभासद आहेत. सभा-सदत्वाकरिता फक्त महिन्याला पाच दिनार ( सुमारे ६ नवे पैसे ) वर्गणी द्यावी लागते. जुने कम्युनिस्ट नेते आणि समाजवादी आघाडीचे कार्यकर्ते यांना आधिक मोकळेपणाने एकत्र काम करता येते. जुन्या कम्युनिस्ट नेत्यांची 'लीग ऑफ कम्युनिस्ट' या नावाने स्थापन झालेली संस्था तात्त्विक मार्गदर्शनाखेरीज आधिक काही करू शकत नाही. समाजवादी आघाडी केवळ अनेक पक्षांचे संमिश्र मंडळ नव्हे. सत्तेच्या अगदी वरच्या पातळीपासून शेवटच्या घटकापर्यंत जे प्रश्न उद्भवतात ते सर्व चर्चा, वादविवाद, आणि शेवटीं बहुमताचा निर्णय अशा पद्धतीने सोडविले जातात.'

'आमच्या पद्धतीवर असा एक आक्षेप घेतला जातो की देशात राजकीय पक्ष स्थापन करण्याचे स्वातंत्र्य का देण्यात येत नाही ? त्यावर आमची भूमिका अशी आहे. पूर्वीच्या अनेक पक्षांतून एक पक्ष निर्माण केला. आता या एकपक्षपद्धतीच्या पुढची पायरी म्हणजे पक्षविसर्जन, बहुपक्ष नव्हे. पक्षरहित प्रत्यक्ष लोकशाहीच्या दिशेने जावयाचे असेल तर त्यासाठी पक्ष वाढविण्याचा मार्ग सुसंगत ठरत नाही. आमच्या मते यापुढे पक्षांची संख्या वाढविणे म्हणजे मागे जाणे होय. पक्षाची गरजच न ठेवणे हा पुढचा मार्ग आहे थोडक्यात, ही कल्पना सूत्रमय पद्धतीने सांगावयाची तर, बहुपक्ष, एकपक्ष आणि पक्षरहित असा क्रम सांगता येईल. प्रत्यक्ष लोकशाहीच्या प्रयोगात मतदार आणि प्रातिनिधिक संख्या यांच्यामध्ये पक्षासारखा अडसर नको असे आमचे मत आहे.

### कम्युन्स

'शासनसंस्थेचा प्राथमिक घटक म्हणजे कम्युन्स. त्यात दहा–बारा हजार लोकसंख्या सामील असते. स्थानिक विकासाची योजना तयार करणे, अंदाजपत्रक बनविणे, ते मत-दारांच्या सभेत मांडून त्यावर चर्चा करणे इत्यादि कामे कम्युन्सकडे सोपविलेली असतात. तसेच आपल्या क्षेत्रातील शेती, उद्योगधंदे, दळणवळण, व्यापार, शिक्षण इत्यादि कार्यावर

देखरेख ठेवणे, त्यांच्या वाढीसाठी प्रयत्न करणे यांची जबाबदारीही कम्युन्सवर असते. स्थानिक स्वातंत्र्य आणि स्वायत्तता यांच्या बाबतीत कम्युन्स वरच्या सत्तेपासून बऱ्याच अंशी मोकळ्या असतात. विकेंद्रीकरणाचा एक टप्पा म्हणून कम्युन्सच्या कार्यांकडे पाहिले जाते. '

## मतदारसभा

' प्रत्येक मतदार संघाची एक कायमची संघटना उभारलेली आहे. किंबहुना असे म्हणता येईल की निवडणुकीच्या वेळी जो मतदारसंघ असतो त्याचेच निवडणुकीनंतर मतदारसभेत रूपांतर होते. मग हा मतदारसंघ कम्युन्सचा असो अथवा संघराज्याचा असो, मतदारसभेत सर्व मतदार सामील असतात. उमेदवाराची नेमणूक करणे आणि निवडणुकीनंतर त्याच्या कार्यावर देखरेख ठेवणे ही मतदारसभेची मुख्य कामे. निवडून आलेल्या प्रतिनिधीने ठराविक दिवसांनंतर मतदारसभेपुढे आपल्या कामाचा अहवाल सादर केला पाहिजे. त्यावर सभेत चर्चा होते. अनेक सूचना केल्या जातात. आपल्या मतदारसंघाला आवश्यक अशा सुधारणांचा विचार होतो. कम्युन, जिल्हा, राज्य, आणि संघराज्य अशा सर्व पातळींवर मतदारसभा असतात. त्या त्या पातळीवर करावयाच्या कामाचा मतदारसभेत आग्रह धरला जातो. एखाद्या प्रतिनिधीचे काम पसंत पडले नाही तर मतदारसभा त्याला परत बोलावू शकते. ज्याला निवडून देता येते त्याला परतही बोलावता आले पाहिजे अशी त्या मागाची भूमिका आहे. '

## कामगार मंडळे

' प्रत्येक उद्योगधंद्याची व्यवस्था पाहण्यासाठी एक कामगार मंडळ ( वर्कर्स कौन्सिल ) असते. कारखान्यातील कामगारांतून गुप्त मतदान पद्धतीने त्याची निवड होते. ही निवड दोन वर्षांसाठी असते. कारखान्यातील कामगार आणि इतर नोकर यांचे जे प्रमाण असते, तेच प्रमाण कामगार मंडळातही ठेवता येते. कामगारांच्या सुखसोयी पाहणे आणि त्यांच्या उत्पादनकार्यावर देखरेख ठेवणे याची जबाबदारी कामगार मंडळावर असते. ही कामे प्रत्यक्ष पार पाडण्यासाठी कामगार मंडळाकडूनच एक कार्यकारी मंडळ निवडले जाते. कारखान्याची दैनंदिन व्यवस्था या कार्यकारी मंडळाकडे असते. कारखान्याची तांत्रिक आणि यांत्रिक व्यवस्था पाहण्यासाठी एका डायरेक्टराची नेमणूक केली जाते. नेमणूक ही कामगार मंडळ आणि स्थानिक लोकसमिती यांच्याकडून केली जाते. कारखान्याचे उत्पादन, विक्री, हिशेब, दैनंदिन कामे, या सर्वांवर डायरेक्टराची व्यवस्था आणि देखरेख असते. थोडक्यात, कारखान्याची सर्व जबाबदारी डायरेक्टर, कार्यकारी मंडळ आणि कामगार मंडळ अशा क्रमाने सोप-

विलेली असते. त्यामुळे इतर कम्युनिस्ट देशांत व्यवस्थापकाची जी पकड असते आणि तिचा उपयोग कम्युनिस्ट पक्ष सत्ता काबूत ठेवण्यासाठी करतो, तशी परिस्थिती युगोस्लाव्हियाच्या अर्थव्यवस्थेत उत्पन्न होऊ शकत नाही. कामगार मंडळांना फार मोठ्या प्रमाणात स्वायत्तता दिलेली आहे.'

'आपल्या समाजवादी संघटनेचा जगातील इतर समाजवादी पक्षांशी संबंध आहेत काय?'

'सोशॅलिस्ट अलायन्सचे संबंध प्रत्यक्षरीत्या फार थोड्या समाजवादी पक्षांशी आहेत. पण अशियातील समाजवादी चळवळ आणि आफ्रिका व दक्षिण अमेरिका यांतील साम्राज्यविरोधी चळवळ करणारे पक्ष आम्ही अधिक जवळचे मानतो.'

'चीन आणि रशिया या दोन्ही देशांशी युगोस्लाव्हियाचे संबंध सध्या तरी बरे नाहीत, पण त्यांतील चीनवादी गटाशी तुमचे अधिक संबंध बिघडलेले आहेत असे दिसते.'

'हे खरे आहे! आमचा व रशियाचा विरोध उत्पन्न होताच चीनने आमच्या विरुद्ध प्रचार सुरू केला आणि आम्ही पश्चिमी राष्ट्रांची मदत घेऊ लागताच साम्राज्यवाद्यांचे हस्तक आम्हांला ठरविण्यात आले. पण यातील एक महत्त्वाची गोष्ट कदाचित आपल्याही लक्षात आली असेल. आमचे व रशियाचे संबंध दुरावले असले तरी चीन आणि रशिया यांचे संबंध मैत्रीचे आहेत असे समजू नका. त्या दोन देशांतील भांडणे अगदी विकोपाला गेली आहेत. त्यांचे मतभेद अधिक खोल आणि मूलभूत स्वरूपाचे बनले आहेत. अधुनमधून ते मैत्रीचे नाटक करीत असले तरी त्यामागे त्यांची भांडणे लपून राहू शकत नाहीत. त्यांचे संबंध पुनः एक होण्याची वेळ निघून गेली आहे असे आम्हांला वाटते. म्हणूनच चीनचे आमच्याशी वैर असणे आम्हांला तरी अनपेक्षित वाटत नाही. चीन सध्या मार्क्सवादी आक्रमकाच्या भूमिकेत आहे. स्टालिनच्या कारकीर्दीप्रमाणे चीनची चढाईची भूमिका सुरू झाली आहे. रशिया त्या अवस्थेतून पुढे गेला आहे. म्हणूनच शांततामय सहजीवनाची त्याची तयारी दिसून येते. आमच्याशी रशियाचे जे भांडण आहे ते मुख्यतः स्टालिनच्या विक्षिप्त आणि हुकूमशाही धोरणाचे स्वरूप म्हणून सांगता येईल. आमच्या मते, समाजवाद ही केवळ राजकीय चळवळ आहे. तिचा प्रवाह अनेक देशांत आपापल्या पद्धतीने चालू रहावा. त्याला कर्मठ विचारधारेचे स्वरूप येऊ नये. म्हणून एकाच केंद्रावरून समाजवादी विचारांचे नियंत्रण करण्याचा एखाद्या राष्ट्राने हव्यास धरणे चुकीचे आहे आणि पुढच्या काळांत ते अवघडही आहे. ज्यावेळी समाजवादी विचार थोड्या देशांपुरतेच मर्यादित होते तेव्हा त्यांना एकत्र ठेवणे शक्य असेलही; पण आज परिस्थिती बदललेली आहे. समाजवादाचा विचार आणि उच्चार केल्याशिवाय कोणत्याही देशाचे भागत नाही. अशा स्थितीत एका देशाने दुसऱ्या देशाला समाजवादाचा आदेश देणे अप्रस्तुत

ठरते. आपला समाजवादी आदेशच सत्य आहे असा आग्रह धरणे तर हास्यास्पद ठरते. रशियाशी आमच्या मतभेदांचे स्वरूप या विचारसरणीत सापडू शकेल.'

•

दोन अडीच तास चाललेला मुलाखतीचा चर्चेचा हा कार्यक्रम संपला तेव्हा युगोस्लाव्हियाविषयी तर आम्हांला माहिती मिळाल्याचा आनंद वाटलाच, पण रशियाच्या युद्धोत्तरकाळातील धोरणाच्या अनेक बाजू समजल्यामुळेही समाधान वाटले.

या मुलाखतीनंतर आम्ही युगोस्लाव्हियाचे पार्लमेंट पाहण्यासाठी गेलो. त्या दिवशी अधिवेशन चालू होते. उपसभापतींनी मुद्दाम आमच्यासाठी वेळ काढून सर्व सभागृह दाखविले आणि पार्लमेंटच्या कामकाजपद्धतीची कल्पना दिली. सभागृहात विरोधी पक्ष नाही. पण विरोधी हितसंबंधी असलेले गट असतात. उदाहरणार्थ, ग्राहक-संघ व उत्पादक-संघ, कच्च्या मालाचे संघ आणि पक्का माल तयार करणाऱ्या कारखान्यांचे संघ अशा गटांत चर्चा चालते आणि शेवटी बहुमताने निर्णय घेतले जातात, असे उपसभापतींनी सांगितले.

## प्रे. टिटो यांची मुलाखत

प्रे. टिटो यांच्या भेटीची वेळ निश्चित झाली होती; पण त्यापूर्वी एकच दिवस अगोदर ते युनोच्या सभेहून परत आले होते. त्यामुळे प्रत्यक्ष भेट होईल की नाही याविषयी युगोस्लाव्हियाच्या पत्रकारांनी शंका व्यक्त केली. पण नियोजित वेळेच्या एक-तास आगोदर मुलाखतीचे निश्चित झाल्याचे सांगण्यात आले व त्याप्रमाणे आम्ही अध्यक्षांच्या निवासस्थानाकडे निघालो. बेलग्रेड शहरापासून मैल दीडमैल अंतरावर अध्यक्षांचे निवासस्थान आहे. पहिल्या महाद्वारावर उभे असलेले पंधरावीस सैनिक वगळले तर इतर कोठेही पहारा किंवा शिपायांचा बंदोबस्त दिसला नाही. एका विस्तीर्ण उद्यानातून पुढे गेल्यावर अध्यक्षांचे निवासस्थान आणि छोटी कचेरी आहे. त्यात विशेष भव्यता किंवा शिल्पकलेचा एखादा वेगळा नमुना कोठेही दिसून आला नाही. मुख्य दालनाच्या पायऱ्यांवर एका अधिकाऱ्याने स्वागत केल्यावर तशीच दोन तीन दालने ओलांडून आम्ही पुढे गेलो तेव्हा एका प्रशस्त दालनात प्रे. टिटो आपल्या एका सहकाऱ्यां-सह उभे होते. त्यांनी सर्वांचे स्वागत केले. मुलाखतीच्या वेळी एक दुभाषा आणि दोन तीन स्थानिक पत्रकार याखेरीज तेथे कोणीही नव्हते. प्रे. टिटो यांना इंग्रजी चांगले येत असावे असे दिसले. तरी पण सर्व उत्तरे मात्र त्यानी आपल्या मातृभाषेतूनच दिली.

त्यावेळी शिखर परिषदेचा प्रश्न खूप गाजला होता. शिखर परिषद भरुन जागतिक राजकारणातील तंगी कमी करावी असा रशियाचा आग्रह होता, तर पुरेशा पूर्वतयारीशिवाय शिखर परिषद भरविणे उपयुक्त ठरणार नाही, किंबहुना ती

अयशस्वी ठरली तर जागतिक राजकारणात अधिक तेढ माजेल असे अमेरिकेचे मत होते. दोन्ही गट अगदी हातघाईवर आलेले होते. त्यावेळी कोणत्याही लष्करी गटात सामील न झालेल्या काही राष्ट्रप्रमुखांनी मुद्दाम युनोच्या बैठकीला हजर राहून पेचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न केला होता. मार्शल टिटो यांच्याशी झालेल्या प्रश्नोत्तरांची राजकीय पार्श्वभूमी अशी होती. स्वाभाविकच तटस्थ राष्ट्रप्रमुखांच्या प्रयत्नांविषयी आणि त्यांचा बड्या राष्ट्रप्रमुखांवर किती प्रभाव पडला याविषयी अधिक प्रश्नोत्तरे झाली.

‘युनोतील आपल्या अनुभवासंबंधी काही सांगू शकाल काय ?’

‘ज्या देशांचा कोणत्याही लष्करी गटाशी संबंध नाही असे देश यावेळी अधिक जवळ आले आणि त्यांच्या मताचा प्रभावही बराच पडला असे मला वाटते. आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समझोता घडून यावा असा आमचा प्रयत्न होता.’

‘पण मग तुमच्या प्रयत्नाला अधिक विरोध कोणाचा होता ?’

‘तुमचे म्हणणे असे समजावयाचे काय की मी कोणातरी बड्या राष्ट्रावर जबाबदारीत टाकून तंग वातावरणात आणखी भर घालावी ?’

‘तसे नव्हे, पण शांततामय सहजीवनाचा पुरस्कार चालू असतानाच जागतिक राजकारणात एकदम पेचप्रसंग उद्‌भवला; तेव्हा त्यामागे कोणाचा तरी दुराग्रह असला पाहिजे.’

‘शांततामय सहजीवन असा शब्दघोष करणारी राष्ट्रे, त्याची अंमलबजावणी इतर राष्ट्रांनी करावी अशी अपेक्षा करतात. पण दोन परस्परविरोधी बड्या गटात मात्र त्यांना शांतताही नको असते व सहजीवनहि नको असते. या शब्दप्रयोगाचा अर्थ आम्हांला जो कळतो तो असा आहे की, सर्व प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविले जावेत. बडे राष्ट्र आणि छोटे राष्ट्र असा भेद नसावा. इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होऊ नये. सर्व देशांना आपापल्या मार्गाने आणि कार्यपद्धतीने विकास करू द्यावा. अशा स्थितीतच आर्थिक व सांस्कृतिक देवघेव केली जावी.’

प्रे. टिटो यांच्या या उत्तरात प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे रशियाच्या धोरणावर टीका होती. त्यांनी उपरोधिकपणे रशियाचे शांततेचे आणि सहजीवनाचे प्रचारतंत्र हास्यास्पद ठरविण्याचा प्रयत्न केला. रशिया सहजीवनाचा उच्चार करीत असताना पूर्व युरोपातील देशात मला हस्तपेक्ष करतो. त्यामुळे शांततेला अर्थ रहात नाही असा त्यांच्या टीकेचा रोख होता. युगोस्लाव्हियाच्या राजकीय जीवनात रशियाने हस्तपेक्ष केल्यामुळेच त्याच्याविरुद्ध कम्युनिस्ट राष्ट्रांची एक फळी उभी राहिली आणि त्या सर्वांनी मिळून युगोस्लाव्हियाच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न केला. अशा स्थितीत शांतता आणि सहजीवन या दोन्ही शब्दांना अर्थ उरत नाही, असे त्यांचे म्हणणे होते. रशियाबरोबरच हंगेरीतील परिस्थितीचेही त्यांनी अप्रत्यक्षपणे विश्लेषण केले आणि तेथील उठावाचे समर्थनही केले.

प्रे. टिटो यांची सर्व टीका सविस्तर चर्चेसह दुसरे दिवशी बेलग्रेडमधील सर्व वृत्त-पत्रांत ठळकपणे प्रसिद्ध झाली. ' बोरबा ' या सरकारी मुखपत्रात तर हिंदी पत्रकारांच्या छायाचित्रासह बातमी प्रसिद्ध करून त्यावर संपादकीय मतही व्यक्त केले. त्यामुळे हंगेरीमध्ये टिटो यांच्या विरुद्ध पुन्हा एकदा टीकेची झोड उठली. हंगेरीतील प्रतिक्रिया हिन्दी पत्रकारांना जाणवण्याइतकी प्रखर होती. दोन दिवसानंतर हिन्दी पत्रकार प्रागला जाण्यासाठी निघणार होते. आमचा मार्ग हंगेरीतूनच जात असल्यामुळे आम्हाला ट्रॅन्झीट व्हिसा, म्हणजे प्रवासमार्गावरील परवाना घेण्याची आवश्यकता होती. बेल-ग्रेडमधील हंगेरीच्या वकिलाने परवाना देण्याचे आदले दिवशी मान्यही केले होते. मार्शल टीटो यांची मुलाखत प्रसिद्ध झाली आणि हंगेरीच्या धोरणाचे सर्व पारडे फिरले. ' असा व्हिसा देता येत नाही ' असे हंगेरीच्या वकिलाने स्पष्टपणे सांगितले. त्यासाठी बुडापेस्ट आणि मॉस्को येथे विचारणा करावी लागेल, असे त्याचे म्हणणे होते. हंगेरीच्या या धोरणामुळे हिंदी पत्रकारांपुढे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. युगो-स्लाव्हियाच्या पत्रकारांनी आम्हांला खास विमानाने पाठविण्याचे ठरविले. पण अशा विमानाला हंगेरीच्या भूमीवरून जाऊ द्यावयाचे किंवा नाही याचीही विचारणा करावी लागेल, असे पुन्हा हंगेरीच्या वकिलाने कळविले. अशा अडचणींमुळे खर्च वाढत होता आणि मुक्कामही निष्कारण लांबू लागला. शेवटी दोन दिवसानंतर हंगेरीने तात्पुरती परवानगी दिली. कोणीही पत्रकाराने हंगेरीतील कोणत्याही स्टेशनवर उतरू नये आणि बुडापेस्ट स्टेशनचा प्लॅटफॉर्म सोडून बाहेर जाऊ नये, अशी अट घातली. अर्थात ती स्वीकारणे भागच होते.

## बेलग्रेडचा निरोप

हंगेरीने निर्माण केलेल्या पेचप्रसंगामुळे बेलग्रेडचा मुक्काम लांबला खरा, पण आमच्या दृष्टीने ती एक इष्टापत्तीच ठरली. त्या मुक्कामात बेलग्रेडच्या जवळपासची ऐतिहासिक स्थळे, निसर्गरम्य ठिकाणे, औद्योगिक केंद्रे, वृत्तपत्रांची कार्यलये इत्यादि पाहण्याची संधी मिळाली. आम्ही उतरलो होतो त्या मास्को हॉटेलपासून पार्लमेंटचे सभागृह जवळच होते. त्यामुळे दररोज थोडा वेळ तेथे जाऊन कामकाज पाहणे सहज शक्य झाले. त्या वेळी पार्लमेंटमध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या कायद्यात दुरुस्ती करणारे बिल चर्चिले जात होते.

लोकशाही देशातील वृत्तपत्रांच्या संदर्भात युगोस्लाव्हियातील वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याला मर्यादित अर्थ आहे. पण रशिया आणि इतर कम्युनिस्ट देशांच्या तुलनेने मात्र युगोस्लाव्हियन वृत्तपत्रे खूपच स्वतंत्र आहेत. येथे सरकारी धोरणावर टीका करता येते. एखाद्या कायद्याचे अथवा सरकारी हुकमाचे विश्लेषण करता येते. सोशॅलिस्ट अलायन्स मध्ये विविध गट समाविष्ट असले तरी त्या गटांची निरनिराळी वृत्तपत्रे आहेत.

ते आपापल्या गटाचे धोरण मांडू शकतात, तसेच इतर गटांच्या धोरणा विषयी मतभेदही व्यक्त करतात. त्यामुळे एकाच प्रश्नाच्या विविध बाजू वाचकांपुढे मांडल्या जातात. एक-एक सरकारी धोरणाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज नसते. देशातील विविध विचार-प्रवाह आणि मतभेद यांना वृत्तपत्रांच्या द्वारे लोकांसमोर मांडता येते. अर्थात या सर्व विचारांना आणि प्रचाराला विशिष्ट मर्यादा असते. कोणाहिं व्यक्तीला वृत्तपत्र काढण्याची शक्यता नाही. तात्त्विक दृष्ट्या तशी बंदी नसली तरी व्यावहारिक दृष्ट्या मात्र शक्यता नाही. त्यामुळे निरनिराळ्या वैचारिक गटांकडून वृत्तपत्रे चालविली जातात. कम्युनिस्ट गट, समाजवादी गट, पुरोगामी गट अशा गटांची वृत्तपत्रे आपल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करू शकतात. अर्थात 'सोशॅलिस्ट अलायन्स'च्या मूलभूत धोरणाला धक्का पोचणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असते. थोडक्यात, युगोस्लाव्हियातील वृत्तपत्रांना रशियाप्रमाणे सरकारी मक्तेदारीचा जाच सोसावा लागत नाही, पण लोकशाही देशांप्रमाणे अनिर्बंध स्वातंत्र्यही नाही. शिवाय, येथील नागरिकांना परदेशी वृत्तपत्रे, नियतकालिके वाचण्याचीही संधी मिळते. इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स, जर्मनी इत्यादि देशांची वृत्तपत्रे येथील ग्रंथालयात आणि सार्वजनिक ठिकाणी मुक्तपणे वाचता येतात. बेलग्रेड पत्रकार संघाच्या कचेरीत तर भारतातील प्रमुख इंग्रजी दैनिकेही पाहावयास मिळाली. या देशातील वृत्तपत्रांना परदेशी वृत्तसंस्थाकडूनही बातम्या मिळतात. टास, रॉयटर, युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका या वृत्तसंस्थांच्या बातम्या बेलग्रेडच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या पाहावयाला मिळाल्या. रशियन वृत्तपत्रांना 'टास' या रशियन वृत्तसंस्थेखेरीज बाहेरच्या बातम्यांचा संपर्क पोचत नाही.

बेलग्रेडचा निरोप घेताना प्रामुख्याने दोन गोष्टींची छाप मनावर पडलेली होती. प्रे. टिटोंचे प्रभावी व्यक्तित्व आणि युगोस्लाव्हियन नागरिकाची अनौपचारिक वागणूक-युगो म्हणजे दक्षिण दिशेचा. स्लॉव्ह् वंशांची ही दक्षिणी आवृत्ती प्रांजळ आणि प्रामाणिक आहे. बोलण्यात, वागण्यात मास्कोचा शिष्टपणा नाही, की प्राग आणि व्हिएन्नाप्रमाणे काटेकोर टापटीप नाही. बेलग्रेडचा पत्रकार अघळपघळपणा वाटावा इतपत मोकळेपणाने गप्पा मारीत असल्यामुळेच त्याच्याशी दिलखुलासपणे बोलणे शक्य झाले. आपल्या देशातील उणीवा मान्य करण्याची त्याची तयारी असते. आम्हांला युगोस्लाव्हिया-संबंधी माहिती सांगताना, मनात एक आणि बाहेर दुसरे, असा मुत्सद्दीपणा करण्याची त्याला गरज वाटत नव्हती. आपल्या देशाची पुरेशी आर्थिक प्रगती झालेली नाही हे तो सहजपणे सांगत असे. प्रगतीविषयी खूप मोठ्या अपेक्षा उराशी बाळगून त्या पूर्ण झाल्या नाही म्हणजे प्रगतीचा आभास निर्माण करण्याची त्याला गरज वाटत नाही. युगोस्लाव्हियातील जाणता माणूस जागतिक संघर्षांत शांततेची भूमिका मान्य करतो, पण दोन देशांच्या संघर्षात अविकसित देशाच्या क्रांतीची तरफदारी करतो. राजकारणाचाच सतत काथ्याकूट करणे मात्र त्याला आवडत नाही. तो आदरातिथ्यशील आहे,

पण त्याबरोबरच ' हिंदी, हिंदी ' म्हणत आम्हांला प्रेमाच्या उमाळ्याखाली ( ? ) गुदमरून टाकण्याचा अतिरेकीपणा कोठेही झाला नाही. समजून सांगण्याची आणि समजून घेण्याची त्याची वृत्ती उल्लेखनीय आहे.

बेलग्रेड स्टेशनवर रात्री दहा वाजता कडाक्याच्या थंडीत आम्हांला निरोप देण्यासाठी पंधरावीस पत्रकार आले होते. त्यांची आत्मीयता आणि जिव्हाळा आम्ही विसरू शकत नाही.

प्राग

## अपघाताची आठवण

बेलग्रेड ते प्राग एकवीस तासांचा रेल्वेप्रवास कंटाळवाणा वाटला. इस्तंबूलहून निघणारी ती गाडी सोफिया, बेलग्रेड, बुडापेस्ट, प्राग आणि शेवटी बर्लिनला पोचते. दक्षिण युरोपातून उत्तरेकडे जाणारे निरनिराळ्या देशांचे प्रवासी गाडीत होते, पण त्यांपैकी फार थोडया लोकांना एकमेकांची भाषा समजत होती. आमच्या दृष्टीने तर सर्वच भाषा अनाकलनीय होत्या. इंग्रजी समजणारे एकदोन प्रवासी भेटले, पण तेही वाटेतच बुडापेस्टला उतरले. कोणत्याही स्टेशनावर उतारूंची गर्दी नव्हती. घोळक्याने लोक डब्यात घुसताहेत, काहीजण या टोकापासून त्या टोकापर्यंत जागेसाठी धावताहेत, असे दृश्य तर कोठेच दिसले नाही. स्टेशनात फेरीवाल्यांच्या आरोळ्या, हमालांची धडपड, उतारूंची आरडाओरड यांचाही अभाव. त्यामुळे स्टेशन आले केव्हा, उतारू चढले व उतरले केव्हा आणि गाडी पुढे निघाली केव्हा हे सहजासहजी लक्षातदेखील यायचे नाही. स्टेशन लहान असो की मोठे, ते स्वच्छ, टापटीपीचे आणि व्यवस्थित असायचे. देशाची सीमा ओलांडताना कस्टम अधिकारी डब्यात यायचा, अतिशय आदबीने सामानासंबंधी विचारपूस करायचा आणि लगेच पुढे निघून जायचा. आम्ही एकवीस तासांत तीन देशांच्या सीमा ओलांडल्या आणि प्रत्येक ठिकाणी असाच अनुभव आला.

रात्री सात वाजता प्रागच्या स्टेशनात गाडीने प्रवेश केला आणि त्याबरोबर इतर स्टेशनांपेक्षा प्रागचे वैशिष्ट्य नजरेत भरले. प्रागचे पत्रकार आम्हांला उतरून घ्यायला स्टेशनवर आले होते. त्यांतील दोनतीन पत्रकार बादेनच्या प्रवासात चांगलेच परिचित झाले होते. त्यांपैकी एक पत्रकार पुढे आला व हस्तांदोलन करून हसत हसत म्हणाला, 'कसा काय झाला प्रवास ? गाडीला अपघात वगैरे झाला नाही ना !'

त्याच्या प्रश्नाचा रोख एकदम लक्षात आला नाही. पण लगेच मास्कोहून प्रागला पोचलो होतो त्या दिवसाची आठवण झाली. आणि मग त्याच्या प्रश्नातील अपघाताचा उल्लेख लक्षात आला. दोन आठवडयांपूर्वीच आम्ही मॉस्कोहून प्रागला आलो होतो. वस्तुतः मॉस्को ते प्राग एक हजार मैल अंतर म्हणजे विमानाने फक्त दोन तासांचा प्रवास. पण प्रत्यक्ष मात्र तीन तास लागले. हवा वाईट होती. प्रागच्या विमान-तळावर आमच्या विमानाला उतरण्याची परवानगी मिळत नव्हती. त्यामुळे विमानाला

आकाशात किती तरी वेळ घिरट्या घालीत वेळ काढावा लागला. मॉस्को विमानतळावरून आम्ही निघालो तेव्हा हवा स्वच्छ होती. प्रसन्न वातावरणात आमच्या प्रवासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. पूर्व युरोपातील आणखी एक कम्युनिस्ट देश पाहण्याची संधी अर्थातच आनंददायक वाटत होती. चेकोस्लोव्हाकिया आकाराने लहान पण सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत देश मानला जातो. साहित्य आणि संस्कृती, कलात्मकता आणि यंत्रकुशलता अशा सर्वच क्षेत्रांत चेकोस्लोव्हाकियाचे स्थान इतर कम्युनिस्ट देशांपेक्षा श्रेष्ठ आणि उच्च प्रतीचे मानण्यात येते. जेमतेम पावणेदोन कोटी लोकसंख्या असलेला हा देश. आणि त्याचे क्षेत्रफळ तर पश्चिम महाराष्ट्रापेक्षाही थोडे कमीच असेल. पण तेथील शास्त्रीय संशोधन आणि वाङ्मयपरंपरा मात्र अत्यंत समृद्ध व संपन्न आहे.

चेकोस्लोव्हाकियासंबंधी असे विचार मनात चालू होते, विमानाचा प्रवासही निर्वेधपणे चालला होता. बाहेर मात्र मुसळधार पाऊस आणि वादळी वारे यांचे अचानक थैमान सुरू झाले. विमानातून पावसाचे भीषण तांडवनृत्य पाहताना गंमत वाटत होती. पण तेवढ्यात परिचारिकेने मोठ्याने ओरडून पट्टे बांधायला सांगितले. वातावरणात फार मोठा बदल घडून येत होता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने परिचारिकेने सावधगिरीचा इशारा दिला असावा एवढी कल्पना आली. पण कसल्याही प्रकारची भीती मात्र मनात डोकावली नाही. काही अंतरावर विमानतळावरील हिरवे-तांबडे दिवे दिसू लागले. लगतच प्राग शहराचा झगझगीत परिसर दिसत होता. विमानतळाच्या माथ्यावर आमचे विमान आले. आणि लगेच तेवढ्याच वेगाने पुढे निघून गेले. पुन्हा परतले आणि दुसऱ्या दिशेने त्याने आपला मोर्चा वळविला. असा प्रकार तीन-चार वेळा घडला. विमानतळ खाली स्पष्ट दिसत आहे, पण विमान मात्र भूमीकडे न झेपावता दुसऱ्याच दिशेला जाऊन परत तळावर घिरट्या घालीत आहे, असा प्रकार अर्धा-पाऊण तास चालला. आणि नंतर ते खाली उतरले. पावसाचा तुफान हल्ला चालूच होता. विमानापासून विमानतळाच्या इमारतीपर्यंत छत्र्यांतून पोहोचविण्याची सोय केलेली होती. त्या इमारतीच्या भव्य दालनात प्रवेश करताच चेक पत्रकारांनी आमचे अभिनंदन केले. 'बरे झाले! तुम्ही फार मोठ्या संकटातून वाचला.' असे ते म्हणू लागले, तेव्हा त्यांच्या बोलण्याचा आम्हांला प्रथम काहीच बोध होईना. नेहमीच्या स्वागताचा तो प्रकार नव्हता एवढे लक्षात आले. पण अभिनंदन करण्याएवढी आम्ही कोणती कामगिरी बजावली ते मात्र समजेना. तेवढ्यात एका पत्रकाराने, आमचे विमान फार मोठ्या संकटात सापडले होते, ते कोसळण्याच्या बेतात होते, असे सांगितले. तेव्हा सारा प्रकार लक्षात आला. वादळी वारे आणि पावसाची झोड यांच्या तडाख्यात आमचे विमान सापडल्यामुळे अपघात होणार की काय अशी भीती विमानतळावरील अधिकाऱ्यांना वाटत होती. म्हणूनच त्यांनी

विमानाला खाली न उतरण्याचा इशारा देऊन ठेवला. आणि विमानतळावरील आगीचे बंब व इतर प्रतिबंधक साहित्य सुसज्ज ठेवले. पण सुदैवाने काही अनुचित प्रकार घडला नाही. एवढ्या भयंकर प्रसंगाची विमानातील प्रवाशांना मात्र काहीही कल्पना आलेली नव्हती.

त्या विमान अपघातासंबंधी प्रागच्या पत्रकाराने करून दिलेल्या आठवणीने देखील अंगावर शहारे आले. पण ती आठवण झटकून टाकली आणि त्या पत्रकाराबरोबर स्टेशनबाहेर पडलो.

## संस्कृतीचा वारसा

प्राग शहर प्रथमदर्शनीच मनात अनुकुल ग्रह उत्पन्न करणारे आहे. नागरिकांची कलात्मक दृष्टी अनेक ठिकाणी व्यक्त होते. या शहराला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. मोठमोठी प्रार्थनामंदिरे, त्यातील सुंदर चित्रकला, स्थापत्यकामाचे आणि शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने, प्रयोगशाळा, ग्रंथालये यांनी सर्व शहर जणू काय फुलून गेले आहे. चौथ्या चार्लसने चौदाव्या शतकात या शहरात विद्यापीठ स्थापन केले. तेव्हापासूनची ज्ञानसंवर्धनाची अखंड परंपरा या शहराला लाभलेली आहे. शहराच्या जुन्या किल्ल्यात एक अप्रतिम म्युझियम आणि त्या शेजारचे ग्रंथालय यांची स्थापना देखील चौदाव्या शतकात झालेली आहे. ग्रंथालयात वीस हजार हस्तलिखित ग्रंथ उत्कृष्ट बांधणी करून ठेवलेले आहेत. त्यात चिंचोक्याएवढ्या बायबलापासून अक्षरशः कमरेइतक्या उंच शास्त्रीय ग्रंथापर्यंत अनेकविध हस्तलिखित ग्रंथ आहेत. म्युझियमच्या मुख्य सभागृहातील छताला काढलेले सुंदर चित्र म्हणजे अप्रतिम चित्रकलेचा-फ्रेस्कोचा-उत्कृष्ट नमुना आहे. हे चित्र सत्तर वर्षांच्या एका कलावंताने सतत सहा महिने खपून काढले असे सांगण्यात आले. बायबलमधील एका कथेवर आधारलेला तो प्रसंग असून त्यातील रंगांचा ताजेपणा अद्यापही कायम आहे. हस्तलिखित ग्रंथात बहुधा सर्व शास्त्रीय विषयांचे ग्रंथ आहेत. एक ग्रंथ उलगडून पाहिला. वनस्पतिशास्त्राची माहिती असलेल्या त्या ग्रंथात जागोजाग निरनिराळ्या वनस्पतींची प्रत्यक्ष पाने व फुले डकवून ठेवलेली आहेत. या ग्रंथालयाच्या शेजारीच पंधराव्या शतकातील छापखान्याचे एक यंत्र आणि त्यावर छापलेले पहिले पुस्तकही जतन करून ठेवलेले आहे.

शहरात व्हाइटस्-कॅथेड्रल नावाचे प्रचंड चर्च आहे. तेराव्या शतकात या चर्चच्या बांधकामाला सुरवात झाली आणि एकोणिसाव्या शतकात ते पूर्ण झाले. हे चर्च म्हणजे वास्तुशास्त्रातील एक आश्चर्य मानले जाते. भव्यता आणि कलात्मकता यांचा इतका सुंदर आणि मनोहर संगम युरोपातील फार थोड्या चर्चमध्ये झालेला असेल असे सांगण्यात आले. चर्चच्या छतावर आणि भिंतीवर काढलेली चित्रे तीन

चार तास पाहूनही समाधान झाले नाही. चेक लोकांची कलात्मकता लहानशा बांधकामातही कशी व्यक्त होते याचे कितीतरी नमुने पाहावयास मिळाले. किल्ल्यापासून शहरात जाताना एक छोटासा पूल ओलांडावा लागतो. या पुलाच्या दोन्ही बाजूंच्या कठड्यावर उत्कृष्ट पुतळे उभारलेले आहेत. बायबलमधील एखादा प्रसंग घेऊन त्याच्या आधारे पुतळ्याची घडण करावयाची आणि तो सार्वजनिक ठिकाणी, रस्त्याच्या कडेला इमारतीवर तो उभारावयाचा असा जणू काय येथील शिल्पकारांना छंदच असावा.

शिल्पकलेचा अति प्रचंड नमुना म्हणून शहरानजीक असलेला स्टॅलिनचा[१] पुतळा मुद्दाम दाखविण्यात आला. रशिया व चेकोस्लोव्हाकिया यांच्या मैत्रीचे प्रतीक म्हणून युद्धानंतर हा पुतळा उभारला आहे. एवढा प्रचंड पुतळा मी पूर्वी कधीही पाहिला नव्हता. सुटीच्या दिवशी पुतळ्याजवळच्या भागाला यात्रेचे स्वरूप येते.

## कलेचे वेड

प्रागच्या पत्रकारांनी आमचे स्वागत आपुलकीने केले. मॉस्कोच्या पत्रकारापेक्षा येथील पत्रकार अधिक अनौपचारिक, अधिक मोकळ्या वृत्तीचा आणि अधिक चर्चा करणारा असल्यामुळे त्याच्याशीं बोलण्यात एक प्रकारचा आनंद वाटत होता. हा अनुभव मॉस्कोत तरी मुळीच आला नाही. शहरापासून तीस चाळीस मैल दूर असलेल्या पत्रकार–धामामध्ये आम्हांला खाना देण्यात आला तेव्हा बऱ्याच प्रशस्त गप्पा मारण्याची संधी मिळाली. एक वयोवृद्ध पत्रकार हिंदी पत्रकारांविषयी विशेष आत्मीयता दाखवीत होते. प्रागला पोचल्यापासून परत निघेपर्यंत त्यांनी आम्हांला सोबत केली. ते काही वर्षांपूर्वी दिल्लीतील चेक वकिलातीत काम करीत होते. त्यांना भारतातील राजकारण, आर्थिक परिस्थिती, प्रदेश इत्यादीसंबंधी खूपच माहिती होती.

पत्रकार–धाममध्ये गप्पा मारीत बसलो असता, परस्पर परिचयाचा कार्यक्रम सुरू झाला. माझ्यासंबंधी माहिती सांगताना अर्थातच ‘ मुंबई नजीकच्या पुणे शहरातील पत्रकार ’ असे काहीसे लांबलचक शब्दांत सांगावे लागले. तेवढ्यात ते वृद्ध पत्रकार म्हणाले, ‘ काय हो, म्हणजे तुम्ही महाराष्ट्राचे. होय ना ? ”

‘ होय ! ’ मी म्हटले.

[१] क्रुश्चेव्हने स्टालिनच्या कारकीर्दीवर टीका करून रशियातील त्याचे सर्व पुतळे आणि चित्रे नामशेष करण्याची जी मोहीम सुरू केली त्या मोहिमेतून प्रागनजीकचा हा पुतळाही सुटला नाही. या पुतळ्यावर घण घालून त्याला विदीर्ण केल्याची बातमी अलिकडेच प्रसिद्ध झाली आहे. हे मूर्तिमंत रशियन राजवटीच्या प्रेरणेनेच झाले. पण दैवदुर्विलास असा की त्या पुतळ्याचे भंगलेले काही तुकडे ब्रिटिश म्युझियमने विकत घेतल्याचीही बातमी प्रसिद्ध झाली आहे.

'तुमचं गुजराती लोकांशी चाललेलं भांडण मिटलं का ?

'भांडण नव्हते ! भाषावार प्रांतांची रचना व्हावी अशी आमची मागणी होती. ती पूर्ण झाली.'

'मग तुमच्या प्रांताची लोकसंख्या विभागली म्हणता !'

'विभागली असली तरी एकट्या महाराष्ट्राची लोकसंख्या चेकोस्लोव्हाकियापेक्षा दुप्पट आहे.'

'असे ! मग आमच्या देशात द्याना थोडे लोक पाठवून ! आमचे उद्योगधंदे इतके वेगाने वाढत आहेत की त्यासाठी येतील तेवढे लोक आम्हांला हवे आहेत.'

'कल्पना चांगली आहे. पण काय हो, चीनसारखे भरमसाट लोकसंख्या असलेले तुमचे दोस्त-राष्ट्र आहेना ! तेथून तुम्हांला लक्षावधी लोक सहज मिळू शकतील. त्यांनाही असाच कोठेतरी लोकभार कमी करायचा आहे.'

हे वाक्य ऐकताच मात्र तो गंभीर बनला आणि म्हणाला, 'तुम्ही म्हणता तसा प्रयत्न आम्ही दोन वर्षांपूर्वीच केला होता. दहा लाख चिनी लोकांना पाठविण्याचे चीन सरकारने मान्य केले. त्याप्रमाणे त्यांच्या वसाहती व त्यांच्यासाठी कारखाने कोठे उभारायचे याची आखणीही झाली. पण ऐन वेळीं काय झाले कोणास ठाऊक; चिनी लोकांना पाठविता येत नाही, असे चीनने कळविले आणि आमची तयारी फुकट गेली.'

या चर्चेनंतर त्याने चीनविषयी कितीतरी तक्रारी सांगितल्या. त्यांत आडपडदा काहीही नव्हता. सरळ सरळ ती चीनची निंदा होती. पण रशियासंबंधी चेक लोकांचे काय मत आहे ते मात्र कोणी सांगायला तयार नव्हते. रशियन लोक आपल्यापेक्षा सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले आहेत, असे मात्र अप्रत्यक्षपणे एका चेक पत्रकाराने अभिप्राय व्यक्त केला. त्याचा पुरावा म्हणून त्याने प्रागमधील चित्रकला, शिल्पकला, विद्यापीठ, रंगभूमी, संगीत, साहित्य यांची उदाहरणे दिली व प्रत्येक वेळीं चेक लोकांनीच या कला युरोपात प्रसृत केल्या असे आवर्जून सांगितले.

हे सर्व ऐकत असता चेकोस्लोव्हाकियाविषयी माझ्या मनात आदर वाढत होता. चेक लोकांचे लोभस व्यक्तित्व, शालीनता, ज्ञानसाधनेची इच्छा, दुसऱ्यांच्या भावना समजून घेण्याची समंजस वृत्ती यांचा प्रत्यय मला लहानमोठ्या प्रसंगांच्या निमित्ताने येत होता. पण त्याच वेळीं इतके सुसंस्कृत, कलाप्रिय, लोकशाहीची उदार मनोभावना असलेले लोक एकपक्षीय राजवटीखाली कसे राहतात, याचे उत्तर मात्र मिळत नव्हते. त्यावर फारसे कोणी बोलायलाही तयार नसे. पण स्वभावतःच चेक लोकांना विविध विषयांवर गप्पा मारण्याची संवय असल्यामुळे निरनिराळ्या प्रसंगांनिमित्त झालेल्या चर्चेतून माझ्या मनातील शंकेला अंशाअंशाने उत्तरे मिळत गेली. आम्ही ज्या आलीशान हॉटेलमध्ये उतरलो होतो तेथे असलेल्या काही हिंदी मित्रांनीही चेकोस्लो-

व्हाकियाच्या अलिकडच्या इतिहासातील अनेक प्रसंग सांगितले. त्यावरून चेकोस्लोव्हाकियाच्या राजकीय व आर्थिक-जीवनात उद्‌भवलेल्या प्रसंगांची संगती लागू शकते.

## दहा वर्षांत दोन संकटे

चेकोस्लोव्हाकियाला लोकशाही राजवटीची प्रदीर्घ परंपरा होती. पश्चिम युरोपातील तीन चार देश वगळले तर चेकोस्लोव्हाकियाइतका समृद्ध देश युरोपात दुसरा कोणताही नव्हता. औद्योगिक विकास आणि शेतीविषयक प्रगत धोरण यांमुळे समाज सुखी होता. उद्योगशील, तंत्रज्ञ आणि उदारमतवादी चेक लोकांना कलेची आवड आणि सौंदर्यदृष्टी अनेक शतकांपासून लाभत गेली आहे. पण सुसंस्कृत, समृद्ध आणि लोकशाहीची परंपरा असलेला हा देश केवळ दहा वर्षांच्या अवधीत दोन वेळा हुकूमशाहीचे भक्ष्य बनला. प्रथम १९३८ मध्ये त्यावर नाझी साम्राज्यवादाने झडप घातली. आणि १९४८ मध्ये रशियन कम्युनिझमने त्याला ग्रासून टाकले.

चेकोस्लोव्हाकियातील जर्मन अल्पसंख्याकांना स्वतंत्र करण्याचे निमित्त करून हिटलरने चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले. आणि बरोबर दहा वर्षांनंतर अल्पसंख्य कम्युनिस्टांचा कैवार घेऊन स्टालिनने चेकोस्लोव्हाकियाच्या 'मुक्ततेचे' समर्थन केले. पहिल्या आघातानेच चेकोस्लोव्हाकियाची लोकशाही दुबळी झाली होती. युद्धकाळात हिटलरच्या सत्तेखाली तिची चौकट नष्ट झाली होती. पण नागरिकांच्या मनातील लोकशाहीच्या भावना हिटलरलाही काढून घेता आल्या नव्हत्या. युद्ध संपताच लोक पुन्हा स्वतःला सावरू लागले आणि लोकशाहीच्या नव्या उभारणीचे स्वप्न पाहू लागले. पण त्याच वेळी स्टालिनने आपल्या अनुयायांकडून चेकोस्लोव्हाकियातील लोकशाही हाणून पाडण्याचा चंग बांधला आणि शेवटी फेब्रुवारी १९४८ मधे तेथील सत्ता उलथून पाडली.

या प्रकारामुळे केवळ चेकोस्लोव्हाकियातच नव्हे, तर मध्य युरोपातूनही लोकशाहीचे उच्चाटन झाले. प्रे. बेनेससारख्या जगप्रसिद्ध लोकशाहीवाद्याला या घटनेने धक्का बसून सहा महिन्यांतच मृत्यू आला. जॅन मसारिकने आत्महत्या केली. उद्योगमंत्री ड्रॅटिनानेही आत्महत्येचा प्रयत्न केला पण तो फसला. व्यापारमंत्री रिपकाला देशत्याग करावा लागला. चेकोस्लोव्हाकियाचे हे सर्व मुत्सद्दी अनेक वर्षांच्या देशसेवेने आणि युद्धकाळातील अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीही आपल्या कार्याने लोकप्रिय बनलेले होते. पण त्यांनी रशियाच्या हस्तक्षेपाला विरोध दर्शविला आणि तेव्हापासून त्यांचा अस्त ओढवला.

जर्मन आणि चेक लोकांचे वैर फार जुने होते. पिढयान पिढया या दोन देशांत शत्रुत्व कायम होते. तीस लाख जर्मन लोक चेकोस्लोव्हाकियात रहात होते. त्यांच्या

सुरक्षिततेचे निमित्त करूनच हिटलरने पुन्हा एकदा चेकोस्लोव्हाकियाशी युद्ध करण्याची धमकी दिली. म्युनिच कराराने पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी त्याला पाठिंबा दिला. त्यामुळे त्याचा हेतू साध्य झाला. पण तेवढयानेही त्याचे समाधान झाले नाही. शेवटी सर्व देशच त्याने आपल्या ताब्यात घेतला. रशिया आणि चेकोस्लोव्हाकिया यांच्यामधे मात्र कधीही वैमनस्य नव्हते. युद्धकाळात मित्र-राष्ट्र म्हणून एकीकडून रशिया आणि दुसरीकडून पश्चिमी राष्ट्रे यांनी चेकोस्लोव्हाकियाला मदत केली. युद्धकाळात चेक सरकार निर्वासित बनून लंडनमधे गेले होते आणि त्याच वेळी प्रमुख चेक कम्युनिस्ट पुढारी मॉस्कोला गेले होते. युद्धानंतर या दोन्ही गटांची रस्सीखेच सुरू झाली. वस्तुतः युद्ध संपेपर्यंत तरी रशिया आणि चेकोस्लोव्हाकिया यांच्या शत्रुत्वाची कल्पना कोणाच्या मनातही आली नव्हती. झारच्या काळापासून सोव्हिएट राजवटीपर्यंत चेकोस्लोव्हाकियाच्या सत्तेने रशियाशी मित्रत्व ठेवले होते. वैचारिक मतभेद असूनही हे मित्रत्व कायम राहू शकले. स्टालिनच्या ऐन आमदानीच्या काळात म्हणजे १९३५ साली चेकोस्लोव्हाकियाने रशियाशी मैत्रीचा करार केला होता. पूर्व आणि पश्चिम युरोपच्या मध्यावर असलेल्या चेकोस्लोव्हाकियाने रशियाशी केलेल्या या कराराला युरोपच्या राजकारणात फार महत्त्वाचे स्थान होते. १९४३ मध्ये ऐन युद्धाच्या धुमश्चक्रीच्या काळात या दोन देशांचा दुसरा मैत्रीचा करार झाला. त्यामुळे सलोख्याचे संबंध अधिक वाढले अशीच चेकोस्लोव्हाकियाची तरी कल्पना होती. ‘ रशियन आणि चेक लोकांची मैत्री चिरायू होवो, ’ अशा घोषणा दोन्ही देशांत दुमदुमल्या होत्या.

१९४२ च्या कराराप्रमाणे दोन्ही देशांनी अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करावयाचा नाही असे ठरले होते. तसेच चेकोस्लोव्हाकियाचे राष्ट्रीय स्वातंत्र्य कायम राखले जाईल असाही विश्वास रशियाने दिला होता. चेकोस्लोव्हाकियाने या विश्वासावर विसंबून रशियाच्या पडद्यामागच्या हालचालींकडे दुर्लक्ष केले आणि शेवटी त्यातूनच दिवसेंदिवस रशियाचा हस्तक्षेप वाढत गेला. आणि त्यात चेकोस्लोव्हाकियाचे स्वातंत्र्य नाहीसे झाले. या कामी रशियाने चेकोस्लाव्हाकियातील कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांना हाताशी धरले. त्या पक्षाची सर्व सूत्रे मॉस्कोहून हलत होती. युद्धकाळात मॉस्कोत राहिलेल्या कम्युनिस्ट नेत्यांना स्वतंत्र अस्तित्व राहिलेले नव्हते. त्यांशिवाय, चेकोस्लोव्हाकियाच्या नागरिकांतही त्यांचा पक्ष अल्पसंख्य होता. पण रशियासारख्या समर्थ देशाचा पाठिंबा मिळाल्यामुळे अल्पसंख्य कम्युनिस्ट पक्षही अधिकारावर आला आणि स्टालिनला हवे होते तसे सरकार चेकोस्लोव्हाकियाच्या सत्तास्थानी बसविण्यात आले. स्टालिनला चेकोस्लोव्हाकियाचे केवळ सहकार्य किंवा मैत्री पुरेशी नव्हती. त्याला तेथील सत्ता संपूर्णपणे आपल्या हातांत हवी होती. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने युद्धोत्तर काळात त्याची पावले पडत होती आणि त्याला अनुसरूनच त्याने चेकोस्लोव्हकियातील सत्तेचे राजकारण आपल्या हाती घेतले होते.

## सत्तांतराचे नाटक

चेकोस्लोव्हाकियातील सत्तांतराचे नाटक जुलै १९४७ मध्ये सुरू झाले आणि त्यावर फेब्रुवारी १९४८ मध्ये अखेरचा पडदा पडला. या सहा महिन्यांत चेकोस्लोव्हाकियात प्रचंड वादळी वेगाने घटना घडत होत्या. त्यांत रशियाच्या तुलनेने चेकोस्लोव्हाकियासारखे छोटे राष्ट्र कोठच्या कोठे पार बुडून गेले. या नाटकाचा एकेक प्रवेश म्हणजे रशियाच्या विस्तारवादाचा एक एक विजयच होता. या विजयाचे श्रेय स्टालिनच्या मुत्सद्देगिरीला अधिक द्यावयाचे की चेकोस्लोव्हाकियातील कम्युनिस्ट नेत्यांच्या फितुरी राजकारणाला अधिक द्यावयाचे असा प्रश्नही या देशाच्या बाबतीत पडत नाही. कारण रशियाच्या कोणत्याही कृतीचे हमखास समर्थन करण्यावरच चेकोस्लोव्हाकियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे अस्तित्व अवलंबून होते. हा पक्ष मॉस्कोचा आदेश डावलू शकत नव्हता, इतके त्याच्यावर रशियाच्या सत्तेचे दडपण होते.

चेकोस्लोव्हाकियातील सूडेटन जर्मन हिटलरच्या हेरगिरीची कामे करीत असत. त्यामुळेच हिटलरला चेकोस्लोव्हाकियातील सर्व गुप्त रहस्ये समजत असत. चेकोस्लोव्हाकिया पोखरून टाकण्यासाठी त्याने या हेरांचा उपयोग करून घेतला. दहा वर्षांनंतर त्याच घटनांची निराळ्या संदर्भात पुनरावृत्ती झाली. चेकोस्लोव्हाकियातील कम्युनिस्ट सभासद स्टालिनच्या हेरगिरीची कामे करू लागले आणि केवळ सहा महिन्यांत त्यांना चेकोस्लोव्हाकियातील लोकशाही उलथून पाडण्यात यश मिळाले. सुडेटन जर्मन आणि चेक कम्युनिस्ट दोघांच्याही निष्ठा चेकोस्लोव्हाकियापेक्षा बाहेरच्या देशांवर अधिक होत्या. सुडेटनांना आपल्या राष्ट्रनिष्ठेपेक्षा जर्मन वंशाची निष्ठा अधिक वाटत होती आणि कम्युनिस्टांना आपल्या राष्ट्रनिष्ठेपेक्षा मार्क्सवादी आंतरराष्ट्रीय निष्ठा श्रेष्ठ वाटत होती. दोघांचे हेतू वेगळे असतील किंवा नसतील, पण दुसऱ्या देशाशी निष्ठा ठेवल्यामुळे दोन्हीही वेळी परिणाम मात्र एकच झाला. चेस्कोस्लोव्हाकियाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही दोन्ही वेळी धोक्यात आले. लोकशाही आणि हुकूमशाही यांचाच संघर्ष दोन्ही वेळा घडला आणि त्यांत लोकशाही पराभूत झाली. हिटलरची हुकूमशाही आणि स्टालिनची हुकूमशाही यांच्यामागची तात्त्विक भूमिका अगदी वेगळी असेल, पण चेकोस्लोव्हाकियाच्या राष्ट्रीय दृष्टीने त्या दोन्हींचे परिणाम मात्र सारखेच झाले.

युद्धानंतर चेकोस्लोव्हाकियातील सर्व उद्योगधंद्यांची आणि शेतीची पुनर्घटना करणे आवश्यक होते. युद्धकाळात सर्व कारखाने विस्कळीत झाले होते. ते जर्मनांच्या ताब्यात गेले होते. अनेक यंत्रज्ञ आणि तंत्रज्ञ देशोधडीला लागले होते. महाविद्यालयीन शिक्षण जवळजवळ बंद पडले होते. देशातील वाहतुकीचे मार्ग, पूल, विमानतळ उध्वस्त झाले होते. अशा परिस्थितीत या सर्वांना पुन्हा उभे करावयाचे म्हणजे बाहेरची मदत घेणे अपरिहार्य होते. ही मदत पूर्वेकडून घ्यावयाची की पश्चिमेकडून घ्यावयाची

असाही वाद होण्याचे कारण नव्हते. कारण पूर्वेकडून, म्हणजे रशियाकडून मदत मिळण्याची शक्यता नव्हती. युद्धामुळे रशियाचेही आर्थिक जीवन विस्कळीत झाले होते. परदेशांना मदत देण्याच्या परिस्थितीत तो देश नव्हता. त्याच वेळी युरोपच्या पुनर्घटनेसाठी अमेरिकेने मार्शल योजना जाहीर केली होती. या योजनेत सामील होण्यासाठी चेकोस्लोव्हाकियालाही निमंत्रण मिळाले होते. मार्शल योजनेचा विचार करण्यासाठी पॅरिस येथे जुलै १९४७ मध्ये परिषद भरणार होती. या परिषदेत सामील होण्याचा निर्णय चेक सरकारने घेतला होता. त्यासाठी सर्व सिद्धताही झाली आणि ऐनवेळी मॉस्कोहून असा आदेश आला की चेकोस्लोव्हाकियाच्या प्रमुख मंत्र्यांनी ताबडतोब मॉस्को येथे हजर रहावे. स्टालिनला त्यांच्याशी महत्त्वाची बोलणी करावयाची होती. या घटनेपासूनच चेकोस्लोव्हाकियाच्या अंतर्गत आणि परराष्ट्रविषयक धोरणात स्टालिनचा हस्तक्षेप सुरू झाला.

यापुढचा तपशीलवार इतिहास म्हणजे चेकोस्लोव्हाकियावर रशियाचे वर्चस्व प्रस्थापित होण्याचा इतिहास आहे. त्यातच स्टालिनच्या युद्धोत्तर परराष्ट्र धोरणाचे तंत्र सामावले आहे. आणि मध्य युरोपातील कम्युनिस्ट क्रांतीच्या घटनांचे तंत्रही त्यात व्यक्त झाले. तो सर्व तपशील या ठिकाणी सांगणे शक्य नाही. पण स्टालिनच्या धोरणाची दिशा समजण्यासाठी त्या तंत्रमंत्रांचा परिचय करून घेणे मात्र शक्य आहे.

## क्रांतीचे तंत्र आणि मंत्र

दुसऱ्या महायुद्धानंतर स्टालिनने युरोपीय देशांतील राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेचा कम्युनिस्ट क्रांतीच्या दृष्टीने उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला. या क्रांतीचे एक तंत्र तयार केले. अर्थात हे तंत्र कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा एक अपरिहार्य भाग म्हणूनच समजले जाते. आणि रशियन क्रांतीनंतर लेनिननेही त्याच वेळच्या परिस्थितीला अनुसरून ते उपयोगात आणले होते. त्याचे तेच तंत्र नव्या पद्धतीने स्टालिनने पोलंड, हंगेरी, चेकोस्लोव्हाकिया, अल्बानिया, बल्गेरिया आणि रुमानिया या देशांत यशस्वी रीत्या उपयोगात आणले. फिनलंड आणि ग्रीस या दोन देशांत त्याला यश मिळाले नाही. ऑस्ट्रिया, इटाली आणि फ्रान्स या तीन देशांतील कम्युनिस्ट पक्षाला स्टालिनच्या इच्छेप्रमाणे वागण्यास वावच मिळू शकला नाही.

रशियन क्रांतीच्या वेळेला उपयोगात आणलेले सशस्त्र उठावाचे प्रयोग वरील देशांत यशस्वी होणे शक्य नव्हते. कारण त्या देशात युद्धामुळे तत्कालिन अस्थिरता आलेली होती तरी, झारशाहीप्रमाणे अनेक वर्षे जुलमी, अत्याचारी सत्तेखाली राहण्याची त्या देशांवर पाळी आलेली नव्हती. किंबहुना त्यांपैकी काही देशांत लोकशाही परंपराही रुजलेल्या होत्या. त्यामुळे स्टालिनला फंदफितुरीचे डावपेच करणे आवश्यक

ठरले. वस्तुतः फितुरीच्या मार्गाने रशियाने त्या देशांवर एकप्रकारे अप्रत्यक्ष आक्रमणच केले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाचे लष्करी सामर्थ्य जगाच्या अनुभवाला आले होते. युद्धानंतर त्या सामर्थ्याचा उपयोग मध्य युरोपातील लहान राष्ट्रांना मार्क्सवादाची दीक्षा देण्याच्या कामी झाला. ही दीक्षा देण्याची स्टालिनने विशिष्ट पद्धत आखली होती. या पद्धतीचे किंवा स्टालिनच्या दृष्टीने या तंत्राचे थोडक्यात सूत्र पुढीलप्रमाणे सांगता येईल :

ज्या देशात ‘ क्रांती ’ करावयाची तेथे प्रथम एक संयुक्त आघाडी स्थापन करण्यात येते. कम्युनिस्ट पक्ष अल्पसंख्य पण संघटित आणि रशियाकडून संरक्षणाची हमी मिळविलेला असे. त्यामुळे अल्पसंख्य असूनही त्याला अशा आघाडीची सूत्रे हलविण्याची संधी मिळविता येते. या आघाडीने देशात संयुक्त सरकार स्थापन करण्या-संबंधी जोराचा प्रचार करावयाचा. या सरकारमध्ये कम्युनिस्ट पक्षाला प्रधानस्थान मिळतेच. मंत्रिमंडळास प्रवेश मिळाला की गृहखाते व माहिती खाते हाती घ्यावयाचे. गृहखात्याच्या जोरावर हळूहळू पोलिस व तत्सम संरक्षण दलांत पक्षांच्या कार्यकर्त्यांची बढती करावयाची. त्या पुढची पायरी म्हणजे पक्षाच्या विरोधकांना दहशत निर्माण होईल असे प्रकार सुरू करावयाचे. धरपकड, विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबणे अथवा हद्दपार करणे, मतदारांच्या याद्यांतून त्यांची नावे काढून टाकणे इत्यादि प्रकार पोलिस खाते करू लागते. विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक झाली म्हणजे स्वाभाविकच त्यांच्या अनुयायांमध्ये एक प्रकारे भीतीचे वातावरण निर्माण होते. त्याच्या जोडीला माहिती खात्याने विरोधी वृत्तपत्रे बंद करणे, बिरोधी पक्षांबिषयीं असत्य, अर्ध सत्य बातम्या पसराव्या. अशा परिस्थितीत निवडणुकीची तयारी झाली म्हणजे त्या जिंकणे अवघड नसते. किंबहुना प्रत्यक्ष होण्यापूर्वीच त्या जिंकल्या जातात. त्यानंतर निवडणु-कीचा खूप गाजावाजा केला जातो. पण एवढे करूनही पूर्व युरोपीय देशांत कम्युनिस्ट पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. अशा वेळीं हुकमी एक्का म्हणून रशियन सरकारने आपले लष्कर निरनिराळ्या मार्गांनी उपयोगात आणले. रशियाच्या हस्तक्षेपामुळे, अल्पमत असलेला कम्युनिस्ट पक्ष अधिकारावर आला म्हणजे प्रथम तो हळू हळू विरोधी पक्ष बरखास्त करून टाकतो आणि ‘ महान क्रांती ’ झाली असे घोषित करून एकटा कम्युनिस्ट पक्षच सत्ताधीश बनतों. एकदा सत्ता हाती आली म्हणजे तिचा उदयोग कसा करावयाचा याचे धडे अगोदरच रशियाने तयार करून ठेवलेले आहेत.

वर उल्लेखलेल्या तंत्रात स्थानपरत्वे काही किरकोळ स्वरूपाचे बदल केले गेले असतील. पण असे अपवादात्मक बदल वगळल्यास तंत्रात मुख्य साचा मात्र सगळीकडे सारखाच. संयुक्त आघाडी, संयुक्त सरकार, निवडणुकीपूर्वीचे दहशतवादी वातावरण, निवडणुकी, निरनिराळ्या मार्गांनी मते मिळविणे, यश मिळाल्यास विरोधी पक्ष बरखास्त करणे; पराभव झाल्यास दहशतवादी कृत्यांनी, अपप्रचारांनी लोकशाहीची मुळे तोडून

टाकणे आणि शेवटी संपूर्ण सत्ता हाती घेऊन सर्व विरोधी पक्षांचे उच्चाटन करणे. ' लेनिनवादी तंत्र ' असे या तंत्राचे नाव आहे.

लेनिनने अंमलात आणलेल्या या तंत्रात स्टालिनने कोणती आणि कशी भर घातली याची उदाहरणे पोलंड आणि चेकोस्लोव्हाकिया या देशांची सांगता येतील. चेकोस्लोव्हाकियात डॉ. बेनेस यांच्यासारख्या जगन्मान्य लोकशाहीच्या पुरस्कर्त्याला अखेरीस दहशतीच्या वातावरणात सत्तात्याग करावा लागला, जॅन मसॅरिकला आत्म-हत्या करावी लागली आणि अनेकांना प्राणास मुकावे लागले.

•

प्रागच्या विमानतळावरून विमानाने मॉस्कोच्या दिशेने अवकाशात झेप घेतली. ढगांचा पडदा बाजूला सारून हजारो फूट उंच उड्डाण करायला त्यास कांही मिनिटांचा देखील अवधी लागला नाही. खाली डोकावून पाहिले. ढगांच्या जाड आच्छादनाखाली सारे जग जणू अदृश्य झाले होते. तरंगत्या ढगाखेरीज कांहीही दिसत नव्हते. शिवाय काही आठवड्यापूर्वीच, मास्कोहून प्रागकडे जाताना या मार्गावरील निसर्ग पाहण्यात जे कुतूहल वाटत होते तेही आता कमी झाले होते. त्यामुळे बसल्या जागीच मन विचारात गुंतून गेले. प्रवासातील अनेक प्रसंग, व्यक्ती, आणि दृश्ये डोळ्यापुढून सरकू लागली. लेनिनग्राड, मॉस्को, प्राग, व्हिएन्ना, बेलग्रेड...पूर्व युरोपातील ही प्रसिद्ध शहरे, त्यातील बहुरंगी जीवन, तेथील लोक आणि त्यांचे विचार या सर्वांची उजळणी मनात होऊ लागली. माणसाप्रमाणेच प्रत्येक शहराचेही रंगरूप वेगळे, त्यांचा सूर आणि नूर निराळा. आधुनिक सुधारणांच्या काही ठराविक चिन्हांनी त्यांना काही बाबतीत सारखेपणा आलेला असला तरी त्या नगरींचे व्यक्तित्व वेगवेगळे होते. तेथील नागरिक, त्यांच्या वागण्याची रीतभात, त्यांच्या आवडीनिवडी, जीवनाकडे पाहण्याची दृष्टी, राहणीमान यांत कितीतरी वेगळेपणा जाणवत होता. लेनिनग्राडची आकर्षक मूर्ती एखाद्या सुसंस्कृत, घरंदाज कुलीन स्त्रीप्रमाणे आदरणीय वाटली; तर प्रागच्या दर्शनाने संपन्न, शालीन प्रमदेचे कल्पनाचित्र डोळ्यापुढे उभे राहिले. नेटके अलंकार घालून हास्यमुखाने स्वागत करणारी ती नीटस नगरी विलोभनीय वाटली. व्हिएन्नाचे जीवन म्हणजे तर एखाद्या कलावंताचे जीवन. कोणत्याही राजमार्गावर जा, संगीत, नाट्य, नृत्य, शिल्प याना समूर्त करणाऱ्या संस्था आणि सभागृहे. सौंदर्य, लालित्य आणि गोडवा जणू ओतप्रोत भरलेला.

या तिन्ही शहरांच्या पार्श्वभूमीवर मॉस्कोचे चित्र मात्र अगदी भिन्न, अगदी निराळे. उग्रप्रकृति आणि पुरुषी औद्धत्य यांची जाणीव करून देणाऱ्या त्या शहराला आत्मप्रदर्शनाची जबरदस्त हौस. त्याची भव्यता वादातीत आहे. क्रेमलीनसारखी ऐतिहासिक वास्तू, मेट्रोच्या स्टेशनांचे वैभवशाली बांधकाम, ' गम 'सारखे प्रचंड वस्तु-

विक्री-केंद्र, बोल्शॉय थिएटर सारखे साम्राज्यकालीन वैभवाचे मूर्तिमंत प्रतिक, विद्यापीठाची बत्तीस मजली उत्तुंग इमारत या सर्वांचे दर्शन झाले तरी मॉस्कोच्या भव्यतेची साक्ष पटायला मुळीच वेळ लागत नाही. पण या सर्व वास्तूंवर आत्मप्रौढीचे आवरण पसरलेले आहे असे सतत वाटते. सत्तेचा दर्प सर्वत्र पदोपदी जाणवतो.

बेलग्रेडची प्रकृती या सर्व शहरांपेक्षा काहीशी निराळी. प्रदर्शन करता यावे एवढे वैभव नाही आणि सौन्दर्य प्रदर्शित व्हावे एवढी कलासंपन्नताही नाही. एखाद्या समाधानी मध्यम वर्गीय महिलेची आठवण करून देणारी ती नगरी. त्या प्रसन्नवदनेजवळ अकृत्रिम आदरातिथ्यशीलता आणि अनौपचारिक आत्मीयता मात्र भरपूर. संपन्नता बेताची, पण स्नेहभाव मात्र उत्कट.

शेजारच्या सहप्रवाशाने तंद्रीतून जागे केले नसते तर आणखी कितीतरी वेळ त्या गोड स्वप्नात मी रमलो असतो. त्याला गप्पा मारायची लहर आली असावी. पत्रकार परिषदेच्या यशापयशाविषयी आमची चर्चा सुरू झाली. पण त्यातून लौकरच विमानसुंदरीने माझी सुटका केली. अल्पोपहाराची वेळ झाली होती. विमानात दर तासअर्धातासाने प्रवाश्यांना काहीतरी खायला, प्यायला दिलेच पाहिजे असा जणू संकेतच असावा. प्रवासात काहीतरी विरंगुळा हवाच की! सूचनेप्रमाणे सर्वजण तयार झाले. गरम पदार्थ समोरच्या डिशमध्ये गर्दी करू लागले. आपापल्या प्रकृतिमानाप्रमाणे पेयांची मागणी होऊ लागली. दोन तास कसे निघून गेले ते समजलेही नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि ........

# पुनश्च मॉस्को

## क्रांति-दिनाची तयारी

मोस्को दृष्टीच्या टप्प्यात आले होते. पण तेवढ्यात हिमवृष्टि सुरू झाली. अचानक सर्व वातावरण पार बदलून गेले. सोसाट्याचा वारा आणि बर्फाचा वर्षाव यांची स्पर्धा सुरू झाली. आकाश झाकळून गेले. हिमवर्षावाला न जुमानता विमान ताशी पाचशे मैलांच्या वेगाने धावत होते. खाली जमीन दिसत नव्हती आणि वर आकाशाचाही पत्ता लागत नव्हता. कोठेच काही दिसत नव्हते. कोणी कोणाशी बोलत नव्हते. पावसाच्या सरीवर सरी येत होत्या. विमानाचा आवाज अधिकच वाढल्यासारखा वाटला. विमानात गंभीर वातावरण आणि बाहेर लहरी हवामान. थोड्या वेळाने दूर कोठेतरी अंधूक दिवे दिसू लागले. पण क्षणात दिसत आणि क्षणात अदृश्य होत. त्यामुळे प्रवाशाना तरी नेमकी काहीच कल्पना येत नव्हती. पण त्या ' अज्ञात प्रदेशात ' फार काळ तरंगत रहावे लागले नाही. मॉस्को विमानतळ जवळ आल्याची घोषणा झाली. प्रवासी उतरण्याच्या तयारीने आपआपल्या जागी सावरून बसले. कागदपत्रे तपासून पाहू लागले.

मॉस्को विमानतळवर आम्ही उतरलो तेव्हा सर्वत्र बर्फच बर्फ पसरलेला होता. पूर्वीच्याच दुभाषांनी आमचे स्वागत केले. त्यांच्याबरोबर पत्रकार मात्र कोणीही नव्हते. पहिल्या फेरीच्या वेळीही मॉस्कोच्या ' लेलिनग्राड ' स्टेशनवर पत्रकार आले नव्हते. ताष्कंद, लेलिनग्राड, प्राग इत्यादि ठिकाणचा असा अनुभव नव्हता. प्रत्येक ठिकाणी स्थानिक पत्रकार येत असत. पण मॉस्कोत मात्र तसा प्रकार घडला नाही. विमानतळापासून हॉटेल युक्रेनियापर्यंत दुभाषाने दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम सांगून टाकला. शहरात क्रांति-दिनाच्या महोत्सवाची तयारी धुमधडाक्याने चाललेली दिसत होती. प्रमुख लोकमार्गावर आणि भव्य चौकात लाल तारे व दिव्यांचा झगझगाट दिसत होता. रंगीबेरंगी पताका आणि घोषणा रस्त्यावर लावल्या होत्या. काही ठिकाणी प्रमुख पुढाऱ्यांची प्रचंड छायाचित्रे टांगलेली होती. त्यात, मार्क्स व लेनीन, काही ठिकाणी क्रुश्चेव्ह आणि काही जागी अध्यक्ष मंडळाचे इतर नेते यांची छायाचित्रे होती. स्टालिनचा मात्र कोठेच पत्ता लागला नाही.

रस्त्यावर बर्फ पडत होता. त्याचे थर साचत होते. काही वृद्ध स्त्रिया बर्फाचे थर झटपट दूर सारीत होत्या. अंगात पांढरा पायघोळ झगा आणि पायात काळे बूट घात-

लेल्या त्या वृद्धा कडाक्याच्या थंडीतही आपले काम अतिशय चपळतेने करीत होत्या. झाडावर, उद्यानात, हिरवळींवर, इमारतींवर सर्वत्र बर्फच बर्फ. रस्त्याने जाणारे सुखवस्तु नागरिक गरम लोकरीचे कपडे घालून जात होते. पण एकंदर रस्त्यावर वाहतूक फार तुरळक होती. जवळ जवळ शुकशुकाटच होता.

हॉटेल युक्रेनियाचे वातावरण परिचित होते. क्रांति-दिनाच्या सोहळ्यासाठी हॉटेलमध्ये परदेशी पाहुण्यांची खूप गर्दी झाली होती. आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांचे आणि विवध रंगांचे पाहुणे प्रशस्त लॉजमध्ये गप्पा मारीत बसले होते. हॉटेलच्या विक्रीकेंद्रांत भेटीदाखल द्यावयाच्या वस्तूंची संख्या वाढली होती.

## भूगर्भातील किमया

मॉस्कोतील भुयारी रेल्वे परदेशी प्रवाशांनी पाहिलीच पाहिजे असा रशियन माणसाचा आग्रह असतो. रशियाच्या कलेचे, कल्पकतेचे आणि परिश्रमाचे ते मानचिन्ह मानले जाते. विजेच्या पायऱ्यांवरून आम्ही भूमिगत झालो आणि मेट्रोच्या एका स्टेशनात थांबलो. सभोवती नजर फिरवली आणि भूगर्भातील ती किमया पाहून अक्षरशः थक्क झालो. तो मार्ग आखणाऱ्या अज्ञात स्थापत्यशास्त्रज्ञापासून तों पूर्ण करणाऱ्या कल्पक कलावंतांपर्यंत सर्वांना मनातल्या मनात धन्यवाद दिले. त्यांची कारागिरी, त्यांची कल्पकता, परिश्रम यांचे ते समूर्त स्वरूप पाहून दिपून गेलो. दर पांच सात मिनिटांनी स्टेशनच्या सुंदर 'दिवाणखान्यात' गाडी यायची, प्रवाशांनी जागा असेल त्याप्रमाणे बसायचे. जागा नसेल तर पुढच्या गाडीची वाट पहायची. गाडी थांबताच डब्याची दारे आपोआपच उघडत आणि पुढे चालू लागले की दारे तशीच बंद होत. गाड्यांची स्वच्छता आणि सौंदर्य कांही आगळेच होते. बसण्याच्या जागा प्रशस्त आणि आरामशीर. डब्यात भरपूर प्रकाश आणि ऊब. कसलाही आवाज नाही. गाडीच्या चाकांची खडखड नाही, प्रवाशांची बडबड नाही. कांही जण बोलत होते ते अगदी ओठातल्या ओठात. बरेचजण वाचीत होते.

अर्धा पाऊण तास मेट्रोतून प्रवास केला. तेवढ्या अवधीत सहासात स्टेशने आली आणि गेली. प्रत्येक स्टेशन म्हणजे शिल्पकलेचा अप्रतिम नमुना. संगमरवरी खांब, त्यावरील नाजूक नक्षीकाम; रचनेचे वैचित्र्य, रंगांची विविधता, आकर्षक प्रकाश योजना; सर्वच कांही नेत्रदीपक, भव्य ,सुंदर, आकर्षक. आश्चर्यचकीत करणारी ती पाताळनगरी. कोणीही दिपून जाईल.

पण आश्चर्याचा पहिला भर ओसरल्यावर मात्र अनेक प्रश्नांनी भंडावून सोडले. शहरात इतरत्र दिसले नाही असे कलापूर्ण बांधकाम भूगर्भात करण्याचे प्रयोजन काय? बादशाही रंगमहालाला मागे सारील एवढे भव्य बांधकाम या रेल्वेमार्गासाठी खरोखरच आवश्यक होते काय? त्यात उधळपट्टी किती आणि उपयुक्तता किती? मी

सहज दुभाषाला माझ्या शंका बोलून दाखविल्या. तो फक्त हसला आणि म्हणाला, ' हें बांधकाम चालले होते तेव्हा मी दहा बारा वर्षांचा असेन. ' त्याने लगेच विषय बदलला.

मॉस्कोच्या वाढत्या लोकसंख्येच्या वाहतुकीसाठी भूयारी रेल्वेची गरज असू शकते; पण त्यासाठी संगमरवरी नक्षीकामाच्या एवढ्या खर्चिक बांधकामाची गरज मात्र मनाला पटत नव्हती. मेट्रोचे एक एक स्टेशन म्हणजे अलीशान ' सरंजमशाही ' महाल, भव्य ' बुर्ज्वा ' प्रासाद, आणि ' प्रोलेटरिएट ' सत्ताधाऱ्यांच्या वैभवाच्या प्रदर्शनाचा मूर्तिमंत आविष्कार वाटतात.

मला तरी ते बांधकाम म्हणजे संपत्तीचा व मानवी शक्तीचा अपव्यय का वाटत होता ? अलिकडे मॉस्कोच्या अनेक भागात घरबांधणीची कामे चालू आहेत; तरी त्या शहरात सर्वांत टंचाई आहे ती घरांची. मग मेट्रोचे बांधकाम झाले तेव्हा काय अवस्था असेल ! अद्यापहि अनेक चाळीवजा इमारतींत चार पाच कुटुंबांना मिळून एकाच सामाईक स्वयंपाकघराचा वापर करावा लागतो. एका गृहिणीचा स्वयंपाक संपल्यावर दुसरीला तेथे जागा मिळते. तिच्या मागे तिसरी ग्रहिणी खोळंबून उभी असते. गेल्या चार पाच वर्षांत ही परिस्थिती बदलत असल्याचे दुभाषाने सांगितले. पण ती अद्याप पूर्णपणे बदललेली नाही. घरांचा तुटवडा कायम आहे. घर मिळविण्यासाठी वशिले-बाजीचे प्रकार घडतात, अशी तक्रारवजा पत्रे अलिकडे वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत अस-ल्याचे सांगण्यात आले.

●

भूयारी रेल्वेचा प्रवास संपवून भूमीवर आल्यावर राजमार्गावर मनसोक्त भटका-यचे ठरविले होते. क्रांति-दिनाच्या महोत्सवामुळे बाजारात सगळीकडे मालाची रेलचेल होती. लालचौकानजीक ' गम ' हे मॉस्कोतील सर्वात मोठे वस्तु-विक्री-केंद्र आहे. आंत प्रवेश केल्याबरोबर त्याचे सर्वव्यापी स्वरूप लक्षात आले. छोट्याशा खेळण्यापासून दागिन्यापर्यंत ' सबकुछ ' मिळण्याचे ते ठिकाण असल्यामुळे गिऱ्हाइकांची खूप गर्दी होती. दररोज एक ते दीड लाख गिऱ्हाइके या दुकानातून विविध वस्तू विकत घेतात. अर्थात वस्तूंच्या पुरवठ्यावर गिऱ्हाइकांची संख्या अवलंबून आहे. काही वेळा आठवडेच्या आठवडे काही वस्तूंचा तुटवडा पडतो, तर काही मालासाठी नेहमीच ' क्यू ' लावावा लागतो. दालनामागून दालने ओलांडली तरी ' गम ' ची विविधता संपली नाही. गिऱ्हा-इकांची गर्दी होती तरी त्यात बेशिस्त नव्हती. गोंधळ, गडबड नव्हती. प्रत्येक दालना-बाहेर काचेच्या दर्शनी कपाटामध्ये ठेवलेल्या वस्तूवर किंमती लिहिलेल्या होत्या. आंत जाऊन तेवढी किंमत द्यावची आणि पावती दाखवून विक्रेत्याकडून वस्तू घ्यावयाची व चालू लागायचे. वस्तूच्या गुणदोषाविषयी तक्रार करायला वाव नाही. आणि भावाची घासाघीस करायचे तर मुळीच कारण नाही. दर्शनी कपाटात ज्या वस्तू ठेवलेल्या होत्या

त्याच दालनात असतील. तेथे नसलेली वस्तू दालनातही नाही असे समजून तिची विचारपूस करण्याचे कारण नाही.

'गम' प्रमाणे इतर काही छोट्या मोठ्या वस्तूकेंद्रातही गेलो. काही वस्तूंचे भाव विचारले. वानगीदाखल पुढील वस्तूंचे भाव पहा : ( सव्वा रुबल= एक रुपया )

| | |
|---|---|
| २० सिगारेटचे पॅकेट | ३ रुबल्स |
| ३ अंडी | ५ रुबल्स |
| १ पौंड मांस | ८ रुबल्स |
| फौंटन पेन ( बऱ्यापैकी ) | ६० रुबल्स |
| मोजे जोड | १५ रुबल्स |
| बूट ( मध्यम प्रतीचा ) | १२० रुबल्स |
| शर्ट ( सुती ) | ३० रुबल्स |
| फेल्ट हॅट ( लोकरीची ) | १५० रुबल्स |
| सूट ( जाडाभरडा, लोकरीचा ) | ६०० रुबल्स |
| सूट ( लोकरीचा ) | ९०० रुबल्स |

आमचा दुभाषा आमच्या सारखाच मध्यम वर्गीय होता. तो आणि त्याची पत्नी दोघेही मिळवते आहेत. त्याने आपल्या कुटुंबाचा जमाखर्च सांगितला. मॉस्कोतील मध्यम वर्गाचा प्रातिनिधीक जमाखर्च म्हणून त्याचा विचार करायला हरकत नाही. त्यावरून राहणीमानाचीहि कल्पना येऊ शकेल. पतीला ७५० रुब्लस व पत्नीला ४७५ रुबल्स मासिक वेतन मिळते. पत्नी एका कचेरीत टायपिस्ट आहे.

महिन्याकाठी पतिपत्नीच्या मिळून १२२५ रुबल्स प्राप्तीतून होणाऱ्या खर्चाचा स्थूलमानाने तपशील असा :

| | |
|---|---|
| अन्नधान्य | ६५० रुबल्स |
| कपडे | २५० रुबल्स |
| घरभाडे व वीज | ५० रुबल्स |
| घरातील इतर वस्तू | १०० रुबल्स |
| पुस्तके, करमणूक इ. | ५० रुबल्स |
| उत्पन्नावरील कर | ८० रुबल्स |
| वाहन व इतर किरकोळ | ५० रुबल्स |

कारखान्यात काम करणाऱ्या सर्वसाधारण कामगार पतीपत्नींना मिळून ६५० ते ७०० रुबल्स मासिक वेतन मिळते. त्यांच्या मिळकतीचा सुमारे तीन चतुर्थांश भाग खाद्यपदार्थांसाठी खर्च होतो. त्यामुळे त्याला कपडे व इतर वस्तूंसाठी बरीच काटकसर करावी लागते. ओढाताणही सोसावी लागते.

रशियात शिक्षणासाठी खर्च करावा लागत नाही आणि वैद्यकीय मदतही मोफत मिळते. ज्याला नवे घर मिळाले तो भाग्यवान समजायचा. कारण घरभाडे फार थोडे द्यावे लागते. वृद्धापकाळात सेवानिवृत्ती वेतन मिळण्याची हमी असल्यामुळे पैसे साठवून ठेवण्याची तितकीशी गरज नसते आणि सामान्य मिळकतीच्या माणसाला तशी बचत करण्याची शक्यताही नसते.

दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किंमती फार असल्यामुळे त्यासाठीच उत्पन्नाचा मोठा वाटा खर्च करावा लागतो. कामगाराला बूट घेण्यासाठी दहाबारा दिवसांची मजुरी खर्चावी लागते आणि लोकरीच्या जाड्याभरड्या कपड्यासाठीही दोन महिन्याचे वेतन खर्ची घालावे लागते. पण थंड प्रदेशात या दोन्ही वस्तू अपरिहार्य आहेत. काही कामगारांच्या पायात कॅन्व्हासचे बूट दिसले. त्यांना चामड्याचे बूट विकत घेणे अद्याप शक्य झाले नाही, एवढाच त्याचा अर्थ.

१९५६ पूर्वी तर सेवानिवृत्तीच्या वेतनाचीही ( पेन्शन ) निश्चिती नसे आणि ते सातत्याने मिळेलच याचीहि खात्री नसे. पण निवृत्तीवेतनाच्या नव्या कायद्याप्रमाणे नोकराला त्याच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतन मिळते. काही जोखमीच्या धंद्यांत ते १०० टक्क्यापर्यंतही दिले जाते. मात्र ते महिन्याकाठी १५० रुबलसपेक्षा कमी आणि ६०० रुबलसपेक्षा अधिक दिले जाऊ नये असा एक नियम आहे.

सामुदायिक शेतीवर काम करणाऱ्या शेतकऱ्यांना सेवानिवृत्तीचे वेतन किंवा तत्सम निश्चित मिळकत मिळत नाही. त्यामुळें वृद्धापकाळी शेतकरी स्त्रीपुरुष जमेल तेवढे काम करून आपल्या मुलांच्या कुटुंबातच राहतात. कारखान्यातील आणि शहरातील सेवानिवृत्तांपैकी बहुतेक मातापिता आपल्या मुलांकडेच राहतात.

●

## राष्ट्रीय महोत्सव

७ नोव्हेंबर हा रशियाचा क्रांति-दिन. रशियन जनतेच्या जीवनात या दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेकडो वर्षांच्या सरंजामी शृंखला त्या दिवशी तुटून पडल्या व एका नव्या युगाचा उदय झाला. क्रांतीच्या वेळी तरुण असलेली पिढी आता जवळ जवळ अस्तंगत झाली. त्यानंतरची दुसरी पिढीही पन्नाशीच्या पुढे सरकली. तिसरी पिढी आज तारुण्याच्या उंबरठ्यावर आहे. या नव्या पिढीला प्रत्यक्ष क्रांतिकाळातील जीवनाची कल्पना नसली तरी, आपल्या देशाने गाठलेला प्रगतीचा पल्ला तिला आभिमानाचा वाटणे स्वाभाविक आहे. म्हणूनच क्रांति-दिनाचा महोत्सव रशियातील यच्चयावत लोक अत्यंत उत्साहाने साजरा करतात. मॉस्कोसारख्या राजधानीच्या ठिकाणी या उत्साहाला उधाण येत असल्यास नवल नाही. रशियाच्या सर्वोच्च

सत्तेचे पीठ म्हणून या शहराचे महत्त्व अशा क्रांति-दिनाच्या प्रसंगी सर्वार्थाने पटू शकते. रशियाच्या प्रगतीचे आणि ऐक्याचे, शस्त्रांचे आणि सामर्थ्याचे, नेतृत्वाचे आणि वैभवाचे दर्शन घडविण्याची ती सुवर्ण संधी. अर्थातच राजधानीत तो दिन अधिक वैभवशाली आणि नेत्रदीपक पद्धतीने साजरा केला जातो.

क्रान्ति-दिनाचा सारा समारंभ जवळून पाहता यावा म्हणून आम्हाला खास प्रवेशपत्रिका मिळाल्या होत्या. हॉटेल युक्रेनियापासून सकाळी सात वाजताच आम्ही लाल चौकाकडे निघालो. शहरातील सर्व वाहने जवळ जवळ बंद होती. लाल चौकाच्या परिसरात तर एकही वाहन फिरकताना दिसले नाही. हजारो लोक मुलाबाळांसह रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. थंडी चांगलीच जाणवत होती. पण अमाप उत्साहाने, थंडीला न जुमानता लोक जागा मिळेल तेथे उभे राहत होते. लाल चौकात फार थोड्या लोकांना प्रवेश देण्यात आला होता. काहीजण गॅलरीवर उभे होते, काही जणांसाठी लेनिन-स्टालिनच्या समाधीनजिक सोय केली होती. अनेकजणांना ' गम 'च्या बाजूला दाटी-वाटीने उभे राहावे लागले होते.

मागे वळून पाहिले. तेथे रशियन नेत्यांची प्रचंड चित्रे लावलेली होती. समोर लेनिन-स्टालिनची समाधी. त्यामागे क्रेमलीनचा भव्य तट. डाव्या बाजूला क्रेमलीनच्या महाद्वारासमोरच्या मोठ्या बुरुजावर चमकणारा लाल तारा आणि उजवीकडे काही अंतरावर एका भव्य चर्चचे उंच कळस. तोफांचा प्रचंड गडगडाट झाला आणि त्याबरोबर रशियन कम्युनिस्ट पक्षाचे नेते व मंत्री समाधीच्या गच्चीवर चढून गेले. मध्यभागी पंतप्रधान क्रुश्चेव्ह आणि रशियाचे अध्यक्ष उभे होते. समाधीच्या पुढच्या प्रचंड लाल चौकात लष्करी बँड सुरू झाला. त्याबरोबर चर्चच्या बाजूने निरनिराळ्या कामगार संघांच्या तुकड्या शिस्तबद्ध मिरवणुकीने येऊ लागल्या. आपल्या कारखान्याचे, सामुदायिक शेताचे अथवा व्यवसायाचे प्रतीक अग्रभागी घेऊन मिरवणुकीतील लोक निरनिराळ्या घोषणा करीत गटागटाने एकामागून एक चालले होते. गाणी म्हणत आणि खेळ करीत काही तुकड्या जाऊ लागल्या. पण सारे एका शिस्तीत, क्रांति-दिनाचे गांभीर्य ओळखून. दोन तासानंतर रशियन सैन्याच्या निरनिराळ्या विभागांच्या तुकड्या येऊ लागल्या. रणगाडे, विमानवेधी तोफा, प्रचंड रॉकेट इत्यादि रण-साहित्यांची रीघ लागली होती. आपल्या लष्करी सामर्थ्याची साधनसामुग्री पाहून प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करीत असत. तेवढ्यात आकाशात विमानांनी विविध आकृत्या करून रशियाच्या हवाई सामर्थ्याची चुणूक दाखविली.

सतत पाच तास क्रांति-दिनाचा अपूर्व सोहळा आम्ही पहात होतो. रात्री मॉस्को-पत्रकार संघात क्रांति-दिनानिमित्त मेजवानीचा कार्यक्रम ठरला होता. त्यानंतर लगेच रात्रीच्या विमानाने भारताकडे प्रयाण.

मॉस्कोहून भारताकडे परत निघालो तेव्हा, रशियाच्या दौऱ्याची मनावर झालेली प्रतिक्रिया अजमावून पहात होतो. रशियातील माणूस सुखी आणि संपन्न आहे काय ? त्याचे राहणीमान, त्याचे जागतिक घटनांविषयीचे ज्ञान, स्टालिनच्या काळातील त्याचे अनुभव, नव्या राजवटीविषयी त्याचे मत अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरे मी शोधू लागलो. रशियात विषमता आहे काय ? समाजात वर्ग आहेत काय ? लाच, वशिले, दिरंगाई यासारख्या शासकीय रोगांना नष्ट करण्यात शासनसंस्थेला यश मिळाले आहे काय ? त्या देशात चार दशकापेक्षा अधिक काळ मार्क्सवादाचा प्रयोग चालू आहे. 'सोव्हिएट मानव' म्हणून ज्याचे आगळे वैशिष्ट्य सांगता यावे असा नागरिक त्या समाजव्यवस्थेने निर्माण केला आहे काय ? स्टालिनच्या काळातील 'पोलादी पडदा', 'बंदिस्त समाज' या शब्दांचे अर्थ आणि संदर्भ बदलले आहेत काय ?

रशियाच्या आर्थिक प्रगतीने आता एवढा टप्पा गाठला आहे की तेथे यापुढे क्रांतिपूर्व काळातील दारिद्र्य दिसणार नाही. सामुदायिक शेतीच्या प्रयोगासाठी शेतकऱ्यांनी सोसलेला अमानुष छळ पुन्हा सोसण्याची त्यांच्यावर पाळी येण्याची शक्यता कमी. पण जीवनोपयोगी वस्तूंचा अद्यापही तुटवडा जाणवतो. दुकानांपुढे 'क्यू' दिसून येतात. खालच्या वर्गाला न परवडण्याएवढे वस्तूंचे भाव आहेत. असे असले तरी, दहा वर्षांपूर्वी जीवनोपयोगी वस्तूंसाठी झालेले अनन्वित हाल नजीकच्या भविष्यकाळात तरी होण्याचा संभव वाटत नाही. शास्त्रीय शोधात मारलेल्या आघाडीमुळे समाजात आशावादी दृष्टिकोन निर्माण झाला आहे. आपल्या प्रगतीचा रास्त अभिमान वाटावा अशी मनःस्थिती दिवसेंदिवस अधिक बळावत आहे. शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. त्या मार्गावरून कोणी मागे खेचायचे म्हटले तरी ते कोणाला शक्य होणार नाही. अर्थात हे शिक्षण रशियन नागरिकाला स्वतंत्र विचार करण्यास प्रवृत्त करू शकते की नाही ते सांगता येत नाही. सर्व विचार आणि प्रचार, सर्व कला आणि साहित्य, सर्व वृत्तपत्रे आणि रंजनाची साधने फक्त शासनसंस्थेच्या सहीशिक्क्यानिशीच बाहेर पडू शकतात. देशातील व परदेशातील घटना अशा सरकारी मार्गांनीच कळू शकतात. त्यांच्या खरेखोटेपणाचा पडताळा पाहण्याची सोय नाही, शक्यता नाही. रशियन नागरिक खूप वाचन करतो. पण कोणती पुस्तके वाचायची ते अगोदरच पक्षाने ठरवून ठेवलेले असते. कोणती पुस्तके प्रकाशित करायची, कोणती प्रकाशित झालेली मागे घ्यायची, हे सर्व शासकीय पातळीवरूनच ठरते.

सामान्य रशियन माणसाला लोकशाहीची कल्पना समजत नाही. संसदीय लोकशाहीचा मार्ग त्याला आकलन होऊ शकत नाही. लोकशाहीच्या मार्गाने विकास होऊ शकतो यावर त्याचा विश्वास बसत नाही. रशियाच्या समाजव्यवस्थेखेरीज दुसऱ्या समाजव्यवस्थेची त्याला जाणीव

नाही. विचारविनिमयाला स्थान नाही. विचारसंघर्षाचे नाव नाही. राज्यकर्त्यांवर लोकमताचा प्रभाव पडण्याची शक्यता नाही. न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य अस्तित्वात नाही. मार्क्सवाद आणि लेनिनवाद यांच्याखेरीज इतर विचार नागरिकाला माहीत नाहीत. कम्युनिस्ट पक्षाच्या हेतूशी जुळणारे ते पुरोगामी, न जुळणारे ते प्रतिगामी, ही व्याख्या त्याने शालेय जीवनापासून पाठ केलेली असते. त्यात विचारभिन्नतेला स्थान नाही. राजकीय चर्चा करण्यास तो तयार नसतो. तो त्या बाबतीत धास्तावलेला तरी असतो किंवा उदासीन तरी असतो.

रशियन नागरिक शांततावादी आहे. जगातील इतर कोणत्याही देशाचा नागरिक शांततावादी असेल तेवढाच तो शांततावादी आहे. पण लोकमताचा लंबक शांततवादाकडून प्रक्षोभाकडे आणि प्रक्षोभाकडून शांततेकडे नेणे रशियातील एकपक्षीय शासनसंस्थेला जेवढे सोपे असते तेवढे इतर ठिकाणी शक्य नसल्यामुळे तेथील नागरिकाचा शांततावाद वा अशांततावाद सर्वस्वी शासनाच्या प्रचाराधीन बनतो. म्हणूनच रशियन नागरिकाचे पूर्वग्रह फार दांडगे असतात. त्याने एकच बाजू सतत ऐकलेली असते. त्याचे परकीयाबद्दलचे प्रेम आणि द्वेष, राग आणि लोभ अति तीव्र बनलेले असतात तेही त्यामुळेच. त्याला बाहेरच्या जगाची फार कमी माहिती असते. जेवढी माहिती असते तीही एकांगी.

सध्याच्या रशियन राज्यकर्त्यांनाही युद्ध नको आहे. पुढचे युद्ध, मग ते कोणाकडूनही सुरू होवो आणि कोणत्याही 'क्रांतिकार्यासाठी' केले जावो, त्यात अणुशस्त्रांचा वापर होण्याची शक्यता रशियन राज्यकर्ते नाकारू शकत नाहीत. अशा युद्धांत घडून येणाऱ्या सर्वनाशात, गेल्या चाळीस वर्षांत अत्यंत कष्टपूर्वक उभारलेली संपत्ती, संस्कृती आणि समाजरचना उध्वस्त होईल याची त्यांना चांगली कल्पना आहे. त्यांनी 'आक्रमक क्रांतिवादा'ची दिशा बदलून 'शांततामय सहजीवनां'चे धोरण स्वीकारले आहे.

रशियाच्या शेती उत्पादनाचे, औद्योगिक उत्पादनाचे आकडे सरकारी प्रचारसाहित्यात दिलेले असतात. पण ते तपासून पाहण्याची सोय नसते. अनेकदा केवळ टक्केवार माहिती दिलेली असते, पण मूळ आकड्यांचा पत्ता नसतो. काही वेळा तुलनात्मक आकडे दिलेले असतात. पण त्या तुलनेचा पायाभूत आकडा नमूद केलेला नसतो. ( इतर देशात असे आकडे प्रसिद्ध केले जातात व अनेक इतिवृत्तांवरून ते तपासता येतात, ताडून पाहता येतात. )

उत्पादनाचे आकडे दरवर्षी वाढतच जात असले तरी त्या उत्पादनाचा उपयोग कोणत्या क्षेत्रात किती प्रमाणात होतो ? पोलादाच्या उत्पादनात दहा वर्षांपूर्वीपेक्षा अमूक पटीने अधिक वाढ झाली आहे असे म्हटले जाते, तेव्हा त्यापैकी दारूगोळा, शस्त्रास्त्रे अणुशस्त्रे आणि तत्सम

साहित्य निर्मितीसाठी किती खर्ची पडले आणि घरबांधणी, कापड-गिरण्या, वाहतुकीची साधने यांच्यावर किती खर्च झाला यांची तपशीलवार फोड जाहीर करण्याची रशियात प्रथा नाही. अद्यापही तेथे अवजड आणि भारी उद्योगधंद्यांवर अधिक भर दिला जातो. त्याचा परिणाम जीवनोपयोगी वस्तूंच्या तुटीवर होतो. तेथील आर्थिक विकासात समतोलपणा नाही म्हटले जाते ते याच दृष्टीने. काही क्षेत्रात उत्पादन खूपच पुढे गेलेले, तर काही क्षेत्रात खूपच मागे पडलेले असते.

रशियन राजकर्त्यांना खंत वाटावी असा विभाग आहे तो शेतीचा. सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू होऊन तीस पस्तीस वर्षे झाली. पण भूमी अद्याप अपेक्षेप्रमाणे सफल झाली नाही. गरजेइतके ती देत नाही. त्यामुळे धान्योत्पादनात हवे ते यश लाभत नाही. ही गोष्ट क्रुश्चेव्हच्या काळात कांही अंशी जाहीर होऊ शकली. पूर्वी तीही शक्यता नव्हती. **स्टालिनच्या काळात शेती उत्पादनाचे खोटे आकडे जाहीर करण्यात येत असत असे क्रुश्चेव्हनेच म्हटले आहे.** विसाव्या काँग्रेस पुढे केलेल्या भाषणात क्रुश्चेव्ह म्हणतो, "शेतीच्या प्रगतीसंबंधी स्टालिनचे अज्ञान विलक्षण होते. पण त्याला त्या अज्ञानासंबंधी कोणी कांही सांगू शकत नव्हते. त्याने देशात कधीही प्रवास केला नाही, प्रत्यक्ष शेती पाहिली नाही. शेतकऱ्यांचे जीवन किती कष्टपूर्वक चालले आहे याकडे त्याने लक्ष दिले नाही. त्याला शेतीच्या प्रगतीचे दर्शन व्हायचे ते चित्रपटांच्या द्वारे. आणि हे चित्रपट, प्रत्यक्ष वस्तुस्थिती लपवून ठेवून नटविलेल्या आणि सजविलेल्या स्वरूपात शेतीचा विकास दाखवीत असत. अशा अनेक चित्रपटांत भरघोस पीक दाखविले जाई. कोंबड्या आणि बदके अनेक पटींनी मोठी करून दाखविण्याची किमया त्यात असे. शेतकरी कुटुंबाच्या चेहऱ्यावर कृत्रिम हास्य त्यात दाखविले जाई. हे सर्व पाहून स्टालिनला असे वाटे की शेतीच्या क्षेत्रात केवढी प्रगती चालू आहे. उत्पादनाचे आकडे फुगवून सांगण्याची प्रथा तर सर्रास पडली होती. मागच्या वर्षापेक्षा पुढच्या वर्षाचे पीक काही हजार टनांनी अधिक दाखविले नाही तर, शिक्षा भोगावी लागणार. या भीतीच्या पोटी पिकाची वाढ फुगलेल्या आकड्यात प्रसिद्ध होत असे."

रशियाने विज्ञानक्षेत्रात केलेली प्रगती नेत्रदीपक आहे. अल्पकाळात त्या देशाने मारलेली आघाडी अद्वितीय आहे. ही प्रगती रशियातील मार्क्सवादी विचारांचा आणि आचारांचा परिपाक असल्याचे सांगितले जाते. विज्ञान आणि राजकारण, तंत्रविद्या आणि विशिष्ट सैद्धान्तिक विचार यांचा अन्योन्य संबंधही मार्क्सवादी तत्वानुसार विशद केला जातो. पण तसे मानले तर साम्राज्यवादी राष्ट्रांनीही डोळे दिपविणारी विज्ञान-प्रगती केली. हिटलरच्या नाझी राजवटीत जर्मनीने जगाला आश्चर्यचकित करून टाकणारे शोध लावले. जपानच्या बाबतीतही असेच विधान करता येईल. वाफेपासून अणुपर्यंत असे अनेक अद्‌भुत शोध, रशिया ज्याला साम्राज्यवादी, फॅसिस्ट इत्यादि

विशेषणे लावतो अशा राष्ट्रांत लागले आहेत. मग अगोदरचे असे संशोधन ' साम्राज्य-वादी ' समजायचें कीं ' फॅसिस्ट ' ?

पण हे सर्व असले तरी, रशियासारख्या अर्ध मागासलेल्या देशाने विज्ञानक्षेत्रात केलेले उड्डाण निश्चितपणे प्रशंसनीय आहे. अर्थात त्याचे मूल्यमापन करताना तेथील शास्त्रीय संशोधनामुळे दिपून गेलेल्या दृष्टीला, त्या देशाच्या हुकूमशाहीने केलेल्या अमानुष छळाचे सत्य दुर्लक्षिता येऊ नये. हुकूमशाहीच्या आसुडाने रक्तबंबाळ झालेल्या लोकांच्या कष्टातून, अपार दुःखातून आणि यातनांतून ते सर्व घडले आहे. हुकूमशाहीने ते अपरिहार्य मानले व मार्क्सवादाने समर्थनीय ठरविले. रशियाच्या अर्थव्यवस्थेला न झेपणारे, न पेलणारे चाललेले अंतराळसंशोधन शास्त्रीय आहे तसेच राजकीयही आहे.

रशियात विषमता आहे. निरनिराळ्या वर्गांना बोचण्या इतपत ती अधिक आहे. आर्थिक मिळकत, सामाजिक प्रतिष्ठा, सत्तास्थान अशा निरनिराळ्या कारणांनी समाजात वर्ग पडलेले आहेत. अकुशल कामगार, सामुदायिक शेतीत काम करणारे शेतकरी, शहरात सफाईची कामे करणारे लोक इत्यादि लोकांचा सर्वांत खालचा वर्ग आहे. कारकून, शिक्षक, ड्रायव्हर, नर्सेस, विक्रेते इत्यादींचा गरीब मध्यम वर्ग; आणि इंजिनियर, डॉक्टर, कारखान्याचे व्यवस्थापक, सामुदायिक शेतीचे डायरेक्टर यांचा सधन वर्ग. शास्त्रज्ञ, संशोधक, लेखक, कलावंत यांचा खूप श्रीमंत वर्ग, संपत्तिमान वर्ग. ही वर्गवारी सामान्यतः आपल्या देशातील वर्गवारीपेक्षा फारशी निराळी नाही. पण या सर्वांपेक्षा उच्चस्थानी असलेला वर्ग म्हणजे राजकीय सत्तेच्या आसनावर गेली त्रेचाळीस वर्षे विराजमान झालेला एकमेव कम्युनिस्ट पक्ष.

वरील निरनिराळ्या वर्गांत खूप मोठी आर्थिक तफावत आहे. तिला अनुसरून राहणीमानात स्पष्ट फरक दिसतो. वस्तू खरेदी करण्याच्या त्यांच्या पद्धतीत फरक पडतो. घरे, घरातील सामान, कपडेलत्ते, जीवनाच्या इतर गरजा भागविणाऱ्या वस्तू, करमणुकीची साधने या सर्वांच्या दृष्टीने वर्गीय भेद सहज लक्षात येतो.

समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत आणि थरांत काम करणाऱ्यांना मिळणाऱ्या मिळकतीत किती विविधता आणि विषमता असते याचे प्रमाण लक्षात येण्यासाठी काही व्यवसायातील मासिक प्राप्तींचे आकडे उद्‌बोधक वाटतील. ( सव्वा रुबल = १ रुपया )

| | | | |
|---|---|---|---|
| कामगाराला किमान वेतन | २७० | | रुबल्स |
| सर्वसाधारण कामगार | ३५० ते | ४०० | रुबल्स |
| हॉटेलमधील वेटर | ४५० ते | ६०० | " |
| दुकानातील विक्रेता | ५०० ते | ६०० | " |
| दुकानाचा व्यवस्थापक | ६५० ते | ८०० | " |
| डॉक्टर | ७०० ते | ८०० | " |
| शिक्षक | ८०० ते | १००० | " |

| | |
|---|---|
| संपादक | २५०० ते ५००० ” |
| प्राध्यापक ( आरंभी ) | ३००० ” |
| प्राध्यापक ( ५ वर्षांनंतर ) | ४५०० ते ५५०० ” |
| कारखान्याचा डायरेक्टर | ७५०० ते १०००० ” |
| निवडक प्राध्यापक व संशोधक | २०००० ते ३०००० ” |

काही लेखक, शास्त्रज्ञ, संशोधक आणि कलावंत यांना तर वेतन आणि / किंवा रॉयल्टी मिळून वर्षाकाठी ५ ते १० लक्ष रुबल्सपर्यंत मिळकत मिळते.

शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांना समाजात आगळे स्थान आहे. सत्ताधाऱ्यांच्या साहित्य-मूल्यांशी आणि कला-ध्येयाशी जुळवून घेणारे लेखक आणि कलावंत अत्यंत लाडके मानले जातात. त्यांना अमाप पैसा मिळतो. साहाजिकच त्यांची सुखाची साधनें, चैनीचे प्रकार यांची कल्पना खालच्या वर्गाला येणार नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदाला इतर नागरिकापेक्षा अधिक सवलती असतात. सत्तेच्या साखळीतील महत्वाचा दुवा म्हणून त्याला कोठेही प्रवेश मिळतो. सार्वजनिक ठिकाणी त्याचे स्थान उच्च मानले जाते. देशात प्रतिस्पर्धी पक्षच नसल्यामुळे त्याचे भय बाळगण्याची गरज नाही. भय असते ते पक्षाच्या अंतर्गत सत्तास्पर्धेचे. आणि ही स्पर्धा इतर भांडवलदारी देशातील सत्तास्पर्धेपेक्षाही अधिक जीवघेऊ, अधिक भीषण असते.

रशियातील वर्गीय विषमतेतील एक अडचण अशी की ती ज्यांना बोचते, खुपते त्यांना तसे सांगताही येत नाही. कारण सोव्हिएट समाजात वर्ग नसतात असे गृहीतच धरलेले असते. शिवाय, सर्वच उत्पादनसाधने जनतेच्या मालकीची असल्यामुळे कोण कोणाची पिळवणूक करणार ! आणि मग विषमता तरी का व कशी मानायची ?

उत्पादनसाधनांच्या केवळ मालकीमुळे नव्हे, तर त्यावर नियंत्रण ठेवणारांच्या श्रेणीमुळेही समाजात वर्ग निर्माण होतात, हे त्यात गृहीत धरले जात नाही.

क्रुश्चेव्हच्या काळात थोडी परिस्थिती बदलली आहे. खालच्या वर्गातील लोक वरिष्ठाविरुद्ध वर्तमानपत्रात तक्रारी करु शकतात. ‘ उच्चभ्रू ’ शिष्टांची उपरोधपूर्ण शब्दात हजेरी घेतां येते. कारखान्याच्या व्यवस्थापकाच्या लबाड्या वृत्तपत्रात जाहीर करता येतात. कारभारातील द्विरुक्ती, गोंधळ आणि दिरंगाई यांना वाचा फोडता येते.

क्रुश्चेव्हने आणखी काही क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या आहेत. त्याने आर्थिक नियोजनाच्या क्षेत्रात विकेंद्रीकरण केले. त्यामुळे औद्योगिक संस्थाने विभागली. कारखान्याच्या संचालकांच्या सत्तेला तडाखा बसला. शेतकऱ्याला आपल्या घराभोवतीच्या प्लॉटमध्ये काढलेले पीक विकण्याची परवानगी मिळाली. कामगारांना किमान वेतनाची हमी दिली. अशी हमी नसलेल्या कामगारांची संख्या आता फारच थोडी असेल. स्टालिनच्या काळात वेतनाची शाश्वती वाटत नव्हती, ती आता वाटू लागली. नागरिकाला राज्यात प्रवास करण्यावरील बंधने शिथील केली. गुप्तहेरांचा ससेमिरा

५५७५०६

कमी झाला. लोकांच्या मनावरील दहशतीचे वातावरण काढून टाकले. सायबेरियात हद्दपार झालेल्या लक्षावधी लोकांचे पुनर्वसन केले. परदेशी प्रवाशांना सवलती मिळू लागल्या. जगात रशियाला मित्र-राष्ट्रे जोडली. तटस्थ राष्ट्रांचा संबंध वाढविला. राज्य-कारभारातील गुप्तता कमी केली. वस्तूंच्या किंमती आणि रशियन नागरिकाच्या किमान वेतनाचे प्रमाण यांचा संबंध जोडला. त्यामुळे सर्वात खालच्या पातळीवरील माणसालाही उपजीविकेची किमान साधने मिळावीत एवढे वेतन देण्याचा उपक्रम सुरू झाला. जनतेचा आत्मविश्वास वाढविला. स्टालिनच्या मूर्तीवर प्रहार करून तर क्रुश्चेव्हने विभूती पूजेच्याच डोक्यावर जबरदस्त घनाघात केला आहे. त्याच्या या सर्वच सुधारणा रशियाच्या विशिष्ट संदर्भात ' क्रांतिकारक ' ठरतात.

●

रशियाची भूमी मागे पडली. खाली प्रचंड हिमपुरुष उभा होता. त्यावर मात करून विमान भारताच्या दिशेने वेगाने निघाले होते. मॉस्कोत एका पत्रकाराने म्हणून दाखविलेली कविता आठवली. पत्रकार संघाच्या कार्यालयात क्रांती-दिन साजरा होत होता. अडीचशे तीनशे पत्रकार त्यात सहभागी झाले होते. सभागृहात वाद्यांचे सूर निनादत होते. त्याला गाण्याची साथ मिळाली. वातावरण धुंद झाले होते. पत्रकार जोडपी टेबलावरून उठून नृत्य करू लागली. सभागृहाच्या लाकडी फरशीवर बुटांचा टक् टक् असा तालबद्ध आवाज होऊ लागला. माझ्या शेजारच्या रशियन पत्रकाराने हातातील चमच्याने ठेका धरला आणि गुणगुणायला आरंभ केला. मी म्हटले, ' जरा मोठ्याने म्हणा. आम्हांलाही ऐकायला मिळेल. ' तो मोठ्याने हसला व म्हणाला, ' मला गाता येत नाही. गीताचा इंग्रजी अनुवाद हवा तर सांगतो. रशियात अलिकडे तरुण वर्गात अत्यंत लोकप्रिय असलेल्या इव्हत्शेंको ( Evtushenko ) या कवीची ही कविता असून त्यात तो सायबेरियातील एका खेड्याचे वर्णन करतो. ऐन पंचविशीतील हा कवी म्हणतो :

" Truth is good and happiness better;
But without Truth there is no happiness. "

" सत्य हें उदात्त आहे आणि सुख तर त्याहून अधिक उदात्त;
पण सत्याशिवाय सुख नाही—समाधान नाही. "

●

समोर भारताची विस्तीर्ण भूमी दिसू लागली. दिल्लीच्या हवाई परिसरात विमान पोचले होते. दूरवर राजधानीतील कळस आणि मिनार दिसत होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६४२ दि: ...

REFBK-0015054
REFBK-0015054